# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—११/१२/२०१५

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ११/१२/२०१५ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

वि—२

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा दिनांक ११/१२/२०१५ रोजी दुपारी ३०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती अपेक्षा विकास पाटील हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. अपेक्षा विकास पाटील —— महापौर

२. श्रीम. पंचशीला नाना पवार —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर | ३७ | श्री. दिपक लछमनदास सिरवानी |
| ४ | श्री. राम (चार्ली) पारवाणी | ३८ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी |
| ५ | श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे | ३९ | श्री. राजू किशनचंद जग्यासी |
| ६ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | ४० | श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ७ | श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना | ४१ | श्रीम. वसुधा धनंजय बोडारे |
| ८ | श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर | ४२ | श्रीम. शकुंतला जग्यासी |
| ९ | श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल | ४३ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| १० | डॉ. महेश गजानन गावडे | ४४ | श्रीम. जयश्री जीवनलाल जग्यासी |
| ११ | श्रीम. अनिता संतोष तरे | ४५ | श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर |
| १२ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४६ | श्रीमती वंदना युवराज भदाणे उर्फ वंदना पाटील |
| १३ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४७ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १४ | श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी | ४८ | श्रीम. मंदा सागर सोनकांबळे |
| १५ | श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल | ४९ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १६ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन दवणे | ५० | ॲड. शैला पांडुरंग सोनताटे |
| १७ | श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी | ५१ | श्री. विजय रामभाऊ तायडे |
| १८ | डॉ. नीना प्रकाश नाथानी | ५२ | श्रीम. अनिता सचिन भानुशाली |
| १९ | श्रीम. मीना कुमार आयलानी | ५३ | श्रीम. कांचन अमर लुंड |
| २० | श्री. राजेश नानिकराम वधरिया | ५४ | श्री. सतराम फतनदास जेसवानी |
| २१ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५५ | श्रीम. जया मोहन साधवानी |
| २२ | श्रीम. जया प्रकाश माखीजा | ५६ | श्रीम. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी |
| २३ | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा | ५७ | श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे |
| २४ | श्रीम. शशिकला शिवाजी आवारे | ५८ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २५ | श्री. भगवान शंकर भालेराव | ५९ | श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे) |
| २६ | श्रीम. लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ६० | श्री. गुरूनो भिकोमल वलेचा |
| २७ | श्रीम. मिनू राजकुमार दासानी | ६१ | श्रीम. माया हरेश चावला |
| २८ | श्री. उमेश सुरेश (पप्पु) कालानी | ६२ | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे |
| २९ | श्रीम. वनिता बब्बू भटिजा | ६३ | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| ३० | श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर | ६४ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| ३१ | श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता | ६५ | श्री. प्रधान धर्मा पाटील |
| ३२ | श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती | ६६ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| ३३ | श्री. गोदुमल नारायणदास किशनानी | ६७ | श्री. सन्मुख ग्यानचंद मानवानी |
| ३४ | श्रीम. कमला गोदुमल किशनानी | ६८ | श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी |
| ३५ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ६९ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |

| | | | |
|---|---|---|---|
| ३६ | श्रीम. इंदिरा जमनादास उदासी | ७० | श्री.बी.बी. मोरे |

तर,
खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्री. राजु रामसिंग कंडारे, २. श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील, ३. श्रीम. आशा नाना बिराडे, ४. श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर, ५. श्रीम. ज्योती सुरेश कालानी, ६. श्री. गणपत गोविंद एडके, ७. श्रीम. खान इसरद सऊद, ८. श्रीम. जयश्री गजानन कांबळी, ९. श्री. रमेश महादेव चव्हाण, १०. श्री. विजय चाहु पाटील, ११. श्रीम. सोनिया राजू जग्यासी

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.
१. श्री. मनोहर हिरे, आयुक्त
२. श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त
३. सौ. प्राजक्ता मि. कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
४. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
५. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
६. श्रीमती मंगला माळवे, सहा. आयुक्त
७. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
८. श्री. भरत भठिजा, प्र. शहर अभियंता
९. श्री. शैलैश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक
१०. श्री. अनिल सितलानी, उप अभियंता, साबांवि
११. श्री. महेंद्र दिंडे, उप अभियंता, विद्युत
१२. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१३. श्री. दिपक ढोले, कनिष्ठ अभियंता, नगररचनाकार

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्रीमती नर्गिस खान
२. श्री. अशोक रामरख्यानी
३. श्री. मनिष भोवते

दुपारी ३.२५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

सदस्य, श्री.दिपक सिरवानी :— मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, सचिव महोदया साई पक्षातर्फे एक प्रस्ताव आहे.

सदस्य, श्री. नरेंद्र (कुमारी) ठाकुर :— मा. महापौरजी येथिल वार्ड ऑफीसर श्री. श्याम शिवनानी आता नुकतेच तीन दिवसांपूर्वी त्यांचे देहवसन झाले आहे आणि ते आता नुकतेच रिटायर्ड झाले होते तर त्यांचे आत्म्यास शांती देणेसाठी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहावे.

महापालिका सचिव :— कृपया श्रध्दाजंली साठी दोन मिनीटे संर्वानी उभे राहावे.

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी :— विश्व हिंदु परिषद चे अशोक सिंगल यांचे देखीलदेहवसन झाले आहे मी सर्व सदस्यांना निवेदन करू इच्छितो की, त्यांना दोन मिनीटे श्रध्दाजंली अर्पीत करावी.
सदस्य,श्री. सुनिल सुर्वे :— एक मिनीट श्री. बाबु शिंदे आपल्या युनियनचे पदाधिकारी होते ते देखील६ तारखेला वारले त्यांना देखीलदोन मिनीटे श्रध्दाजंली दयावी.

महापालिका सचिव :— कृपया श्रध्दाजंली साठी दोन मिनीटे संर्वानी उभे राहावे.

---

सुचकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर
श्री. प्रदिप रामचंदानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

## शोक प्रस्ताव

उल्हासनगर महानगरपालिकेचे प्र. प्रभाग अधिकारी व लघुलेखक श्री. श्याम शिवनानी यांचे नुकतेच काही दिवसांपूर्वी निधन झाले.

व विश्व हिंदु परिषदचे श्री. अशोक सिंगल यांचे सुध्दा काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे.

तसेच युनियनचे पदाधिकारी श्री. बाबु शिंदे यांचे दिनांक ६/१२/२०१५ रोजी निधन झाले.

वर उल्लेखिलेल्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ५९ ब दिनांक:—११/१२/२०१५

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. श्याम शिवनानी, श्री. अशोक सिंगल व श्री. बाबु शिंदे यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

⇨ विषय क्र. १ :— कल्याण—अंबरनाथ रस्त्ता रुंदीकरणामुळे बाधीत झालेल्यांच्या पुनर्वसनाबाबत धोरण निश्चित करणे.

यावेळी सदस्य श्री. धनंजय बोडारे यांनी सभागृहात प्रवेश केला.

सदस्या, श्रीमती. जया साधवानी:— मा. महापौर महोदया, शहर विकासासाठी कल्याण—अंबरनाथ रोडचे पुर्ण शॉपकिपर असोसिएशनच्या वतीने देखील आम्हाला निवेदन मिळाले आहे आणि या विषयावर आम्ही आमच्याकडुन चर्चा करु इच्छितो की सर्वप्रथम मा. आयुक्त साहेब मी आंपणास निवेदन करते की या कल्याण अंबरनाथ रस्त्याविषयी एक महत्त्वाची बाब ही विचारायची आहे की आज महापालीकेचा पुर्ण स्टाफ कल्याण—अंबरनाथ रोडला तयार करण्यासाठी जी तोडफोड होत आहे त्या ठिकाणी कार्यरत आहेत, माझे आपल्याला नम्रपणे निवेदन आहे आज या रस्त्याचे काम श्री. कापडनीस साहेब साभांळत आहेत आज ज्यांना देखील आम्ही विचारत आहोत अभियंत्यापासुन ते गार्डनमध्ये काम करणाऱ्यापंर्यत, अभियंते पासुन ते संर्वापर्यत ज्यांना कोणाला विचारले तर ते सांगतात की कल्याण—अंबरनाथ रस्त्यावर उभा आहे तर कल्याण—अंबरनाथ रस्ता तोडण्याव्यतिरीक्त पुर्ण उल्हासनगर मध्ये देखील पुष्कळ काम आहेत सॅनीटेशन डिपार्टमेंटला कोणाला विचारले तर ते देखील तेथे आहेत, सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियंते देखील तेथे उभे आहेत, गार्डनचा माळी देखील तेथे उभा आहे, तर एक पॉलीसी आपण येथे तयार केली असणार की ज्याची जेथे आवश्यकता आहे वेगवेगळे डिपार्टमेंट आहेत, तर ते त्या ठिकाणी असले पाहीजे या रस्त्या ऐवजी देखील या शहरात आणखी बऱ्याच समस्या आहेत तर त्याचे देखील निवारण आपल्याला करावयाचे आहे आणि गरज असल्यास सेनेटरी डिपार्टमेंटचे किंवा जे काही कामे असतील पेंडीग पेंडीग होत असतील तर ते वाईट वाटते अशा पुष्कळ बाबी आहेत जसे की आज ६ सेंटरवर डॉक्टर्स नाही आहेत मी त्या दिवशी गेली होती हेल्थ डिपार्टमेंन्टला चेकींग करणेसाठी तर त्या ठिकाणी एकही डॉक्टर आढळुन आला नाही. त्यांची वेळ संपली आहे आणि

रिअपॉईंटमेंट करावयाचे आहे, तर माझा हा आग्रह आहे की या कल्याण–अंबरनाथ रस्त्या व्यतिरीक्त जे इतर कामे उल्हासनगर शहरात आहेत त्यास देखील महत्त्व दिले जावे, हा एक विषय  झाला आणि दुसरे म्हणजे कल्याण – अंबरनाथ रस्त्यावर जितके ज्यांचे दुकाने गेले आहेत त्याबदली साईड त्यांना देणे गरजेचे आहे, कारण ते सर्व व्यापारी रस्त्यावर आलेले आहेत, ज्यांचे पुर्ण दुकाने गेले आहेत, काल पर्यंत जो राजा होता तळमजल्यापासुन ते चार माळयापर्यंत दुकाने होते ते तोडण्यात आलेले आहेत ते आता रस्त्यावर आलेले आहेत, त्या एका दुकानाचे नाही तर पुर्णचे पुर्ण कुटूंब त्यांचे बरोबर काम करणारे लोक त्यांचे देखील कुटूंब रस्त्यावर आलेले आहेत, आज आपले कर्तव्य आहे, जर आम्हाला त्यांनी सोबत दिलेली आहे जर आपण पुर्ण दुकानांची कटींग केलेली आहे तर आम्ही त्यांना पुर्ण मोबदला आमची कमिटी बसून निश्चीत करेल तर ते दिले जावे त्यांना मिळायला पाहीजे त्यांना आम्ही पुर्णच्या पुर्ण दुकान देवु इच्छितो दुसरा प्रश्न आहे की कोणाचे १० फुट गेले आहे कोणाचे १५ फुट गेले आहे कोणाचे ५ फुट गेले आहे तर बाकी उर्वरित दुकानाला दोन माळे बनवु दयावे असा मी येथे प्रस्ताव ठेवत आहे  आमच्या पक्षाकडुन कमीत कमी हा प्रस्ताव ठेवण्यात येत आहे की ज्यांचे ४ गेले आहे त्यांना ४ करू दयावे ज्यांचे ३ गेले आहे त्यांना ३ माळे करू दयावे, म्हणजे २ माळयांचे आरसीसी बनविण्याचे त्यांना परवानगी दयावी, माझा हा आग्रह आहे की या ठिकाणी जो कर लादला गेला आहे किती रेटसने आज त्या दुकानांची जर ते दुकाने दोन माळयाचे तयार होतील जे टॅक्स विभाग जुने दर अगोदर घेत होते तेच जुने दर घ्यावे, पुर्ण व्यापारी आज त्रस्त आहेत तर त्या व्यापाऱ्यांकडे लक्ष देवुन आज आम्ही असे कळवु इच्छितो की व्यापाऱ्यांना कोणताही त्रास न देता त्यांचे पुर्नवसनचे जे काम आहे त्वरीत झाले पाहीजे, हा प्रस्ताव पास झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी करणेसाठी शासनाकडुन काही मदत हवी असेल तर आम्ही देखील शासन आणि प्रशासन मिळुन काम करू आता येत्या काळी हा एकच रस्ता नाही आणखी रस्ते जे बनविणार आहोत तर त्या वेळेस व्यापाऱ्यांना आणि घरांचा आपल्यावर विश्वास असेल की शहराच्या विकासाचे काम यांनी हातात घेतले आहे ते पुर्ण करण्याचे पाठी ते लागले आहेत, तर माझा हा आग्रह आहे की हे लक्षात घेऊन व्यापाऱ्यांचे जास्तीत जास्त फायदा होणार हे पहा जर व्यापारीच नसतील तर आपला शहराचा विकास कसा काय होणार? त्यावर देखील लक्ष देणे फार गरजेचे आहे, माझा हा आग्रह आहे निवेदन आहे की या प्रस्तावास मान्यता दिली जावी.

यावेळी सदस्या श्रीमती अनिता भानुशाली, श्रीमती अर्चना करनकाळे यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्या, श्रीमती. मिना सोंडे</u> :– मा. महापौर, आयुक्त साहेब, उल्हासनगर शहर हे असे आहे जे की मिलेट्री कॅम्प वर वसलेले शहर आहे, आज त्यामुळे आपले शहर वसलेले आहे, आज त्यामुळेच या रस्त्याचे रुंदीकरण घेतले आहे, ज्यामुळे कित्येक लोकांना नुकसान झालेले आहे, साहेब माझी फक्त इतकी विनंती आहे की, काही इमारती असतात आम्ही सनदेने आरक्षित जागेने मंजुर करतो तर त्यांना २५ टक्के जागा ही महापालिकेने देणे आवश्यक असते, उदाहरण म्हणजे वुडलॅन्ड कॉम्पलेक्स त्या ठिकाणी अगोदरच जे स्ट्रक्चर बनलेले आहेत, जे १०० टक्के दुकाने तुटलेले आहेत, ज्यांची काहीच जागा उर्वरित नाही आहे त्यांना त्या स्ट्रक्चर्स मध्ये फास्ट जर पुर्नस्थापनेसाठी दिले गेले तर त्यांचे बिजनेस पुन्हा आणि चांगल्या प्रकारे सुरू होणार, कृपया याबाबत नोंद घ्यावी, धन्यवाद!

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया</u> :–  मा. महापौरजी, आज ही सभा बोलविण्यात आलेली आहे तर यात आम्हाला एक स्पष्टीकरण पाहीजे नगररचना विभागाकडून या ठिकाणी कोणीही उपस्थित नाही आहे, जे आम्हाला स्पष्टीकरण देणार ही मार्कीग कशी जास्त दिली आहे जे १०० फुट रस्त्याची कंटीग केली गेली त्याची मार्कीग कोणत्या आधारे दिली गेली आहे? माझ्याकडे काही असे कागदपत्रे आहेत जसे की यु. नं. १३३ आणि यु.नं. १३४ याबाबतचे कागदपत्रे आहेत एसडीओ उल्हासनगर टाऊनशिपने त्यांना सनद दिली आहे आणि सनद देतेवेळी जे डिमॉर्केशन दिले आहे ज्या डिमॉर्केशनमध्ये हे दर्शविण्यात आले आहे ज्यांचे स्ट्रक्चर १०० फुट रस्त्याच्या बाधीत नाही आहे तरी देखील त्यांना रोड कटींच्या नावाने १३ फुट रोड कंटीग दिली गेली आहे, दुसरे एक उदाहरण मी आंपणास देतो शांतीनगर येथिल आहे ब्लॉक नं. सी–३९, रूम नं. १४३, कमल छाया नावाची इमारत आहे, यांना मंजुर आराखडयानूसार सनद दिली गेली आहे, ॲडीशनल सनद देखील दिली गेली आहे, आणि यांना डिर्माकेशन प्रमाणे जे एसडीओ उल्हासनगर टाऊन शिपने ॲडमिनीस्ट्रेटरने दिले आहे त्यात सरळपणे दिसत आहे की याची कोणतीही रोडची कटींग होत नाही आहे, तर रोडची कटींग न होता त्याची सर्व्हे शिट मध्ये त्यांची कटींग निरंक आहे, त्यानंतर देखील त्यांना ३ फुटची मार्कीग दिली गेली आहे, तर कोठे ना कोठे या रस्त्याची मार्कीग देण्यात चूक झालेली आहे, आणि याचा सेंटर कोणत्याही रस्त्याला आपण मार्कीग देतो त्याचे आपण प्रथमत: सेंटर ठरवितो की १०० फुटाचे ५० फुट कोठे येईल? ५० फुट एका बाजुला आणि

५० फुट एका बाजुला रस्ता जाईल, तर जी मध्य मार्कींग आहे ती त्यांनी चूकीची केली आहे, त्यानी पूर्वीचे जे डिवाईडर लागलेले आहेत त्यास सेंटर समजुन मार्कींग दिली आहे, तर ती देखील चूकीची आहे तर यासाठी आम्ही स्पष्टीकरण मागतो की आपण जी मार्कींग दिलेली आहे ती कोणत्या आधारे दिलेली आहे? किंवा आपण त्यात जी शिट आहे शिट नं. ५ ए आहे आणि शिट नं. २६ आहे या शिटांना पाहुन आपण मार्कींग दिलेली आहे काय ? यासाठी आम्हाला प्रथम स्पष्टीकरण दयावे?

<u>सदस्या, डॉ.निना नाथानी</u> :— मा. महापौरजी आता यांनी सांगितल्याप्रमाणे सेंटर मार्कींग बरोबर करण्यात आलेली नाही, मी आता संपुर्ण सभागृहाला विचारते की नगररचना विभागाचे जे मुख्य आहेत श्री. करपे त्यांना येथे किती नगरसेवकांनी पाहीले आहे? ते कधी कामावर उपस्थित नसतात, त्यांचा रूम कायमस्वरूपी बंद असतो, जर त्यांनी पहिल्यापासुन बरोबर काम केले असते तर आज ही परिस्थिती उद्‌भवली नसती, ही परिस्थिती का आली आहे कारण की ते बरोबर काम करत नाहीत तर आपण याबाबत श्री. करपे यांना बोलावुन प्रश्नोत्तरे करणार तर जास्त चांगले होईल. यांचा देखीलप्रश्न सुटेल, अनावश्यक करण्यात आलेली आहे, वाढीव कटींग करण्यात आलेली आहे, तर मी बीजेपी पक्षाकडून बोलते की, जी अननॅसेसरी कटींग केली आहे ती चूकीची केली गेली आहे प्रॉपर्ली आज मार्कीग केली गेली असती तर आता इतक्या लोकांचे नूकसान झाले नसते की जितके आज इतक्या लोकांचे नूकसान झालेले आहे त्याची भरपाई आज कोण करणार? कोणीही नाही? तर ही बाब जी आपल्या श्री. राजेश वदारिया यांनी उचललेली आहे हे बरोबर आहे, परंतु हे पुर्णत: श्री. करपे यांचेवर डिंपेड आहे आय वूड रिक्वेस्ट की आपण त्यांना संपर्क करून हा प्रश्न विचारावा तर ते जास्त उचित राहील, धन्यवाद!

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया</u> :— क्लअरीफिकेशन कोण देईल?

<u>सदस्या, श्री. मिना आयलानी</u> :— मा. महापौरजी, उप—महपौरजी, आयुक्त साहेब, सचिव महोदया, आपले उल्हासनगर शहर हे ज्या परिस्थितीत सध्या आहे आणि ज्याप्रमाणे व्यापाऱ्यांचे नूकसान होत आहे आम्हाला त्याबाबत खेद आहे, व्यापाऱ्यांनी निवेदन केले होते की आम्ही आमचे दुकान स्वत: तोडणार आणि आपले सामान स्वत: बाहेर काढणार, आपण काहीही न ऐकता दुसऱ्या दिवसापासुन तोडणे सुरू केले, आपण असे तोडणे सुरू केले की जसे की खुप मोठी झुंज देत आहात जर नैसर्गिक आपत्ती आली असती तरी देखील इतके नूकसान झाले नसते बुलडोझर ज्याप्रमाणे आपण चालवित आहात असे वाटते की आपण लढाई करत आहात, व्यापाऱ्यांची आज काय परिस्थिती आहे, आणि त्यावर अधिकारी गर्व करीत आहेत, जसे की त्यांचे दु:खावर मीठ चोळत आहेत, आम्हाला व्यापाऱ्याचे दु:ख सहन होत नाही, आम्हाला दु:ख वाटत आहे, हे शहर साल १९४७ पासुनचे वसलेले आहे एक एक व्यापारी,एक एक घर आपल्या मेहनतीने येथे वसलेले आहे, आज ६५ वर्षापासुन मेहनत करून जे वसविले होते, आपल्या कामासाठी अन्नासाठी जे केले त्याबदल्यात त्यांना काय मिळाले? ते तर आपल्या सर्वासमोर आहे , साल १९४७ पासुन आता असे काही पडले आहेत की आता शुन्यावर आले आहेत, तर हे आपले कर्तव्य आहे का की त्यांना शुन्यावर आणावे? मी आंपणास हे निवेदन करते की आपल्या महापालिकेकडे जी २५ टक्के आरक्षित जागा आहे आपण ती जागा त्यांना देवुन टाका आणि जी घरे रस्त्यावर आलेली आहेत त्यात कित्येक महिला आहेत, वृध्द आहेत, लहान मुले आहेत, ते आज कोठे जातील? पहिलेच राणी मॉ आणि शिश महल या इमारतीचे रहिवाशी अजुन भटकत आहेत, आणखी ही घरे रस्त्यावर आलेली आहेत, त्यांना रस्त्यावर पाहतांना आम्ही सहन करू शकत नाही, आपण आपली माणसीकता दाखवा, ज्यांची घरे गेली त्यांना घरे दयावी ज्यांची १०० टक्के दुकाने गेली त्यांना रिसाईकल करावे आणि ज्यांचे थोडे उर्वरित आहेत त्यांना एक माळयाची आणि दोन माळयाची परवानगी लवकरात लवकर देणार असे मी आंपणास अनुरोध करते.

यावेळी सदस्य श्री. उमेश कालानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्या, डॉ.निना नाथानी</u> :— मा. महापौरजी आमची गटनेता श्रीमती. मिना आयलानी यांनी आता सांगितल्यानूसार आम्ही संपुर्ण सभागृह सहमत आहोत प्रस्ताव तर आम्ही सर्व देत आहोत सर्व पक्ष आपले प्रस्ताव देणार की कोणता भाग त्यांना देण्यात यावा, परंतु जोपर्यंत आपण त्या प्रस्तावास समोर घेवुन जावु, डेव्हलप करू आजपावेतो आपल्याकडे २५ टक्के प्लॉट्स, खाली जागा, खाली पडलेले आहेत जे पुर्णत: खाली आहेत ज्यांची ऑनरशिप आपण त्यांना देवु शकतो या विस्थापीतांना का दिली जावु नये? तसे देखील आपण त्यांना हे भाडेपट्टीने देणार आहोत, त्यांना ऑनरशिपवर तर देणार नाही आहोत, तर आता त्वरीत का नाही? जे आता भटकत आहेत, यामध्ये काही पुर्णत: शुन्य झाले आहेत, त्यांचे घर नाही किंवा काही नाही, दुसऱ्या ठिकाणी जावुन राहत आहेत, या वेळेपर्यंत जोपर्यंत आपले प्रस्ताव मंजुर होत नाही तोपर्यंत ही २५

टक्के आपल्याकडे जागा आहे ज्याचा निर्णय आम्ही आणि तुम्ही सभागृह घेवु शकतो ते त्वरीत कोठेही स्टेबल होवु शकणार नाही ना, तर ती जागा विस्थापीत लोकांना देण्यात यावी जेणेकरून त्यांचे घर सुरू होईल, किंवा त्यांचे दुकान सुरू होईल, मी आंपणास विनंती करते की या बाबी आपण आजच आता क्लिअर केल्या तर त्या विस्थापीतांना थोडासा दिलासा मिळेल, धन्यवाद!

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया</u> :— साहेब, क्लअरीफिकेशन आतापर्यंत झालेले नाही आहे, माझा जो प्रश्न आहे त्याचे अजुन उत्तर मिळाले नाही आहे.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :— श्री. राजेश आपला प्रश्न हा नगररचना विभागाशी निगडीत आहे ना,

यावेळी सदस्य श्री. भगवान भालेराव यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया</u> :— साहेब त्यामुळे तर सांगितले होते की नगररचनाकार यांना बोलवा, ठिक आहे पुन्हा रिपीट करतो, कोणत्याही रस्त्याची मार्कींग जी दिली जाते त्या रस्त्याचा प्रथम त्या रस्त्याचा सेंटर पॉईन्ट मार्क केले जाते आणि सेंटर पॉईन्ट मार्क झाल्यानंतर उदाहरणार्थ १०० फुटाचा रस्ता आहे, तर ५० फुट या बाजूला आणि ५० फुट दुसऱ्या बाजुला काय मार्कींग देणार? माझ्या हातात शिट नं. २६, यु.नं. १३३, १३४ यांना ॲडमीनिस्ट्रेटरने सनद दिलेली आहे ८० वॉलची आणि सोबत डिर्माकेशन दिलेली आहे, त्यांचा स्ट्रक्चर १०० फुट रस्त्याशी बाधीत नाही आहे, आपण तरी त्यांना १३ फुट रोड कटींगची मार्कींग दिलेली आहे, असे का? दुसरे उदाहरण मी आंपणास देतो की, ही शासन निर्मीत जागा आहे ब्लॉक नं. सी— ३९, रूम नं. १४३, कमल छाया इमारत आहे शांतीनगर येथे यांना सिडी आणि साईडवर ॲडीशनल सनद दिलेली आहे, दोन्ही डिर्मार्केशनमध्ये जे ॲडमिनीस्ट्रेटरने सनद दिलेली आहे दोन्ही मध्ये १०० टक्के कटींग नाही आहे, तरी देखीलआपण त्यांना ३ फुटाची मार्कींग दिलेली आहे, तर हे स्पष्ट होते की आपण जो रस्त्याचा मध्यभाग घेतला आहे, तो चूकीचा पकडलेला आहे, मी बोलेल चूकीची आहे ती मार्कींग तर हे बोलतील ना की ती बरोबर आहे ना, ही मार्कींग आपण घेतली आहे ना,

<u>सदस्य, श्री. राजु जग्यासी</u> :— यांचे उत्तर देणेपूर्वी मी ही माहिती घेवु इच्छितो की, या रस्त्यावर निश्चीत १०० टक्के दुकाने किती गेलेली आहेत? आणि रेसिडेनशियल जागा किती जात आहेत? ही माहिती सभागृहाला देण्यात यावी? निश्चीत नंबर मी रिपीट करत आहे. आपल्याला माहिती आहे किंवा नाही ते सांगावे? १०० टक्के जी दुकाने जात आहेत, आणि रेसिडेनशियल जे १०० टक्के जात आहेत ही माहिती सभागृहाला देण्यात यावी ऑफीस, शॉप आणि रेसिडेनशियल निश्चित आकडा पाहीजे जे १०० टक्के जात आहेत?

<u>श्री. दिपक ढोले, कनिष्ठ अभियंता</u> :— एकूण स्ट्रक्चर ८१५ होते त्यानंतर त्यात जे निवासी ॲड केले ते २०६ ॲड झाले, ८१५ स्ट्रक्चर आहेत एकूण त्यावर जे निवासी आहे ते २०६ आहे. त्यापैकी जे १०० टक्के जे जात आहेत ते कमर्शिअल आहेत १६८ आणि निवासी ६७ आहेत.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया</u> :— आता माझ्या प्रश्नाचे उत्तर दया,

<u>श्री. दिपक ढोले, कनिष्ठ अभियंता</u> :— नगररचना विभागाने जी मार्कींग दिलेली आहे त्यावेळेस एमएमआरडीएचा एक प्लॅन नगररचना विभागात येथे आला होता तो प्लॅन एमएमआरडीए डिपार्टमेंटने जो सर्व्हे केला आहे त्यात एक्झीस्टींग सेंटर पकडून सर्व्हे केलेला आहे, ती बाब आम्ही आपले आयुक्त मा. खतगांवकर साहेबांना निदर्शनास आणुन दिली होती, त्याप्रमाणे आयुक्त साहेबांनी ५० फुट एका बाजूला आणि ५० फुट दुसऱ्या बाजुला असे मार्कींग करण्यास सांगितले होते त्याप्रमाणे जागेवर मार्कींग देण्यात आली आहे.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया</u> :— याचा अर्थ आपण याबाबत सहमत आहात त्या डिवाईडरला सेंटर पॉईन्ट पकडुन मार्कींग केली आहे, याचा सर्व्हे केला नाही आहे की तो डिवाईडर सेंटर पॉईन्टवर आहे किंवा नाही आहे. आंपणास आताच मी १३३ आणि १३४ बाबत सांगितले आपल्या विभागाने माहिती अधिकारात उत्तर दिले आहे युएमसी/टीपीडी/६९२/११, दि. २१/१/२०१२ ही माहिती अधिकारात माहिती देण्यात आली आहे, यु. नं. १३३, यु.नं. १३४ हे १०० फुट रस्त्याने बाधीत होत नाहीत, आपण एका अर्थाने माहिती अधिकारात म्हणत आहात की हे स्ट्रक्चर त्यात बाधीत नाही आहे, आणि पुन्हा आपण त्यास मार्कींग देता.

**श्री. दिपक ढोले, कनिष्ठ अभियंता** :— १९४७ सालचे जे मंजूर डिपी प्लॅन आहे, त्यात ते बाधीत होत आहे,

**सदस्य, श्री. राजेश वदारिया** :— तर आता काय नवीन डिपी लागु होत आहे काय ? २०१४ साली नविन डिपी आपण मंजुर करून शासनाकडे पाठविलेला आहे, त्यात मार्कींग दुसरी आहे काय ?

**श्री. दिपक ढोले, कनिष्ठ अभियंता** :— असे नाही आहे, शिवाजी चौक आणि फॉरवर लाईन चौक, १९७४ चे सेंटर लाईन होते ते ४ ते ५, ६ फुट हललेले आहे,

**सदस्य, श्री. महेश गावडे**:— ती लाईन कोणी सरकविली? खतगांवकर साहेबांनी सरकविली काय? तुम्ही सरकविली का ? लाईन कशी सरकली? एमएमआरडीएला राईड्स आहेत का तुमच्याकडे कामे करायला? हा रस्त्या कोणाच्या बिलॉगिंग आहे? १९७४ ची लाईन कशी सरकली याचे उत्तर दया मला तुम्ही?

**सदस्य, श्री. जग्यासी दिलीप** :— ही मार्कींग देण्यापूर्वी आपण लोकांचे कागदपत्रे तपासली आहेत काय? कोणाकडे सनद आहे कोणाकडे नाही आहे, कोणाचे नावे आहे ही मालमत्ता, हे काम महापालिकेचे नाही काय?

**सदस्य, श्री. महेश गावडे**:— लाईन कशी सरकली याचे उत्तर दया मला तुम्ही? खतगांवकर साहेबांनी सरकवली का? तर ती लाईन तुम्ही सरकवली का? महापालिकेचे हे काम नव्हते काय की कोणाकडे सनद आहे? तुम्ही नविन डिपी जेव्हा केला

**सदस्य, श्री. सुरेश जाधव** :— मा. आयुक्त साहेब श्री. ढोले साहेब प्रश्नाचे उत्त्तरे देत आहेत मला त्यांना विचारायचे आहे, की तुम्हाला या रस्त्याची पुर्ण माहिती आहे काय ? माहिती आहे काय याचे प्रथम मला उत्तर दया? या रस्त्याविषयी किती कटींग झाली आहे ? काय झाली आहे हे परिपुर्ण माहिती आहे काय ?

**श्री. दिपक ढोले, कनिष्ठ अभियंता** :— मला परिपुर्ण माहिती नाही आहे.

**सदस्य, श्री. सुरेश जाधव** :— तर जावुन बसा तेथे, त्यांना पुर्ण माहिती नाही आहे आणि ते काय प्रश्नाची उत्तरे देणार आहेत. ऊगाच आम्ही बडबड करायचे आणि टाईम वेस्ट करायचे? जावुन बसा तुम्ही कारण तुम्हाला पुर्ण रस्त्याची माहितीच नाही आहे, तुम्ही काय उत्तर देणार आहात आम्हाला ऊगाच आम्ही एकएक सदस्य उठून तुमच्यावर रोष करणार त्यास काय अर्थ आहे? आयुक्त साहेब ज्यांना माहिती असेल त्यांना तुम्ही बोलवा.

**सदस्य, श्री. महेश गावडे**:— हा गंभीर प्रश्न आहे, जेव्हा तुम्ही हा महत्त्वाचा सभा बोलवित आहात तर अधिकाऱ्यांनी उपस्थित राहायला नको काय? हे शहर बेवारशी आहे असे समजु का आम्ही लोक, का जंगल राज्य आहे.

**सदस्य, श्री. सुरेश जाधव** :— जा बसुन घ्या तुम्ही उगाच टाईम वेस्ट करू नका, तुम्हाला त्या रस्त्याविषयी काही माहितीच नाही तर तुम्ही काय उत्तरे देणार आहात?

**सदस्या, डॉ.निना नाथानी** :— साहेब नगररचनाकार यांना बोलवा आता त्यांच्याशी प्रश्नोत्तरे करणार आहोत.

**सदस्य, श्री. दिलीप जग्यासी** :— हा रस्ता १०० फुट करायचा आहे किंवा नाही हा अधिकार महापालिकेला आहे किंवा एमएमआरडीएला आहे, किंवा शासनाला आहे काय हे अधिकार महापालिकेला दिलेले आहेत काय की नाही? हे आपण ठरवावे की शहराला किती रस्ते दयायचे आहेत.

**सदस्य, श्री. सुरेश जाधव** :— सदस्य साहेब त्या अधिकाऱ्याला माहितीच नाही तर कशाला प्रश्नोत्तरे जवाब करत आहात आपण? त्यांना काही माहितीच नाही,त्यांना माहितीच नाही तर काय उत्तरे देणार ते त्यांना खाली बसवा आयुक्त साहेब उत्तर देतील

**सदस्य, श्री. महेश गावडे**:— आयुक्त साहेब, आपण नगरररचनाकार यांना बोलवा, हे उत्तर देवु शकत नाही.

<u>सदस्या, डॉ.निना नाथानी</u> :— आयुक्त साहेब, आपण नगररचनाकार यांना बोलवा, यांचेशी प्रश्न करण्यास काही अर्थ नाही आहे.

<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी</u> :—या अगोदर देखील आमच्याकडून चूक झालेली आहे शासनाकडून, ३७ ए हा कोणत्याही नगरसेवकाला माहिती नव्हते की हा कायदा काय आहे?

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :— आजच्या या सभेत नगररचनकार हे गैरहजर आहेत कारण त्यांनी फार पूर्वीच रजा टाकलेली होती कारण त्यांचे कौटुंबीक...

<u>सदस्य, श्री. महेश गावडे</u>:— महत्त्वाची सभा बोलविता तर यु शूड अटेंड द टिपी.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :— पूर्वीच सुटट्‌ी टाकली असल्यामुळे ते उपस्थित नाही आहेत, परंतु ज्यावेळेस मार्कींग झाली होती त्यावेळेस ते नगररचनाकार म्हणुन नव्हतेच, ते देखील येथे तोवर माहिती देवु शकले असते की नाही ही शंका आहे, तर श्री. वदारिया यांनी जो प्रश्न विचारला रस्त्याचा मध्यभाग आणि मार्कींगच्या बाबती मध्ये तर विषय असा आहे की, एकूण १०० फुट रोड आपल्या डिपी प्लॅनवर आहे, त्याची जी अलाईनमेंट आहे त्या अलाईमेंट प्रमाणे काही ठिकाणी आपले डिवाईडर सेंटरला नाही हे त्यावेळेसही निदर्शनास आले होते ही बाब तत्कालीन आयुक्तांच्या निदर्शनास देखील आली होती परंतु त्यात किती फुट बाधीत होते ते जास्तीत जास्त ४ ते ५ फुटामध्ये फरक आणि तो एकूण ८२१ मालमत्तेपैकी फक्त १८ ते २० मालमत्तेचा हा विषय होता, त्यामुळे तत्कालीन आयुक्तांनी असा निर्णय घेतला होता की आणि एमएमआरडीए ने तसाच प्लॅन त्यांना उपलब्ध करून दिला होता असलेल्या रोड डिवाईडर सेंटर पासुन १०० फुट या साईडला आणि १०० फुट त्या साईडला मार्कींग आपण केलेली आहे, सॉरी ५० फुट या साईडला आणि ५० फुट त्या साईडला एकूण १०० फुट, आता यु.नं. १३३ व १३४ चा प्रश्न वदारीया साहेबांनी

<u>सदस्य,श्री.जीवन इदनानी</u> :— आयुक्त साहेब एक मिनीट आपण आता कमीट करत आहात की संर्वाना माहिती होते पूर्वीचे जे आयुक्त होते त्यांना देखील माहिती होते डिपार्टमेंटला देखील माहिती होते जी लाईन्स शिफ्ट झालेली आहे आणि जी दुकाने बाधीत होत आहेत ते बेकायदेशिर बाधीत होते आता तुम्ही सांगा की हे कोण करून देणार? आयुक्तांना पॉवर्स आहेत का लाईन शिफ्ट करायच्या,आयुक्तांना पॉवर आहे का लाईन शिप्ट करायचा

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :— नाही विषय लाईन शिफ्ट करायचा नाही आहे,

<u>सदस्या, डॉ.निना नाथानी</u> :— नगररचनाकार यांचे अधिकारात आपण निर्णय थांबविला पाहीजे होता.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :— लाईन शिफ्टींगचा विषयच नाही आहे येथे?

<u>सदस्य,श्री. जीवन इदनानी</u> :— यु आर ॲडमीटींग दॅट मिस्टेक हॅज बिन कमीटेड बाय द स्टाफ ॲन्ड एक्स कमिशनर,

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :— मी जे १८ ते २० मालमत्तेबाबत बोललो, आपण या सर्व मालमत्तेला गेल्या ३ वर्षात वेळोवेळी नोटीसेस दिलेल्या होत्या,

<u>सदस्य,श्री. जीवन इदनानी</u> :— नोटीस दिली ही गोष्ट वेगळी,

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :— ज्या मालकाने निदर्शनास आणुन दिले की आमच्या लाईन मध्ये प्रॉब्लेम आहे त्यांच्या बाबतीत आपण थांबविले, यु. १३३ व १३४ तर ते उल्लेख श्री. राजेश वदारीया करतात ती बाब माझ्या निदर्शनास आल्यानंतर त्याचे डिमोलेशन आपण थांबवुन आपण तो विषय त्याचे म्हणणे ऐकून घेवुन शॉर्ट आऊट करून निर्णय घ्यायचा हे आपले धोरण ठरलेले होते तर ज्या ज्या मालकांनी दुकानाच्या मालकधारकांनी असे त्यांच्या अलाईन्मेंट बाबत इश्यु रेज केलेला आहे त्यांचे वैयक्तिक सुनावणी आपण घेवुन निर्णय घेणार आहोत आणि घेत आहेत आणि अलाईमेंन्टचा हा विषय ८२१ मालमत्तेपैंकी १५ मालमत्ता

एवढया मोठया कामामध्ये विषय नाही आणि फार तर ४ ते ५ फुटाची अडचण येत आहे ते आपण दुरूस्त करत आहोत.

<u>सदस्य,श्री. जीवन इदनानी</u> :— कायदयामध्ये प्रावधान आहे का की मार्कींग शिफ्ट करायचे म्हणुन,

<u>सदस्य,श्री. राजेंद्रसिंह भुल्लर</u> :— मा. आयुक्त साहेब, जी बांधकामे आता तोडत आहेत, जी आपले लोक तोडत आहेत जास्त नुकसान होईल तर ते आपल्या लोकांना भरपाई करून दयावी लागेल, साई कॉम्पलेक्स ही इमारत आहे शांतीनगर येथे ते स्वत: तोडत आहेत, ८ दिवसांपासुन तोडण्याची कारवाई सुरू आहे, तरी देखीलआपले कर्मचारी जेसीबी आणि प्रोकलन लावत आहेत तेथे ही काय दादागिरी आहे, जे स्वत: तोडत आहेत त्यांना तोडु दया ना,

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :— गेल्या दोन दिवसापासुन आपले धोरण हेच आहे की, जे स्वत: होवुन पुढे येतात ज्यांना जेसीबी पाहीजेत लोक पाहीजे, त्यांना आपण मॅनपॉवर आणि जेसीबी उपलब्ध करून देत आहोत.

<u>सदस्य,श्री. राजेंद्रसिंह भुल्लर</u> :— साहेब आता मला फोन येत आहेत ते स्वत: तोडत आहेत मशिने लागलेली आहेत.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :— आपण तशा सूचना पास केलेल्या आहेत तेथे

<u>सदस्य,श्री. राजेंद्रसिंह भुल्लर</u> :— आपण विचारा कापडनीस साहेबांना, साई कॉम्पलेक्स तोडत आहेत तेथे पोहचलेले आहेत ते,

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :— डिएमसीला भेटल्यानंतर ते तेथे क्लिअरपणे सांगत आहेत.

<u>सदस्य,श्री. राजेंद्रसिंह भुल्लर</u> :— आता चला माझ्याबरोबर ही दादागिरी कसली आहे?

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :— होय जाऊ या.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :— यामध्ये दादागिरीचा विषय नाही आहे, विषय हा आहे की, जर ती इमारत मशिन शिवाय पडत नसेल आणि ४ लोक लावुन पाडण्याचे बऱ्याच वेळेस...

<u>सदस्य,श्री. राजेंद्रसिंह भुल्लर</u> :— हे पाहा परत त्यांचा फोन येत आहे, मशिनने तोडत आहेत.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :— मशिन उपलब्ध करून मालकाच्या सुपरविझनखाली पाडत आहोत. मालक तेथे उभे राहुन मालकाच्या सुपरविझनखाली पाडण्याची कारवाई आपण करत आहोत. स्पेसिफीक सांगा आपण सूचना पास करू.

<u>सदस्य,श्री. राजेंद्रसिंह भुल्लर</u> :— साई राम कॉम्पलेक्स तेथे आपले कापडनीस साहेब गेलेले आहेत.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया</u> :— आयुक्त साहेब, या विषयाबाबत मी कळवु इच्छितो की, यांनी दि. १२/५/२०१५ रोजी आपल्या नोटीसचे उत्तर दिले आहे श्री. आर. वी. रामचंदानी हे टाईपीस्ट आहेत महाराजा हॉलच्या समोर दि. १३/५/२०१५ रोजीचे इनवर्ड आहे आपल्याकडचे आपण त्यांना काय उत्तर दिले आहे? कोणती कारवाई केली आहे? पुन्हा त्यांना नोटीस मिळालेली आहे, याचा अर्थ हाच आहे की कोणतेही वेरीफीकेशन होत नाही आहे, त्याअगोदर दिनांक: २५/४/२०१३ रोजी उत्तर दिले आहे, त्यानंतर दिनांक: १२/५/१५ रोजी उत्तर दिले आहे, दोन पत्र देवुन देखीलत्यांचे ऐकणारे कोणी नाही, कोणी वेरीफीकेशन करणारा नाही आहे,

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :—अलाईनमेंट बाबत मी स्वत: दोन सुनावणी माझ्याकडे घेतलेल्या होत्या, त्याची तक्रार प्राप्त झाली, त्यांचे अलाईनमेंटचे त्यांचे काय उत्तर आहे हे पाहुन आपण निर्णय घेतलेला होता, आणि घेत आहोत त्यामुळे श्री. वदारिया आपले डिमोलिश झालेले नाही आहे, होल्ड केलेले आहे मला माहिती

मिळाल्यानंतर त्यावर ॲक्शन घेवुन आपण निर्णय घेत आहोत, ज्या १४ ते १५ केसेस कोर्टात गेलेल्या आहेत, मा. उच्च न्यायालयामध्ये देखीलआपण हाच मुद्दा घेतलेला आहे, ज्यांच्या तक्रारी आहेत अलाईटमेंट बद्दल त्या तक्रारी आपण सोडवू.एक रस्ता आपल्याला विकसित करायचा आहे तेथे १४–१५ दुकाने बाधित होत आहेत अलाईनमेंट बददल त्यांची सुनावणी घेवु.

सदस्य, श्री. राजेश वदारिया :–आता आपण जे डेमोलेशन चालु केलेले आहे. तर रोड सुध्दा बनविणार रोड बनविणारी एजन्सी आहे का? आपल्या जवळ आपण जो रोड तोडला आहे, कोणत्या एजन्सीला टेंडर दिले?

सदस्य श्री दिलीप जग्यासी– फंड आहेत आपल्याकडे कोणत्या एजन्सीला दिलेत?

सदस्य, श्री. राजेश वदारिया – फंड आहेत एजन्सी फिक्स केली का ? आधी ते दाखवा

सदस्य श्री दिलीप जग्यासी– बजेट मध्ये तरतुद केली आहे का

सदस्य,श्री. जीवन इदनानी :– सर आपण म्हणत आहात १४–१५ ते तर कोर्टात गेलेत ठीक आहे १४–१५ नाही कमीत कमी ३०० ते ४०० दुकाने रोड बाधित झाली आहेत अलाइनमेंटमुळे त्यांच्या कडे पैसा नाही कोर्टात जायला गरीब आहेत त्यांच्याकडे खायला पैसा नाही एम एम आर डी ए ला काय अधिकार आहेत असे म्हणायचे की ही सेंटर लाईन धरा मला नाही वाटत असा काही कायदा आहे काही अधिकार आहे आपण म्हणतात हे अलाइनमेंट चेज झाले आहे. त्यांना बोलावू त्यांच्याशी बोलू मग जे नुकसान झाले आहे ते तुम्ही भरून देणार का हा भाऊ बंदकीचा कायदा नाही आहे. महानगरपालिका हे शहर हे प्रशासन महाराष्ट्र राज्य हे कायदयाच्या पुस्तकावर चालते. तुम्ही संरक्षक आहात भाऊ बंदी करणे हे दुकानदारांचे काम आहे. आमचे काम आहे. जावुन बसा कमी जास्त करा हे दुकानदारांचे काम आहे. हे कोणत्या कायदयात आहे, त्यांना बोलावू त्यांच्याशी बोलू एक तर चुकीचे तोडले गेले आणि आता भाऊबंदीची भाषा बोलता १६ ते आहेत जे कोर्टात गेले त्याच्या मागे २५० ते ३०० दुसरे आहेत. ते असे आहेत ज्यांची कोर्टात जायची क्षमता नाही त्यांची नुकसान भरपाई कोण करणार ?

सदस्य श्री दिलीप जग्यासी–आपल्या अंदाजानुसार कधी पर्यंत रोड तयार होईल ८ महीने?

सदस्या, डॉ.निना नाथानी :–आयुक्त साहेब, ही जी अलाइनमेंटची समस्या झाली आहे जे राजेश वधारीया व जीवनभाई बोलत आहे त्यासाठी मी असे म्हणेण की सारेच्या सारे दोषी आहेत जर एम.एम.आर डी ने अलाइनमेंट केली आहे तर आपल्या शहराच्या नगररचनाकाराचे हे कर्तव्य होते तेथे त्यावेळी उपस्थित राहणे पण तिथे ते उपस्थित नव्हते आणि आज देखील एवढी महत्वाची मिंटींग आहे तरी ते उपस्थित नाही. माझी खरोखर मागणी आहे की ते ज्या त–हेने काम करत आहेत त्याने पुर्ण शहर बाधीत होईल त्यांना निलंबीतच केले पाहीजे.

सदस्य, श्री. राजेश वदारिया :–आमची मागणी ही आहे तम्ही सेंट्रल लाईन निश्चित करा वेरीफाय करा. नव्याने घ्या टेबल सर्व्हे झाला पाहिजे. कुणा एका व्यक्तीवरही अन्याय नाही झाला पाहीजे.

यावेळी सदस्य श्री. उमेश कालानी, श्री. मनोज सयानी, सदस्या श्रीमती जया साधवानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–हे मार्किंग वेरीफाय करूनच केले आहे. जो पण प्रॉपर्टीचा प्रॉब्लेम आहे तो समोर आला आहे, श्री. जीवन इदनानी हे म्हणाले त्यांचे म्हणणे ऐकले जाईल, एका प्रकरणात कोर्टाने म्हणटले आहे. कोर्टानेच सांगितले आहे. यांचे म्हणणे ऐकून घ्यावे आणि निर्णय घ्यावा. हे कोर्टाचे आदेश आहेत आणि आम्ही सुनावणी घेणार.

**यावेळी मा. महापौर श्रीमती अपेक्षा पाटील हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

**यावेळी श्रीमती पंचशिला पवार, उप–महापौर हया मा. महापौरांच्या स्थानी आसनस्थ झाल्या.**

<u>सदस्य, श्री. जीवन इदनानी</u> :—आमचे म्हणणे सेंटर लाईन बरोबर नाही त्यांच्या ज्या तक्रारी आहेत. की मार्किंग बरोबर नाही तुम्ही त्यांना सोडा मार्कींग बदलून समोर जाईल समोरच्याला दिले गेले काय? समोरच्याला जास्त मार्जिंग दिली गेली काय त्याचे जास्त तोडले गेले काय?

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :—हे १३ ते १४ जणांच्या बाबतीत झाले आहे.

<u>सदस्य,श्री. जीवन इदनानी</u> :—हे १३. १४ जण नाही २५० ते ३०० जणाच्या प्रॉपटर्या आहेत.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :—जितक्या जणांच्या तक्रारी आल्या आहेत. त्यांना मेझर करेक्ट करून दिले जाईल. प्रॉपर्टीमध्ये थोडया फार त्र्युटया झाल्या असतील. योग्य माप घेतले जाईल, नियमा प्रमाणे केले जाईल.

<u>सदस्य,श्री. जीवन इदनानी</u> :—त्याची भरपाई कोण करणार?

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :—हे लिगल मेटर आहेत.

<u>सदस्य,श्री. जीवन इदनानी</u> :—कायदयानुसार आपण करणार ना? त्यांना त्यांच्या नुकसानीची भरपाई करुन तर देणार ना? हा मुद्दा असा आहे की तो एका तासात संपला नाही पाहिजे. ज्वलंत मुद्दा आहे, तेथिल व्यापा—यांचे नुकसान झालेत. संपुर्ण उल्हासनगरचा नकाशा बदलला. आर्थिक व सामाजिक नकाशा खराब झाला आहे. लोक डिप्रेशनमध्ये गेले आहेत. हा मस्करीचा मुद्दा नाही. काहींचे नातेवाईक वारले ही स्थिती पाहुन की आमचे काय होईल ते? तर माझे असे म्हणणे आहे की आपण जे म्हणत आहात की अलाईनमेंटसाठी कोर्टात दिले आहे तर काय आपण ती अलाईनमेंट समोर शिफ्ट केले काय? आपणांस तर आधीच माहित पडले होते की ती अलाईनमेंट चुकीची आहे. तर काय आपण शिफ्ट केले का? आपण म्हणता १५—१६ आहे, मी आपणांस दाव्यानिशी सांगेल की हे २५०—३०० आहेत. तर काय अडीचशे तीनशे मध्ये भाऊबंदीमध्ये तयार होईल काय? तर मला सांगावे की कोणत्या कायदयात लिहिले आहे की भाऊबंदमध्ये या आज ही लाईन येथे आहे तर उदया तेथे जाईल. तर दोन्ही तर्फे महापालिकेस भरपाई दयावी लागेल. मी कायदयाविषयी बोलत आहे की भाऊबंदीविषयी बोलत नाही. आज आमच्याकडे विकासासाठी पैसे नाहीत, दुस—या गोष्टीसाठी पैसे नाहीत, मग काय कंम्पेसेशनसाठी पैसे घालावेत? कोणासाठी या स्टाफसाठी? नगररचनाकारासासाठी की ते महासभेत येत नाहीत? आपण तर आता आलात. याबाबत आपल्या शहर अभियंत्याने हे स्टेटमेंट दिले आहे की, श्री. खतगांवकर साहेब याबाबत दोषी आहेत. आपण मानतात की श्री. खतगांवकर याबाबत दोषी आहेत? कोण आहे दोषी? महासभा ॲथरोटी? एमएमआरडीए की, प्लॅनिंग ऑथरोटी? प्लॅनिंग ॲथरोटीवर कोणता एमएमआरडी आहे? कोणत्या कायदयानुसार सांगितले की एमएमआरडीए आहे? या बाबींचे आपण कायदयानुसार उत्तर दयावे.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :—मी कायदयानुसारच उत्तर देत आहे की, ग्रिव्हेंसेस जे आहे दॅट व्हिल बी हर्ड ॲण्ड डिसायडेड ॲज पर लिगल प्रोव्हीजन लिहिले आहे. या लिगल प्रोव्हजनमध्ये जे लिगली होईल ते होईल.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया</u> :—साहेब, मी एक बाब जाणुन घेवु इच्छितो की २०१४ मध्ये आपल्या महापालिकेने नविन विकास आराखडा रिवाईज्ड केला होता. त्यामध्ये कल्याण—अंबरनाथ रस्ता ६० फुटसाठी प्रस्तावीत केले आहे. त्यात आपण क्लस्टर डेव्हलपमेंटसाठी सुध्दा प्रस्तावित केले आहे. आणखीन काही सुविधा सुध्दा दिल्या आहेत. तर यात प्रस्तावित विकास आराखडयात ६० फुटाचा रस्ता आहे व मंजुर विकास आराखडयात १०० फुटाचा रस्ता आहे. तर याबाबतची किती कारवाई उचित आहे? कायदेशीररित्या सांगावे साहेब.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :—कायदेशीरच सांगत आहे. प्रस्तावित विकास आराखडयात एमआरटीपी ॲक्टमधील २६ अंतर्गत जो शासनाकडुन नगररचनाकार नियुक्त होतो तो विकास आराखडा तयार करतो. ७४ नुसार १०० फुटाचा रस्ता होतो तर तोच ठेवण्यात आला आहे. सेक्शन २८ ची जी प्लॅनिंग कमिटी आहे तिने आलेल्या हरकतींवर सूनावणी घेतल्यानंतच आपण १०० फुटाच्या शिफारसी घेतल्या आहेत. त्यानंतर विकास आराखडा शासनाकडे जाण्याआधी महासभेपुढे येतो त्यावर महासभा जी काही सूचना देते ती सूचना शासनाकडे सादर केली जाते. आता विकास आराखडा शासनाकडे सादर केला आहे. तसेच सेक्शन ३१ म्हणतो, एमआरटीपी ॲक्टचा सेक्शन म्हणतो की कोणता विकास आराखडा शासनाकडे प्रलंबित आहे, स्ट्रींन्जंट जी जास्तीत जास्त

आहे तीच पाहिली पाहिजे. तर व्हाईल इम्प्लीमेंटींग द डेव्हलोपमेंट प्लान वुई हॅव टु गो फॉर स्ट्रींन्जंट . १०० फुटाचा स्ट्रींन्जंट तेथे लागु होतो. दुसरे म्हणजे जर जो विकास आराखडा प्रलंबित आहे, त्याची लेंथ कमी करण्याचे प्रस्तावित केले आहे. परंतु त्यानंतर इंडिपेंडंट रिझोलेशन जे एमएमआरडीएकडुन डिमांड झाले की १०० फुट करायचा आहे, इन्क्रोचमेंट रिमुव्ह करुन दया, त्यावर ॲक्शन जेव्हा सुरु झाली होती प्रशासनाकडुन तेव्हा याच महासभेने ठराव केला होता. रस्ता १०० फुटाऐवजी ८० फुट करण्यात यावा. तो ठराव ४५१ अंतर्गत शासनाकडे गेला होता. तो शासनाकडे प्रलंबित होता तर त्यावर चर्चा होवुन निर्णय झाला, तो विखंडीत करण्यात आला. त्यावेळी शासनाने सांगितले की तो रस्ता १०० फुटाचा असला पाहिजे. त्यासाठी हा रस्ता १०० फुट करण्याचे कायदेशीर आहे.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया</u> :–आपण ज्या स्ट्रेंज्थ विषयी बोलत आहात तर आपण शासन निर्णय वाचा किंवा एमआरटीपी वाचा, स्ट्रेंज्थचा आपण वापर कराल जेव्हा कुण्या व्यक्तीचा आपण प्लान मंजुर करता, कोणत्याही स्वतंत्र इमारतीचा, ना की रस्त्याचा. हया स्थितीचे स्पष्टीकरण करा. कारण आज मी आपणांस उदाहरण देतो एका रस्त्याची अलाईटमेंट बदल होते, कित्येक रस्ते असे आहेत की विकास आराखडयात त्याबाबत प्रथम एक अलाईटमेंट होती नंतर आपण दुसरी अलाईटमेंट प्रस्तावित केली आहे. तर आपण आता जर रस्ता तयार कराल तर कोणती अलाईटमेंट प्रस्तावित करणार? तेच रस्ते आहेत जे बदल झाले आहेत, त्यांच्या अलाईटमेंटमध्ये बदल झाले आहेत.

यावेळी सदस्या श्रीमती मिनु दासानी, श्रीमती कमला क्रिशनानी, सदस्य श्री. प्रधान पाटील हे सभागृहातुन बाहेर गेले.यावेळी सदस्य श्री. उमेश कालानी, श्री. मनोज सयानी, सदस्या श्रीमती जया साधवानी हे सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>सदस्य,श्री. जीवन इदनानी</u> :–मी याबाबत आपले समर्थन करतो. आपण ज्या ठरावाबाबत म्हणत आहात की शासनाने विखंडीत केला, रद्द केला असे ब–याचशा गोष्टी या शहरात चालु आहेत. तो ठराव केव्हाचा आहे, तर २०१३ चा आहे, जो मरण पावलेला ठराव आहे त्यास वारंवार मारले जात आहे. कसा मेला तो ठराव? १७ जानेवारी २०१४ मध्ये विकास आराखडा मंजुर केला तर आपोआप आपण त्यात ६० फुट केला तसेच क्लस्टर नुसार त्यात १०० फुटाचा करण्याबाबत अटी व शर्ती ठेवल्या. तर आपोआप या महासभेतील पहिले जे ठराव आहेत ते मरण पावलेत तर शासन त्यास वारंवार का मारेल? तर जे फोर्समध्ये आहेत, फोर्समध्ये २०१४ चा ठराव होता, तर वारंवार या शहराची दिशाभुल केली जात आहे, हा ठराव झाला, हा ठराव रद्द झाला आहे. कोठे ठराव रद्द झाला, अंतिम ठराव तर आजसुध्दा आपणाकडे आहे. तर त्यात आमचे अधिकार आहेत हरकती व सूचना घेण्याचे. तर मी सभागृहास विनंती करतो की, आपल्या शहरातील गणमान्य लोक, चांगले लोक होते त्यांना मेल्यानंतर श्रध्दांजली दिली जात होती. तर मी सभागृहास सांगेल की आपण आज सर्व मेलो, का मेलो तर, आज आम्ही प्लॉनिंग ॲथोरीटी आहेत, आपण जो निर्णय दिला होता १७ जानेवारी २०१४ मध्ये तर आपण त्यास मारुन टाकले. प्रथम तर श्रध्दांजली आपण आम्हांस दयावी कारण आमची तर कोणतीची ॲथोरीटी राहीली नाही. ना निवडलेल्या प्रतिनिधींची राहील ना, प्लॅनिंग ॲथोरीटीची राहील. आपल्या मनात जे आले ते आपण केले. उठा दोन मिनिटे आणि स्वत:च स्वत:ला श्रध्दांजली दया. ही खरी श्रध्दांजली होईल. पुर्णच्या पुर्ण विकास आराखडा तुम्ही फाडुन टाका ना? कशाला एक्सटेंशन मागता, नव्या विकास आराखडयाला कशाला एक्सटेंशन पाहिजे, फाडून टाका. दुहेरी निती कशी चालेल? एकाला चॉकलेट दयाल, एकाला लाठी. काय बोलता साहेब? थोडाफार कायदा आम्हांलाही येतो. आपण कायदयाचे संरक्षण करण्यासाठी आहात, आणि आपण काहीही कराल? हजारोंना बेघर केले, निर्वासीत केले, रस्त्यावर आणले. आपली धारणा अशी होती, यापुर्वीचे जे ठराव झालेत ते सर्व संपुष्टात आले आहेत. हे तर आपणही मानता की महासभेचा जो शेवटचा ठराव असतो तो कायम राहतो.

 यावेळी सदस्य श्री. मनोज सयानी, श्री. उमेश कालानी यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

<u>सदस्य, श्री. दिलीप जग्यासी</u> :– अशी कोणती इमरजन्सी होती, शासनाकडे आपला विकास आराखडा प्रलंबित असतांना एवढी काय घाई होती हा रस्ता तोडण्याची? असे कोणते संकट होते, हा निर्णय घेतला गेला की सर्व शहर सोडुन आधी हा रस्ता तोडायचा.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया</u> :–यावर आधी खुलासा केला जावा.

<u>सदस्य,श्री. जीवन इदनानी</u> :–प्लॅनिंग ऑथरटीलाच संपवुन टाकलेत. कमाल आहे, झिरो केलेत.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :–प्लॅनिंग ऑथरटीचा ठराव शासनाने विखंडीत केला आहे आणि १०० फुट रस्ता घेण्याचा निर्णय घेतला आहे.

<u>सदस्य,श्री. जीवन इदनानी</u> :–तुम्ही सांगा, आमचा विकास आराखडाचा ठराव कधी संपुष्टात आणला? ज्या ठरावा बाबत आपण बोलत आहात तो आम्हीच संपृष्टात आणला शासन काय संपुष्टात आणणार?

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :–शासनाकडील विकास आराखडयाचा ठराव पाहुनच शासनाने निर्णय घेतला आहे.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :–</u>३१ मध्ये जावुन_त्या ठरावामध्ये दुस–यांदा अजुन हरकती आणि सूचना मागवायच्या आहेत.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :–शासनाने हा रस्ता १०० फुट करण्यासाठी जो वेगळा ठराव केला होता तो ठराव विखंडीत केला आहे म्हणुन हा निर्णय झाला आहे.

<u>सदस्य,श्री. जीवन इदनानी</u> :–आमचा तो विकास आराखडयाचा ठराव रद्द केला नाही.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :–अदयाप विकास आराखडा शासनाकडे प्रलंबित आहे. विकास आराखडयाचा ठराव रद्द केला नाही. विकास आराखडा अदयाप प्रलंबित आहे, तो अदयाप मंजुर झालेला नाही. दॅट इज द जनरल बॉडी रिझुलेशन इज वन ऑफ द सजेशन इन डीपी.

<u>सदस्य,श्री. जीवन इदनानी</u> :–तुम्ही सुरुवातीपासुनच कायदा फिरवित आहात. हे सजेशन नाही आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:–</u>हे सजेशन नाही, हा प्लॅनिंग ऑथोरीटीचा ठराव आहे.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :–प्लॅनिंग ऑथोरीटीचा ठराव मान्य केला नाही, अदयाप शासनाकडे प्रलंबित आहे.

<u>सदस्य,श्री. जीवन इदनानी</u> :–प्रलंबित आहे तर आपणांस काय घाई होती? आपणांस एवढी काय घाई होती?

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :–तुम्ही कायदेशीर स्थगिती आणायला पाहिजे होती.

<u>सदस्य, श्री. दिलीप जग्यासी</u> :– आपण हे कायदेशीर करत आहात?आपण प्रथम हे कायदेशीररित्या आणावयाचे होते.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे</u> :–शासनातर्फे जो ठराव आला आहे, १०० फुटाचा त्यानुसारच करत आहोत. जे केले आहे ते कायदेशीर केले आहे. शासन निर्णयानुसार अंमलबजावणी केली आहे.

<u>सदस्य, श्री. दिलीप जग्यासी</u> :–एवढी काय घाई होती? विकास आराखडयास सोडुन हा रस्ता करत आहात काय? काय हा रस्ता कल्याणकडुन १०० फुटाचा होईल?

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :–</u>काय होते या रस्त्यामध्ये? काय एवढी घाई केली? ४ वर्षापासुन प्रकरण सुरु आहे, अजुन तीन महिने मिळाले असते तर निर्णय झाला असता.

<u>सदस्य श्री. दिलीप जग्यासी :–</u>१०० फुट होणार हा रस्ता? रेल्वेची मालमत्ता असती तर तोडली असती?

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :–</u>नुसते फिरवत आहेत. का दिशाभुल करत आहेत?

यावेळी सदस्या श्रीमती मिनु दासानी, श्रीमती कमला क्रिशनानी यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

सदस्य, श्री. धनंजय बोडारे :–मा. महापौर महोदया, आजची महासभा ही फक्त विस्थापीतांचे पुनर्वसन कसे करायचे याबाबतीत आहे. कायदेशीर प्रक्रिया, कायदेशीर बाबी याबाबतीत आम्ही खोलात गेलो तर अंगाशी येईल. यांनाही परवडणार नाही आणि आपल्यालाही परवडणार नाही. त्यामुळे कायदेशीर जश्या प्रक्रिया असतील, जसे आयुक्त महोदयांनी सांगितले, आजची महासभा ही विशेष आहे, आज व्यापा–यांचे पुनर्वसन करायचे, नाही करायचे याविषयीच चर्चा होईल. बाकी तर आम्ही भांडत असतो. आजची विशेष महासभा आहे, आपण तर व्यापा–यांसाठी भांडत असतो, ती सहानुभुती आहे, तर उगाच भांडण्यापेक्षा त्यांचे पुनर्वसन कोठे करायचे बस्स यावरच चर्चा झाली पाहिजे. तर मी सभागृहाला विनंती करेल की त्यांचे पुनर्वसन कोठे करायचे यावरच चर्चा करा. त्यासाठी आम्ही प्रस्ताव देत आहोत, असे प्रस्ताव झाले पाहिजेत, बाकी अलाईटमेंट तुम्ही बघुन घ्या, आता श्री. राजेश वदारिया यांनी सांगितले, मला वाटते जर आता अलाईटमेंटमध्ये बदल करायला गेले तर नुकसान होईल, त्यामुळे कायदेशीर बाबी आपण तपासुन पहा. आम्ही जो विचार करत आहोत, आम्ही या ठिकाणी जो प्रस्ताव ठेवत आहोत, यात शहराचे नुकसान होणार आहे की फायदा होणार आहे? तर एका व्यक्तीचा फायदा होण्यासाठी आम्ही ५० व्यक्तीस वेठीस धरले तर हे बरोबर नाही. चुका वर्षानुवर्ष झालेल्या असतील, किंवा त्यावेळच्या प्रशासनाने किंवा शासनाने जो काही निर्णय घेतला असेल तर तो म्हणजे जास्त लोकांचे नुकसान होवु नये म्हणुन. परंतु आम्ही एका व्यक्तीचा फायदा होण्यासाठी, ठिक आहे त्यांचे पुनर्वसन कसे करायचे, त्याचा फायदा कसा होईल, त्याचे नुकसान कसे कमी होईल, हा दृष्टीकोन ठेवुन, ती प्रक्रिया ती सिस्टम न बनविता यावर जास्तीत जास्त लोक प्रभावीत होतील, आता जर अलाईटमेंट चेंज करायचे म्हटले व कायदयाच्या विरोधात करायला गेले तर त्याचा परिणाम वेगळा होईल. एक तर प्रक्रिया रखडेल आणि किती लोक प्रभावीत होतील हे आता माहित नाही. आता या लोकांची मानसिकता झालेली आहे, त्याचे पुनर्वसन करायचे एवढेच या विषयावर चर्चा करा अशी मी संपुर्ण सभागृहाला विनंती करतो. प्रशासनाने कायदेशीर बाबी तपासाव्यात. कमीत कमी कायदयाचे उल्लंघन होणार नाही, याची आपण काळजी घ्या. अशी मी सभागृहाला विनंती करतो एवढाच विषय घ्या, आम्ही प्रस्ताव देतो.

सदस्य, श्री.राजेश वदारिया :–माझ्या एका प्रश्नाचे अदयाप आपण उत्तर दिलेले नाही, साहेब की कोणती एजंन्सी रस्ता बनविणार आहे? काय ती एजन्सी फिक्स आहे? आपण डिमॉलेशन केले आहे.

यावेळी सदस्या श्रीमती निना नाथानी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

सदस्य, श्री. बी.बी.मोरे :– कोणती एजन्सी आहे? काय आहे? आपणांस सांगितले आहे, सभागृहामध्ये.

सदस्य, श्री.राजेश वदारिया :–नाही सांगितले होते.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :–मा. महापौरजी, आपल्याला सरळ शब्दामध्ये, संपुर्ण सभागृहाला मा. धनंजय बोडारे यांनी सांगितले आहे. पुनर्वसनाचा विषय आहे, पुनर्वसनाचाच विषय राहु दया. दुसरे कोणालाही काही बोलायचे असेल तर त्यांनी मा. आयुक्तांच्या दालनात जावुन त्यांना भेटावे. तेथे चर्चा करावी. आता फक्त पुनर्वसनाचा विषय आहे. मला सरळ दिसत आहे यांना व्यापा–यांना दयायचे नाही आहे. हे सरळ राजकारण करु इच्छिता. आणि भांडणे होवुन ही महासभा संपवावी असे दिसते. हे राजकारण करत आहे, तर माझी सूचना आहे, पुनर्वसनाबाबत निर्णय व्हावा.

सदस्य, श्री. बी.बी.मोरे :– आजचा विषय फक्त, व्यापा–यांना जागा दयायची की नाही दयायची, सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, आता असा विषय आहे की, कल्याण–अंबरनाथ रस्त्यावर जे काही डिमॉलेशन झाले, तर तेथिल विस्थापीतांना काय करायचे, त्यांना जागा कोठे दयायची, काय करायचे, घर किंवा दुकानदार यांच्यासाठी हा विषय आहे. सदस्य काय काय विचारत आहेत, मार्किंग कोठे, हे कोठे, ते कोठे? हे न बोलता हा विषय काय आहे त्यावरच लक्ष दिले पाहिजे. मी २०१० मध्ये सभापती होतो त्यावेळी ३३ रस्त्यांचे याच पध्दतीने रस्त्याचे रुंदीकरण झालेले आहे. तर त्यावेळी झालेल्या विस्थापीतांचे आजपर्यंत काय केलेले आहे? महाराष्ट्र शासनाने म्हणा किंवा नगरपालिकेने म्हणा काय केलेले आहे? आज ते लोक दरोदार भटकत आहेत,

त्यांना पर्यायी जागा दिलेली नाही. भलेही ते दुकानदार असाल, घरमालक असोत, किंवा फेरीवाले असोत बिचारे टोपल्या घेवुन बसत असतात त्यांना देखील जागा दिली गेलेली नाही. असा रेकॉर्ड आहे या उल्हासनगर शहराचा, त्या लोकांची येथे चप्पल घासली गेली. एक श्री. शुक्ला म्हणुन वकिल आहे, त्यांची चप्पल घासली गेली, त्यांना आजपर्यंत पर्यायी जागा दिलेली नाही. आणि त्याच्याकडे न्यायालयाचा आदेश देखील आहे की त्यास पर्यायी जागा दयावी म्हणुन तर याबाबत आयुक्त साहेब काय उत्तर देतात माहिती आहे? ज्या आयुक्ताने ज्या रस्त्याचे डिमोलेशन केले असेल तो आयुक्त येथुन बदली होवुन गेला इकडे जागा नाही, तर आयुक्त वर हात करुन घेत आहेत, ही पध्दत येथे चालली आहे. आज ते म्हणत आहेत, रस्ता रुंदीकरणाच्या दृष्टीकोनातुन कायदयाने जर माझी सनद असेल तरी ती जमिन घेवु शकतो, त्यास पर्यायी जागा देवु शकतो परंतु सध्या या शहराची परिस्थिती अशी आहे कुठलीही पर्यायी जागा दिलेली नाही, कुठलीही जागा राहिलेली नाही. तर या विस्थापीतांना तुम्ही जागा देणार कोठे? ३३ रस्ता रुंदीकरणात विस्थापीत झालेल्या लोकांचा काहीही उलगडा झालेला नाही, तर आता या विस्थापीत झालेल्या लोकांचे तुम्ही काय करणार? आणि म्हणुन माझी तुम्हांला विनंती आहे की, तुम्ही बोलतांना म्हणतात की, अशा अशा पध्दतीने हे झाले आहे ते चुकीचे आहे. ३३ रस्त्याचे काढले तर ५० ते १०० लोकांचे नुकसान होईल. जर ३३ रस्त्याचे विचारले तर हे म्हणतात की या बाजुने ५० फुट व त्या बाजुने ५० फुट रस्ता होईल. आता शहाड फाटकचा रस्ता काढला तर तेथे काय मोजमाप केले? तेथे जर मार्किंग केली नाही, तर आमची सनद असलेली दुकाने तोडली. डॉल्फीन क्लबच्या येथे, त्यावेळी श्री. सोनावणे साहेब होते, ते म्हणाले तुम्ही जर तुमचे स्ट्रक्चर काढले तर इतर लोक काढतील. ५० फुट येथुन , ५० फुट तेथुन काढुन दिलेले आहे हे सर्व चुकीचे झालेले आहे. तुम्हांला जर डिमोलेशन करायचे असेल तर आधी ३३ रस्त्यांचे पहा, असेही लोक दारोदार भटकत आहेत, त्यांची सनद असलेली दुकाने व घरे गेलेली आहेत. श्री. राजेश वदारिया म्हणतात त्यांना सनद दिलेली आहे, त्यांना डिमार्केशन दिलेले आहे, माझ्या स्वत:च्या दुकानाला सनद होती, डिर्मार्केशन दिलेले आहे. याबाबत मी तुम्हांला पत्र दिलेले आहे, की मला पर्यायी जागा दया. जर नसेल तर तुम्ही सभागृहाला सांगा. मला जागा दिलेली नाही. आता प्रश्न एवढाच आहे की या लोकांना पर्यायी जागा दयायची, की नाही दयायची, कोठे दयायची? या शहरामध्ये इंदिरा मार्केट आहे, बरेचश्या रस्त्याच्या बाजुला जमिनी आहेत, महापालिकेने जर विचार केला की त्यांना आपण जागा देवु शकतो, बसवु शकतो, तर यापध्दतीने विचार केला पाहिजे. ही माझी विनंती आहे, धन्यवाद।

<u>**सदस्य, श्री. अंकुश म्हस्के**</u> :– मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, माझा एक प्रश्न आहे की, जी मार्किंग दिलेली आहे, ती विकास आराखडयानुसार दिली आहे की, डिवायडरचे सेंटर बघुन दिलेले आहे. पुर्ण इमारत आहे, ती पुढे येत असेल तर ४ फुटाचा किंवा ३ फुटाचा पिलर असेल तर ती इमारत खालुन कमी करत येणार की वरुन? जर नगररचनाकारांनी याबाबत खुलासा केला तर पब्लीकचा मार्ग मोकळा होईल, त्यांना दिलासा मिळेल.

<u>**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी**</u> :–मा. महापौरजी, आयुक्त साहेब, माझी एक विनंती आहे की, आपण लोकांना एक मार्किंग दिली आहे त्यानुसार ते त्यांचे बांधकाम काढत आहे. जर त्याने शटर बांधले आणि ते जर तुम्ही परत तोडले तर ते आम्ही मान्य करणार नाही. व्यापा–यांनी जर स्वत:हुन त्यांचे बांधकाम तोडले आहे, तर ते तुम्ही पुन्हा त्यांचे बांधकाम तोडु नका ही माझी विनंती आहे, धन्यवाद।

**यावेळी मा. महापौर श्रीमती अपेक्षा पाटील यांनी सभागृहात प्रवेश केला व आपल्या स्थानी आसनस्थ झाल्या.**

<u>**सदस्य, श्री. अंकुश म्हस्के**</u> :– आयुक्त साहेब, माझा एक प्रश्न आहे, जी २ फुट किंवा ३ फुटची मार्किंग दिलेली आहे तर त्यात खालुन ड्रेनेज किंवा फुटपाथ दिले तर बरे होईल. जेणेकरुन पुर्ण इमारत तोडण्याची गरज भासणार नाही. आणि जर कॉलम तोडले तर पुर्ण इमारत खाली पडण्याची शक्यता आहे. याचा जरा विचार करावा.

<u>**सदस्य, श्री. मनोज सयानी**</u> :–मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव महोदया, मी दोन मिनटे सर्वात प्रथम या सभागृहात बोलेन की, एवढया मोठया प्रमाणावर बांधकाम तोडण्याची कारवाई ४ तारखेपासुन सुरु झालेली आहे इतिहासात पहिल्यांदाच उल्हासनगर शहरात एवढया मोठया प्रमाणात बांधकाम तोडण्याची कार्यवाही झाली आहे. कल्याण अंबरनाथ रोड, ज्याला कल्याण बदलापुर रोड सुध्दा म्हटले जाते, शांतीनगरपासुन ते फॉलवर लाईनपर्यंत साईबाबा मंदिरपर्यंत शासनाच्या आकडयानुसार आठ ते साडे आठशे

दुकाने बाधित होत आहेत त्यामध्ये पुर्णपणे जे जात आहे, बाधित होत आहेत ते १२२ दुकाने व ५० हुन अधिक घरे जात आहेत. हे जे काम चालु आहे, व्यापा—यांसाठी शहरातील सर्व लोकांनी आपल्या छातीवर दगड ठेवुन शहराच्या विकासासाठी सर्व पक्षाने हा निर्णय घेतला आहे. एकच लक्ष्य आहे की शहराचा हा जो मुख्य रस्ता आहे, कल्याण अंबरनाथ रस्ता आहे, ही मुख्य धारा आहे तो रस्ता मोठा झाला पाहिजे, फक्त कल्याण अंबरनाथ रस्ता नाही तर कर्जत, वांगणी, कल्याण येथुन हाजीमलंग हा रस्ता मोठा झाला पाहिजे. एका दिवसात जवळ जवळ २ लाख लोक या रस्त्यावरुन जातात. हा शहराचा मुख्य रस्ता म्हणुन वाहतुक येथुन वाहते. आज जे बांधकाम तोडले जात आहे, आज लोकांचे पुर्ण दुकान जात आहे, ५ फुट, ६ फुट, ८ फुट जात आहे याबाबतचे दु:ख सर्व पक्षांना आहे, राजकीय नेत्यांना आहे. चिंता आहे, हे याचे जिवंत उदाहरण आहे, ही विशेष महासभा जी सर्व पक्षांनी मिळुन व महापौरांनी हो म्हणुन आयोजित केली. याचा आवाज याच सभागृहात नाही तर नागपुरच्या अधिवेशनात गुंजला याचे आभार शहराच्या आमदार श्री. ज्योती कालानी यांना आहे, त्यांनी याचा आवाज एकदम बुलंदतेने उचलला. पक्षपार्टी न पाहता, प्रत्येक अधिकारी, प्रत्येक कार्यालय, प्रत्येक मंत्रीपर्यंत त्यांनी हा आवाज उठविला आहे. शहराच्या व्यापा—यांनी शहर विकासासाठी जे बलिदान केले आहे, त्यांना पर्यायी जागा मिळाली पाहिजे. आमचे भाजपाचे श्री. गुरुमुख जगनानी, शिवसेनेचे आमदार श्री. बालाजी किणीकर, आमदार श्री. गणपत गायकवाड बाकी सर्व पक्षांच्या लोकांनी यावर एकमत दाखवुन शहरासाठी ज्यांनी बलिदान दिले आहे त्यासर्वांसाठी पुढील भविष्यासाठी चिंता व्यक्ती केली आहे. खरेतर हे धन्यवादाचे पात्र आहेत, महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब आपण सुध्दा. यामध्ये छोटे छोटे बातम्या आल्यात जो डिवायडर आहे तो सूरुवातीपासुन घ्यायला पाहिजे होते तर तो मधुनच घेतला आहे. मार्किंग देवुन सुध्दा अतिरिक्त बांधकाम प्रोक्लेन आणि जेसीबीने तोडले गेले आहे. यामुळे व्यापा—यांचे जे नुकसान झाले आहे त्यांचा आपल्यावर रोष आहे. ते आपली दुकाने स्वत: तोडु इच्छित होते परंतु महानगरपालिकेने येवुन जेसीबी व प्रोक्लेनने तोडली. त्याव्यतिरिक्त जी मार्किंग दिली आहे ती कुठे कुठे चौकात मध्यात दिली आहे. त्यांना अजुन ४—५ फुट तोडावे लागेल. या ज्या गोष्टी आहेत ते व्यापा—यांकडुन प्रसार माध्यमांकडुन समोर येत आहेत. हे ऐकुन खुप दु:ख होते, एकतर आधी जी मार्जिन होती ती तरी चुकीची होती किंवा जी आता देत आहात ती चुकीची आहे. आपणांस व नगररचनाकार यांना लक्ष देणे आवश्यक असेल की जी पहिली मार्जिन आहे त्यावर लक्ष देणे गरजेचे आहे. ९० टक्के व्यापा—यांनी स्वत:हुन पुढे येवुन दुकाने तोडली आहेत. एकदा रुंदीकरण झाले, त्यांनी शटल बनविलेत, गाळे बनविलेत, आपले रोजी रोजगार चालु केले आहे. पुन्हा जर तुम्ही तोडणार आणि त्यांना सांगणार की, तुमची मार्किंग चुकीची दिली होती, तुम्ही सांगाल तुमची मार्किंग ४ फुट अजुन पाहिजे, तर ही दुर्भाग्याची गोष्ट आहे. आयुक्त साहेब, हे पाहणे तुम्ही गरजेचे आहे. कारण तांत्रिक विभाग प्रशासन तुम्ही बघता, तुम्ही याकडे लक्ष दिले पाहिजे. दुसरे असे की, आताच गटनेता व राजकीय नेत्यांची बैठक झाली, स्थायी समिती सभागृहात बैठक झाली, तेव्हा तेथे निर्णय घेण्यात आला की जेवढे काही विस्थापीत लोक आहेत त्यांना कोठे ना कोठे पर्यायी जागा दिली पाहिजे, तिचे स्वरुप काय असेल, कशी जागा देणार, कशी असेल याचे स्वरुप स्पष्ट करुन सर्व गटनेत्यांनी राष्ट्रवादी कॉग्रेस पक्ष, शिवसेना, भाजपा, कॉग्रेस व इतर सर्व पक्षांनी व्यापा—यांच्या हिताची गोष्ट केली आहे, ज्यांनी व्यापा—यांच्या दु:खात आपले दु:ख प्रकट केले आहे. व्यापा—यांना सहानुभुती देण्याचा प्रस्ताव आपल्यासमोर बनवुन पाठवित आहोत. श्री. जमनु पुरस्वानीजी एक मिनिट, जरा थांबा मला पुर्ण बोलु दया, प्रस्ताव आपणच वाचणार. जेथे डिवायडरवर मार्जिन दिली आहे त्यावर लक्ष देणे गरजेचे आहे. आपण जी आता मार्किंग दिली आहे त्यापेक्षा एक इंच सुध्दा जास्त व्यापारी कटिंग करुन देणार नाही. जर व्यापा—यांवर तुम्ही दबाव टाकला, तुम्ही असे केले तर आम्ही सर्व पक्षीय आंदोलन करु आणि याचे उत्तर तुम्हांला दयावे लागेल. एमएमआरडीए कडुन रोड चांगला होईस्तोपर्यंत आणि आता आम्ही जी पॉलिसी निश्चित करत आहोत त्यांना जागा देणार आहोत ती कोठे असेल त्याचे स्वरुप काय असेल निविदा निघेस्तोपर्यंत त्याच्यासाठी उपायुक्त पदाचा एक अधिकारी मी यावुनही पुढे जावुन असे म्हणेल की, श्री. नितीन कापडणीस साहेब, ज्यांना बुलडोझर मॅन म्हणुन आता उल्हासनगरमध्ये नाव दिले गेले आहे, आमचे सर्व अधिकारी सक्षम आहेत, पण श्री. कापडणीस साहेबांना कल्याण—अंबरनाथ रोड तोडण्यापासुन तो रस्ता तयार होईस्तोपर्यंत निविदा काढणे पर्यायी व्यवस्था विस्थापीतांसाठी शोधुन देणे, त्यासाठी उपाययोजना करणे, त्यासाठी आपले जे उप—आयुक्त आहेत श्री. नितीन कापडणीस त्यांची विशेष नियुक्ती या कामासाठी करावी, अशी आम्हां सर्व राजकीय पक्षांकडुन मागणी करतो. जी व्यापा—यांची मागणी आहे, आमचे जनप्रतिनीधींचे प्रश्न आहेत, जी मागणी आहे, त्यासाठी श्री. नितीन कापडणीस यांना नियुक्त करावे, तुम्ही आणि अतिरिक्त आयुक्त तर आहातच, विशेष करुन श्री. नितीन कापडणीस जे मुख्यालय सांभाळतात त्यांच्यावर हा कार्यभार सोपविण्यात यावा, आणि इतर कामाचा त्यांचा बोझा हलका करुन फक्त कल्याण—अंबरनाथ रोडसाठी उप—आयुक्त म्हणुन विशेष नियुक्ती करावी, कारण हा मुख्य रस्ता आहे, व्यापा—यांनी यासाठी बलीदान दिले आहे, ते व्यर्थ नाही गेले पाहिजे, येथे एक सुंदर मोठा रस्ता तयार झाला पाहिजे. आणि कालमर्यादेत तो रस्ता तयार झाला पाहिजे, दिसला गेला पाहिजे, अशी आमची मागणी आहे.

डिवायडरच्या मार्किंगकडे लक्ष दिले पाहिजे, कारण व्यापारी व आपले जे प्रायव्हेट आर्किटेक्ट आहेत त्यांचे म्हणणे आहे की डिवायडरची मार्किंग जर बरोबर दिली तर सव्वा सव्वा फुट दोन्ही बाजुकडुन जागा बरोबर शिल्लक राहते. व्यापा–यांसाठी एक एक इंचसुध्दा महत्वाचा आहे, विशेष करुन या गोष्टीकडे लक्ष दयावे, धन्यवाद।

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव</u> :– सन्माननिय महापौर महोदया, उप–महापौर, आयुक्त साहेब, कल्याण–उल्हासानगर–अंबरनाथ रस्त्यामध्ये बाधित झालेल्या व्यापा–यांबाबत, साहेब एक गोष्ट लक्षात ठेवा येथे सर्व चर्चेचे गृ–हाळ उल्हासनगर महापालिकेवर येथे मला संबंधीत सदस्यांना विनंती करायची आहे की हा रस्ता महाराष्ट्र शासनाचा आहे. राज्य महामार्ग ३५ चा हा रस्ता आहे, हा रस्ता तोडुन महाराष्ट्र शासनाकडे महापालिकेने हॅण्डओव्हर करायचा आहे, हा राज्य मार्ग आहे. गेल्या आठ दिवसापासुन वॉटस्‌अप असो किंवा इतर माध्यमे असोत त्यावर पर्यायी रस्ता देण्यासंबंधी चर्चा चालु आहे. जर या रस्त्त्याच्या बाधित होणा–यांना तुम्ही पर्यायी जागा देत असाल तर यापुर्वी ३३ रोड बनतांना ख–या अर्थाने उल्हासनगर शहराच्या विकासासाठी रुंदीकरण केले आहे, त्यामध्ये ज्यांचे नुकसान झाले आहे त्या दुकानदारांना व घरांना देखील पर्यायी जागा मिळाली पाहिजे. त्यासाठी एक प्रस्ताव मी आपल्यासमोर ठेवतो.

यावेळी सदस्या डॉ. निना नाथानी यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, कल्याण–अंबरनाथ रस्त्यामध्ये ज्यांची पुर्ण दुकाने गेली आहेत, किंवा ज्यांचे काही अंशी घर गेले आहे, किंवा पुर्ण घर जाणार आहे, तर त्यांना पर्यायी जागा कोठे दयायची यासाठी आज महासभा आयोजित केली आहे, वेगवेगळया पक्षाने आपसात बसुन व्यापा–यांशी मिळुन काही मार्ग काढण्याचा प्रयत्न केला आहे, मा. महापौरजी, आपण प्रशासनाबरोबर बसुन एक मार्ग काढण्याचा प्रयत्न केला व जे संपुर्ण २०० दुकाने गेली आहेत, कमीत कमी १८० जे अंशिक रुपाने किंवा पुर्ण रुपाने गेले आहेत, त्याविषयी प्रशासनाकडे किंवा आपल्या आयुक्त महोदयांकडे त्यांना अन्य जागी पर्यायी जागा देण्याबाबत आपणाकडे काय प्रस्ताव आहे, आपण काय रुपरेषा तयार केली आहे, आपल्या मनात काय आहे, त्यांचे कसे पुनर्वसन केले जावे, त्यांना कसे दुकान दिले जावे, त्यांची नुकसान भरपाई कशी केली जाावी, याबाबतीत प्रशासनाचे काय मत आहे? आज दोन तीन महिन्यापासुन ही चर्चा सुरु आहे, ४ तारखेपासुन मोठया प्रमाणावर तोडु कारवाई सुरु आहे, जे नुकसान झाले आहे याबाबतीत प्रशासनाने काय विचार केला आहे, यासाठी आज जी महासभा बोलाविली आहे, आपल्याकडे कोणकोणते प्लॉट आहेत, कुठे आपण पुनर्वसन करणार आहोत, असे न होवो की पुर्वी शासनाकडुन एक योजना आली होती, आपण गरीब लोकांना फ्लॅट देणार होतो, ७०५ भुखंडावर काही लोकांनी घरे बनविली, जेव्हा दुकाने बनविली, त्यावेळी एका इसमाने उच्च न्यायालयात जावुन एक आदेश आणला आणि ती दुकाने तोडली गेलीत. सत्ता पक्ष असो किंवा विपक्ष असो त्यांची इच्छा आहे की व्यापा–यांच्या हितासाठी काही ना काही केले पाहिजे. असे न होवो की हित करता करता त्यांचे अहित होवो, म्हणुन सभागृहाला विनंती आहे की, शांतीपुर्वक आयुक्त साहेब, व प्रशासनाने ही जी दुकाने तोडली गेली आहे, हे जे मोठे नुकसान झाले आहे, सभागृहात सांगितले गेले, ७० ते ८० दुकाने बाधित झालीत, माझे म्हणणे असे आहे की, २०० पेक्षा जास्त घरे असतील, कारण जर एक इमारत आहे त्यात १५ घरातुन जर कुणाचे ५ घर बाधित होत आहेत, तर १५ चे १५ घरे खाली करावी लागतील. ना की त्यातील बाकी थांबतील व ५ लोकांना बाधित केले जाईल. मी आपणांस विनंती करेल की या ५ तारखेच्या आत आपण हे जे दृश्य पाहत आहात, तर आपल्या मनात देखील दु:ख होत असेल, आपण शासनाकडुन बांधिल आहोत, आपणांस फक्त रोष करुन चालणार नाही, आपणांस सत्ताधारी व विपक्षवाले ब–याचदा भेटले असतील, व्यापारी व बाजारातील पंचायतीचे अध्यक्ष आपणांस भेटले असतील परंतु मी असे पाहिले आहे की आजपर्यंत आपण याबाबत खुलासा केलेला नाही तर आपले काय मत आहे, सत्ताधारी पक्ष व विपक्ष व सर्व सदस्यांकडुन जोपर्यंत प्रस्ताव येईस्तापर्यंत आपण आपले मत या सभागृहास सांगावे.

<u>सदस्य, श्री. दिपक सिरवाणी</u> :–मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव महोदया, ठिक आहे जे झाले ते झाले असेही नाही म्हणता येणार, जे दुकानदार अखंड भारतातुन विस्थापीत होवुन आले होते पुढची स्थिती कशी राहील तर साई पक्षाकडुन एक प्रस्ताव दिला होता, तो वाचुन दाखवितो.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरसवानी</u>:–प्रस्ताव देण्याआधी आयुक्त साहेबांच्या मनात काय आहे ते तर कळु दया.

<u>सदस्य, श्री. दिपक सिरवाणी</u> :– आमच्या पक्षाचे म्हणणे ऐकुन तर घ्या.

सदस्य, श्री. जमनादास पुरसवाणी:—नाही, मी काय म्हणतो आयुक्तांना सांगु दया, आपण १०० फुटावरुन ८० फुट रस्ता केला, पण आयुक्त साहेबांनी तो ठराव शासनाकडे विखंडीत करण्यासाठी पाठविला. आपण काय केले, जरा आयुक्त साहेबांचा प्रस्ताव येवु दे, मग तुम्ही दया.

यावेळी सदस्या श्रीमती जया साधवानी यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

सदस्य,श्री. जीवन इदनानी :—विकास आराखडा विखंडीत नाही झाला आहे. म्हणुन मी म्हणालो की, सभागृहाने आधी स्वत:च स्वत: श्रध्दांजली व्हावी. यांनी सभागृहाला जिवंत जाळले. प्लॅनिंग ॲथोरीटीस संपविले.

सदस्य, श्री. जमनादास पुरसवानी:— आधीचा रोडचा ठराव रद्द झाला आहे, विकास आराखडा नाही म्हणत मी. तुम्हांला जर खरोखर वाटत असेल तर व्यापा—यांचे भले व्हावे तर आयुक्तांना त्यांची बाजु मांडु दे. सर्व पक्षांची इच्छा आहे व्यापा—यांचे भले होवो तर आयुक्तांना त्यांची बाजु मांडु दया.

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी :—मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त महोदय, सचिव महोदया, श्री. जमनादास पुरस्वानी म्हणत आहेत की आयुक्तांना त्यांची बाजु मांडु दया. मी सांगतो की, आमचे विधानपरिषदेचे सदस्य श्री. गुरुमुख जगवानी जे नागपुरमध्ये आपल्याला सुध्दा भेटले होते ते स्वत: मुख्यमंत्री महोदयांना भेटले होते, आमच्या पक्षाचे अध्यक्ष, व ठाणे जिल्हयाचे सर्व नेते, तसेच श्री. राजेश वानखेडे देखील गेले होते. इथल्या आमदार श्रीमती ज्योती कालानी देखील मा. मुख्यमंत्री महोदयांकडे गेल्या होत्या. सर्वांना मुख्यमंत्री महोदयांनी एका शब्दात सांगितले की, यांना पर्यायी जागा मिळणारच हे माझे वचन आहे. आमचे सदस्य श्री. राजेश वानखेडे तेथे उपस्थित होते, नागपुरमध्ये आपण स्वत: उपस्थित होतात, श्री. गुरुमुख जगवानी यांनी लक्षवेधी विधानपरिषदेत टाकली होती आणि त्यात लिहिले होते की, रस्ता रुंदीकरणात बाधित झालेल्यांना पर्यायी जागा दयावी. आम्हांला वाटत होते जेव्हा हा रस्ता १०० फुट होईल तेव्हा वाटत होते की रस्ता चांगला होईल परंतु आता आम्ही जेव्हा तेथुन जातो तर आमच्या मनाला वाईट वाटते, असे वाटते हसावे की रडावे, कारण ज्या त—हेने लोकांची दुकाने तोडली आहेत, मनात ठेच लागली आहे. परंतु आमच्या मुख्यमंत्री महोदयांचा जो एजेंडा आहे, तो विकासासाठी आहे. काही लोकांना त्रास झाला असेल, परंतु हेच लोक भविष्यात म्हणतील की हे एक सदन असे होते की ज्यांनी शहराच्या विकासासाठी निर्णय घेतला. १०० फुटाचा रस्ता बनेल परंतु त्याच बरोबर त्या लोकांना मलम लावण्याची देखील गरज आहे. आयुक्त महोदय आपणांस देखील शासनाकडुन निर्देश मिळाले असतील की यांना पर्यायी जागा दया. येथे सत्तापक्ष असो किंवा विपक्ष असो प्रत्येकाच्या मनात एकच दु:ख आहे, रडणे आहे की आपले जे व्यापारी आहेत जे ५० वर्षापासुन व्यवसाय करत आहेत त्यांना पुन्हा रोजीरोटी मिळावी हे एक सामाजिक देणे आहे. हे दायित्व आपणांस निभवावे लागेल. सभागृहातील एकही व्यक्ती नाही म्हणाार नाही, आम्हांला समाजविकासाबरोबर समाजाचे दायित्व देखील निभवावे लागेल. श्री. जमनादास पुरस्वानी यांच्या प्रस्तावास पुढे नेत मी असे म्हणेन की आयुक्त साहेब आपणांस सुध्दा या सभागृहास एक वचन दयावे लागेल आपण या लोकांना पर्यायी जागा दयाल. धन्यवाद।, जय हिंद, जय भारत.

सदस्य, श्री. पृथ्वी वलेचा :—साहेब, आम्हांला विश्वास आहे की, तुम्ही आमच्या लोकांसाठी सर्व काही कराल. आपण प्रामाणिक आहात, आम्हांस आशा आहे की आपण आमच्यासाठी काहीतरी कराल. आम्ही आपले आभारी राहु.

सदस्य, श्री. राजु जग्यासी :— मा. महापौरजी, मी आपली क्षमा मागतो सभागृहात जरा कंन्फ्युजन आहे. मी सर्वात आधी प्रश्न केला होता की, रेसिडेन्शीअल प्रापर्टी किती आहेत त्यामध्ये जरा संभ्रम आहे, मी म्हणुन प्रश्न सुध्दा विचारला होता. मी विनंती करेल की अधिका—यांनी याबाबत येवुन खुलासा करावा. १०० टक्के ज्या मालमत्ता बाधित होत आहेत त्या किती आहेत, त्यानुसार आम्ही प्रस्ताव तयार करु. हे जरा स्पष्ट होवु दया.

सदस्य श्री. दिलीप जग्यासी :—ज्यांचा अर्धा फ्लॅट जाईल तो कोठे राहणार?

सदस्य श्री. राजु जग्यासी :—९० ते १०० टक्के किती बाधित होतात ते आधी सांगा.

श्री. बठिजा, प्र. शहर अभियंता :—२६५ मालमत्ता आहेत.

<u>सदस्य, श्री. राजु जग्यासी</u> :– रेसिडेंशीअल ज्यांचे पुर्ण फ्लॅट जात आहेत, जे रोडवर येत आहेत.

<u>श्री. बठिजा, प्र. शहर अभियंता</u> :–होय. रेसिडेंशीअल आणि व्यापा–यांचे गाळे १६८.

<u>सदस्य, श्री. राजु जग्यासी</u> :– हेच माहिती करुन घ्यायचे होते.

<u>सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :–</u>एक मिनिट.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>श्री. कुमारीजी एक मिनिट मी सभागृहाला विनंती करतो की, जो आम्ही सर्व संमतीने एक प्रस्ताव तयार करत आहोत, आपल्याला देणार आहोत यात काही शंका नाही की व्यापा–यांसाठी केला आहे, व्यापा–यांसाठी प्रावधान ठेवले आहे. परंतु जे रस्त्यावर आले आहेत, ज्यांना घर नाहीत, ज्यांना घरे नाहीत, जे घर तुटल्यामुळे बेघर झाले आहेत, कुणाची परिस्थिती कशी आहे, कोणाची कशी आहे? कोणाच्या घरी लग्नकार्य असेल, कोणाच्या घरी काही असेल, कोणाची मुले शिकत असतील, निसर्गाने आम्हांला या खुर्चीवर बसविले आहे, तर आमचे कर्तव्य बनते की आम्ही त्यांच्यासाठी काहीतरी करावे आणि जर आमच्या हातात आहे, मी खुलासा करु इच्छितो की, महापालिकेला २५ टक्के मालमत्ता जी मिळणार आहे, ज्यांची पुर्णत: फ्लॅट गेले आहेत. आज फ्लॅट घेणे सहज नाही तर आमचे कर्तव्य बनते व मी सभागृहाला विनंती करतो की, ठरावामध्ये हे घ्यावे की ज्या मालमत्ता आपणाकडे येणार आहेत, त्या मालमत्ता वाजवी दराने भाडे तत्वावर यांना देण्यात यावे. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–</u>मा. महापौरजी, आता श्री. राजु जग्यासी यांनी सांगितले की, २५ टक्के आपली मालमत्ता बिल्डरांकडे आहे. माझ्यामते श्री. राजेश वानखेडे यांनी सुध्दा हा विषय काढला होता परंतु त्याबद्दल काहीही सविस्तर माहिती देण्यात आलेली नव्हती. त्याचा थांगपत्ता सुध्दा नाही कुठे आहे ती मालमत्ता, कोणत्या बिल्डरच्या घश्यात आहे, कोणत्या नगरसेवकांच्या घश्यात आहे? त्याचा थांगपत्ता नाही. मग नुसत्या त्या हवेशीर बाबी महासभेमध्ये उपस्थित करुन त्या लोकांना चॉकलेट देण्यासारखे काम होणार आहे, तर मालमत्ता कोणती आहे, त्याची सविस्तर यादी येथे आणावे व त्यानंतर व्यवस्थीत नियोजन करता येईल. नुसते हवेत बोलुन त्या व्यापा–यांना चॉकलेट देणे, त्या घरमालकांना आशा दाखविणे हे मला तरी बरोबर दिसत नाही.

<u>सदस्य श्री. दिलीप जग्यासी :–</u>राधास्वामी सत्संगच्या बाजुला राधा अपार्टमेंट आहे, ती अर्धी बिल्डींग जात आहे. तसेच प्लाझाचा सुध्दा पुढचा भाग जात आहे. त्यांचे पीलर्स कट होतील तर काय राहिलेल्या जागांची क्षमता टिकुन राहील काय? समजा, १० घरे जात आहे, बाकीचे १० घरे तेथे राहु शकतील काय त्यांचा स्लॅब तोडल्यावर त्या इमारतीची एवढी क्षमता असेल काय? इतर लोक सुध्दा विस्थापती होणार नाही काय उरलेले?

<u>श्री. भरत बठिजा, प्र. शहर अभियंता :–</u>ते तर बिल्डींगजची स्टॅबिलीटी चेक करुन नंतर सांगता येईल.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी:–</u>माय डिअर सीटी इंजिनिअर, आपण बोललात ६७, आणि सभागृहाने सुध्दा मान्य केले ६७. प्लाझा टॉवर मध्ये किती फ्लॅट आहेत?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>आमची श्री. रिजवानी बरोबर बैठक झाली तेव्हा त्यानी १८२ चा आकडा दिला होता, आयुक्त महोदय आपण सुध्दा तेथे उपस्थित होते. श्री. नरेंद्रकुमार ठाकुरजी, श्री. आयुक्त महोदय सुध्दा तेथे उपस्थित होते, १८२ संपुर्ण रुपाने बाधित होणार असे श्री. रिजवानी यांनी स्थायी समितीमध्ये सांगितले होते. त्यावेळी मी म्हटले होते की, १८२ नाही तर २०० पेक्षा अधिक असतील जर एका इमारतीत १० घरे बाधित असतील तर उर्वरीत घरे सुध्दा बाधित होतील. तर ती इमारत खाली करावी लागेल व त्यांना सुध्दा काही महिने, ४ महिने, ६ महिने दुस–या जागेवर रहावे लागेल. माझ्या मते ही जी माहिती आहे ती पुर्णरुपाने बरोबर नाही. किंवा त्यांचे आकडे व्यवस्थीत नाही, त्याची माहिती महासभेत दिली जावी की, कोण कोणत्या इमारतीमध्ये कोणकोणते घरे जात आहेत. प्लाझा टॉवर आहे तेथे आहेत १२ घरे त्यानंतर ८ घरे आलीत असे श्री. रिजवानी म्हणाले परंतु तेथे ५५ पेक्षा जास्त घरे आहेत.

यावेळी सदस्या श्रीमती शुभांगी बेहनवाल सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>सदस्य श्री. दिलीपकुमार जग्यासी :—</u>राधास्वामी सत्संग हॉलच्या बाजुला.

<u>सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—</u>प्लाझा टॉवर येथे जे दिले आहे ते ७६०, ७०६, ५०६, ४६०, ३६०, १६० व ग्राउंड फ्लोअर तेथिल लिफ्ट सुध्दा गायब केली आहे. एकुण ८ फ्लॅट जात आहे. त्यात ६ लोकांना नोटिस दिल्या आहेत. तर हे डिमॉलेशन सुरु झाल्यानंतर ते १६० फ्लॅटधारक कोठे जातील? यात दोन आधीच कमी करण्यात आले आहेत. ८ फ्लॅट जात आहेत, प्लाझा टॉवर मध्ये.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, मी प्रशासनास विनंती करतो की आपण याची संपूर्ण चौकशी करुन प्रशासनाने त्यांना घर व दुकाने दयावीत. ही संपूर्ण जबाबदारी पुर्णपणे प्रशासनाची आहे. कोणाचे किती घर जात आहे व किती दुकाने जात आहे याची पुर्णपणे आपण चौकशी करा. जे गोरगरीबांचे दुकाने व घरे जातात त्यांना आपण जागा दयायला पाहिजे, हे स्पष्ट धोरण आहे, यामध्ये वाद नाही. आपण स्वतंत्रपणे याची चौकशी करा. धन्यवाद।

<u>सदस्या डॉ. निना नाथानी :—</u>आयुक्त साहेब, आता आताच एका सदस्याने प्रश्न मांडला की जर अर्धी इमारत तोडली तर काय अर्धी इमारत सुरक्षीत आहे? कोणत्याही इमारतीचे बांधकाम, स्लॅब व सीव्हील वर्क असो, जर थोडासा सुध्दा बेस जातो तर ती इमारत संपुर्णच्या संपुर्ण असुरक्षीत आहे. त्यामुळे संपुर्णच्या संपुर्ण इमारत जात आहे. आपण जो आकडा दिला आहे तो फारच कमी आहे. ८, ९ घरे मोजल्याने नाही होत तर संपुर्णच्या संपुर्ण इमारतीचे बिम असुरक्षीत होत आहेत. आपण म्हणालात आपण हे नंतर तपासु परंतु नंतर कसे तपासणार? ही समजण्याची गोष्ट आहे की कोणत्याही इमारतीतील सिव्हील वर्क किंवा ग्रॉस चेंजेस येतात तर ती इमारत डीम टु बी अनसेफ. तर आपण तेथे लोकांना कसे ठेवणार? ती संपुर्ण इमारत असुरक्षीत होते. तर अशा इमारतीत असुरक्षीतपणे लोकांनी राहणे याबाबत आम्ही राजी नाही. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>श्री. बठिजा साहेब, आपण शहर अभियंता आहेत, आपण डीप्लोमा केला आहे की डिग्री केली आहे हे आम्हांला माहित नाही. परंतु त्यावेळी आपणांस निश्चितच शिकविण्यात आले असेल की जर एखादे बांधकाम तोडल्यानंतर त्या बांधकामाचे स्टॅबिलीटी किती वाचते? ही तर ७ माळयाची इमारत आहे. यात जातील ७ घर, ८ घर व बाकी घरे कोठे जातील? ६० घरे? हे स्ट्रक्चर स्टॅबिलीटी सर्टीफिकेट आपण देणार? बाकी जे लोक तेथे आहेत त्यांची जिविताची व मालमत्तेची हमी आपण घेणार?

<u>श्री. भरत बठिजा, शहर अभियंता :—</u>ही जी यादी आहे ती नगररचना विभागाकडची आहे.

यावेळी सदस्या श्रीमती शशिकला आवारे हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>म्हणजे तुम्ही फॉल्टी आहात ना?

<u>श्री. भरत बठिजा, शहर अभियंता:—</u>स्टॅबिलीटीचा जो प्रश्न आहे, जी कोणती इमारत बनेल तेव्हा त्याचे डेस्टी वर्क कळेल.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>बनणार? ती तुटणार आहे, ती बनेल केव्हा?

<u>सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—</u>श्री. बठिजा साहेब, ही जी इमारत तुटणार आहे, किंवा तोडली जात आहे त्यांना तर नोटिसा सुध्दा मिळाल्या नाहीत. असेच तोडण्यात आले आहे. १७ सेक्शन येथे एक दुकान आहे, त्याची ११ फुटची मार्जिन होती, जेव्हा तोडण्यात आले तेव्हा १९ फुट तोडण्यात आले, मी श्री. कापडणीस साहेबांना फोन केला की जी मार्किंग आहे तर याची तपासणी कोण करणार?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>आयुक्त साहेब, एका गोष्टीचा खुलासा करु इच्छितो, जेव्हा उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे डेंजरस इमारतीस नोटिस दिली तर त्या इमारतींना नोटिस दिल्यानंतर आपण त्यांना खाली केल्यावर तेथिल लाईट कनेक्शन व पाण्याचे कनेक्शन कापण्यात आले, व त्यांना सांगण्यात आले की इमारत

रिपेरिंग करण्यास सांगितले ते रिपेरिंग झाल्यानंतर आम्ही त्यांना म्हटले की जो पॅनलप्रमाणे इंजिनिअर आहे त्याचे सर्टीफिकेट आणण्यात यावे. तसेच या ज्या इमारती आहे प्लाझा सारखे इमारती आहेत, त्यांचे थोडे थोडे बांधकाम तुटणार तर त्याच्या स्टॅबिलीटीचे काय करणार? व आपले जे पॅनलवर इंजिनिअर आहे त्यांचे आपण सर्टीफिकेट घेणार? त्यांच्या पुनर्वसनाची व्यवस्था करणार? याबाबत जरा खुलासा करावा, जर एका इमारतीचे आठ फ्लॅट तुटतात त्यांना कुण्या ना कुण्या आर्किटेक्टचा किंवा पॅनलच्या इंजिनिअरचे स्टॅबिलीटी सर्टीफिकेट असली पाहिजे. म्हणजे जेणेकरुन लोकांना तेथे जागा देवु. जी निती आहे त्यात आम्ही त्या पॅनलवरील इंजिनिअरचे सर्टीफिकेट मागितले आहे. जर आपण त्या इमारतीतील काही फ्लॅट तोडणार ती नक्कीच डेंजरस होईल. तर आपण तेथिल लोकांचे जीव वाचण्यासाठी त्यांना तेथुन हटवुन जागा देवु शकतो काय याबाबत अन्य गोष्टींसह त्यांच्या पुनर्वसनाच्याबाबत जरा खुलासा करावा.

<u>सदस्या डॉ. निना नाथानी:—</u>माझा एक प्रश्न आहे, की आपण कुठेही कोणत्याही इमारतीत जर काही बदल केले तर आपणांस परवानगी घ्यावी लागते, जेव्हा सीव्हील वर्कचे चेंजेस येते तेव्हा म्हणतात की ही इमारत डेंजरन्स आहे, ती इमारत एक तृतियांश तुटत असेल तर ती संपुर्णच्या संपुर्ण इमारत धोकादायक आहे. बाकीच्या भागातील लोक सेफ असतील तर काय त्याचे आपण पुनर्वसन करणार? आपण या गोष्टी पाहिल्या पाहिजेत धन्यवाद।

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>यांना पर्यायी जागा दयायची नाही दयायची याबाबत आपले काय म्हणणे आहे यामध्ये? तुम्हीच बोला, तुमचे म्हणणे मांडा व आम्हांला कळु दया.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>मा. आयुक्त साहेब, प्रथम तुम्ही सर्वांचे ऐकुन घ्यावे व नंतर उत्तर दयावे. जर काही लोकांना उशिर होत असेल तर लवकर आटोपुन घ्या, कारण निर्णय महासभाच घेणार आहे. कोणाचे काही ऐकायची गरज नाही. आयुक्त साहेब, मलाही काहीतरी याविषयी बोलायचे आहे. हा जो कल्याण—अंबरनाथचा रस्ता आहे तो गेल्या ४० वर्षापासुन ७४ च्या विकास आराखडयात १०० फुटाचा आहे. ठिक आहे, तेथे बांधकामे झालेत, परंतु प्रत्येक व्यापा—यांना माहित आहे आज ना उदया तोडावे लागणारच आहे. परंतु ज्यावेळेस या महासभेत विषय आणला गेला, गेल्या तीन वर्षापासुन हे सर्व प्रकरण चालु आहे. अशा अवस्थेत आम्ही व्यापा—यांना सांगतो की आम्ही वाचवु. कारण यामध्ये आमची राजनैतिक पोळी भाजत असतो. जेव्हा निवडणूक येते त्या त्या वेळी आम्ही हया सर्व गोष्टी पुढे आणत असतो, त्यानंतर गप्प बसतो. याठिकाणी जे जे विषय येणार आहेत ते आम्ही दोन वर्ष अगोदरही करु शकलो असतो. परंतु आम्ही विचार केला की कसेतरी व्यापारी वाचले पाहिजेत. परंतु हा रस्ता मुळात आमच्या अधिकारात नाही. ४ वर्षापुर्वीच मी या महासभेत विषय मांडला होता, त्यावेळी आमचे आयुक्त श्री. खतगावकर साहेब होते. त्यावेळी मी प्रश्न विचारला होता की हा जो रस्ता आहे तो आपल्या महापालिका क्षेत्रात आहे काय? आणि तो आम्हांला वाचविता येईल काय? त्यावेळी आयुक्तांनी आपले स्पष्ट मत मांडले होते की हा रस्ता महापालिका क्षेत्रात नसुन त्यावर शासन निर्णय घेवु शकते. पण हा आम्ही वाचवु शकत नाही तरी सुध्दा आम्ही व्यापा—यांना आश्वासन देत राहिलो. काही सदस्यांनी विषय आणला की यांना पर्यायी जागा दयायची, मी आता त्यांची नाव घेत नाही. त्यांनी बरीच उदाहरणे दिलीत, त्यांनी ७०५ चे म्हटले आणि त्या फ्लॉटमध्ये एमएससीबीचे ऑफिस सुध्दा आहे. ७०५ प्लॉटमध्ये अनाधिकृत बांधकामे झालेले आहेत. ती मालमत्ता महापालिकेची आहे, परंतु कोणतरी बिल्डर सनद आणुन कोर्टात गेला आणि आपल्या महापालिकेने विस्थापितासाठी कोटी रुपये खर्च करुन बांधकाम केले होते. कोर्टाकडुन स्टे आणुन ते पाडण्यात आले. ७०५ चे उदाहरण देवुन आम्ही महासभेत मांडतो, बोलतो. कारण ते शक्य नाही. आम्ही फक्त राजनितीच करतो पण आज लोकांचे नुकसान झाले आम्हांलाही बघवत नाही. परंतु कायदयाच्यादृष्टीने ते आम्हांला करावे लागते. ते होणारच होते, आज नाहीतर उदया ही व्यापा—यांवर टांगती तलवारच होती. आज आम्ही व्यापा—यांसाठी महासभा लावली आहे. हा जो प्रस्ताव आम्ही याठिकाणी मांडतो, तो खरोखच होणार आहे का आणि त्यांना न्याय मिळणार काय? जर त्यांना न्याय मिळत असेल तर चांगलीच गोष्ट आहे. त्यादृष्टीकोनातुन हे पाऊल घेतले पाहिजे, फक्त आम्ही बोलतोय, आम्ही शासनाकडे प्रस्ताव पाठवतोय आणि शासन त्याच्याकडुन काहीच उत्तर देत नाही. असे व्हायला नको. जोपर्यंत आपण येथे प्रस्ताव पाठविणार, पारीत करणार, त्यावर आपला दृष्टीकोन असायला पाहिजे. त्यामध्ये काय कमी आहेत, त्यामध्ये काय होवु शकते, या गोष्टीचा खुलासा करुनच आपण वर पाठवावे. अशी आमची विनंती आहे. याअगोदर सुध्दा ३३ रस्त्यात जे रस्ते बनविण्यात आले ते ३ नंबर व ४ नंबरलाच बनविण्यात आले, त्यामध्ये बहुतेक गरीब लोकांची घरे गेलीत परंतु आजपर्यंत त्यांना पर्यायी जागा भेटलेली नाही. तसेच कॅम्प नं. ३ व ४ मध्ये काही पॉलिटीकल लोकांची घरे जात होती पण नाही गेली. ठिक आहे काही हरकत

नाही. परंतु त्यावेळेस ते रस्तेच वगळुन टाकलेत. अशा परिस्थितीत ३३ रस्त्यात ज्या लोकांची घरे गेलीत, ती लोक आता रस्त्यावर आहेत तर त्यांचाही विचार करण्यात यावा. तर फक्त व्यापा–यांसाठीच नाही तर गोरगरीबांसाठी निर्णय घेण्यात यावा अशी माझी मनापासुन इच्छा आहे. परत असा एक सदस्य आहे, त्यांनी म्हटले की याच्यानंतर जर तुम्ही रस्ता रुंदीकरण करतात त्यात जर तुम्ही एक इंच सुध्दा हात लावायला गेलात तर आम्ही रस्त्यावर उतरु अशा आमच्या एका सदस्याचे म्हणणे होते. यापुर्वी सूध्दा एका नेत्याने यास विरोध केला की हा १०० फुट रस्ता आम्ही होवु देणार नाही. व्यापारी रस्त्यावर उतरणार, परंतु आम्ही त्यावेळेस त्यांना आश्वासन दिले होते. परंतु जेव्हा तोडायला आले तेव्हा तेथे एक कुत्रा सुध्दा भटकला नाही. ते आम्ही सर्वांनी बघितले. ठिक आहे, तर अशा पध्दतीने आम्ही लोकांशी राजकारण करु नये, अशा पध्दतीने खेळु नये अशी प्रामाणिक इच्छा आहे परंतु आम्ही जो विषय घेतो, तो या लोकांना फायदेशीर व्हायला पाहिजे. आज आम्ही रस्त्याबद्दल बोलत आहे, तो रस्ता पुर्ण १०० फुट करायला पाहिजे, तर पुर्ण १०० फुटच घ्या. तर काही लोकांना तुम्ही आमच्या लोकांच्या सांगण्यावरुन आश्वासन देवु नका की मी वाचविन, पुर्ण १०० फुट घ्या. तर भविष्यात ही तर पिढी जाईलच जी नविन पिढी येईल त्यास अशा पध्दतीने त्रास व्हायला नको. याठिकाणी काही लोक धक्का येवुन मेले, काही लोक आजारी पडले, तर प्रत्येकाला वाटते की, मेहनतीने आम्ही जी वस्तु बनविली आहे ४० वर्षापासुन, ५० वर्षापासुन वास्तव्य करत आहोत. ती वस्तु डोळयासमोरुन गायब होते. ठिक आहे आपण या गोष्टी करत आहोत. परंतु याबाबत जी आपण फॅनिंग देणार आहोत उदया असे नको, त्या व्यापा–यांना परत उभे राहावे लागेल. तर आज या रस्त्याबाबत ज्या फॅनिंग देणार, त्या आताच स्पष्ट करा, भविष्यात परत एखादया व्यापा–याला आत्महत्या करायला लावु नका. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :</u>–मा. आयुक्त साहेब, आताच श्री. सुरेश जाधव यांनी सांगितले, ट्रेनिंगच्याबाबतीत चौकात, ट्रर्निंगला जी फॅनिंग देण्यात येणार आहे, दिली आहे, किंवा देण्यात येणार आहे, याबाबतीत सुध्दा खुलासा करावा. व्यापारी आता त्रस्त झाले आहेत, स्वत:ची प्रापर्टी तुटली, मालमत्ता तुटल्या आहेत ते पाहुन जर काही लोक हार्ट पेशंट असेल तर ते जर डिप्रेशनमध्ये गेले, जसे आता श्री. जीवन इदनानी यांनी सांगितले तर तसे व्हायला नको, जी फॅनिंगची मार्किंग दिलेली आहे, दयायची आहे, तोडलेली आहे किंवा तोडायची आहे ते सुध्दा आता स्पष्ट करावे आणि आपल्या प्रशासनातर्फे हे जे विस्थापीत झालेले लोक आहेत, व्यापारी आहेत, किंवा ज्यांची घरे गेली आहेत, इमारतीत घरे गेली आहे तर आपण त्यांना कशाप्रकारे, बाधित झालेल्या लोकांना तुम्ही न्याय कसा देणार ते थोडक्यात लवकर तुम्ही सांगावे अशी आमची इच्छा आहे. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :</u>–मा.महापौरजी, आयुक्त साहेब, पुर्ण सभागृहाचे म्हणणे तुम्ही ऐकुन घेतले. श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही काही ठराव केला. मा. आयुक्त महोदयांनी मागचा ठराव विखंडीत करण्यासाठी पाठविला. संपुर्ण सभागृहाचे, संपुर्ण शहराचे मत होते तो रस्ता ८० फुट करायचा. त्यासाठी दोन वेळा आम्ही ठराव पारीत केला. श्री. चंद्रशेखर साहेब असतांना तेव्हा सुध्दा आम्ही तो ठराव ९९ कि २००० साली तेव्हा सुध्दा प्रस्ताव केला. परंतु तो रस्ता झाला नाही. त्यावेळी श्री. चंद्रशेखर यांची भुमिका नाही, तुम्ही रस्ता करणारच अशी होती. चंद्रशेखर गेले परंतु रस्ता झाला नाही. जसे आता श्री. सुरेश जाधव यांनी सांगितले की तेव्हापासुन आमच्यावर टांगती तलवार होती. गेल्या पाच ते सहा महिन्यापासुन त्या रस्त्यावरचे व्यापारी भटकत होते. महानगरपालिकेचे प्रत्येक दरवाजे, प्रत्येक राजकीय लोकांचे, प्रत्येक आयुक्तांचे तेथुन व मंत्रालयामध्ये किती चकरा झाल्या असतील म्हणजे आताच नाही ब–याच वर्षापासुन म्हणजे अशाच विषय निघाला की तेथिल व्यापा–यांना किती थरका बसतो. तर त्यांची जी लागत होते, आयुष्यभराची पुंजी व आयुष्यभराची मेहनत होती. आज एवढी चर्चा याठिकाणी होते, जर तो रस्ता मोकळा होता, आज आम्ही सर्वांनी तुमचे अभिनंदन केले असते की वर्षानुवर्ष रखडलेला रस्ता तुम्ही घेतला आहे. एमएमआरडीएचा निधी आणु. त्याठिकाणी व्यापा–यांचे नुकसान झाले आहे, व्यापा–यांनी कुर्बानी दिली. १००० कोटीच्या आसपास या उल्हासनगर शहरांच्या व्यापा–यांचे म्हणजेच उल्हासनगरचे नुकसान झाले. परंतु हा मुख्य रस्ता असल्याने हे तर आज ना उदया कधी तरी होणारच होते असे श्री. सुरेश जाधव यांनी सुध्दा सांगितले. औषध कडु असले तरी आपणांस घ्यावी लागेल. जे कडु औषध आम्ही घेतले ते आम्हांला पचविता पचविता वेळ लागेल. सांगायचा अर्थ असा की आता जी आम्ही भुमिका घेत आहोत ते साकारात्मक दृष्टीकोनातुन प्रशासनाने त्यावर कार्यवाही केली पाहिजे. लोकांचे नुकसान झालेले आहे, झालेल्या नुकसानांची भरपाई करता येणार नाही. तर त्यांना आम्हांला रस्त्यावर किंवा वा–यावर सोडता येणार नाही कारण ते व्यापारी, ते लोक आपले उल्हासनगर येथिल आहेत. त्यांचे नेतृत्व त्यांनी आम्हांला याठिकाणी दिलेले आहे. त्यांच्यावर विश्वासाने विसंबुन राहतात त्यांना वा–यावर सोडता येणार नाही त्यामुळे पुन्हा एकदा संपुर्ण सभागृहाची, जो आम्ही निर्णय घेवु, आम्ही प्रस्ताव करु शकतो त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे करणे हे प्रशासनाचे काम आहे. गेल्या तीन वर्षापासुन

एमएमआरडीएने पार्किंग देण्यासाठी सांगितले आहे. पार्किंग दिलेली आहे. परंतु अशा प्रकारची चुकीचे होत आहे त्यावर लक्ष दयायला पाहिजे. आणि मग सभागृहाच्या लक्षात आणायला पाहिजे. ठिक आहे देर आये, दुरुस्त आये. कायदयाच्या बाबीमध्ये गेलो तर आम्हीच अडचणीत येणार आहोत. व्यापा–यांचे नुकसान त्यामध्ये जास्त होत आहे. त्या बाबी आम्ही दुर्लक्ष करत आहोत परंतु व्यापा–यांचे पुनर्वसन करणे हे आमचे कर्तव्य आहे. आणि तुमचीही जबाबदारी तेवढीच आहे. कारण आम्हांला फक्त एकच रस्ता नाही तर इतर रस्ते सुध्दा मोठे करतांना त्या लोकांनी विश्वासाने म्हणले पाहिजे नाही नाही आमचे जरी गेले, विचार करणारे सदस्य या सभागृहात बसलेले आहेत व आयुक्त हे आमच्यासाठी विचार करण्यासाठी बसलेले आहेत. त्यामुळे रस्ता रुंदीकरण करतांना ते आमच्यासाठी आवश्यक असणार आहे. नुकसान काय करता, लोकासंख्या वाढत आहे, वाहन प्रदुषण वाढत आहे. अर्धा–अर्धा तास, एक–एक तास कोंडी होण्यापेक्षा आमची काही लोक बाहेर जात आहेत. कोण कल्याणला जाते, कोणी अंबरनाथला जाते, कारण उल्हासनगर राहण्यासारखे नाही. परंतु हा एक वेगळा रस्ता उल्हासनगरला तुम्ही देतात, परंतु त्याची कुर्बानी ती लोक देत आहेत. आमचे महाडिक यांनी काश्मिरच्या ब्राउंडरीवर लढतांना कुर्बानी दिली, त्यांचे संपुर्ण महाराष्ट्राने कौतुक केलेले आहे, अशा पध्दतीने कौतुक करण्याची भुमिका आता व्यापा–यांची आहे. उल्हासनगरसाठी त्यांनी कुर्बानी केली, त्याग केला, करोडो रुपयांचे नुकसान त्यांचे झालेले आहे. मोठया काळजाची लोक आहेत ते. परंतु त्यांची कदर केली पाहिजे. नाहीतर आमिर खान बोलला होता की त्याच्या बायकोला वाटते म्हणुन भारत सोडायचे होते. एका साईडला महाडिकची पत्नी म्हणते माझे ३ मुले सुध्दा माझ्या नव–यासारखे मिल्टरीमध्ये मी पाठविन. आणि आमिर खान त्याच्या बायकोला व मुलाला वाटते की देश असुरक्षीत आहे म्हणुन तो परदेशात पाठवितो. अशा प्रकारची आमची भुमिका असता कामा नये आम्ही आमिर खान व्हायला नको. महाडिकाच्या भुमिकेत व्यापारी झालेले आहेत, थट्टा मस्करी चालु आहे असे व्हायला नको. त्यांचे पुनर्वसन कसे होईल, कमीत कमी नुकसान कसे होईल, अशा प्रकारे आमची भुमिका असली पाहिजे आणि या भुमिकेतुन सभागृहाने पाहिले पाहिजे. आम्ही येथे प्रस्ताव देत आहे, प्रस्ताव प्रस्ताव न राहता, लालफितीमध्ये न अडकविता, काटेकोरपणे तंतोतंत पालन करुन त्या व्यापा–यांचे पुर्नवसन कसे होईल, ज्यांची घर पुर्ण जात आहे, त्यांचे पुर्नवसन कसे होईल, अशी भुमिका घेवुन सकारात्मक दृष्टीकोन ठेवुन एखादा सक्षम अधिकारी ठेवुन पुर्नवसनचा जो प्रकल्प होईल, लगेच रस्त्याचे बांधकाम कसे सुरु करता येईल यासाठी पाठपुरावा करण्यासाठी उप–आयुक्त, सहाय्यक, उप–आयुक्त, इजिनिअर, सहा. अभियंता अशी एक टिम तयार करावी. नुसती नेमणुक नको तर जबाबदारीने काम केले पाहिजे. तो रस्ता बनविण्यासाठी, त्याचे पुर्नवसन करण्यासाठी भविष्यात सुध्दा पुन्हा तेथे हातगाडी सुध्दा उभी राहणार नाही, असा वेगळया प्रकारचा लुक दयावा, ज्या लोकांनी कुर्बानी दिली आहे, ज्या लोकांनी बलिदान केले आहे, त्याचे चीज व्हावे. अशा प्रकारचे आव्हान स्विकारुन आपण सर्वांनी उतरा अशी मी आपणांस विनंती करतो. जो मी प्रस्ताव देतो त्याची लवकरात लवकर अंमलबजावणी करण्याचे आश्वासन तुम्ही दया. तुमची भुमिका काय असेल, कायदेशीर मार्ग काय ते तुम्ही सांगा, आम्हांला माहित नाही. कायदेशीर मार्गात तसे काहीच बसत नाही, पण कायदेशीर मार्ग बाजुला ठेवुन मानवतेच्या दृष्टीकोनातुन लोकांनी त्याग करण्यासाठी, त्यास प्रवृत्त करण्यासाठी, इतर रस्ते तोडतांना त्यांना वाटले पाहिजे की हे लोक आमचे नुकसान होवु देणार नाही. आपल्या पाठीशी सभागृह आहे अशी भुमिका घेवुन तुम्ही कार्यवाही चालु ठेवा. ते आश्वासन फक्त आम्हांला आपल्याकडुन अपेक्षित आहे.

यावेळी सदस्या श्रीमती पुष्पा राजवानी, श्रीमती अनिता तरे हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, सर्व सदस्यांच्या भावना चांगल्या आहेत. त्या पुर्नवसनाच्या दृष्टीकोनातुन मी सांगतो, मी एवढीच विनंती करेल की, या अगोदर जे ३२–३३ रस्त्यांचे जे बाकी आहे ते आणि माझ्याकडे जो रस्ता तुटला तेथे दोन दुकाने गेली आहेत, असतील माझे मित्र म्हणुन मला माहिती आहे. परंतु जेव्हा तुम्ही उल्हासनगरमध्ये एकाला न्याय देण्यासाठी एवढे झटत आहेत, त्याच उल्हासनगरमधील बाकीच्या लोकांसाठी तुमची जबाबदारी नाही काय? ३३ रस्तेवाले १५ वर्षापासुन भटकत आहे, त्यांचा विचार व्हावा एवढीच माझी विनंती आहे. सर्व सदस्यांना कृपा करुन त्यांचाही विचार व्हावा ही विनंती. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>सन्माननिय महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, मी सदर प्रस्ताव वाचतो की, ही महासभा प्रस्तावित करीत आहे की, कल्याण–अंबरनाथ रस्ता रुंदीकरणामध्ये उल्हासनगरच्या विस्थापीत दुकानदार व घरांना पर्यायी जागा मिळण्यासाठी खालील जागेंवर ज्यांची १०० टक्के दुकाने बाधित झाली असतील त्यांना १० X २० चौ. फुटची तयार दुकान व ज्यांची घरे काही अंशी तुटले असतील व संपुर्णपणे तुटले असतील त्यांना २०० चौ. फुटचे तयार घर देण्यासाठी प्रस्तावित करीत आहे.

दुसरे इंदिरा गांधी मार्केट, उल्हासनगर–३ हे महापालिकेच्या मालकीचे असलेले मार्केट नादुरुस्त असल्याने ते पाडुन त्याठिकाणी बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर मार्केट बांधुन रस्ता रुंदीकरणात बाधित झालेल्यां व्यापा–यांना ९९ वर्षांसाठी ३०० रुपये नाममात्र प्रती महिना भाडेतत्वावर देण्यासाठी प्रस्तावित करीत आहे.

तसेच इंदिरा गांधी मार्केट मध्ये विस्थापित झालेल्यांसाठी बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर जे मार्केट बांधणार त्याची निविदा प्रक्रिया एका महिन्यात पुर्ण झाली पाहिजे व त्याचे बांधकाम एक वर्षाच्या आत पुर्ण झाले पाहिजे, या समस्याचे निवारण करण्यासाठी जे उप–आयुक्त पुर्णवेळ नेमण्याचे आदेश ही महासभा देत आहे.

तसेच यापुर्वी शहरातील ३३ रस्त्यांच्या रुंदीकरणात तसेच इतर रस्त्यात बाधित झालेल्या गोरगरीबांना वरीलप्रमाणे पर्यायी जागा देण्यात यावी. सदर प्रस्ताव यापुढे भविष्यात असे काही झाले तर त्या घरमालकास व दुकानदारांना जागा देणे महापालिकेस बंधनकारक राहील. तसेच भविष्यात इतर रस्त्याच्या कामी बाधीत झालेल्यांना पर्यायी जागा देण्यासाठी ७०५ सारखे भुखंड सुध्दा आरक्षित करण्यात येवुन ३७ ए मध्ये शासनाकडे पाठवावे.

सर्व पक्षातील सदस्यांना मी विनंती करतो की हा प्रस्ताव सर्वानुमते पारीत करावा, अशी विनंती.

<u>सदस्या डॉ. निना नाथानी :–</u>मा. महापौरजी, मा. आयुक्तजी, यांनी जसे ७०५ भुखंडाचे प्रस्तावित केले त्याप्रमाणे मी आणखीन एक सांगते की, प्लॉट क्र. ६१८ हा सुध्दा आपल्या महापालिकेचा आहे. ती जागा रिकामी पडुन आहे. जर त्यास सुध्दा या प्रस्तावात समाविष्ट केले तर फार चांगले होईल कारण येथे जे विस्थापीत घरे आहेत त्यांच्यासाठी आम्ही कुठलाही मुद्दा काढलेला नाही. आपणांस घरांना सुध्दा जागा दयायची आहे ना की फक्त दुकानदारांनाच. जर आपण आपल्या महापालिकेच्या अंतर्गत असलेला प्लॉट ६१८ सुध्दा समाविष्ट केला तर फारच चांगले होईल.

<u>सदस्य श्री. महेश गावडे :–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, या रस्त्यावर ज्या इमारती आहेत की ज्यांच्याकडे कागदपत्र नाहीत, आणि या प्रत्येक इमारतीत १५ ते २० फ्लॅट आहेत. इमारती अशा आहेत की ज्यांनी एफएसआय वायोलेशन केलेले आहे. यासाठी आपण कुठले निकष लावणार आहात की आपण त्यावेळेस सांगणार की या इमारती लिगली नाही त्यामुळे आमचे काही देणे लागत नाही, तर याचे मला उत्तर आपण कृपया दयावे.

<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी :–</u>आयुक्त साहेब, मी आमचा ठराव वाचुन दाखवितो. असे दुकानदार की ज्यांना ती जागा व्यवसाय करण्यासाठी पुरशी वाटते, मागील बाजुच्या व्यवसायासाठी जागा थोडी आहे त्यांना तेथे बांधकाम करण्याची परवानगी दयावी. जर १५ मिटरपेक्षा कमी उंची असेल तर त्या ऐवजी १५ मिटरपेक्षा जास्त उंचीसाठी तळमजला अधिक ४ मजले अशी परवानगी दयावी. एमआरटीपी ॲक्ट १९६६ व महाराष्ट्र महापालिका अधिनियम किंवा अन्य संबंधीत नियमानुसार दंड किंवा शुल्क मधुन सुट देण्यात यावी. दुकानदारामार्फत एमआरटीपी ॲक्ट किंवा महाराष्ट्र अधिनियमामार्फत दंडात्मक कारवाई करु नये. वरील बाबींबरोबर दुकानदारांना एफएसआय, टीडीआरचे स्वरुप दयावे. हा टीडीआर एकास पाच या स्वरुपाचा दयावा. दुकानदारांना हा टीडीआर शहरातील कुठल्याही व्यापार वस्तुसाठी वापरण्यास परवानगी देण्यात यावी. टीडीआर एरिया ठरविण्यासाठी निष्कासन सूचना, मालमत्ता कर, देयक दुकानदाराने दाखवावे, फोटो व्हिडीओ किंवा विश्वसनीय पुरावे ग्राहय धरण्यात यावे. भरपाईसाठी वरील बाबी ग्राहय धरावे. सन २०१५–२०१६, २०१६–२०१७, २०१७–२०१८ या आर्थिक वर्षातील मालमत्ता कर आणि पाणीपट्टी पुर्णपणे माफ करण्यात यावी. जर अधिक रक्कमेचा यावर्षी भरणा केला असेल तर पुढील वेळेस समायोजित करण्यात यावी. सन १९८६–८७ च्या प्रस्तावित निदर्शन केलेला किमान दराने मालमत्ता कर खालील टक्केप्रमाणे लावण्यात यावी. महापालिका पॅनलवर आर्किटेक्टची नेमणुक करुन मोफत सेवा पुरविण्यात यावी, पुर्वीचे स्वरुप जसे होते तसे देण्यास मदत होईल जसा नरीमन पॉईंटचा क्वीन नेकलेस दिसतो तसा. नुकसान झालेल्या दुकानदाराचे दर हे रेडीरेकनरप्रमाणे करण्यात यावे.

यावेळी सदस्य श्री. राजेश वानखेडे हे सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u>महापौर महोदया, आज संपुर्ण जनतेच्या नजरा महापालिकेवर आहे, या संपुर्ण जनतेच्या नजरा महासभेवर आहे. कारण की हा जो रस्ता आहे तो शहराच्या मधुनच जातो. या शहराच्या मधुन जाणा–या रस्त्यात जी दुकाने होती, त्या दुकानांची किंमत ५० लाखापासुन कोटी रुपयापर्यंतची होती. आपण विचार करा की, किती मालमत्तेचे नुकसान झालेले आहे, किती लोकांचे नुकसान झालेले आहे. त्यांच्या परिवाराचे नुकसान.....

यावेळी सभागृहातील काही सदस्य आपापसात बोलत होते.

<u>सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :–</u>आयुक्त साहेब, तुमचे आभारी आहोत, सहकार्य दिल्याबद्दल.

<u>सदस्या श्रीमती राजश्री चौधरी :–</u>आयुक्त साहेब, हे काय चालले आहे, सगळयांचे झाले बोलुन आम्हांला सुध्दा बोलायचे आहे. आता दुकानांचा विषय झाला, इमारतीचा विषय झाला परंतु जे बैठे घर आहे त्याचे कोणीच काही बोलत नाही. तुम्ही पर्यायी जागा काय देणार ते सांगा ना, फक्त चर्चा चर्चा चर्चाच झाली आहे, परंतु तुम्ही सांगितले नाही अदयाप त्यांना पर्यायी जागा कोठे देणार. तुम्ही उत्तर दया ना आम्हांला? कधी देणार, काय देणार ते आजच्या महासभेत निर्णय व्हायलाच पाहिजे. आज लोक बाहेर उभी आहेत, त्यांना जागा दिली पाहिजे. फक्त चर्चा करुन काही फायदा आहे काय? आयुक्त साहेब, तुम्ही उत्तर दया. नाहीतर आम्ही येथे बोलणार, सहा वाजले की घरी जाणार, पर्याय काय आहे यावर?

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>सन्माननिय सदस्य, माझ्याकडे ज्या सूचना व उपसूचना आल्या आहेत त्या सचिव महोदया वाचुन दाखवतील.

<u>महापालिका सचिव :–</u>मा. महापौरांच्या आदेशन्वये त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या काही ठरावासाठी सूचना व उपसूचना मी वाचुन दाखविते, येथे आधी मा. सदस्य श्री. भगवान भालेराव यांनी दिलेली सूचना वाचुन दाखविते.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार कल्याण–अंबरनाथ रस्ता रुंदीकरणामध्ये उल्हासनगरच्या विस्थापीत दुकानदार व घरांना पर्यायी जागा मिळण्यासाठी खालील जागेंवर ज्यांची १०० टक्के दुकाने बाधित झाली असतील त्यांना १० X २० चौ. फुटची तयार दुकान व ज्यांची घरे काही अंशी तुटले असतील व संपुर्णपणे तुटले असतील त्यांना २०० चौ. फुटचे तयार घर देण्यासाठी प्रस्तावित करीत आहे.

दुसरे इंदिरा गांधी मार्केट, उल्हासनगर–३ हे महापालिकेच्या मालकीचे असलेले मार्केट नादुरुस्त असल्याने ते पाडुन त्याठिकाणी बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर मार्केट बांधुन रस्ता रुंदीकरणात बाधित झालेल्यां व्यापा–यांना ९९ वर्षासाठी ३०० रुपये नाममात्र प्रती महिना भाडेतत्वावर देण्यासाठी प्रस्तावित करीत आहे.

तसेच इंदिरा गांधी मार्केट मध्ये विस्थापित झालेल्यांसाठी बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर जे मार्केट बांधणार त्याची निविदा प्रक्रिया एका महिन्यात पुर्ण झाली पाहिजे व त्याचे बांधकाम एक वर्षाच्या आत पुर्ण झाले पाहिजे, या समस्याचे निवारण करण्यासाठी जे उप–आयुक्त पुर्णवेळ नेमण्याचे आदेश ही महासभा देत आहे.

तसेच यापुर्वी शहरातील ३३ रस्त्यांच्या रुंदीकरणात तसेच इतर रस्त्यात बाधित झालेल्या गोरगरीबांना वरीलप्रमाणे पर्यायी जागा देण्यात यावी. सदर प्रस्ताव यापुढे भविष्यात असे काही झाले तर त्या घरमालकास व दुकानदारांना जागा देणे महापालिकेस बंधनकारक राहील. तसेच भविष्यात इतर रस्त्याच्या कामी बाधीत झालेल्यांना पर्यायी जागा देण्यासाठी ७०५ सारखे भुखंड सुध्दा आरक्षित करण्यात येवुन ३७ ए मध्ये शासनाकडे पाठवावे. अशा रितीने त्यांनी ठराव करण्यास सांगितले आहे. दुसरा प्रस्ताव मा. सदस्या श्रीमती मिना कुमार आयलानी यांनी सुध्दा दिला आहे. त्यांची सूचना अशी आहे की, जे कल्याण–अंबरनाथ रस्त्यात बाधित होणार आहेत, उल्हासनगर महानगरपालिकेने सरकारी जमिनीचा विकास करतांना २५ टक्के गाळे उल्हासनगर महापालिकेस हस्तांतरीत केले आहे, त्याप्रमाणे त्यांचे पुर्नवसन करावे. त्याच प्रमाणे प्लॉट नं. ६१८, ७०५ व इतर ठिकाणी महापालिकेचे व शासनाचे भुखंड मोकळे आहेत त्याठिकाणी त्यांचे पुर्नवसन करावे अशी त्यांनी सूचना मांडली आहे. याचा ठरावात समावेश करावा. दुसरी उपसूचना मांडली आहे मा. सदस्य श्री. नरेंद्र दवणे यांची, त्यांनी असे म्हटले आहे की, सर्वप्रथम मी उल्हासनगर महानगरपालिकेचे अभिनंदन करु इच्छितो कल्याण अंबरनाथ रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम आपल्या अथक परिश्रमामुळे व नियोजनबध्द पध्दतीमुळे होवु शकले. मी विनंती करतो की आज ११/१२/२०१५ रोजीच्या महासभेत कल्याण अंबरनाथ रस्ता रुंदीकरणात बाधित होणा–या विस्थापीतांचे पुर्नवसन करण्याबाबत धोरणात्मक निर्णय होवुन ठराव पारीत करण्यात येणार आहे, परंतु यापुर्वी उल्हासनगर महानगरपालिकेने काही रस्त्यांचे रुंदीकरण केले आहे त्यात जे गोरगरीब विस्थापीत झाले आहे, त्यांचाही पुर्नवसनात समाविष्ट करुन भविष्यात रस्ता रुंदीकरणात बाधित होणा–यास त्याचा लाभ मिळावा ही विनंती आहे. मा. महापौरांनी ही उपसूचना स्विकार केली आहे, सर्वांना मान्य असेल तर ठरावात समावेश करण्यात येईल.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>माझ्या प्रस्तावास कोणतीही उपसूचना घेता कामा नये.

<u>सदस्य श्री. नरेंद्र दवणे :–</u>प्रत्येकाचा ठराव वेगळा नाही होणार, ठराव एकच होणार आहे. तो तुमचा विषय नाही.

यावेळी सदस्या श्रीमती पुष्पा बागुल, श्रीमती मंदा सोनकांबळे, श्रीमती शैलजा सोनताटे हया सभागृहातुन बाहेर गेल्या. 

<u>महापालिका सचिव :–</u>साई पक्षातर्फे एक ठराव आहे, तो मगाशी श्री. दिपक सिरवानी यांनी वाचला आहे. मी पुन्हा एकदा वाचते त्यांनी काही सूचविले आहे.

खालील नमुद केल्या प्रमाणे बाधीत दुकांनदारांसाठी भरपाई योजना सुचविली आहे.

अ.) उरलेल्या भागामध्ये पुर्णविकास करू इच्छीनाऱ्या दुकानदारांसाठी

१. असे दुकानदार ज्यांना उरलेली जागा व्यवसाय करण्यास पुरेशी वाटते किंवा त्यांच्या मागील बाजुस व्यवसायाठी जागा पुरशी आहे त्यांना सोयीस्कर बांधकाम करण्यास परवानगी द्यावी.

२. जर सद्याच्या १५ मिटरपेक्षा कमी उंची असेल तर त्याऐवजी १५ मिटरपेक्षा जास्त उंची साठी तळ मजला अधिक चार मजले अशी परवानगी द्यावी

३. एम.आर.टी.पी ॲक्ट, नगररचना अधिनियम १९६६, महाराष्ट्र महापालिका अधिनियम किंवा अन्य संबंधीत नियमानुसार दुकानदारांना दंड किंवा शुल्कामधून सुट देण्यात यावी.

४. दुकानदारांविरूध्द एम.आर.टी.पी ॲक्ट किंवा महाराष्ट्र महापलिका अधिनियम अंतर्गत कोणतीही दंडात्मक, कायदेशीर कारवाई करू नये.

५. वरील गोष्टींबरोबर दुकानदारांना एफ.एस.आय टि.डी.आर च्या स्वरूपात द्यावा

६. हा टि.डी.आर १:५ या स्वरूपात द्यावा

७. दुकानदारांना हा टि.डी.आर. शहरातील कुठल्याही रहीवाशी अथवा व्यापारी हेतुसाठी वापरण्यास परवानगी देण्यात यावी.

८. टि.डी.आर. एरीया ठरविण्यासाठी निष्कासन सुचना मालमत्ता कर देयक किंवा दुकानदाराने दाखविलेले फोटा व्हिडीयो किंवा अन्य विश्वसनीय पुरावे ग्राहय धरण्यात यावे.

९. भरपाई साठी वरील सर्व कागदपत्रांसाठी जास्त भाग दर्शविणारा पुरावा ग्राहय धरावा.

१०.सन २०१५–१६, २०१६–१७, २०१७–२०१८ या अर्थिक वर्षातील मालमत्ता कर आणि पाणी पट्टी पुर्णपणे माफ करण्यात यावी. जर आधिच या रक्कमेचा भरणा केला असेल तर पुढील वर्षासाठी समायोजित करण्यात यावी.

११.सन १९८६–८७ च्या प्रस्तावित निर्देशित केलेल्या किमान दराने मालमत्ता कर खालील नमुद तक्याप्रमाणे लावण्यात यावी.

| Type of Construction | Residential | Non residential |
|---|---|---|
| | Rate (Per sq feet per month) to determine Rateable Value | |
| STRUCTURES WITH RCC ROOF | 0.20 | 0.30 |
| STRUCTURES ON TIER (MS) GURDIERS | 0.12 | 0.18 |
| STRUCTURES WITH ACC SHEETS ROOF | 0.09 | 0.14 |
| STRUCTURES WITH WOODEN ROOF | 0.07 | 0.11 |
| STRUCTURES WITH MUD ROOF | 0.05 | 0.08 |
| OPEN LAND | 0.005 | 0.0075 |

असे त्यांनी मालमत्तासाठी दर लावले आहेत.

१२. महानगरपालिका पॅनलवरील आर्किटेक यांची नेमणूक करून मोफत सेवा पुरविण्यात यावी. त्यामुळे मुळचे स्वरूप जसे होते तसे दिसण्यास मदत होईल. जसे मुंबईतील नरीमन पॉईंट क्विन्स नेकलेस दिसते तसे

१३. योग्य आखणी न झाल्यामुळे नुकसान झालेल्या दुकानदारांची भरपाई रेडी रेकनेर दर प्रमाणे करण्यात यावी

ब.) ज्या दुकानदारांचे दुकान ५० टक्याहुन अधिक निष्कासित करण्यात आले आहेत.

१. वरील 'अ' प्रमाणे पुर्नवसनासाठी पात्र ठरवावे

२. या व्यतिरिक्त पर्यायी जागा १:२ व्यवसायासाठी तर १:४ वास्तव्यासाठी मालकितत्वावर १ रू च्या नाममात्र करारनाम्यानुसार करावी.किंवा पर्यायी जागा उपलब्ध नसेल व दुकानदार इच्छुक असेल तर टि.डी.आर वरील प्रमाणे 'अ' मधील क्र ७ मध्ये दर्शविल्याप्रमाणे १:५ च्या ठिकाणी १:१० असा देण्यात यावा.

३. व्यवसायीक इमारतीमध्ये व्यापारांना प्राधान्याने जागा द्यावी जर जागा उपलब्ध नसेल अणि दुकानदाराची तयारी असेल तर निवासी इमारतीमध्ये जागा द्यावी.

४. जर पर्यायी जागा ही सर्मपित केलेल्या जागेपेक्षा कमी अधिक असेल तर त्या फरकामची भरपाई सन २०१५–१५ मधील रडी रेकनर दराप्रमाणे करावी.

५. महापालिका वर नमुद २ आणि ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे पर्यायी जागा देवू शकत नसेल तर भरपाई रू २५०००/– प्रति चौ.फुट दराने करावी.

अशा प्रकारे संपादनाच्या बाबतीत एम.आर.टी.पी.ॲक्टच्या कलम १२६ अन्वये पुरेशा भरपाईची शिफारस करीत आहे.

नविन भुसंपादन कायद्यानुसार दुकानदार बाजारभाव प्रमाणे भरपाई मिळण्यास सुद्या पात्र ठरते बऱ्याच प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाने योग्य भरपाईसाठी आदेश दिले आहे.

दुकानदार आणि त्यांच्या कुटूंबियांना कायदेशिर रित्या लाभ देण्यासाठी आयुक्त व दुकानदारांच्या संघटनेचे प्रतिनिधी यांच्यामध्ये एम.ओ.यु घेतला पाहिजे म्हणजेच मेमोरेडम ऑफ अंडरस्टॅडिग केले पाहिजे. आणि त्यावेळी महापालिका सचिवांच्या मुद्रेनिशी स्थायी समितीचे दोन आणि असोशियनेचे दोन सदस्य साक्षीदार म्हणून असले पाहिजे.

दुकानदार व त्यांच्या कुटूंबियांचे हित जपण्यासाठी कायदेशिर ठराव करून प्रयत्न केला पहिजे या साठी इतिवृत्ताची वाट न पाहता अंमलबजावणी केली पाहीजे त्याचबरोबर इतर आवश्यक मंजुरी मिळविण्यासठी ही प्रकिया तात्काळ सुरू केली पाहीजे.

महापालिकेने विकास करण्साठी आरक्षीत भुखंडावर केलेल्या बांधकामाचे २५ टक्के दिले आहे. पुरेसा नसेल तर दुकानदारांच्या संमतीने साई बाब मंदिर, ऑर्डनन्स फॅक्टरी गेट समोर येथे व्यावसायीक संकूल बांधण्याचा विचार करू शकते. यासाठी एम.एस.ई.बी आणि पाणी पुरवठा भुखंड चा उपयोग होऊ शकतो किंवा इंदिरा गांधी भाजी मार्केट ची पुर्णबांधणी करून पुर्णबांधणी करता येवू शकते. प्रस्तावीत विकास आराखडयात महापालिकेने साईबाबा मंदिराजवळील जागा प्रकल्प बाधीत लोकांसाठी आरक्षित केली आहे. तीच जागा किमीत कमी वेळेत उपलब्ध करावी.

कल्याण अंबरनाथ रोडची निर्मिती १९८५ सालामध्ये करण्यात आली होती आणि नियमानुसार गटारे आणि नाले जमिनी अंतर्गत पुरवायच्या आहेत. म्हणुन ससध अस्तित्वात असलेला रस्ता पुर्णपणे तोडून त्याची पुर्नबांधणी करणे आवश्यक आहे.

वेगवेगळया ठिकाणांसाठी वेगवेगळया निविदा काढेन एकाचवेळेस काम सुरू केल्यास सदर काम वेळेत पूर्ण करणे शक्य होईल.

बऱ्याच केसेस मध्ये मार्किंग योग्यरीत्या केलेली नाही. त्यामुळे येथील काम योग्य आणि अनुभवी आर्किटेक्ट आणि सल्लागारांच्या निरिक्षणाखाली करावयास हवे. लाईन आउट तात्काळ आणि काटेकोरपणे विकास आराखडयाप्रमाणे दिले गेले पाहिजे. चुकीच्या आखणीमुळे पुढे कायदेशिर गुंतागुंत वाढण्याचा संभव आहे आणि यात दुकानदारांचे नुकसान आहे.

बहुमजली प्लाझा टॉवर आणि रस्त्याच्यालगत असलेली इमारती यांना तोडण्यापासुन वाचविण्यासाठी आणि तेथे राहणा—या अनेकांच्या जिवितास होवू शकणारा धोका टाळण्यासाठी तांत्रीक दृष्टया शक्य असल्यास पिलर मधून ड्रेन जावू देण्याची परवानगी द्यावी. अशाच प्रकारची व्यवस्था शांतिसागर अपार्टमेंटमध्ये ए १ पाणी पुरी ते सी ब्लॉक गुरू व्दारा चौक रस्त्याच्या रूंदीकरणाच्या वेळी करण्यात आली होती.

पुर्नवसन योजना प्रभाविपणे अंमलबजावणी करण्यासाठी पुढील प्रमाणे विशेष कक्ष स्थापनेची आवश्यकता आहे. ते आपला दैनंदिन अहवाल मा.आयुक्तांकडे सादर करतील

| | |
|---|---|
| उप—आयुक्त | अध्यक्ष |
| शहर अभियंता (साबावि) | सदस्य |
| कनिष्ठ किंवा उप अभियंता (साबावि) | सदस्य |
| कनिष्ठ किंवा उप अभियंता (पापु) | सदस्य |
| कनिष्ठ किंवा उप अभियंता (भुयारी गटार योजना) | सदस्य |
| कनिष्ठ किंवा उप अभियंता (विद्युत) | सदस्य |
| कनिष्ठ किंवा उप अभियंता (एम.एस.ई.बी) | सदस्य |
| कनिष्ठ किंवा उप अभियंता (बि.एस.एन.एल) | सदस्य |
| अनुभवी व वरिष्ठ आर्किटेक | सदस्य |
| सहा. आयुक्त | सदस्य आणि समन्वये अधिकारी (एमएमआरडीए आणि इतर संस्था) |
| दुकानदारांच्या संघटनांचे दोन प्रतिनिधी | सदस्य |

मी आदरनीय आयुक्त आणि माझ्या अनुभवी आणि वरिष्ठ सहकां—यांना विनंती करतो की, सदरील पुर्नवसन योजनेमध्ये बाधीत दुकानदारांच्या अर्थिक लाभ आणि प्रतिष्ठा लवकरात लवकर उंचाविण्यासाठी आपणाकडील अमुल्य सहकार्य करावे. व हा ठराव एकमताने मंजुर करण्यासाठी मी विनंती करतो. असा ठराव दिला आहे.

आता महासभेने ठराव कसा करावा ते सांगावे.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आता यावेळी सर्व पक्षाने मिळुन ठराव दिला आहे. त्यामध्ये आमचे सदस्य श्री. भगवान भालेराव यांनी अंशीत हा शब्द टाकला आहे. जरा आपण मला त्याचा अर्थ सांगु शकता काय? मला आयुक्तांकडुन माहिती पाहिजे, अंशीचा अर्थ काय आहे?

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>ज्याची घरे अर्ध्यापेक्षा कमी तुटली असतील त्यांना अंशिक म्हणतात.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>आयुक्त साहेब, मला निदर्शनास आणायचे आहे की, अंशिक म्हणजे त्याचे प्रमाण किती असावे हे आपण ठरवावे. अंशत: म्हणजे किती? अर्ध्या लोकांचे घरे गेले त्यांनाही दयायचे कि पुर्णत: घरे गेले त्यांनाही दयायचे आहे? आणि उरलेल्या जागेवर ते आपले वास्तव्य ठेवणार, म्हणजे त्याठिकाणी अर्धे दुकान ज्याचे गेले पण अर्धे आहे तो त्या ठिकाणी आपले वास्तव्य ठेवणार. अशा ज्या जागा मिळतील त्याची माहिती हवी. आमच्या महापालिकेच्या इतिहासामध्ये आम्ही जे ठराव पाठविले आहेत, ते तिकडुन परत आले नाही. चला आम्ही पाठवितो ठिक आहे., हरकत नाही. परंतु अंशिक या शब्दाचा अर्थ आम्हांला कळला नाही. म्हणुन मी विचारले. आणि त्याच्यासाठी मी तुम्हांला सांगतो की, ज्या जागा उरतील, भविष्यामध्ये तुम्ही ज्या पर्यायी जागा म्हणुन दयाल, ठराव पास होवुन आल्यावरच आपण त्या गोष्टी करणार आहोत. ज्यांची अर्धी

जागा राहील ती महानगरपालिकेने ताब्यात घ्यावी, असे म्हणणे आहे आपणाकडे. आणि दुसरी गोष्ट अशी आहे की आपण ३०० रुपये प्रति दुकानदाराला लावत आहोत. तर त्याबाबत आपल्या निदर्शनास ही गोष्ट आणायची आहे की आम्ही लोकांकडुन जो मालमत्ता कर घेतो, महापालिकेकडुन मागतो, दुकान असो किंवा घर असो, त्यांच्याकडुन आम्ही तीन, तीन हजार, चार, चार हजार घेतो. पण आम्ही यांना ९९ वर्षासाठी ३०० रुपये आम्ही देत आहोत तर या गोष्टीचा विचार करावा. असे या ठरावात व्हायला नको तो ठराव विखंडित होवुन यायला. ज्या बाबी तुमच्या लक्षात येतील शहराच्या दृष्टीकोनातुन आपला प्रस्तावही तेथे राहायला पाहिजे. असे माझे म्हणणे आहे, धन्यवाद।

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u> मा. महापौर महोदया,....

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>मा. महापौर महोदया, एक मिनिट श्री.प्रदिपजी, अंशिक फक्त घरासाठी लिहिलेले आहे, अंशीक दुकानासाठी लिहिलेले नाही, पुर्ण दुकान ज्यांचे गेले आहे त्यांना दयावे. अंशीक दुकान गेले त्यांना नाही.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u> मा. महापौर महोदय, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव महोदया, माझे असे म्हणणे आहे की आता दोन्ही ठराव आपल्याकडे आलेले आहे, एक साई पक्षाचा आला आहे, एक सर्व पक्षांचा मिळुन आलेला आहे. यात आपण आपले मत मांडायचे आहे की कुठला ठराव प्रशासनास सोयीचा होईल. आमचा उद्देश हा आहे की, आम्ही जो ठराव देतो त्याची १०० टक्के अंमलबजावणी झाली पाहिजे. फक्त राजनिती करण्यासाठी नाही, आम्ही सांगु आम्हांला बंदुकचे लायसन्स पाहिजे मग तोफचे लायसन्स दया. नंतर कळेल आम्ही तर तोफ मागितले होते साधे बंदुकसुध्दा मिळाले नाही. असे होवु नये म्हणुन मी आपणांस विनंती करतो की, हे दोन्ही ठराव आता सचिव महोदयांनी वाचलेले आहे. आपण आपले मत मांडावे की दोन्ही ठरावांपैकी प्रशासनाला कोणता सोयीचा होणार आहे. ज्याची अंमलबजावणी आपण सहज करु शकाल याचे उत्तर आम्हांला दयावे.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>मा. आयुक्त साहेब, माझे आपणांस एक निवदेन आहे, आपण जी मालमत्ता या प्रकल्पात घेत आहात, इंदिरा गांधी मार्केट असो किंवा काही जे या प्रस्तावात आहेत, तर कोणत्याही मालमत्तेचा मालकी हक्क महापालिकेकडे नाही, आगाउ ताबा आहे परंतु मालकी नाही. तर प्रकल्प पुर्ण करण्याअगोदर महापालिकेने मालकी ताबा लवकरात मिळवावा. हे आवश्यक आहे.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—</u>कल्याण अंबरनाथ रस्त्यात बाधित होणा—या विस्थापीतांचे पुनर्वसन करण्यासाठी पर्यायी जागा देण्याचा प्रस्ताव या विशेष महासभेत ठेवला असून याबाबत सर्व सन्माननिय सदस्यांनी चर्चा केली आहे, आपल्या शहरातुन जाणारा राज्य शासनाचा मार्ग आहे. काही वर्षापासुन त्याचे रुंदीकरण चर्चेत होते. आणि तो रस्ता १०० फुट व्हावे. पुढील भवितव्यासाठी, वाढते वाहन आणि लोकसंख्यसाठी आवश्यक ती बाब, कल्याण—अंबरनाथ या दोन शहराला मिळणारा हा रस्ता १०० फुट होण्यासाठी गेल्या ब—याच वर्षापासुन यावर उहापोह होती. आपण शासनाच्या निर्णयानंतर हा रस्ता रुंदीकरणास सुरुवात केली. सभागृहात बरीच चर्चा झाली, त्यात काही त्रृटींवरही चर्चा झाली. परंतु हे होत असतांना हा जवळ पास तीन किलोमिटरचा रस्ता आणि त्यात ८२१ मालमत्ता विविध अंतरापर्यंत कट करुन त्याची रुंदी वाढविण्याचा आपण प्रयत्न करत आहोत. तसेच सर्वात मोठे काम व्यापा—यानी, त्यांची दुकाने व घरे जे बाधित होत होते त्यात त्यांनी फिल्डवर चांगले महापालिकेला सहकार्य केले. तसेच सदस्यांनी या रस्ता रुदीकरणासाठी मोठया प्रमाणात सहकार्य केले. त्यामुळे हे काम सुरु आहे. हा चांगला मोठा सुंदर रस्ता होत असतांना जसे सभागृहात चर्चा झाली की ब—याच व्यापा—यांनी आपल्या मालमत्तेचे, त्यांच्या मालमत्तेची हानी झाली आहे त्यांनी यावर मोठया प्रमाणात त्याग करुन या रस्त्यासाठी जागा उपलब्ध करुन दिलेली आहे, तेव्हा खरच यांचे कौतुक करायला पाहिजे, महापालिकेतर्फे आपण त्यांना शहरासाठी केलेल्या त्यागाबद्दल त्यांचे आभार मानायला पाहिजे, विस्थापितांसाठी सभेमध्ये चर्चा झाल्यानंतर जे दोन प्रस्ताव आपणाकडे आलेले आहे, त्यात सर्वात प्रथम म्हणजे हा रस्ता पुर्ण मोकळा झाल्यानंतर सर्व डेब्रिज काढुन घेवुन त्यानंतर एमएमआरडीएकडुन ते काम लवकरात लवकर चालु करावे अशा महापालिका, पालकमंत्री, राज्य शासन यांना आपण पाठपुरावा करतच आहोत. परंतु ते काम सुरु होईपर्यंत आपणांस विस्थापीतांसाठी काय करता येईल याच्यावर हे प्रस्ताव होत आहे. दोन्ही प्रस्ताव हे वेगवेगळया एंगलने आलेले आहे. आणि ३३ रस्ते जेव्हा या शहरामध्ये रुंदीकरण झालेत त्यामध्ये सुध्दा जे विस्थापीत झाले होते आणि त्यामध्ये ज्यांची दुकाने गेली होती, त्यावेळेस प्रशासनााने जी काही मदत केलेली आहे, तर त्याचा इतिहास आपणाकडे आहे. त्यामुळे ज्यांचे ५० ते ६० टक्क्यांपर्यंतचे जे नुकसान झालेले आहे,

आणि तिथे त्यांना धंदा करण्यापुरती जागा त्यास उपलब्ध आहे तर त्या जागेवर वर मजला करुन त्या व्यापा—याची तेथे धंदेची सुरुवात होणार आहे, त्याचा पुन्हा प्रश्न येणार नाही असा त्याचा इतिहास असून आपण त्यास अलाउ केलेले आहे. परंतु जे दुकानदार १०० टक्के या रस्त्यामध्ये बाधित होतील यासाठी त्यांचे पुर्नवसन करावे अशी संपुर्ण सभागृहाची भावना आहे. आणि महापालिकेला असलेले अधिकार व प्रशासनास असलेले अधिकार, आयूक्ताला असलेले अधिकार आणि राज्य शासनाला असलेले अधिकार या तीन स्तरावर आपल्या अधिकारात जे आहे ते आपण लगेच करु. त्यास कुठलीही वेळ घालविण्याची गरज नाही. शासनातर्फे ती लगेच कारवाई सुरु होईल त्यासाठी एक वेगळा कक्ष, जसे आपण सांगितले तसे उपायुक्तांच्या अधिनस्तखाली एक कक्ष, नगररचनाकार आणि शहर अभियंता यांच्या संयुक्त विद्यमाने हे जे विस्थापीत झालेले आहेत ते १०० टक्के पुर्ण झालेले आहे. सभागृहात अशी सुध्दा चर्चा झाली की काहींचे त्यात नाव नाही, त्यांना नोटिस सुध्दा मिळाली नाही परंतु ते विस्थापीत झालेले आहेत. तर हे प्रत्यक्ष तपासुन, त्यांना जे काही पॅकेज ठरेल, त्याचा समाविष्ट करण्यासाठी तो कक्ष तेथे काम करेल. पुन्हा हा रस्ता लवकरात लवकर नागरीकांच्या सोयीसाठी चांगला करुन घेणे आवश्यक आहे त्याचा तो कक्ष पाठपुरावा करेल. काही सन्माननिय सदस्य माझ्याकडे आले होते तेव्हा त्यांना मी बोललो होतो, तेथे रस्ता मोठा झाल्यानंतर सुध्दा एमएससीबीची लाईन आणि डीपी रस्त्यात आहेत ती आपल्याला शिफ्ट करुन घ्याव्या लागणार आहेत, त्यासाठी मी आधीच एमएससीबीच्या कार्यकारी अभियंत्यांशी संपर्क साधला, त्यांनाही सांगितले व पालकमंत्री महोदयांशी चर्चा केली त्यांनाही तसे सांगितले आहे. तर डीपी आणि पोल शिफ्ट करुन एमएमआरडीच्या रस्त्याचे काम करुन घेणे हे आपल्याला करावे लागणार आहे. आणि पॅकेजेसमध्ये काही जसे ऊहापोह झाला की तेथेच बांधत आहेत तर त्यांच्या टॅक्सेशन मध्ये कंन्सेशन दयावे. ते महापालिकेच्या स्तरावर विचार करुन देवु शकतो. त्यानंतर आपली जी जागा आहे, त्या जागेवर शॉपिंग सेंटर बांधुन आपल्याला उपलब्ध करुन दयावे, त्याचे जे मुल्य आहे, आपल्याला तरतुद अशी आहे की ते मुल्य बाजारभावाप्रमाणे असले पाहिजे. विस्थापीत आहे आणि जर त्यांना सवलत दयायची असेल तर आपणांस शासनाकडे जावुन तर शासनाचे जे अधिकार आहेत डायरेक्टर देण्याचे ते प्राप्त करुन घेता येईल. तर आपण सर्वसाधारण सभेने पॅकेजविषयी व्यवस्थीत प्रस्ताव तयार करुन तो रिजॉल्व कराल त्या अनुषंगाने प्रशासनातर्फे आम्ही कायदयाच्या तरतुदीत राहुन जे जास्तीत जास्त आपल्या व्यापा—यांसाठी व नागरीकांसाठी करता येईल आणि रेसिडेंन्शीअल ज्यांचे घरे जातील तर आपल्याकडे तरतुद आहे की ३० वर्ष लिजवर प्लॉट देण्याचा अधिकार महापालिकेसच आहे. आणि त्याचा बाजारमुल्यप्रमाणे भाव रीलीज करायचा असेल तर तेही आपणास शासनाकडे जावे लागेल. असे शासनाच्या अखत्यारीतल गोष्ट आता मुख्यमंत्री महोदयांनी आश्वासन दिले की आपण त्यांच्याकडे लवकरात लवकर प्रस्ताव घेवुन मान्य करुन घेणे आणि पॅकेजेससाठी जो प्रयत्न प्रशासनातर्फे होईल त्यात तुम्हा सर्व सभागृहातील सदस्यांचे, नागरीकांचे व व्यापा—यांचे सहकार्य आवश्यक आहे, धन्यवाद।

**यावेळी सभागृहातील सदस्यांनी टाळया वाजविल्या.**

<u>सदस्य श्री. अंकुश म्हस्के :—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, मी एक तांत्रिक अडचण विचारली होता, २ फुट व ३ फुटाविषयी.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—</u>सांगतो, सांगतो.

<u>सदस्य श्री.सुनिल सुर्वे:—</u>साहेब, एक मिनिट आपण फक्त त्यात ३३ रस्त्यांचाच उल्लेख केला व इतर रस्ते सुध्दा त्या ३३ रस्त्यानंतर तोडले तर यावर सुध्दा थोडसे सांगण्यात यावे.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—</u>सन्माननिय सदस्य यांनी जो मुद्दा उपस्थित केला की २ फुट व ३ फुट यामध्ये खालच्या फ्लोअरची जागा जाते तर मग ती जागा नालीमध्ये ॲडजस्ट करावी. तशी पध्दत कल्याण व इतर ठिकाणी सुध्दा अवलंबिली आहे. तर ते आपण फिल्डवर जावुन स्वत: बघुया. जे चांगले करता येईल आणि संपुर्ण इमारतीला जर धोका पोहचत नसेल फुटपाथ व नाली होवुन रस्त्याची रुंदी १०० फुटच राहत असेल तर नक्कीच त्यावर आपण पॉझिटीव्ह विचार करु. तसेच श्री. सुर्वे साहेब, तुमच्या दुकानदारांबाबत सांगायचे झाले तर त्यासाठी मला वाटते पुढच्या सभेत त्याबाबत पॅकेज ठरवु या. आणि वेगळे पुनर्वसनाचा ठराव घेवुन यावे त्यावेळेस तुम्ही त्यास मान्यता दया, धन्यवाद।

<u>सदस्य श्री. राम पारवानी :—</u>साहेब, ज्यांचे पाच फुट आहे त्यांचे काय करणार? तेथे मोठ मोठया इमारती आहेत, जे ५ फुट आहेत तर त्यांच्यासाठी काय?

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>साहेब, आणखी एक खुलासा घेवु इच्छितो आता आपण प्रस्ताव पारीत करत आहोत तर पारीत झाल्यानंतर त्यावर त्वरीत अंमलबजावणी करणार की वर शासनाकडे पाठविणार? याबाबत जरा खुलासा करण्यात यावा.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:–</u>नाही, याच्यामध्ये ज्या आमच्या अधिकारात, तुमच्या अधिकारात म्हणजे सर्वसाधारण सभेने ठराव केलेला आहे, आपल्या अधिकारात ते आपण लगेच ॲक्ट करु आणि ज्याला आता साधारणत: उदाहरण दयायचे तर एका जागेवर शॉपिंग सेंटर बांधायचे आहे, कुठल्याही पध्दतीने तर त्याचे ई–टेंडरींग करणे, कार्यवाही करणे ते आपल्या स्तरावर करु या. राहिला तो भाडयाचा प्रश्न तो प्रस्ताव पाठवुन देवु शासनाला. शासनाकडे गेल्यावर मान्यता येईल. हे लवकर घेण्यासाठी ५–६ महिने लागतील विस्थापितांचे पुनर्वसन करायचे आहे. रिलीफ देण्यासाठी हे एका महिन्यात होणार नाही त्यास वेळ लागेल आपण तसे करु या. जे आपल्या स्तरावर आहे ते लगेच करु या आणि जे शासनाकडे जाईल ते लगेच पाठवु या.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>जे शॉपिंग कॉम्पलेक्स आपण बनवित आहोत ते आपल्या अधिकारात आहे ना? आहे ना, तर मला तेच बोलायचे आहे.

<u>सदस्य श्री. महेश गावडे :–</u>आयुक्त साहेब, मी एक प्रश्न विचारला होता.

<u>सदस्य श्री. राम पारवानी:–</u>पाच फुटासाठी काय साहेब?

<u>सदस्य श्री. महेश गावडे :–</u>लिगॅलिटीसाठी जो प्रश्न विचारला, अशा ४ –५ इमारती आहेत, त्यात १५–१५ ब्लॉक आहेत. त्या समजा पाडल्या तर काय करता येईल. त्यांच्याकडे इमारतीचे कागदपत्रच नाहीत.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>सचिव महोदया, प्रस्ताव वाचा.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–</u>नाही, तो एक प्रश्न रेसिडेन्शीअलबद्दल डॉ. नाथानी महोदया यांनी सुध्दा विचारले तर आपण आता कर्मशिअलच डिमॉलिश करत आहोत रेसिडेन्शीअलसाठी अदयाप आपण हात लावलेला नाही ते थांबलेले आहे, त्याचे कारण असे की लगेच कोणालाही विस्थापीत करायचे नाही. त्या इमारतीचे व्यवस्थीत टॅक्नीकली बघुन ती हायराईज्ड बिल्डींग पाडत असतांना काय इफेक्ट होतो, टॅक्नीकली आणि मशिनच्या रुपाने काय करता येईल तो अभ्यास चालु आहे. उप–आयुक्त व त्यात जे आहेत त्यांच्याशी वेगवेगळया रुपाने चर्चा करुन तो निर्णय घेवु या मग त्यात विस्थापीत तेवढे होतील की पुर्ण होतील हे आपण नंतर ठरवु या.

<u>सदस्य श्री. महेश गावडे :–</u>इमारतीचे कागदपत्रच नाहीत.

<u>सदस्य श्री. मनोज सयानी:–</u>मा. महापौरजी, कृपया लवकरात लवकर ही प्रक्रिया पुर्ण करु या कारण संपुर्ण उल्हासनगरची नजर आज या महासभेवर आहे. काय निर्णय घेतला जातो, निवडलेले सदस्य त्यांच्यासाठी काय पॅकेज घेवुन येतात, कशाप्रकारे दिलासा मिळतो, पुर्ण उल्हासनगरची नजर यावर आहे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>सचिव महोदया, प्रस्ताव घ्या.

<u>सदस्य श्री. अंकुश म्हस्के :–</u>मा. आयुक्त साहेब, आपण जे सांगितले आहे तर त्याचा टॅक्नीकली अडचण काय आहे, त्याचे संरक्षण करुन जे रेसिडेंन्शिल आहे त्यावर कार्यवाही करु. तर माझे असे म्हणणे आहे आपला जो तोडु रस्ता जात आहे, तर कृपया त्यांना सांगा की तेथे रेसिडेंन्शिल आहे, हात लावु नये. आमच्या इकडचे लोक स्वत: तोडायला तयार आहेत.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>साहेब, रेसिडेंन्शीअल तोडण्यापुर्वी तेथील लोकांना कसे बसविण्यात येईल तर त्याची जरा प्लॅनिंग करा.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–</u>रेसिडेंन्शील बिल्डींग ती मंडळी सोसायटी स्वत: तोडुन घेत असतील तर आपण त्यांना अलाउ करणार आहोत, भलेही त्यास १० दिवस, १५ दिवस व १ महिना लागो. आपण तर थांबलेलेच आहोत आणि रहिवासी लगेच विस्थापीत होणार नाही त्याची जरा काळजी घेत आहोत आणि तांत्रिकदृष्टया व्यवस्थित तपासुनच करणार.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>सचिव महोदया, ठराव वाचुन दाखवा.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>अहो, श्री. जमनुजी, ठराव दया. अहो, श्री. जमनुजी काय करत आहात आपण ठराव दया.

यावेळी श्री. जमनादास पुरस्वानी यांनी मा. महापौरांकडे ठराव दिला.

<u>महापालिका सचिव :—</u>जो प्रस्ताव सन्माननिय सदस्यांनी दिला आहे, आरपीआय, शिवसेना, भाजपा सदस्यांनी मिळुन दिला आहे, त्या प्रस्तावात सदस्य श्री. नरेंद्र दवणे आणि श्रीमती मिना आयलानी यांनी जे सुचविले आहे, ६१८ व ७०५ प्लॉट, आणि श्री. नरेंद्र दवणे यांनी सुचविले आहे की, इतर बांधकामाचे सुध्दा तुम्ही घ्यावे, जे आधी बाधित झालेले आहे, याचा समावेश करुन तुम्ही ठराव.....

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>नाही, नाही.

<u>महापालिका सचिव :—</u>त्याचा या ठरावात समावेश करायचा की नाही?

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>नाही, नाही त्या ठरावात समावेश करु नका.

<u>सदस्य श्री. नरेंद्र दवणे :—</u>अहो, त्या ठरावात तेच आहे, मागील १९९९ सालात जी बांधकामे तुटलेली आहेत, रस्त्याचे काम करतांना, त्यांना रास्त होत आहे का? श्री. भालेराव साहेब, तुमचे असे मत आहे का की त्या लोकांना भरपाई मिळाली नाही पाहिजे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>जो ठराव देण्यात आला आहे तो तसाच ठेवा, त्यात काही समाविष्ट करु नका.

<u>सदस्य श्री. नरेंद्र दवणे :—</u>म्हणजे आम्ही असे समजावे की, १९९९ मध्ये जी बांधकामे तुटलेली आहेत त्या लोकांना काही दिलासा न भेटावा असे तुमचे मत आहे का?

<u>महापालिका सचिव :—</u>एक मिनिट, श्री. दवणे साहेब, तुमचा पॉईंट यात कव्हर झाला. ३३ रस्ता रुंदीकरणात व इतर रुंदीकरणात बाधित झालेल्या.

<u>सदस्य श्री. नरेंद्र दवणे :—</u>माझेही तेच म्हणणे आहे ना? मी दुसरे काही लिहिलेच नाही, तेच सांगत आहे.

<u>सदस्य श्री. मनोज लासी :—</u>आहे ना उल्लेख, ३३ रस्त्यांचा उल्लेख आहे व इतर सुध्दा आहे.

<u>सदस्य श्री. नरेंद्र दवणे :—</u>जे तुम्ही दिलेले आहे ना, मी तेच दिलेले आहे.

<u>महापालिका सचिव :—</u>तुमच्या या गोष्टीचा समावेश आहे यामध्ये या आधीच. आताच मला सदस्य श्री. नरेंद्र ठाकुर यांनी सुध्दा सांगितले की आमचाही ठराव आहे यामध्ये तोच असाच आहे. तर आता मला सांगावे की, साईपक्षातर्फे आणि कॉग्रेस पक्षातर्फे त्यांचे काय मत आहे ते मला सांगावे. तुमचा पाठिंबा आहे की मतदानास घेवु?

<u>सदस्य श्री. महेश गावडे :—</u>आमचा प्रस्ताव स्पेसिफीक आहे. हा प्रस्ताव वेगळा आहे. हे सर्व झाल्यानंतरचा आमचा प्रस्ताव आहे.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>आमचा इंदिरा गांधी मार्केट विस्थापीत करण्याकामी देण्यास विरोध नाही. बाकी हे सर्व अतिरिक्त सूचना आहेत.

<u>महापालिका सचिव :—</u>नाही, मग हा ठराव सर्वसंमतीने करायचा असेल तर सर्व सूचना टाकाव्या लागतील आणि ठराव एकच होईल. तर सर्व सदस्यांनी सांगावे की काय करायचे ते. त्यानुसार मतदानासाठी घ्यावे लागेल.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>महोदया, आमचा ठराव आमचा आहे, आणि त्यांचा त्यांचा आहे. तर यावर मतदान घ्या.

<u>महापालिका सचिव :—</u>मतदान घ्यायचे?

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>हो, मतदानासाठी घ्या.

<u>सदस्य डॉ. निना नाथानी :—</u>आमचा मतदानास विरोध आहे. आपण त्यातच टाका ना, तेच बरोबर राहील ना, सर्वांचे वेगवेगळे आहे तर आपण विचारु तर शकता?

<u>महापालिका सचिव :—</u>नाही, महोदया, साई पक्षाचा जो ठराव आहे जर त्यांचे मुद्दे सदस्यांना मंजुर आहे का नाही, तर ते तर आधी ठरवा नंतर मी या ठरावात टाकते. ते नाही म्हणतात आपण आपला एकमताने ठराव करा, नंतर टाकते ते मुद्दे.

<u>सदस्या डॉ. निना नाथानी :—</u>ठिक आहे, चर्चा करा, मग निर्णय घ्या, कोण्या एकाच्या सांगण्याने बदल नाही झाला पाहिजे. प्रत्येकाचे वेगवेगळे विचार व वेगवेगळया भावना असतात, असे नाही की फक्त एकाचेच मुद्दे टाकाल. नाहीतर आपण सर्वांचे ठराव एकत्र करा. आमची त्यास मान्यता आहे. आम्ही यांच्या ठरावाच्या विरोधात नाही, परंतु फक्त मुद्दे टाकण्यासाठी सांगत आहोत. हे का विरोधात आहे ते कळत नाही.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>मा. महापौरजी, आपण असे करा की, सूचनेवर मतदान घ्या व उपसूचनेवर वेगळे मतदान घ्या ना. उपसूचना जर मंजुर झाली तर सूचनेसोबत जोडली जाईल नाहीतर होणार नाही. ती तर उपसूचना आहे ना?

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>महोदया, घ्या तुम्ही. सचिव महोदया, ठराव वाचून टाका, तुम्ही प्रत्येकाला विचारत बसला तर सभागृहाचा पुर्ण वेळ जाईल. तुम्हांला काय करायचे मतदान घ्यायचे नाही घ्यायचे त्यावर निर्णय घेवुन टाका.

<u>सदस्या डॉ. निना नाथानी :—</u>नाहीतर सभा स्थगीत करा व सर्वांना आपसात निर्णय घेवु दया व नंतर घ्या सभा. असे कसे कुण्या एकाच्या सांगण्यावरुन ठराव करणार? पुर्ण जमिन मोकळी पडुन आहे हे विरोधात का जात आहे हे मला समजत नाही.

<u>सदस्य श्री. मनोज लासी :—</u>मा. महापौरजी, प्रपोजल सोबत चार सहया, सुचक, अनुमोदक सहया घेवुन आपणाकडे एक ठराव पाठविला आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>आमचा प्लॉट नं. ६१८ व ७०५, यु.नं. २५,२६ हा सुध्दा ठरावात समाविष्ट करा.

<u>सदस्य श्री. मनोज लासी :—</u>यावर आता मतदान घ्या.

<u>महापालिका सचिव :—</u>ठिक आहे. महापौर मॅडम मतदान घ्यायचे का?

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>होय, मतदान घेण्यात यावे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>इलेक्ट्रॉनिक मिडिया अलाउड नाही.

<u>सदस्या डॉ. निना नाथानी :—</u>निर्णय घेण्यासाठी एक दोन दिवस सभा स्थगित करा व नंतर निर्णय घ्या. सचिव महोदया, जरा ऐकुन तर घ्या, ती जमिन संपुर्णपणे रिकामी आहे, ९७ मध्ये आपण जरा तपासुन पाहावे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>सचिव महोदया, तुम्ही प्रस्ताव वाचा ना?

<u>सदस्या डॉ. निना नाथानी :—</u>तुम्ही मध्ये बोलत आहात, १९७४ मध्ये ती जागा प्ले ग्राउंडची जागा असून ती रेसीडेनशीयलसाठी आरक्षित आहे. या गोष्टीमुळे आपल्या जनतेस फायदा होत आहे तर आपण माझ्या प्रस्तावाच्या विरोधात का जात आहात मला समजत नाही. आमच्या समोर या बाबीचे स्पष्टीकरण दिले तर बरे होईल.

<u>महापालिका सचिव :—</u>नाही, ॲड करत आहोत ना?

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> प्लॉट नं. ६१८ व ७०५, यु.नं. २५,२६ हा सुध्दा ॲड करण्यात यावा.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>अहो, महोदया ठराव परत वाचा. तुम्ही काय ॲड केले व काय डिलिट केले.

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :—</u>आम्ही आपणांस चार सुचक व चार अनुमोदकसहीत एक प्रस्ताव दिला आहे त्यावर सचिव महोदया यावर मतदान घ्या.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>सचिव महोदया, मतदान घ्या.

<u>महापालिका सचिव :—</u>ठिक आहे, हा जो प्रस्ताव आला आहे, जो मगाशी वाचण्यात आला, मा. सदस्य श्री. भालेराव साहेबांनी जो प्रस्ताव वाचला आता त्यात मा. सदस्य श्री. भुल्लर महाराजांनी ज्या दोन बाबी ॲड करायला सांगितल्या त्या ॲड करुन हा ठराव मतदानासाठी टाकण्यात येत आहे. जे या ठरावाच्या बाजुने आहेत त्यांनी हात वर करावेत. कृपया सर्वांनी नीट वर हात करावेत.

<u>सदस्या श्रीमती मिना आयलानी :—</u>माझे २५ टक्के सुध्दा समाविष्ट करावे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>नाही, जसा प्रस्ताव दिला तसे करा. श्री. भुल्लर महाराज यांनी सांगितले की प्लॉट नं. ६१८ व ७०५, यु.नं. २५,२६ हे समाविष्ट करुन बाकी इतर समावेश करावे. आम्ही जो ठराव दिला आहे त्याप्रमाणे करावा.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>सचिव महोदया, महापौर व उपमहापौरांचे सुध्दा मत घ्या.

<u>महापालिका सचिव :—</u>घेतले आहे.

<u>प्रस्तावाच्या बाजुने मते ५०</u>

१. श्रीमती अपेक्षा पाटील
२. श्रीमती पंचशिला पवार
३. श्रीमती मिना आयलानी
४. श्री. जमनादास पुरस्वानी
५. श्रीमती जया माखिजा
६. कु. शकुंतला जग्यासी
७. श्री. राम पारवानी
८. डॉ. निना नाथानी
९. कु. जयश्री जग्यासी
१०.श्रीमती मिनाकौर लबाना
११.श्री. हरेश जग्यासी
१२.श्रीमती अर्चना करनकाळे
१३.श्रीमती माया चावला
१४.श्री. भगवान भालेराव
१५.श्रीमती समिधा कोरडे

१६.श्रीमती ज्योती गायकवाड
१७.श्री. अंकुश म्हस्के
१८.श्री. धनंजय बोडारे
१९.श्री. विजय सुपाळे
२०.श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
२१.श्रीमती वसुधा बोडारे
२२.श्रीमती राजश्री चौधरी
२३.श्रीमती लिलाबाई आशान
२४.श्रीमती नेहा भोईर
२५.श्रीमती अनिता भानुशाली
२६.श्रीमती वंदना पाटील
२७.श्री. जयेंद्र मोरे
२८.श्री. प्रधान पाटील
२९.श्री. सुरेश जाधव
३०.श्री. सुभाष मनसुलकर
३१.श्री. उमेश कालानी
३२.श्री. नरेंद्रकुमार ठाकुर
३३.श्री. राजु जग्यासी
३४.श्री. गोदु क्रिशनानी,
३५.श्रीमती मिनु दासानी
३६.श्रीमती कमला क्रिशनानी
३७.श्री. आशा गुप्ता
३८.श्रीमती लक्ष्मी सिंग
३९.श्रीमती रेखा ठाकुर
४०.श्रीमती वनिता भठिजा
४१.श्री. सतरामदास जेसवानी
४२.श्री. गुरुनो वलेचा
४३.श्री. पुथ्वी वलेचा
४४.श्री. नरेंद्र दवणे
४५.श्रीमती मिनाताई सोनेजी
४६.श्रीमती जया साधवानी
४७.श्रीमती कांचन लुंड
४८.श्रीमती अंजली साळवे
४९.श्री. राजेश वदारिया
५०.श्री. सुनिल सुर्वे

सदस्य श्री. जीवन इदनानी :—आमच्या पक्षाची भुमिका स्पष्ट आहे, त्याची नोंद घेण्यात यावी. जे इंदिरा गांधी मार्केट जे भाजी मार्केट आहे त्याचे नविन बांधकाम करुन देण्याच्या बाजुने आहेत व त्याच बरोबर आपले दुकानदार बंधु आहेत, त्यांच्यासाठी जो ॲडिशनल प्रस्ताव दिला आहे तो सुध्दा पारीत करण्यात यावा, तसेच बिल्डरांकडे महापालिकेची जी मालमत्ता आहे ती काढुन या विस्थापीत झालेल्या लोकांचे पुर्नवसन केले जावे याच्या बाजुने आम्ही आहोत. इंदिरा गांधी भाजी मार्केट न बनो या बाजुने नाही आहोत, तर बनण्याच्या पक्षाने आहोत परंतु ती कधी बनेल, कधी तो विस्थापीत झालेला मनुष्य तेथे जाईल याचा आम्हांस काही भरोसा नाही. मार्केट बनवा, बनवत राहा, आमचा काही विरोध नाही, आमचे फक्त एवढेच म्हणणे आहे की आम्ही जो प्रस्ताव दिला आहे, आमचा मार्केटला विरोध नाही, तर व्यापा—यांसाठी ब—याच संरक्षणाच्या गोष्टी झाल्या, सभागृहाने त्याकडे लक्ष दिले आहे परंतु काही कारणास्तव जर सभागृह त्यास पारीत करत नाही, व्यापा—यांना

परत समस्यांमध्ये टाकु पाहत आहे तर सभागृहाची मर्जी आहे. आपण शिकलेले सदस्य आहात. तर आमचा विरोध किंवा बाजु घेण्याची बाब नाही. आम्ही व्यापा—यांच्या बाजुने आहोत.

महापालिका सचिव :—मग काय आपण यात तटस्थ आहात?

सदस्य श्री. जीवन इदनानी :—हो, मी तटस्थच आहे.

महापालिका सचिव :—जे या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी हात करावेत. कुणीही प्रस्तावाच्या विरोधात नाहीत.

प्रस्तावाच्या विरोधात मते शुन्य

महापालिका सचिव :—तसेच जे तटस्थ आहेत त्यांनी कृपया हात वर करावेत. ७ मते तटस्थ आहेत.

तटस्थ ७ मते

१. श्री. महेश गावडे
२. श्री. दिलीप जग्यासी
३. श्री. दिपक सिरवानी
४. श्रीमती आशा इदनानी
५. श्रीमती इंदिरा उदासी
६. श्री. विजय तायडे
७. श्री. सजित चक्रवर्ती

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—महोदया, आपण हे मत विरोधात घेतले की, तटस्थ घेतले.

काही सदस्य :—तटस्थ, तटस्थ....

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—तटस्थचा अर्थ समर्थन पण नाही आणि विरोधपण नाही.

महापालिका सचिव :—होय. तुम्ही प्रस्तावावर तटस्थ मत दिले विरोधात नाही, तुमचा प्रस्ताव येथेच संपला तुम्ही तटस्थ आहात. त्यामुळे त्याच्यावर मतदान घेता येणार नाही त्यामुळे हा प्रस्ताव बहुमताने पारीत झाला, नाही मंजुर झाला.

सदस्य श्री. मनोज सयानी :—मा. महापौरजी, आपल्या सभागृहात आज एक ऐतिहासिक निर्णय झाला आहे. सर्व उल्हासनगरची यावरच नजर होती की आजची महासभा काय निर्णय घेते, ज्यांनी आपल्या दुकानाचे बलिदान दिलेले आहे. तर मा. महापौरजी, मी असे म्हणतो की यावर सर्व पक्षीय गटनेत्यांची एक समिती जो या गोष्टींचा प्लॅनिंग घेवुन, अंमलात आणेपर्यंत, ई—टेंडरींग करुन प्लॅनिंगनुसार काम करेल. मा. महापौर महोदया आपल्या देखरेखीखाली समिती नेमावी, धन्यवाद।

सदस्या श्रीमती जया साधवानी :—श्री. मनोज लासी जे म्हणाले त्याचे मी समर्थन करते.

सदस्य श्री. प्रदिप रांमचंदानी :— आम्ही प्रशासनाची प्रशंसा करतो, खासकरुन आयुक्त महोदयांची ज्यांनी या शहराच्या विकासासाठी काम केले. धन्यवाद।

सदस्य श्री. मनोज सयानी :—बिल्कुल, बिल्कुल, आयुक्त साहेब, धन्यवाद।

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—हा ठराव एकमताने मंजुर झालेला आहे.

सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :—मा. आयुक्त महोदय, हा जो प्रस्ताव पारीत करण्यात आला तो लवकरात लवकर अंमलात आणावा.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>मा. महापौरजी, हा ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करावा.

<u>काही सदस्य:–</u>होय, इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करावा.

<u>सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :–</u>आपण ठराव पारीत करा आम्ही आपला सत्कार करु.

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :–</u>सचिव महोदया हा ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत झाला आहे.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :–</u>आयुक्त महोदयांनी मी सांगु इच्छितो की, तुम्ही फार हुशार व्यक्ती आहात. आपण डोळे उघडुन ठेवा, जळगावसारखे घरसंकुलाचे स्कॅंडल हे उल्हासनगरचे स्कॅंडल न होवो. तर आपण आपले कागदपत्र, विस्थापित, बाधित, यावर आपण जरा चौकशी ठेवावी.

<u>सदस्य श्री. मनोज लासी :–</u>आमचे समर्थन आहे या गोष्टीस.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>श्री. जीवन इदनानी यांच्या म्हणण्याचे आम्ही समर्थन करतो व ती गोष्ट लक्षात ठेवु.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे



---

☑ <u>विषय क्र. १:–</u> **कल्याण–अंबरनाथ रस्ता रुंदीकरणामुळे बाधीत झालेल्यांच्या पुनर्वसनाबाबत धोरण निश्चित करणे.**

<u>प्रस्तावना:–</u>

दिनांक ४/१२/२०१५ रोजी कल्याण–अंबरनाथ रस्ता रुंदीकरणाच्या कामामुळे या रस्त्याच्या कडेला असलेल्या एकुण ८२२ व्यवसायिकांचे गाळे अंशत: अथवा पुर्णत: पाडण्यात येणार आहेत. गेल्या ४० वर्षापासुन व्यवसाय करीत असलेल्या १३० व्यावसायिकांचा सुध्दा यात समावेश आहे. शहराची ओळख असलेली बाजारपेठ उध्दस्त होण्यामुळे अनेक नागरीकांसमोर रोजगाराचा गंभीर प्रश्न निर्माण होणार आहे. याकरीता या व्यावसायिकांना संरक्षण देणे व त्यांचे पुनर्वसन करणेबाबत धोरणे निश्चित होणे आवश्यक आहे या समस्येवर तोडगा काढण्यासाठी महासभेसमोर निर्णय घेण्यासाठी सादर.

<u>विशेष महासभा ठराव क्र:</u> ६० <u>दिनांक:–११/१२/२०१५</u>

सुचकाचे नाव : १) श्री. ओमी कालानी
२) श्री. धंनजय बोडारे
३) श्री. भगवान भालेराव
४) श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव : १) श्रीमती. जया साधवानी
२) श्री. नरेंद्र कुमार ठाकुर
३) श्री. राम पारवानी
४) श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार कल्याण–अंबरनाथ रस्ता रुंदीकरणामध्ये उल्हासनगरच्या विस्थापीत दुकानदार व घरांना पर्यायी जागा मिळण्यासाठी खालील जागेंवर ज्यांची १०० टक्के दुकाने बाधित झाली असतील त्यांना १० x २० चौ. फुटची तयार दुकान व ज्यांची घरे काही अंशी तुटले

असतील व संपुर्णपणे तुटले असतील त्यांना २०० चौ. फुटचे तयार घर देण्यासाठी प्रशासनास निर्देश देत आहे.

इंदिरा गांधी मार्केट, उल्हासनगर—३ हे महापालिकेच्या मालकीचे असलेले मार्केट नादुरुस्त असल्याने ते पाडुन त्याठिकाणी बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर मार्केट बांधुन रस्ता रुंदीकरणात बाधित झालेल्यांना ९९ वर्षांसाठी ३०० रुपये प्रती महिना भाडेतत्वावर देण्यासाठी मान्य करत आहे.

तसेच इंदिरा गांधी मार्केट मध्ये विस्थापित झालेल्यांसाठी बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर जे मार्केट बांधणार त्याची निविदा प्रक्रिया एका महिन्यात पुर्ण झाली पाहिजे व त्याचे बांधकाम एक वर्षाच्या आत पुर्ण झाले पाहिजे असे प्रशासनास निर्देश देत आहे.

तसेच प्लॉट ६१८, यु. नं. २५ व २६ येथे पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

या समस्येचे निवारण करण्यासाठी एक उप—आयुक्त पुर्णवेळ नेमण्याचे आदेश देत आहे. तसेच यापुर्वी शहरातील ३३ व इतर रस्ते रुंदीकरणात बाधित झालेल्या गोर—गरीबांच्या घरांना व दुकानांना वरीलप्रमाणे पर्यायी जागा देण्यास मान्यता देत आहे. सदरचा प्रस्ताव यापुढे बाधित होणा—या प्रत्येक घरमालकास व दुकानदारास देण्यास महानगरपालिका बंधनकारक असेल.

तसेच भविष्यात इतर रस्त्यांच्या कामांच्यावेळी बाधित झालेल्यांना पर्यायी जागा देण्यासाठी ७०५ व ६१८ सारखे भुखंड सुध्दा आरक्षित करण्यांत येवुन ३७ ए मध्ये शासनाकडे पाठवावे.

या ठरावाअंतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—१)
२)
३)
४)

अनुमोदकाची सही /—१)
२)
३)
४)

<u>मंजुर</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u>कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ६.१५ वाजता महापौर श्रीमती अपेक्षा विकास पाटील यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— २९/३/२०१६

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२९/३/२०१६ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

वि—३

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा दिनांक २९/३/२०१६ रोजी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती अपेक्षा विकास पाटील हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. अपेक्षा विकास पाटील —— महापौर

३. श्रीम. पंचशीला नाना पवार —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर | २८ | श्रीम. इंदिरा जमनादास उदासी |
| ४ | श्री. राजु रामसिंग कंडारे | २९ | श्रीमती वंदना युवराज भदाणे उर्फ वंदना पाटील |
| ५ | श्री. राम (चार्ली) पारवाणी | ३० | श्री. दिपक लछमनदास सिरवानी |
| ६ | श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे | ३१ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी |
| ७ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | ३२ | श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ८ | श्री. विजय खंडु सुपाळे | ३३ | श्रीम. वसुधा धनंजय बोडारे |
| ९ | श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी | ३४ | श्रीम. शकुंतला जग्यासी |
| १० | श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल | ३५ | श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर |
| ११ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन दवणे | ३६ | श्रीम. जयश्री जीवनलाल जग्यासी |
| १२ | श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी | ३७ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १३ | डॉ. नीना प्रकाश नाथानी | ३८ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १४ | श्रीम. मीना कुमार आयलानी | ३९ | श्री. विजय रामभाऊ तायडे |
| १५ | श्री. राजेश नानिकराम वधरिया | ४० | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १६ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ४१ | श्रीम. कांचन अमर लुंड |
| १७ | श्रीम. जया प्रकाश माखीजा | ४२ | श्रीम. जया मोहन साधवाणी |
| १८ | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा | ४३ | श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे |
| १९ | श्रीम. ज्योती सुरेश कालानी | ४४ | श्री. गुरूनो भिकोमल वलेचा |
| २० | श्री. भगवान शंकर भालेराव | ४५ | श्री. विजय चाहु पाटील |
| २१ | श्रीम. लक्ष्मी सुरेद्र सिंग | ४६ | श्रीम. माया हरेश चावला |
| २२ | श्रीम. मिनू राजकुमार दासानी | ४७ | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे |
| २३ | श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर | ४८ | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| २४ | श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता | ४९ | श्री. प्रधान धर्मा पाटील |
| २५ | श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती | ५० | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| २६ | श्री. गोदुमल नारायणदास किशनानी | ५१ | श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी |
| २७ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५२ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील, २. श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना, ३. श्रीम. आशा नाना बिराडे, ४. श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर, ५. श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर, ६. श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल, ७. डॉ. महेश गजानन गावडे, ८.श्रीमती आशा जीवन इदनानी, ९. श्री. गणपत गोविंद एडके, १०. श्रीम. शशिकला शिवाजी आवारे, ११. श्री. उमेश सुरेश (पप्पु) कालानी, १२. श्रीम. वनिता बब्बू भटिजा, १३. श्रीम. कमला गोदुमल किशनानी, १४. श्रीम. खान इसरद सऊद, १५. श्री. राजू किशनचंद जग्यासी, १६. श्रीम. सोनिया राजू जग्यासी, १७. श्री. धनंजय बाबूराव बोडारे, १८. श्रीम. जयश्री गजानन कांबळी, १९.

श्रीम. मंदा सागर सोनकांबळे, २०. ॲड. शैला पांडुरंग सोनताटे, २१. श्रीम. अनिता सचिन भानुशाली, २२. श्री. सतराम फतनदास जेसवानी, २३. श्रीम. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी, २४. श्री. राजेश देवेंद्र वानखेडे, २५. श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे), २६. श्री. सन्मुख ग्यानचंद मानवानी, २७. श्री.बी.बी. मोरे

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१४. श्री. मनोहर हिरे, आयुक्त
१५. श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त
१६. श्रीमती प्राजक्ता मि. कुलकर्णी
१७. श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त
१८. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
१९. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
२०. श्री. वेखंडे, उप मुख्य लेखा परिक्षक
२१. श्रीमती मंगला माळवे,सहा. आयुक्त
२२. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
२३. श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
२४. श्री. विजय रिजवानी, प्र. शहर अभियंता
२५. श्री. हनुमंत खरात, कार्यकारी अभियंता, विद्युत
२६. श्री. नंदु समतानी, प्र. सहा. आयुक्त
२७. श्री. अजित गोवारी, प्र. सहा. आयुक्त,
२८. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
२९. श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
३०. श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त, साप्रवि
३१. श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
३२. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
३३. श्रीमती अलका पवार, प्र. विधी विभाग प्रमुख
३४. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
३५. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती नर्गिस खान
२. श्री. अशोक रामरख्यानी

सायंकाळी ४.२० वाजता वंदेमात्रम म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

**<u>महापालिका सचिव :–</u>** विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

**<u>सदस्य श्री. विजय सुपाळे –</u>** मा. महापौर आमचे वरिष्ठ नगरसेवक श्री. भुल्लर महाराज यांच्या मधल्या भावाचे रविवारी रात्री १ वाजता निधन झाले आहे. तरी त्यांना श्रध्दांजली वाहण्यात यावी ही विनंती.

**<u>महापालिका सचिव –</u>** कृपया सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळावे.

**<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी –</u>** मा. महापौर मॅडमजी आमचे सिंधी समाजाचे संत श्री. निहारामजी यांचे काल निधन झाले आहे. त्यांना देखील श्रध्दांजली वाहण्यात यावी.

इकडे सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण केली.

---

सुचकाचे नाव :– श्री. विजय सुपाळे
अनुमोदकाचे नाव :– श्री. दिपक सिरवानी

**<u>शोक प्रस्ताव</u>**

उल्हासनगर महानगरपालिकेचे वरिष्ठ नगरसेवक श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचे मधले भाऊ श्री. गुरविंदरसिंह भुल्लर यांचे दि. २८.३.२०१६ रोजी निधन झाले. तसेच सिंधी समाजाचे संत श्री. निहारामजी यांचे २६.४.२०१६ रोजी निधन झाले.

त्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ८८ अ दिनांक:— २९/३/२०१६

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. गुरविंदरसिंह भुल्लर व संत श्री. निहारामजी यांचे निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सदस्य, श्री नरेंद्र दवणे — मा. महापौर, आयुक्त साहेब आज पूर्ण शहरामध्ये गल्ली, रस्ते साफ करणारे जे सफाई करणारे कर्मचारी आहेत त्यांच्या वस्ती स्थलांतरीत करण्यासाठी ते जे बाहेर बसले आहेत आणि माझे हे पत्र आहे ते निवेदन मी तुम्हाला देऊ इच्छितो सर्व वाल्मिकी समाजाचे आहेत.

महापौर तथा पीठासीन अधिकारी— मा. सदस्य ही अर्थसंकल्पाची मिटींग आहे. यात कोणाला इतर विषय आणता येणार नाही. आणि इतर विषय असतील तर ते येत्या महासभेमध्ये द्यावेत.

महापालिका सचिव :—विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :— स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेऊन सन २०१६—१७ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाज व सन २०१५—१६ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजास अंतिम स्विकृती देणे**

---

महापौर तथा पीठासीन अधिकारी — मा.स्थायी समिती सभापती श्रीमती जया माखिजा यांनी कृपया मंचावर यावे.

**(श्रीमती जया माखिजा, स्थायी समिती सभापती या मंचावर आसनस्थ झाल्या.)**

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी — मा. महापौर व आयुक्त साहेब आमचे नगरसेवक श्री. हरेश जग्यासी यांच्या घरावर हल्ला झाला आहे. ४००/५०० लोक उभी आहेत. तातडीने आधिका—यांना पाठवा. पोलीसांत तक्रार केली आहे. पाणी येत नाही यात नगरसेवकाचा काही दोष नाही. आपण तातडीने दखल घ्यावी.

यावेळी सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी हे सभागृहातुन बाहेर गेले. 

सदस्या, डॉ. निना नाथानी — मा. महापौर मला पण हेच म्हणायचे आहे मी सेल्युट करते प्रशासनाला १० मिनिटांसाठी पाणी मिळते मला वाटते यासाठी प्रशासनाला सेल्युट केले पाहिजे. आपण खुप चांगले काम करीत आहात. २५ हजार वस्तीमध्ये १० मिनिटे पाणी कसे पुरणार ते सांगा? माझे मते सर्व मा. सदस्यांचा पण हाच विचार असेल. ते पण यासाठी प्रशासनाला सन्मानित करतील.

सदस्य, श्री.पृथ्वी वलेचा — मा. महापौर माझे प्रभागातील लोकांनी मला बाटल्या मारल्यात.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी –</u> सन्माननीय सदस्य मी सुरूवातीलाच सांगीतले आहे ही बजेटची मिटिंग आहे येथे इतर विषयावर चर्चा करता येणार नाही. पाण्याच्या विषयी आपण लवकरात लवकर महासभा लावु या.

यावेळी सदस्या श्रीमती वंदना भदाणे यांनी सभागृहात प्रवेश केला.

**(येथे मा. सभापती स्थायी समिती यांनी मा. महापौर यांना अंदाजपत्रक सादर केले.)**

<u>सभापती, स्थायी समिती, श्रीम. जया प्रकाश माखिजा –</u> मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त, सभागृह नेता, विरोधी पक्षनेता, सभी गटनेता, सभी सभापती, सन्माननिय नगरसेवक, नगरसेविकायें , अधिकारी कर्मचारी, पत्रकार बंधू तथा उपस्थित सभी नागरिक आप सभी का वर्ष २०१६–१७ के बजेट की महासभा में स्वागत है !

**आजसे** सात साल पहले वर्ष २०१०–११ मे इसी सदन में पहिली बार मैने अंदाजपत्रक सादर किया था जिसे सभी सन्माननिय सद्स्योंने एक होकर मंजूर किया था ! मैं उम्मीद करती हुँ की, इसबार भी वर्ष २०१६–१७ के बजेट को सभी सदस्य सर्व संम्मतीसे मंजूर करेंगे ! वर्ष २०१२ मे पाच साल के कार्यकाल के लिये चुनके आए हुये सभी सदस्यों का यह आखरी वर्ष है !अगले वर्ष २०१७ मे हम सभी को जनताके समक्ष जाना होगा ! जनता की सारी अपेक्षाए हम बजेट की माध्यम सेही पुरी कर सकते है ! इन्ही अपेक्षाओंको ध्यान मे रखते हुये स्थायी समिती सदस्योंने किसी भी कर मे वृध्दी न करते हुये एक संतुलित बजेट बनाने का प्रयास किया है ! मै आपसे विनंती करती हु की, आप सभी सदस्य इसमें मार्गदर्षन करे, जैसे हम वो सारी अपेक्षाए पुरी करनेवाला एक उत्तम अंदाज मंजूर कर पायें !

तो चले बजेट की ओर !

<u>उत्पन्न बाजू</u> :

**वित्तीय** वर्ष २०१६–१७ के लिए मा. आयुक्त व्दारा ५३५.७० कोटी उत्पन्न तथा ६०७.३० कोटी खर्च की तसवीर स्थायी समिती के समक्ष पेश की गयी थी ! इसके साथ ७१ करोड रुपयोंका करोंमे बढोत्तरी का प्रस्ताव सादर किया गया था परंतू स्थायी समिती सदस्योंने किसीभी प्रकार की बढोत्तरी नामंजूर करते हुये थकीत कर वसूल करके जो अंदाजपत्रक बनाया है, वो इस प्रकार है!

| | | |
|---|---|---|
| 'अ' अंदाजपत्रक उत्पन्न | : | ५२३.९७ करोड |
| 'ब' अंदाजपत्रक उत्पन्न | : | १.७५ करोड |
| 'क'अंदाजपत्रक उत्पन्न | : | १९४.४८ करोड |

**एकूण उत्पन्न ७५०.२० करोड**

| | | |
|---|---|---|
| 'अ' अंदाजपत्रक खर्च | : | ४४३.५२ करोड |
| 'ब' अंदाजपत्रक खर्च | : | ३.७० करोड |
| 'क' अंदाजपत्रक खर्च | : | २७२.४० करोड |

**एकूण खर्च : ७१९.६२ करोड**

वर्ष २०१६–१७ मे प्राप्त होनेवाली आमदनीसे जो विकास कार्य पुरे किये जायेंगे, वो इसप्रकार है !

<u>भुयारी गटार योजना</u> :

कुछही समय पहले केंद्र और राज्य शासन के सहयोग से अमृत योजना जाहीर की गयी है! इस योजना मे मुलभूत सेवा व सुविधाओंसे सबंधित योजनाओंको मंजूरी प्राप्त की जा सकती है ! उल्हासनगर महानगरपाालिका की तरफसे भेजे गये २२३ करोड रुपयोंकों भुयारी गटार प्रकल्प को इसमें मान्यता प्रदान की गयी है ! इस योजना के तहत ५० प्रतिशत रक्कम केंद्र शासन, २५ प्रतिशत रक्कम राज्यशासन व्दारा अनुदान स्वरुप मे प्राप्त होगी ! महापालिका की तरफ से इसमे सिर्फ २५ प्रतिशत रक्कम खर्च करनी होगी ! इस योजना कोशुरु करने के लिये वर्ष २०१६–१७ के अंदाजपत्रक मे ८९ करोड रुपयोंका प्रावधान किया गया है !

रस्ते विकास :
शहर का बढता व्यापार, बढती जनसंख्या तथा बढती ट्राफीक इन सभी जरुरतोंको ध्यान मे रखते हुये, रस्ते विकास कार्यक्रम के तहत ७९ कोटी रुपयोंका फंड रखा गया है ! इसमे कल्याण अंबरनाथ रोड और ऐसे कई अन्य रस्तोका विकास नियोजित किया गया है ! इसके अलावा बारीश के पहले रस्तोंका डांबरीकरण करने के लिये ५ करोड रुपये रखे गये है !

महापौर, उप महापौर और अन्य निधी :
महापौर, उपमहापौर, स्थायी समिती व अन्य समितीयों कें सभापती, गटनेता, नगरसेवक अपनी इच्छासे अपने प्रभाग मे विकास कार्य करवा सके, इसके लिये जो निधी उपलब्ध की गयी है, ओ इस प्रकार है !

| | | | |
|---|---|---|---|
| १) | महापौर निधी | : | १.७५ करोड |
| २) | उप महापौर निधी | : | १.०० करोड |
| ३) | स्थायी समिती सभापती निधी | : | १.०० करोड |
| ४) | गटनेता | : | ५० लाख |
| ५) | सभागृह नेता | : | ५० लाख |
| ६) | विरोधी पक्ष नेता | : | ५० लाख |
| ७) | प्रभाग समिती सभापती | : | ५० लाख |
| ८) | स्थायी समिती सदस्य | : | २० लाख |
| ९) | नगरसेवक निधी | : | १० लाख |
| १०) | प्रभाग समिती निधी | : | १५ लाख |
| ११) | स्वीकृत नगरसेवक निधी | : | १५ लाख |

शिक्षण मंडळ :
महानगरपालिका व्दारा संचलीत स्कूलों मे जरुरतमंद बच्चो की पढाई , पोषाख व अन्य सुविधाओं के लिये ४२ करोड रुपये उपलब्ध करके दिये गये है ! इसमें नये स्कूल तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका बनाने के लिये १८ करोड रुपये रखे गये है !

साफ सफाई :
शहर कों साफ और सुंदर बनाये रखने हेतु कचरा उठाना , डपिंग ग्राउंड व्यवस्था, तथा जंतुनाशक इत्यादी खरेदी करनेके लिये आरोग्य विभाग को ३४ करोड रुपये दिये गये है !

परिवहन सेवा :
शहर मे यातायात की समस्याओं को सुलझाने के लिये एक और प्रयास करते हुये परिवहन समिती की तरफ से अमृत योजना के तहत १० नयी बस खदीदने का प्रस्ताव पारीत किया गया है ! इसके लिये २ करोड रुपये प्रावधान रखा गया है !

पाणी पुरवठा :
पिढले वर्ष कम बारीश होने की वजहसे महाराष्ट् की कई जिल्होमें डॅम का पाणी शुन्य स्तर पर है !
हमारे आसपास के डॅम मे भी पाणी बहुत कम मात्रा में बचा हुआ है ! सभी बातों को ध्यान में रखत हुये, नये बोअरवेल लगाने तथा पुराने बोअरवेल मरम्मत के लिये ५ करोड रुपये रखे गये है! इसके अलावा जल आपुर्ती सबंधित अन्य कामों के लिये ३० करोड रखे गये है!

विदयुत व्यवस्था :
संपूर्ण शहर की स्ट्रीट लाईट व्यवस्था, बाग बगीचे और सार्वजनिक जगहोंपर रोशनाई बनाये रखने के लिये १३ करोड रुपये रखे गये है !

राष्ट्रीय कार्यक्रम :
महापालिका अधिनियमो मे दर्शाए गये कार्य व कर्तव्य के अलावा राष्ट्रीय तथा राज्य स्तरीय जिम्मदारीयों को निभाने के लिये सहयोग करना पडता है ! ऐसी जिम्मेंदारीयोंको निभाने हेतु बजेट मे कि गयी प्रावधान की जानकारी इस प्रकार है !

| | | | |
|---|---|---|---|
| १) | विकलांग कल्याणकारी योजना | : | २ करोड |
| २) | एडस टी.बी. रोकथाम | : | १० लाख |
| ३) | लस टोचणी | : | १५ लाख |

| | | | |
|---|---|---|---|
| ४) | कुटूंब नियोजन कार्यक्रम | : | १० लाख |
| ५) | वेडे व कुष्ठरोगी कल्याण योजना | : | ३५ लाख |
| ६) | महिला व बालकल्याण | : | ४.१० करोड |

सामान्य जनता पर किसी भी प्रकार की कर वृध्दी का बोज न डालते हुये स्थायी समिती सदस्योंने एक होकर तयार किये गये अंदाजपत्रक को महापालिकाके सभी सदस्य मंजूर करेंगे, ऐसी में अपेक्षा करती हुँ ! और में अपने दो शब्द समाप्त करती हुँ ! मेरे कार्यकाल में सहयोग करने के लिये मा. महापौर , मा. उप महापौर , आयुक्त तथा सभी अधिकारीओं का मै आभार व्यक्त करती हुँ !
धन्यवाद ! जयहिंद ! जय महाराष्ट् !

यावेळी सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

**सदस्या, डॉ. निना नाथानी –** मा. महापौरजी मी आपल्या सभापतींना धन्यवाद देऊ इच्छिते की त्यांनी कुठलीही करवाढ केली नाही.

यावेळी सदस्य श्री. भगवान भालेराव यांनी सभागृहात प्रवेश केला.

**सदस्या, श्रीमती. जया साधवानी –** मा. महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब, आमच्या महापालिका सचिव एका गोष्टीसाठी मी सभापती महोदयांना धन्यवाद देते की त्यांनी कोणतीही करवाढ केली नाही. परंतु मी व माझ्या सदस्यांनी सभापतींना पत्र दिले होते आमच्या प्रभागातील कामांचा बजेटमध्ये समावेश करण्यासाठी. परंतु त्यांनी यात समावेश केला नाही. मला समजत नाही शहरातील २२ रोड टाकले आणि आमची पत्र मात्र कच–याच्या डब्यात टाकली याचे मला दु:ख आहे. जे रोड, गार्डन आणि समाज मंदिर बनविण्यासाठी आम्ही आग्रह करतो ते सुध्दा करदाते आहेत. त्यांचा वापर करदाते करतात. मी माझ्या पक्षातील श्री. गोदु क्रिशनानी, श्रीमती मिना सोंडे, श्रीमती पिंकी उदासी, श्रीमती दिप्ती दुधानी, श्रीमती अंजली साळवे व माझे पत्र मी आपल्याकडे देत आहे. मला आशा आहे तुम्ही त्याचा अंदाजपत्रकात समावेश कराल. मा. महापौर आपल्याला माहिती आहे आपल्या शहरावर जलसंकट आहे. मी आपणांस आग्रह करते, निवेदन करते सक्तपणे सांगते की ३ महिने झाले पाणी येत नाही आणि मला आशा आहे की पुढे देखील पाणी येणार नाही. जोपर्यंत पावसाळा येत नाही. आपण जनतेकडून एक वर्षाचे पाण्याचे बिल घेता. माझा आग्रह आहे, निवेदन आहे की आपण जर जनतेला पाणी देऊ शकत नाही तर कमीत–कमी त्यांचे सहा महिन्यांचे बिल माफ करा त्यांना थोडा दिलासा मिळेल. आपण पाणी त्यांना देऊ शकत नाही. पूर्ण शहरात पाण्यासाठी त्राही–त्राही होत आहे. आणि आपण जर त्यांना एका वर्षाचे बिल दिले तर हे जखमेवर मीठ चोळण्यासारखे होईल. तर मी सर्व सभागृहाला विनंती करते की जनतेला ३ महिने पाणी मिळाले नाही. पुढील ३ महिने पाणी मिळणार नाही. तर त्यांचे ६ महिन्यांचे बिल कमी करावे. त्यांना जास्त बिल पाठवू नये, त्यांच्या जखमेवर मीठ चोळू नये. दुसरे मी आपणांस निवेदन करते की प्रभाग क्र.३४ मध्ये आपले वाल्मिकी समाजाचे सफाई कर्मचारी तेथे त्यांना क्वार्टर मिळाले आहेत. मा. महापौर आपण पण व्हिजीट दिली आहे. दोन इमारती चांगल्या तयार झाल्या आहेत. तिसरी बनत आहे. चौथीसाठी जागा ठेवली आहे. आपण बजेट पाहिले आहे त्या इमारतीसाठी फक्त ३ करोड ठेवले आहे. पहिल्या दोन इमारतींमध्ये अजुन काम राहिले आहे. तेथेच करोडो लागतील. तिसरी इमारत अजून तयार होत आहे. तर हे शक्य नाही की एवढा निधी पुरेल. आपल्या बरोबर माझी मिटींग झाली होती. ठेकेदाराशी मिटींग झाली होती. तर ३ महिन्यांत हे काम होणे शक्य नाही. आणि या कामासाठी जवळ–जवळ १३ करोड रुपये लागतील. तर माझे म्हणणे आहे की सद्या तरी ३ च्या ऐवजी १३ करोड करा. आणि जर अजुन लागते तर महापौर मॅडम आम्ही तुमच्याकडे येऊ. आम्हाला असे वाटते की तेथे १३ करोडची आवश्यकता आहे. तरच ३ महिन्यांत ते काम होणे शक्य आहे. ही आपल्यासाठी गर्वाची बाब आहे. पूर्ण ठाणे जिल्ह्यामध्ये फक्त आपल्याकडे माझे प्रभागातील क्वाटर्स बांधले आहे. काही आमदार देखील होते. त्यांनी देखील ॲप्रिशिएट केले आहे. आमचे आमदार श्री. बालाजी किणीकर देखील मा. आयुक्तां बरोबर आले होते एक आठवडयापुर्वी. तर मी १३ करोडची तरतुद करावी ही विनंती करते आणि दुसरे असे की डंपींग ग्राऊन्डची काय स्थिती आहे हे आपणांस माहितच आहे. डंपींग ग्राऊन्डची स्थिती खूप खराब आहे. आयुक्त साहेबांनी व आम्ही ब–याचदा तेथे भेट दिली आहे. कच–यावर कचरा टाकत आहेत. याच्यासाठी आपण फक्त टोकन अमाऊंट म्हणून एक करोड

रुपये ठेवले आहे. हे कसे शक्य आहे? हे कसे शक्य आहे. एक करोडमध्ये भुखंड मिळणे? आपल्याला जास्तीत–जास्त मोठा भुखंड घ्यावा लागेल, कमीत–कती १० वर्ष तरी तेथे कचरा डंप झाला पाहिजे. तर माझी विनंती आहे की याकडे आपण लक्ष द्याल. एक करोडमध्ये भुखंड मिळणे शक्य नाही. कमीत–कमी २५ करोड तरी त्यासाठी तरतुद करावी लागेल. याकडे आपल्याला लक्ष द्यावे लागेल. मी विनंती करते की वाल्मिकी समाजाचे कर्मचारी जे बाहेर आहेत त्यांचे अर्ज घ्यावेत व ३०५ कामगारांची लवकरात–लवकर भरती करावी. उच्च न्यायालयात प्रकरण आहे त्यांच्या पगारासाठी आपल्याला तेवढी तरतुद करावी लागेल. प्रकरण उच्च न्यायालयात अंतीम टप्प्यावर आहे. दुसरे सफाई कर्मचा–यांच्या मुलांच्या शिक्षणा साठी व उच्च शिक्षणासाठी काहीतरी करावे लागेल. बजेटमध्ये तशी तरतुद करावी लागेल. तसेच नविन कामगांराचे पेन्शन योजना बंद केली आहे ती लवकरात लवकर सुरू करावी असा माझा आग्रह आहे. तसेच बजेटमध्ये सफाईसाठी पाच टक्के तरतुद केली जाते ती येथे केल्याची दिसून येत नाही ती येथे ठेवणे आवश्यक आहे. सफाई कर्मचा–यांच्या वस्तीमध्ये पाणी येत नाही. तेथे पाणी उपलब्ध करून देण्याची विशेष व्यवस्था करावी. माझे असे म्हणणे आहे की आपले कर्मचारी पाठीचा मणका आहेत जेव्हां आपण झोपलेलो असतो तेव्हा ते सफाई करतात. मा. महापौर त्यासाठी काहीतरी तरतुद केली पाहिजे. माझे आपणांस निवेदन आहे की मी दिलेल्या सर्व बाबींचा समावेश करावा व आपल्या कर्मचा–यांना तसे निर्देश द्यावेत अशी विनंती करते. या सर्वांचा बजेटमध्ये समावेश करावा आम्ही खुप विचार करूनच मुद्दे मांडले आहेत. धन्यवाद मॅडम.

<u>सदस्या श्रीम. समिधा कोरडे :–</u> मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त व सचिव मॅडम हे अंदाजपत्रक दिलासा देणारे आहे. एका दृष्टीने धक्कादायक आहे कारण यामध्ये कोणतेही करवाढ केलेली नाही. कर वाढ न करता अंदाजपत्रक हे सर्व समावेक्षक असायला पाहिजे होते. सर्वात महत्वाच्या त्रुटया हया आहेत आपल्या शहरात अपंग आहेत. अपंगासाठी कोठेही अशी तरतूद ठेवलेली नाही. शासन निर्णयानुसार ५ टक्के तरतूद ही ठेवावी लागते ती कोठेही ठेवली नाही. दुसरी गोष्ट उल्हासनगर शहरात जी काही बांधकामे आहेत ज्या सदनिका आहेत जे कोण राहतात त्या लोकासाठी जी मालमत्ता आहे त्याचे एक सर्वेक्षण झाले पाहिजे. कारण मागे आपण डी. पी. पास केला आहे. त्यानुसार क्लस्टर डेव्हल्पमेंट साठी तरतूद करावी लागेल. कारण ती जर योजना अंमलात आणायची असेल व्यवस्थित राबवायची असेल तर त्यासाठी टॅक्स जीएस मॅपींग सिस्टीम ने केले पाहिजे. त्यासाठी जीएस मॅपींग करीता कुठेही आर्थिक तरतूद केलेली आढळून येत नाही. तिसरी गोष्ट जर बांधकामे नियमीत करण्याकरीता येईल किंवा आता जो शासन निर्णय झालेला आहे दि. ३१/१२/२०१५ च्या शासन निर्णय नुसार मालमत्ता रेग्युलाईज करायच्या असतील तर त्यासाठी करावी लागणारी कर वाढ कोठेही आढळत नाही. आपल्याला मालमत्ता नियमीत करावयाची असतील तर मॅपींग कसे करायचे याबाबत काहीही तरतूद केलेली नाही. त्यामुळे क्लस्टर डेव्हल्पमेंटचा फायदा कुठ पर्यंत साध्य होणार हे कळत नाही. तिसरी गोष्ट वृक्ष प्राधिकरण त्या सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे झाडे लावणे, उदयाने विकसीत करणे हे सर्व आहे. परंतू जेव्हा आपण झाडे लावतो झाडासाठी आवश्यक असणारा सर्वात महत्वाचा भेडसावणारा आजचा प्रश्न म्हणजे पाणी. आपण झाडे लावण्याकरीता लाखो रूपये खर्च करतो. परंतु त्याच झाडांची निगा राखण्यासाठी त्यांना पाणी देण्यासाठी कोणतेही तरतूद स्पष्टपणे या अंदाजपत्रात दिसून येत नाही. झांडाना कुंपण बांधण्याची तरतूद आहे पण झाडांना पाणी देण्यासाठी कोठेही तरतूद नाही. या सर्वात प्रामुख्याने त्रुटया आहेत त्यात जमेची बाजू एक आहे की, महिला व बालकल्याण विकासासाठी वाढीव निधी दिला आहे व महिला भवन साठी निधी दिला आहे. परंतू जे महिला शौचालयासाठी निधी येतात त्याचे हेड कुठेही स्पष्टपणे दिसुन येत नाही. मग ते फक्त जनरल निधी मधून होणार का? कारण गेल्यावेळेस महिला शौचालयाकरीता वेगळे हेड होते. ते येथे दिसत नाही. मा. आयुक्त साहेब आम्ही काही सुचना देत आहोत आपण फोनवर बोलत आहात कृपया सुचना महत्वाच्या आहेत ते आपण ऐकावे. या बजेट मध्ये जे रिवाईज बजेट होईल त्यात या सर्व सुचनांची अंमलबजावणी झाली पाहिजे. या सर्व महत्वाच्या सुचना आहेत. त्या राहून गेल्या आहेत. आपले बजेट ढोबळ झाले आहेत हे छोटे बारकावे लक्षात घेतले पाहिजे. तर या सुचनांची अंमलबजावणी व्हावी. हि विनंती. धन्यवाद!

यावेळी सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, स्थायी समिती सभापती व सर्व सन्माननीय सदस्य हे अंदाजपत्रक आहे यात मा. स्थायी समितीने शहराच्या हितासाठी कोणतीही कोणतीही कर वाढ केलेली नाही. शहरातील मुख्य रस्ते घेतले गेले आहे व नगरसेवक निधी प्रभाग समिती निधीत वाढ केलेली आहे काही सदस्यांचे असे म्हणणे होते की या निधीमध्ये वाढ करण्यात यावी. सभागृह नेता एक करोड, विरोधी पक्ष नेता एक करोड, सर्व नगरसवेक निधी पन्नास लाख रूपये स्थायी समिती निधी चाळीस लाख रूपय दुरूस्ती आणि नुतनीकरणा करीता महापालिकेचे राजीव गांधी उदयानासाठी एक करोड व नामनिर्देशीत सदस्यासाठी वीस लाख रूपये व वाल्मीकी श्रमसाफल्यसाठी जे काम बाकी आहे त्यासाठी तेरा करोड तरतूद

करण्यात यावे. वीस करोड वाढवून सातशे चाळीस कोटी एकोणावीस लाख लाख खर्च तर सातशे चाळीस कोटी एकाव्वन लाख उत्पन्न तर या प्रकारे तीस लाख फायदाचा अर्थसंकल्प सादर केलेला आहे. तर मी सदस्यांना विनंती करीन की, यावर काही चर्चा न करता बजेट मंजूर करावे. स्थायी समिती मध्ये गटनेत्यांसोबत यांवर बरीच चर्चा झालेली आहे. सर्व सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी सर्व संमतीने बजेट मंजूर करावे. आणि हे जे वीस करोड जी आपण वाढ करोत आहोत त्यात जर टॅक्स कलेक्शन बरोबर केले तर घरोघरी जाउन जर कलेक्शन केले तर कोणाचे पाच हजार, कोणाचे सात हजार असले तर लाईटवाले एक महिना सुध्दा थांबत नाही. जर आपल्या अधिका—यांनी व्यवस्थित कलेक्शन केले तर वीस करोड उत्पन्न वाढवणे मोठी गोष्ट नाही. याप्रकारे सातशे चाळीस कोटी एकावन्न लाख उत्पन्न व सातशे चाळीस कोटी एकोणीस लाख खर्चाचे बजेट शहरासाठी खूप चांगल असेल. मी सर्व सदस्यांना विनंती करीन की सर्व संमतीने बजेट पास करावे.

यावेळी सदस्या श्रीमती ज्योती कालानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

**सदस्य, श्री. सुरेश जाधव :—** मा. आयुक्त साहेब दरवर्षी आपण बजेट पास करतो सालाबाद प्रमाणे प्रथा आहे आपण पास करतो. परंतू वास्तविक अर्थसंकल्प काय आहे आपण हे करणार आहात का? मी सभापती आहे मला अनुभव आहे मागच्या बजेटची कामच तुम्ही केलेली नाही आता तुम्ही एवढा बजेट ठेवला आहे ही कामे होणार आहेत का? मला एक विचारायचे आहे की कुष्ठरोगा करीता आपण नेहमी तरतूद ठेवतो ते यावेळी केल्याचे दिसुन येत नाही. आणि दुसरे मला बोलायचे नाही आहे कारण आपलेच लोक आहेत आपलेच ओठ आपलेच दात असे आहे. काही ठरावीक लोकांच्या प्रभागातील रस्ते घेतले आहेत. उड्डान पूल, व्हिनस टॉकीज हा मुख्य रस्ता आहे हा दुसरा शहरात मिळणारा रस्ता आहे त्याकरीता काहीही तरतूद ठेवलेली नाही. तर मा. महापौर व सभापतींना विनंती आहे की, उड्डान पूल हा तीन व चार नंबरला मिळणारा मुख्य रस्ता आहे त्याकरीता अंदाजपत्रकात तरतूद ठेवावी. दुसरे की गणेश विसर्जन घाट आहे त्याकरीता निधी ठेवलाला दिसत नाही. तर त्याकरीता देखील निधी ठेवावा. आणि कुष्ठरोगी वसाहती करीता निधी ठेवावा शासन सांगते की कुष्ठरोग वसाहती महापालिकेचा हिस्सा आहे. मी स्थायी समितीला पत्रव्यवहार केलेला आहे तरी त्यांच्यासाठी काहीही निधी ठेवलेला नाही. मी आयुक्त साहेबांना विनंती करतो की, यांनी ठेवला नाही पण आपण ठेवावा. नाही तर मी महापालिकेसमोर सर्व कुष्ठरोगी वासाहतीला घेउन येईन व उपोषणाला बसेन कारण त्यांचा तो हक्क आहे. अशा लोकांना तुम्ही निधी देत नाही लाजा वाटायला पाहिजे असे मी बोलेन, आणि अपंगासाठी देखील निधी ठेवला नाही आणि मुख्य मुख्य रस्त्याकरीता तुम्ही ठेवला आहे एक करोड नको तर पन्नास लाख ठेवा तुम्ही वसहातीकरीता निधी ठेवला नाही. आयुक्त साहेब काही महिन्यांनी गणपती येणार आहे गणपती विसर्जनासाठी पन्नास साठ लाखाचा निधी आपण दरवर्शी ठेवतो तो ठेवला नाही. तरी तो ठेवावा अशी माझी विनंती आहे.

**सदस्य, श्री. रमेश चव्हाण :—** मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, मी मागील तीन वर्षापासून सांगतो आहे की, स्मशानभूमी कडे जाणारा रस्ता, सगळयांना तिकडे जायचे आहे तो छोटा आहे तो तरी बजेट मध्ये ठेवा. परंतू स्थायी समितीचे सदस्य व काही व्यक्ती बघून हे रस्ते ठेवलेले आहेत.

**सदस्य, श्री भगवान भालेराव :—** रस्ते बंद करा व पास करा.

**सदस्य, श्री रमेश चव्हाण :—**गणेशनगर शिवसेना शाखा ते स्वामी शांती प्रकाश पूतळा या करीता आठ कोटी ठेवले आहे. आठ कोटीत ते होईल का? आठ कोटी कोणाच्या सांगण्यावरून ठेवले आहेत. आठ कोटी भरपूर आहे ते अंतर कमी आहे. सांगा ना कोण सांगणार आहे? सार्वजनिक बांधकाम विभागाचे. साहेब हे आठ कोटी ठेवले आहेत आठ कोटींची आवश्यकता नाही. एवढा मोठा रस्ता नाही. साहेब माझी विनंती आहे की, तुम्ही मोघम आकडे ठेवले आहेत ते कमी करून लालचक्की ते व्हिनस व स्मशानभूमीचा रस्ता मनिष अपार्टमेंट पर्यंत करावा कारण चार व पाच नंबर मधील सर्व व्यक्ती तेथे येतात. हे सर्व मोघम आकडे आहेत. तर दुरूस्ती करावी अशी माझी विनंती आहे.

**सदस्य, श्री प्रदीप रामचंदानी** — मा महापौर उपमहापौर सचिव मॅडम आजचे जे बजेट मा स्थायी समिती सभापतींनी प्रस्तृत केले आहे सभपती महोदयांनी कुठलाही कर वाढवला नाही. परंतू दुर्देवाची एक गोष्ट आहे यावेळी जे आपण प्रॉप्रटी टॅक्स अे—२ मध्ये दिलेले आहे त्यात आपण सांगितले आहे की दि. ०१/०१/२०१५ ते ३१/०३/२०१६ त्यात तीन कोटी साठ लाख एकशे अकरा वसूल होणार आहे. आज ३१ तारीख जवळ आली आहे पत्यक्ष किती वसूली झाली आहे ते सांगा. कोणाचे लक्षच नाही बोलण्यात अर्थ काय? म्हणुन तर गप्प राहिलो ना. माझी आयुक्त साहेंबाना विचारणा आहे की, आपण जे तीन महिन्यात लक्ष्य ठेवले आहे ती

तरी वसूली झाली आहे का? बाकी तर होत नाही. आपण जे दि. ०१/०१/२०१५ ते ३१/०३/२०१६ पर्यंत लक्ष्य ठेवले आहे ते तरी पूर्ण झाले आहे का? ज्यात लिहिलेले आहे आठ लाख रूपये

सदस्य, श्री. सुभाष मनसुलकर :— मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब .........

सदस्य, श्री. जयेंद्र मोरे :— आयुक्त साहेब जयबाबा नगर येथे जुना शिवाजी महारांजाचा पुतळा आहे त्या पुतळयाच्या नुतनीकरणासाठी मी एक पत्र दिले होते त्या पुतळयाच्या नुतनीकरणासाठी २५ लाख निधी ठेवावा कारण त्या पुतळयाची अवस्था अशी आहे बोलायचेच नाही काही कोणी काय ऐकतच नाही. आयुक्त साहेब सभापती मॅडम आम्ही आपणांस पत्र दिले होते शिवाजी महाराजाच्या पुतळयाची अवस्था खूपच खराब झाली आहे तिथे नविन पुतळा उभारावा. त्यासाठी २५ लाखाची तरतूद अंदाजपत्रकात करावी ती केलेली नाही. तरी त्वरीत ती करावी. तसेच हिल लाईन पोलिस स्टेशनपासून ते जयश्रीकुष्णा अर्पाटमेंट पर्यंतचा रस्ता हिल लाईन पोलिस स्टेशन समोरचा रस्ता खराब आहे मी चार वर्षापासून वारंवार पत्र देत आहे त्या रस्त्यासाठी पण अंदाजपत्रकात त्यासाठी तरतूद करण्यात आली नाही साहेब आपण स्वत आला होता त्या रोडची पाहणी केली होती तर त्या रोडसाठी २५ लाख तरतूद करण्यात यावी आणि तरतूद न करता पण काम झाले पाहिजे

सदस्य, श्री. प्रदीप रामचंदानी — मा महापौर मॅडम आमचे निवेदन ऐका मार्केटसाठी काही तरतूद करण्यात आली नाही फी शून्य ठेवली आहे फेरीवाल्यांची फी शून्य आहे अजून एक रुपया आपल्याला मिळाला नाही तर येत्या वर्षी मार्केट फी व फेरीवाल्याचे, वॉटर हारवेस्टींग आपण काही तरतूद नाही ठेवली का, ठेवली नाही? कारण पाण्याची टंचाई आहे. पावसाळा नाही आला यावर्षी तर आम्हाला सांगावे पाणी साठणार कुठे?

सदस्य, श्री. सुभाष मनसुलकर — मा महापौर उपमहापौर आयुक्त साहेब हे जे स्थायी समितीने बजेट सादर केले आहे ते खूप चांगले बजेट सादर केले आहे श्री सुरेश जाधव यांनी सांगितले आहे की कुष्ठरोगी वसाहतीसाठी काही ठेवले नाही तर त्यासाठी निधी ठेवावा तसेच काही सदस्यानी काही पत्र दिली त्याचा रस्त्याचा समावेश या अंदाजपत्रकात करावा मी सर्व सदस्यांना विनंती करेन की त्यांनी सर्वसंमतीने बजेट पास करावे एवढे दोन शब्द मी बोलेन धन्यवाद

**सदर ठरावा अंतर्गतचा निर्णय इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता. अंमलात आणण्यात येईल. अंदाजपत्रक छापून प्रत्येक पालिका सदस्यास प्रत पाठविण्याची व्यवस्था मुख्य लेखा अधिकारी करतील व छापील अंदाजपत्रक या ठरावाचा भाग मानला जाईल.**

सुचकाची सही /—
अनुमोदकाची सही /—

सर्वानुमते

**महापौर/पिठासन अधिकारी**
**विशेष महासभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

---

महापालिका सचिव :—कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ६.४५ वाजता महापौर श्रीमती अपेक्षा विकास पाटील यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)

महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—३/६/२०१५

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ३/६/२०१५ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

## वि—१

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा दिनांक ३/६/२०१५ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती अपेक्षा विकास पाटील हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. अपेक्षा विकास पाटील —— महापौर

४. श्रीम. पंचशीला नाना पवार —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर | ३३ | श्री. गोदुमल नारायणदास किशनानी |
| ४ | श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३४ | श्रीम. इंदिरा जमनादास उदासी |
| ५ | श्री. राम (चार्ली) पारवाणी | ३५ | श्री. दिपक लछमनदास सिरवानी |
| ६ | श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे | ३६ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी |
| ७ | श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना | ३७ | श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ८ | श्रीम. आशा नाना बिराडे | ३८ | श्रीम. वसुधा धनंजय बोडारे |
| ९ | श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर | ३९ | श्रीम. शकुंतला जग्यासी |
| १० | श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल | ४० | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| ११ | डॉ. महेश गजानन गावडे | ४१ | श्रीम. जयश्री जीवनलाल जग्यासी |
| १२ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४२ | श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर |
| १३ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४३ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १४ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन दवणे | ४४ | श्रीम. मंदा सागर सोनकांबळे |
| १५ | डॉ. नीना प्रकाश नाथानी | ४५ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १६ | श्रीम. मीना कुमार आयलानी | ४६ | ॲड. शैला पांडुरंग सोनताटे |
| १७ | श्री. राजेश नानिकराम वधरिया | ४७ | श्रीम. अनिता सचिन भानुशाली |
| १८ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ४८ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १९ | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा | ४९ | श्रीम. कांचन अमर लुंड |
| २० | श्रीम. ज्योती सुरेश कालानी | ५० | श्री. सतराम फतनदास जेसवानी |
| २१ | श्री. गणपत गोविंद एडके | ५१ | श्रीम. जया मोहन साधवाणी |
| २२ | श्रीम. शशिकला शिवाजी आवारे | ५२ | श्रीम. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी |
| २३ | श्री. भगवान शंकर भालेराव | ५३ | श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे) |
| २४ | श्रीम. लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ५४ | श्री. गुरूनो भिकोमल वलेचा |
| २५ | श्रीम. मिनू राजकुमार दासानी | ५५ | श्री. विजय चाहु पाटील |
| २६ | श्री. उमेश सुरेश (पप्पु) कालानी | ५६ | श्रीम. माया हरेश चावला |
| २७ | श्रीम. वनिता बब्बू भटिजा | ५७ | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे |
| २८ | श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर | ५८ | श्री.बी.बी. मोरे |
| २९ | श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता | ५९ | श्री. प्रधान धर्मा पाटील |
| ३० | श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती | ६० | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| ३१ | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे | ६१ | श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी |
| ३२ | श्रीमती वंदना पाटील (भदाणे) | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१ श्री. राजु रामसिंग कंडारे    २ श्री. राजू किशनचंद जग्यासी

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ४ | श्रीम. सोनिया राजू जग्यासी |
| ५ | श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर | ६ | श्रीमती जयश्री गजानन कांबळी |
| ७ | श्रीमती आशा जीवन इदनानी | ८ | श्री. विजय रामभाऊ तायडे |
| ९ | श्रीम. जया प्रकाश माखीजा | १० | श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे |
| ११ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | १२ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| १३ | श्रीम. कमला गोदुमल किशनानी | १४ | श्री. सन्मुख ग्यानचंद मानवानी |
| १५ | श्रीम. खान इसरद सऊद | १६ | श्रीमती अनिता संतोष तरे |
| १७ | श्रीमती राजश्री चौधरी | १८ | श्रीमती शुभांगी बेहनवाल |
| १९ | श्री. दिलीपकुमार जग्यासी | २० | श्री. प्रदिप रामचंदानी |

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त
२. श्री. नितीन कापडनीस, उप–आयुक्त, मुख्यालय
३. श्रीमती प्राजक्ता मि. कुलकर्णी, महापालिका सचिव
५. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
६. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
७. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
८. श्री. भरत बठिजा, प्र. शहर अभियंता
९. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१०.श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक
११.श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
१२.श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
१३.श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
१४.श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
१५. श्री. विशाल कदम, मुख्य लिपिक
१६. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्रीमती विशाखा सावंत
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. मनिष भोवते

वंदे मात्‌रम म्हणुन सांयकाळी ४.१५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. १ :**–प्लॉट क्रमांक ७०५ येथे, कल्याण–अंबरनाथ रस्त्यामधील बाधीत मालमत्ताधारकांना पर्यायी जागा देणेबाबत चर्चा करणे.

<u>काही सदस्य :–</u>सभा स्थगित करण्यांत यावी.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>सदरची सभा अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यांत येत आहे.

---

सुचकाचे नाव :– श्री. राम पारवानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

<u>स्थगित प्रस्ताव</u>

दिनांक ३/६/२०१५ रोजी सांयकाळी ४.०० वाजेची सभा अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यास प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ११ ड** **दिनांक : ३/६/२०१५**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक ३/६/२०१५ रोजी आयोजित केलेल्या सभेचे काही कामकाज अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ४.३० वाजता महापौर श्रीमती अपेक्षा विकास पाटील यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः– २२/६/२०१५

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २२/६/२०१५ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

# वि–१–अ

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा दिनांक ३/६/२०१५ रोजी आयोजित केलेली सभा स्थगित केल्याने सदर सभा दिनांक २२/६/२०१५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती अपेक्षा विकास पाटील हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. अपेक्षा विकास पाटील –– महापौर

५. श्रीम. पंचशीला नाना पवार –– उप–महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर | ३६ | श्री. दिपक लछमनदास सिरवानी |
| ४ | श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३७ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी |
| ५ | श्री. राम (चार्ली) पारवाणी | ३८ | श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ६ | श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे | ३९ | श्रीम. वसुधा धनंजय बोडारे |
| ७ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | ४० | श्रीम. शकुंतला जग्यासी |
| ८ | श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना | ४१ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| ९ | श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर | ४२ | श्रीम. जयश्री जीवनलाल जग्यासी |
| १० | श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर | ४३ | श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर |
| ११ | श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल | ४४ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १२ | डॉ. महेश गजानन गावडे | ४५ | श्रीम. मंदा सागर सोनकांबळे |
| १३ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४६ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १४ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४७ | ॲड. शैला पांडुरंग सोनताटे |
| १५ | श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी | ४८ | श्री. विजय रामभाऊ तायडे |
| १६ | श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल | ४९ | श्रीम. अनिता सचिन भानुशाली |
| १७ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन दवणे | ५० | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १८ | श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी | ५१ | श्रीम. कांचन अमर लुंड |
| १९ | डॉ. नीना प्रकाश नाथानी | ५२ | श्रीम. जया मोहन साधवाणी |
| २० | श्रीम. मीना कुमार आयलानी | ५३ | श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे |
| २१ | श्री. राजेश नानिकराम वधरिया | ५४ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २२ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५५ | श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे) |
| २३ | श्रीम. जया प्रकाश माखीजा | ५६ | श्री. गुरूनो भिकोमल वलेचा |
| २४ | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा | ५७ | श्री. विजय चाहु पाटील |
| २५ | श्रीम. ज्योती सुरेश कालानी | ५८ | श्रीम. माया हरेश चावला |
| २६ | श्रीम. शशिकला शिवाजी आवारे | ५९ | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे |
| २७ | श्री. भगवान शंकर भालेराव | ६० | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| २८ | श्रीम. लक्ष्मी सुरेद्र सिंग | ६१ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| २९ | श्री. उमेश सुरेश (पप्पु) कालानी | ६२ | श्री. प्रधान धर्मा पाटील |
| ३० | श्रीम. वनिता बब्बू भटिजा | ६३ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| ३१ | श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर | ६४ | श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी |
| ३२ | श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता | ६५ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३३ | श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती | ६६ | श्री.बी.बी. मोरे |

| | | | |
|---|---|---|---|
| ३४ | श्री. गोदुमल नारायणदास किशनानी | ६७ | श्रीम. इंदिरा जमनादास उदासी |
| ३५ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ६८ | श्रीमती वंदना भदाणे |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१ श्री. राजु कंडारे
२ श्रीम. आशा नाना बिराडे
३ श्रीम. अनिता संतोष तरे
४ श्री. गणपत गोविंद एडके
५ श्रीम. मिनू राजकुमार दासानी
६ श्रीम. कमला गोदुमल किशनानी
७ श्रीम. खान इसरद सऊद
८ श्रीम. जयश्री गजानन कांबळी
९ श्री. राजू किशनचंद जग्यासी
१० श्री. सतराम फतनदास जेसवानी
११ श्रीम. सोनिया राजू जग्यासी
१२ श्रीम. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी
१३ श्री. सन्मुख ग्यानचंद मानवानी

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त
२. श्री. नितीन कापडनीस, उप–आयुक्त, मुख्यालय
३. श्रीमती प्राजक्ता मि. कुलकर्णी, महापालिका सचिव
४. श्री. मिलिंद सोनावणे ,नगररचनाकार
५. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
६. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
७. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
८. श्री. वेखंडे, उप–मुख्य लेखा परिक्षक
९. श्री. भरत बठिजा, प्र. शहर अभियंता
१०.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
११.श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक
१२.श्री. जितु चौईथानी, उप अभियंता, साबांवि
१३.श्री. अजित गोवारी, प्र. सहा. आयुक्त
१४.श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
१५.श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
१६.श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
१७.श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
१८.श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
१९. श्री. विशाल कदम, मुख्य लिपिक
२०. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती विशाखा सावंत
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. मनिष भोवते

सायंकाळी ७.०० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. १ :–**प्लॉट क्रमांक ७०५ येथे, कल्याण–अंबरनाथ रस्त्यामधील बाधीत मालमत्ताधारकांना पर्यायी जागा देणेबाबत चर्चा करणे.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :– विशेष महासभा दिनांक २/७/२०१५ रोजी घेण्यात यावी.

<u>महापौर तथा पिठासीन अधिकारी</u> :– सभा स्थगित करण्यात येत आहे व २ तारखेला सायंकाळी ५.०० वाजता सभा पुन्हा घेण्यात येणार आहे.

सुचकाचे नाव :— श्री. राम पारवानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

स्थगित प्रस्ताव

दिनांक ३/६/२०१५ रोजी अनिश्चित कालावधीसाठी स्थगित झालेली सभा दिनांक २२/६/२०१५ रोजी पुन्हा स्थगित करुन सदरची सभा दिनांक २/७/२०१५ रोजीपर्यंत स्थगित करण्यास प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. १२ ब** **दिनांक : २२/६/२०१५**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक २२/६/२०१५ रोजी ३.३० वाजता आयोजित केलेल्या सभेचे काही कामकाज दिनांक २/७/२०१५ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :—कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ७.१० वाजता महापौर श्रीमती अपेक्षा विकास पाटील यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— २/७/२०१५

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २/७/२०१५ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

## वि—१—ब

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा दिनांक ३/६/२०१५ रोजी आयोजित केलेली सभा स्थगित झाल्याने सदरची सभा दिनांक २२/६/२०१५ रोजी आयोजित करुन पुन्हा स्थगित केल्याने सदर सभा दिनांक २/७/२०१५ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती अपेक्षा विकास पाटील हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. अपेक्षा विकास पाटील —— महापौर

२१.श्रीम. पंचशीला नाना पवार —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर | ३९ | श्री. दिपक लछमनदास सिरवानी |
| ४ | श्री. राजु रामसिंग कंडारे | ४० | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी |
| ५ | श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ४१ | श्री. राजू किशनचंद जग्यासी |
| ६ | श्री. राम (चार्ली) पारवाणी | ४२ | श्रीम. सोनिया राजू जग्यासी |
| ७ | श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे | ४३ | श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ८ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | ४४ | श्रीम. वसुधा धनंजय बोडारे |
| ९ | श्रीम. आशा नाना बिराडे | ४५ | श्रीम. शकुंतला जग्यासी |
| १० | श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर | ४६ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| ११ | श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर | ४७ | श्रीम. जयश्री जीवनलाल जग्यासी |
| १२ | श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल | ४८ | श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर |
| १३ | डॉ. महेश गजानन गावडे | ४९ | श्रीमती वंदना भदाणे |
| १४ | श्रीम. अनिता संतोष तरे | ५० | श्रीम. इंदिरा जमनादास उदासी |
| १५ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ५१ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १६ | श्री. विजय खंडु सुपाळे | ५२ | श्रीम. मंदा सागर सोनकांबळे |
| १७ | श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी | ५३ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १८ | श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल | ५४ | ॲड. शैला पांडुरंग सोनताटे |
| १९ | श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी | ५५ | श्री. विजय रामभाऊ तायडे |
| २० | डॉ. नीना प्रकाश नाथानी | ५६ | श्रीम. अनिता सचिन भानुशाली |
| २१ | श्रीम. मीना कुमार आयलानी | ५७ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| २२ | श्री. राजेश नानिकराम वधरिया | ५८ | श्रीम. कांचन अमर लुंड |
| २३ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५९ | श्री. सतराम फतनदास जेसवानी |
| २४ | श्रीम. जया प्रकाश माखीजा | ६० | श्रीम. जया मोहन साधवाणी |
| २५ | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा | ६१ | श्रीम. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी |
| २६ | श्रीम. ज्योती सुरेश कालानी | ६२ | श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे |
| २७ | श्री. गणपत गोविंद एडके | ६३ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २८ | श्रीम. शशिकला शिवाजी आवारे | ६४ | श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे) |
| २९ | श्री. भगवान शंकर भालेराव | ६५ | श्री. गुरूनो भिकोमल वलेचा |
| ३० | श्रीम. लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ६६ | श्रीम. माया हरेश चावला |
| ३१ | श्रीम. मिनू राजकुमार दासानी | ६७ | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे |
| ३२ | श्री. उमेश सुरेश (पप्पु) कालानी | ६८ | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे |

| | | | |
|---|---|---|---|
| ३३ | श्रीम. वनिता बब्बू भटिजा | ६९ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| ३४ | श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर | ७० | श्री. प्रधान धर्मा पाटील |
| ३५ | श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता | ७१ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| ३६ | श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती | ७२ | श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी |
| ३७ | श्री. गोदुमल नारायणदास किशनानी | ७३ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३८ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ७४ | श्री.बी.बी. मोरे |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१ श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना
२ श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन दवणे
३ श्रीम. कमला गोदुमल किशनानी
४ श्री. विजय चाहु पाटील
५ श्री. सन्मुख ग्यानचंद मानवानी
६ श्रीम. खान इसरद सऊद
७ श्रीम. जयश्री गजानन कांबळी

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. मनोहर हिरे, आयुक्त
२. श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त
३. श्री. नितीन कापडनीस, उप–आयुक्त, मुख्यालय
४. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, महापालिका सचिव
५. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
६. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
७. श्रीमती मंगला माळवे, सहा. आयुक्त
८. श्री. भरत बठिजा, प्र.शहर अभियंता
९. श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
१०.श्री. जितु चोईथानी, उपअभियंता, साबांवि
११.श्री. हनुमंत खरात, उप अभियंता, विदयुत
१२.डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
१३.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१४.श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
१५.श्री. विनोद केणे प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
१६.श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त,
१७.श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
१८.श्री. शैलेश दोंदे, कर निर्धारक व संकलक
१९.श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
२०.श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती विशाखा सावंत
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. मनिष भोवते

सांयकाळी ७.१० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

महापालिका सचिव :– विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

**विषय क्र. १** :–प्लॉट क्रमांक ७०५ येथे, कल्याण–अंबरनाथ रस्त्यामधील बाधीत मालमत्ताधारकांना पर्यायी जागा देणेबाबत चर्चा करणे.

काही सदस्य :–सभा स्थगित करा.

महापौर तथा पीठासीन अधिकारी :–सदरची सभा अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यात येत आहे.

सुचकाचे नाव :— श्री. राम पारवानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

स्थगित प्रस्ताव

दिनांक ३/६/२०१५ रोजी अनिश्चित कालावधीसाठी स्थगित झालेली सभा दिनांक २२/६/२०१५ रोजी पुन्हा स्थगित करुन सदरची सभा दिनांक २/७/२०१५ रोजी पुन्हा स्थगित झाल्याने अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यास प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. २० अ | दिनांक : २/७/२०१५

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक २/७/२०१५ रोजी ४.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे काही कामकाज अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर/पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :—कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

सांयकाळी ७.१५ वाजता महापौर श्रीमती अपेक्षा विकास पाटील यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—८/७/२०१५

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ८/७/२०१५ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

## वि—१ क

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा दिनांक ३/६/२०१५ रोजी आयोजित केलेली सभा स्थगित झाल्याने सदरची सभा दिनांक २२/६/२०१५ रोजी आयोजित करुन पुन्हा स्थगित केल्याने सदर सभा दिनांक २/७/२०१५ रोजी आयोजित करुन सदर सभेचे काही कामकाज पुन्हा स्थगित करण्यात आले. सदरची सभा दिनांक ८/७/२०१५ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती अपेक्षा विकास पाटील हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. अपेक्षा विकास पाटील —— महापौर

२२.श्रीम. पंचशीला नाना पवार —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर | २३ | श्री. दिपक लछमनदास सिरवानी |
| ४ | श्री. राम (चार्ली) पारवाणी | २४ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी |
| ५ | श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे | २५ | श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ६ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | २६ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| ७ | श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना | २७ | श्रीम. जयश्री जीवनलाल जग्यासी |
| ८ | श्रीम. आशा नाना बिराडे | २८ | श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर |
| ९ | श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर | २९ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १० | श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल | ३० | श्रीम. मंदा सागर सोनकांबळे |
| ११ | डॉ. महेश गजानन गावडे | ३१ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १२ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ३२ | श्रीम. अनिता सचिन भानुशाली |
| १३ | श्री. विजय खंडु सुपाळे | ३३ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १४ | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा | ३४ | श्री. सतराम फतनदास जेसवानी |
| १५ | श्री. गणपत गोविंद एडके | ३५ | श्रीम. जया मोहन साधवाणी |
| १६ | श्री. भगवान शंकर भालेराव | ३६ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| १७ | श्रीम. लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ३७ | श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे) |
| १८ | श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता | ३८ | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| १९ | श्री. विजय चाहु पाटील | ३९ | श्री. प्रधान धर्मा पाटील |
| २० | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे | ४० | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| २१ | श्री. गुरूनो भिकोमल वलेचा | ४१ | श्री.बी.बी. मोरे |
| २२ | श्रीमती वंदना पाटील (भदाणे) | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. राजु रामसिंग कंडारे | २ | श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर |
| ३ | श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ४ | श्रीम. अनिता संतोष तरे |
| ५ | श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी | ६ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| ७ | श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल | ८ | श्रीम. ज्योती सुरेश कालानी |
| ९ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन दवणे | १० | श्रीम. शशिकला शिवाजी आवारे |
| ११ | श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी | १२ | श्रीम. मिनू राजकुमार दासानी |
| १३ | डॉ. नीना प्रकाश नाथानी | १४ | श्री. उमेश सुरेश (पप्पु) कालानी |

१५ श्रीम. मीना कुमार आयलानी
१६ श्रीम. वनिता बब्बू भटिजा
१७ श्री. राजेश नानिकराम वधरिया
१८ श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर
१९ श्री. हरेश परमानंद जग्यासी
२० श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती
२१ श्रीम. जया प्रकाश माखीजा
२२ श्री. गोदुमल नारायणदास किशनानी
२३ श्रीम. खान इसरद सऊद
२४ श्रीम. कमला गोदुमल किशनानी
२५ श्री. राजू किशनचंद जग्यासी
२६ श्रीमती रेखा अशोक ठाकुर
२७ श्रीम. सोनिया राजू जग्यासी
२८ श्रीम. इंदिरा जमनादास उदासी
२९ श्रीम. जयश्री गजानन कांबळी
३० श्रीम. वसुधा धनंजय बोडारे
३१ ॲड. शैला पांडुरंग सोनताटे
३२ श्रीम. शकुंतला जग्यासी
३३ श्री. विजय रामभाऊ तायडे
३४ श्रीम. कांचन अमर लुंड
३५ श्रीम. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी
३६ श्री. मनोज दिलीपकुमार सयानी
३७ श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे
३८ श्री. सन्मुख ग्यानचंद मानवानी
३९ श्रीम. माया हरेश चावला
४० श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. मनोहर हिरे, आयुक्त
२. श्री. श्रीधर पाटणकर, अतिरिक्त आयुक्त
३. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, महापालिका सचिव
४. श्री. नितीन कापडनीस, उप–आयुक्त, मुख्यालय
५. श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त, कर
६. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
७. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
८. श्रीमती मंगला माळवे, सहा. आयुक्त
९. श्री. भरत बठिजा, प्र.शहर अभियंता
१०.श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
११.श्री. जितु चोईथानी, उपअभियंता, साबांवि
१२.श्री. हनुमंत खरात, उप अभियंता, विदयुत
१३.डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
१४.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१५.श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
१६.श्री. विनोद केणे प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
१७.श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त,
१८.श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त
१९.श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
२०.श्री. शैलेश दोंदे, कर निर्धारक व संकलक
२१.श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती विशाखा सावंत
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. मनिष भोवते

सांयकाळी ६.१० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **<u>विषय क्र. १ :–</u>**प्लॉट क्रमांक ७०५ येथे, कल्याण–अंबरनाथ रस्त्यामधील बाधीत मालमत्ताधारकांना पर्यायी जागा देणेबाबत चर्चा करणे.

---

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**यापुर्वी हा विषय झालेला आहे, त्यामुळे सध्या आता हा विषय वगळण्यात यावा.

**महापालिका सचिव :—**विषय वगळवा की अमान्य करायचा?

**काही सदस्य :—** सदरचा विषय अमान्य करण्यात यावा.

**महापालिका सचिव :—**ठिक आहे, अमान्य करण्यात येत आहे.

**महापौर :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १ :—** प्लॉट क्रमांक ७०५ येथे, कल्याण—अंबरनाथ रस्त्यामधील बाधीत मालमत्ताधारकांना पर्यायी जागा देणेबाबत चर्चा करणे.

**प्रस्तावना:—**

मा. विधानसभा सदस्या श्रीमती ज्योती पप्पु कालानी यांनी कल्याण—अंबरनाथ—वांगणी या राज्य मार्ग क्र. ३५ याचे रस्ता रुंदीकरणात बाधीत होणा—या मिळकतीधारकांना प्रथम पुर्नवसन व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे व यास मागील महासभेमध्ये मा. महानगरपालिका सदस्य यांनीही दुजोरा दिलेला आहे. ज्यांची मालमत्ता बाधीत होत आहे त्यांचे पुर्नवसन पहिल्यांदा होणे आवश्यक आहे असे सूचित केले आहे. याबाबत उल्हासनगर महानगरपालिकेच्या महासभेमध्येही या विषयावर चर्चा होवून बहुतांश सदस्यांनी यास दुजोरा दिलेला आहे.

मंजूर विकास योजना नकाशानुसार विषयांकित भुखंड आरक्षण क्र. ६ खेळाचे मैदान या आरक्षणात बाधीत आहे. सुधारीत प्रसिध्द प्रारुप विकास योजनेनुसार विषयांकित जागा रहिवासी विभागात समाविष्ट आहे.

मंजूर विकास योजना आराखडयाप्रमाणे आरक्षण क्र. ६ चे जागेची ताबेपावती दिनांक १८/३/८७ रोजी महापालिकेस देण्यात आलेली आहे. तथापि, मालकी महाराष्ट्र शासनाची आहे.

कल्याण अंबरनाथ या रस्त्याच्या रुंदीकरणामध्ये बाधीत होणा—या मालमत्ताधारकांना या ठिकाणी पर्यायी जागा देण्याबाबतचे पत्र मा. विधानसभा सदस्य व मा. महापालिका सदस्य यांनी शिफारस करुन मा. महासभेपुढे सदर विषय चर्चेकरीता घेणेचे कळविले आहे.

सदरचा विषय येत्या महासभेच्या विषयपटलावर विचारविनिमय व चर्चेकरीता विषयसूचीमध्ये समाविष्ट करणेस प्रस्तावित आहे.

**विशेष महासभा ठराव क्र: २४** — **दिनांक:—८/७/२०१५**

**सुचकाचे नाव : श्री. राम पारवानी**
**अनुमोदकाचे नाव : श्री. नरेंद्रकुमार ठाकुर**

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या प्लॉट क्रमांक ७०५ येथे कल्याण—अंबरनाथ रस्त्यामधील बाधीत मालमत्ताधारकांना पर्यायी जागा देण्याचा प्रस्ताव अमान्य करीत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही /—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा

**महापालिका सचिव :–** विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २ :–**केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) राबविण्याबाबत नगरविकास विभागाचा शासन निर्णय क्रमांक: स्वभाअ २०१५/प्र.क्र.२३/नवि ३४, दिनांक: १५ मे, २०१५ प्रमाणे उल्हासनगर शहरामध्ये अंमलबजावणी करीता चर्चा करून निर्णय घेणे.

---

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :–**आयुक्त साहेब, यापुर्वीच्या प्रस्तावामध्ये चर्चा झाली, उल्हासनगर स्वच्छ, कचरा उचलला जात नाही आणि स्वच्छ भारत अभियान कसे राबविणार आहे? यात नक्की आपल्या महासभेची भुमिका काय असेल? आतापर्यंत फक्त अभियान राबवायचे म्हणजे रेकॉर्डवर काय? कचरा उचलला जात नाही. दामदुप्पटीने म्हणजे पैसे दिल्यानंतर सुध्दा महापालिकेने मंजुर केल्यानंतर कचरा उचलला जात नाही ही वस्तुस्थिती आहे. प्रशासनास सुध्दा मान्य आहे ते. तर आता हा प्रस्तावावर नक्की काय करायचे? आमची भुमिका काय असणार आहे? हे या ठिकाणी नमुद करावे.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–**याच्यात काय आपली भुमिका अशी असेल की एखादी निविदा काढावी आणि पुन्हा कोनार्कला ठेका दयावा अशीच असेल.

**आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–**केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियान हे २ ऑक्टोंबर, २०१४ पासुन सुरु केलेला आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनाने स्वच्छ महाराष्ट्र अभियान याची घोषणा केली, आणि आपल्याला २ ऑक्टोंबर, २०१९ पर्यंत हे अभियान राबवुन काही गोष्टी करायच्या आहेत त्यामध्ये महत्वाचे म्हणजे आपले शहर हे कोडीएफ मुक्त म्हणजे उघडयावर शौचालयाला जाण्यास कुठल्याही नागरीकास भाग पडता कामा नये यासाठी घरोघरी शौचालय बांधणे म्हणजे वैयक्तीक शौचालय. तसेच ज्या नागरीकाच्या घरी जागा नसेल तेथे ग्रुप करुन सार्वजनिक शौचालय व जेथे बाजार भरतो, एसटी बसस्थानक आहे, म्हणजे मायग्रान पाप्युलेशन, लोक मोठया प्रमाणात येतात, मार्केटचा भाग असेल तेथे कम्युनिटी शौचालय बांधण्यासाठी केंद्र शासन आणि राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमाने ही योजना जाहिर केली आहे. हे करत असतांना या अभियानाचे उद्घाटन मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी केले त्या उद्घाटनाच्या सोहळयाला आपल्या महापौर महोदया उपस्थित होत्या. मुंबई येथिल सहयाद्री येथे उद्घाटन पार पडले. आता यामध्ये वैयक्तीक शौचालयाबाबत स्वच्छता निरिक्षकांची मी बैठक भरवुन त्यांच्याकडे एक वैयक्तीक फॉर्म घेण्यासाठी आपल्या सर्व सन्माननिय सदस्यांना संपर्क करुन त्यांच्या प्रभागामध्ये ज्या कोणी नागरीकांच्या घरी जागा आहे तो शौचालय बांधु शकतो. तर अशा नागरीकाला केंद्र शासन आणि राज्य शासन यांच्याकडुन १२००० रुपयाचे अनुदान मिळणार आहे. केंद्र शासन ४००० आणि ८००० रुपये राज्य शासनाकडुन मिळणार. असे एकुण १२००० रुपयाचे अनुदान त्या नागरीकास उपलब्ध होणार यासाठी जी पध्दत टाकुन दिलेली आहे त्या पध्दतीप्रमाणे आपण जेथे वैयक्तीक शौचालय बांधु शकतो अशी प्रभागनिहाय यादी आपण तयार केलेली आहे, आता त्याबाबतचा सर्व्हे संपत आलेला आहे. त्या मालकाकडुन एक हमीपत्र आपल्याला घ्यायचे आहे. आणि ही यादी आपण प्रसिध्द, अपलोड करणार आहोत. त्याच्यावर कोणाच्या हरकती व सूचना असतील तर त्या ऐकुन घेवुन अंतिम यादी तयार करुन ती राज्य शासनास सादर करायची आहे. राज्य शासन आपणांस त्याबाबत अनुदान मंजुर करणार आहे आणि ज्यावेळेस असे अनुदान प्राप्त झाल्यानंतर आपण वैयक्तीक शौचालयासंबंधीत परवानगी त्या संबंधीत लाभार्थींना देणार आहोत. त्याचवेळेस त्या व्यक्तीस एकुण अनुदानाच्या ५० टक्के म्हणजे १२ हजाराच्या पन्नास टक्के म्हणजे ६००० रुपयाचा धनादेश लगेच देणार आहोत. त्याने ते काम पुर्ण करायचे आहे. वैयक्तीक शौचालयाच्या बांधकामाचे काम पुर्ण करुन त्याचे फोटो या अभियानाअंतर्गत आपणांस वेबसाईटवर अपलोड करायची आहे. आणि नंतरचे ५० टक्क्याचे अनुदान ते काम पुर्ण झाल्याची खात्री करुन लाभार्थीना ती रक्कम दयायची आहे. अशा प्रकारे शहरामध्ये असलेल्या घरात जेथे जेथे जागा आहे परंतु शौचालय उपलब्ध नाही अशा सर्व लाभार्थींचा सर्व्हे करुन, यादी करुन त्यांना रुपये १२००० केंद्र व राज्य शासनातर्फे उपलब्ध करुन देवुन वैयक्तीक शौचालय बांधकाम आपण हाती घेणार आहोत. त्यानंतर पब्लीक शौचालय जेथे जेथे जागा आहे, आणि सामुहिक कुटुंब राहत असतील म्हणजे वैयक्तीक शौचालयासाठी जागा

उपलब्ध नाही म्हणजे सामुहिक शौचालय ग्रुप करुन बांधुन त्यांची व्यवस्था तेथे करता येत असेल अशासाठी आपणांस पब्लीक शौचालय बांधण्यासाठी केंद्र व राज्य शासनास अनुदान मिळणार आहे. आणि मार्केट, बाजार जेथे मोठया प्रमाणात गर्दी जमा होते तेथे कॅम्युनिट शौचालय बांधकामासाठी सुध्दा आपणांस अनुदान मिळणार आहे. तर यासाठी आपण वैयक्तीक शौचालयाची यादी अंतिम करत आहोत. त्याचबरोबर सार्वजनिक शौचालय जेथे जेथे बांधता येत असेल ते बांधुन देण्यासाठी प्रस्ताव तयार करत आहोत आणि कॅम्युनिटी शौचालयाचा प्रस्ताव तयार करत आहोत असा एकत्रीत प्रस्ताव आपण राज्य शासनास सादर करुन हे अनुदान आपण प्राप्त करुन घेणार आहोत. यामध्ये वैयक्तीक शौचालय बांधत असतांना ते घर अधिकृत आहे की अनधिकृत आहे अशा प्रकारचे प्रश्न शासनासमोर आले होते तर शासनाची भुमिका अशी आहे की आपल्याला ओडीएफ मुक्त, हगणदारी मुक्त करायचे असल्यामुळे कुठलाही नागरीक उघडयावर शौचालयास जावु नये. यासाठी हे टार्गेट अचिव्ह करण्यासाठी जर एखादे अनधिकृत बांधकाम असेल परंतु तेथे वास्तव्य असेल, वास्तव्य जोपर्यंत आहे तोपर्यंत त्यास शौचालय बांधुन वापरता येईल. अशा प्रकारचा धोरणात्मक निर्णय केंद्र व राज्य शासनाने घेतलेला आहे. त्यामुळे जेथे वैयक्तीक शौचालयाला जागा आहे तेथे आपण वैयक्तीक शौचालय बांधु या. जेथे पब्लीक शौचालय बांधुन आपणांस मोठया प्रमाणात शौचालयाची व्यवस्था करुन देणे शक्य आहे तेथे सार्वजनिक शौचालय वा कॅम्युनिटी शौचालय बांधुन आपले शहर हे ओडीएफ मुक्त २०१६ पर्यंत पुर्ण करुन घ्यायचे आहे. केंद्र व राज्य शासनाने याची मुदत २०१९ जरी दिली असली तरी आपल्याकडे उघडयावर जाणा–यांची संख्या पाहता आपल्याला हे टार्गेट लवकर कसे पुर्ण करता येईल यासाठी त्यावेळी नगरविकास सचिव आणि यांनी मोठया प्रमाणात महापौर व अध्यक्षांना त्यांच्या टार्गेटची कटअप डेट जाहिर करायला सांगितली होती. आपल्या महापौर महोदयांनी २०१६पर्यंत आपण हे काम पुर्ण करु असे आश्वासन तेथे दिलेले आहे. त्यामुळे लगेचच आम्ही सर्वसाधारण सभेची वाट न पाहता याचा सर्व्हे पुर्ण केलेला आहे. तर जवळपास सकाळी मी माहिती घेतली तर ३३९३/– वैयक्तीक शौचालयासाठी त्यांनी अर्ज भरुन घेतलेला आहे.

<u>**सदस्य श्री. महेश गावडे :–**</u>बरेच लोकांना मिळालेले नाही. आमचा स्लम वार्ड आहे ब–याच लोकांची इच्छा आहे, त्यांना अर्ज मिळालेले नाहीत.

<u>**आयुक्त, श्री. मनोहर हिरे:–**</u> यासाठी मी हा विषय ब–याच दिवसांपुर्वी विशेष महासभा जेव्हा आपण बोलाविली तेव्हा आणला होता. त्याचे कारण हेच याचे आपणांस शहरामध्ये मोठया प्रमाणात जाहिराती करायच्या आहेत. यामध्ये वेगवेगळया स्वंयसेवी संस्थाना समाविष्ट करुन नागरीकांना या योजनेची माहिती देणे. सर्व सदस्यांना विनंती आहे की या संबंधी जीआरच्या प्रती सर्व सदस्यांना मी झेरॉक्स करुन दिलेल्या आहेत. याचेही आपण वाचन करावे व तुमच्या प्रभागातील कुणीही उघडयावर शौचालयास जावु नये याची खबरदारी घेण्यासाठी शौचालय जेथे बांधता येईल त्याची यादी, जागा, जेथे कॅम्युनिटी शौचालय बांधता येईल, सार्वजनिक शौचालय बांधता येईल त्याच दयाव्यात व ज्या नागरीकांकडे शौचालय नाही त्यास जागा उपलब्ध असेल तर त्यास अर्ज आपल्या फार्मेटमध्ये भरुन दयावा. अजुनही काही दिवसात आपण सर्व्हे पुर्ण करुन या आणि शासनास प्रस्ताव सादर करु या. याचबरोबर ......

<u>**सदस्य श्री. बी.बी. मोरे :–**</u>किती त्यास देणार? १२००० रुपये तुम्ही सांगत आहेत.

<u>**सदस्य श्री. सुरेश जाधव :–**</u>त्यांना बोलु तर दया पुर्ण.

<u>**आयुक्त, श्री. मनोहर हिरे:–**</u>श्री. मोरे साहेब, तुम्ही बसा मी तुमच्या शंकेचे निरसन करत आहे.

<u>**सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :–**</u>आयुक्त साहेब, माझी सुध्दा एक शंका आहे, तुम्ही एकत्र उत्तर दया. साहेब, वैक्तीगत शौचालय आहे तुम्ही घेतात परंतु सार्वजनिक, कॉम्युनिटी शौचालय बांधतांना तुम्ही कोणाची दखल घ्याल म्हणजे, शौचालय कोणाची असणार?

<u>**आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–**</u>नाही, सन्माननिय सदस्यांची शिफारस आपण घेत आहोत, जो लाभार्थी आहे, त्यांचे आपण अर्ज भरुन घेणार आहोत.

<u>**सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :–**</u>याचबरोबर आपण एमएमआरडीएवर सुध्दा नियंत्रण ठेवावे. बरेच शौचालय आहेत ते बंद आहेत. तर ते सुध्दा आपण यामध्ये समाविष्ट केले तर बरे होईल साहेब.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:–</u>ठिक आहे.

<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी:–</u>धन्यवाद साहेब.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>आयुक्त साहेब, याच्यामध्ये एक विषय आहे, त्याचा लक्षांक किती आहे, नाहीतर फॉर्मची संख्या वाढणार. आपल्या शहरातील लक्षांक किती आहे?

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:–</u>यामध्ये संख्येची मर्यादा नाही आहे. आपणांस शुन्य ओडीएफ. म्हणजे उघडयावर शौचालयास कोणी नाही. जेथे ज्यास शौचालय नाही आणि जागा आहे, त्यास आपण शौचालय देणार. तर १२००० ची जी मर्यादा आहे ती केंद्र आणि राज्य शासनानेच ठरविली आहे. परंतु यात शौचालयाचे बांधकाम पुर्ण होत नाही. त्यामुळे याला आपण आमदार निधी, खासदार निधी किंवा महापालिकेने काही रक्कम टाकावी अशा प्रकारचे....

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>साहेब, आता एक विषय आहे आपण ज्या खाजगी लोकांना, लाभार्थींना शौचालय देणार, ड्रेनेजची पध्दत कोठे आहे आपणाकडे? त्यामुळे आरोग्याचा मोठा प्रश्न निर्माण होणार भविष्यात.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे:–</u>तेथे अंडरग्राउंड ड्रेनेज नाही तेथे सेफ्टीक टॅकची व्यवस्था करावी लागणार आहे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>मग सेफ्टीक टॅकसाठी १२००० रुपये आणि शौचालय बांधणे कसे शक्य आहे?

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–</u>त्यासाठी उदयाच्या सर्वसाधारण सभेपुढे मी एक आयत्यावेळचा प्रस्ताव दिलेला आहे. यापुर्वी महापालिकेकडुन आपण निधी घेत होतो, दहा हजार की सहा हजार त्याप्रमाणे आपण उदया ते ठरवायचे आहे की आपण प्रत्येकी जर दहा हजार उपलब्ध करुन दिलेत, दहा अधिक हे बारा हजार आणि काही लाभार्थ्यांचा हिस्सा त्याचा स्वत:चा, तर अशा प्रकारे .....

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>थांबा, आणखी दुसरा एक विषय आहे, समजा ५०० घरे आहेत, मग २०० घरात जर शौचालय असेल मग त्यांना या संधीचा फायदा मिळेल काय?

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–</u>नाही, ज्याच्याकडे शौचालय नाही, तोच याच्यासाठी पात्र आहे. ज्याच्याकडे आधीच शौचालय उपलब्ध आहे तर त्यास या योजनेचा कुठलाच लाभ मिळणार नाही.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>साहेब, प्रस्ताव चांगला आहे, महापालिकेचे नुकसान नाही. फक्त १२००० मध्ये होवु शकणार नाही. यापुर्वीच महापालिकेने स्वच्छता अभियान राबविले होते की जेणेकरुन उघडयावर लोकांना बसावे लागु नये किंवा अस्वच्छता शहरामध्ये होवु नये म्हणुन प्रत्येकी दहा हजार रुपये मंजुर केले आहे. फक्त त्यामध्ये एक अट होती की प्रत्येक प्रभागामध्ये पाच. एका वर्षात पाच करतील अशा प्रकारचा ठराव पारीत केला होता. त्याच्यामध्ये सुधारणा करुन उदयाच्या यामध्ये केंद्र शासन १२००० आणि महापालिकेतर्फे १० हजार जो पुर्वीचा ठराव आहे तो मर्यादीत होता परंतु यामध्ये काही लक्षांक काही नाही म्हणजे अमुक एवढे केले पाहिजे. तर सरसकट केंद्र शासनाचे व महापालिकेचे, म्हणजे महापालिकेची सुधारणा होईल, केंद्र शासन व राज्य शासनाने ज्या योजना राबविल्या त्यामध्ये सर्वात उत्स्फुर्त उल्हासनगर महानगरपालिका आहे. अशा प्रकारचा एक संदेश दयावा. परंतु आज तुर्तास तुम्ही आणलेला प्रस्ताव मला वाटते चांगले आहे परंतु जास्तीत जास्त तुम्ही आणलेला निधी केंद्र शासनाचा आणि राज्य शासनाचा याठिकाणी कसा येईल यासाठी आपण प्रयत्न करु.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, या विषयावर मी बोलु इच्छितो, आपण हे जे शौचालय बनविणार त्यामध्ये आपण सांगितले की सेफ्टीक टॅक आवश्यक आहे, तरी सुध्दा सेफ्टीक टॅक बाबत झोपडपट्टी एरिया जो आहे तेथे अंडरग्राउंड ड्रेनेजची लाईन टाकणे आवश्यक आहे. कारण की सेफ्टीक टॅकनंतर सुध्दा ड्रेनेजची लाईन टाकुन त्यास बाहेर नाल्यापर्यंत नेणे आवश्यक असेल. तर मी आपणांस विनंती

करतो की, जेथुन कोठुन प्रस्ताव येतील तेथे महापालिकेतर्फे अंडरग्राउंड ड्रेनेजची छोटी लाईन टाकण्याचे काम सुध्दा सोबतच केले जावे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा संबंधीत विभागास सूचना करा की, तात्काळ मंजुर करा, त्याच्यामध्ये काही त्रृटया असतील तर स्वत: लक्ष घाला नाहीतर आजचे काम उदयावर नको जायला.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>समजा ही योजना राबवित असतांना कोणी व्यक्तीने शौचालय बांधलेच नाही तर त्यास दंड काय? हे का सांगत नाही तुम्ही? अहो, महाराष्ट्रामध्ये सरपंचापासुन सर्व निलंबित झाले, नगरसेवक निलंबित झाले. ज्याने शौचालय बांधले नाही, त्यांना घरी जावे लागले. तुम्ही का सांगत नाही, हे सांगितले पाहिजे पहिले की ज्या लोकप्रतिनीधीने जर शौचालय बांधले नाही कारण की ही योजना भारताची आहे. केंद्र शासनाची आहे, शहर हे सुंदर, स्वच्छ राहण्यासाठी कोणी उघडयावर शौचालयास बसु नये, ही योजना राबवित असतांना सदस्याने राबविलीच पाहिजे असे सांगितले पाहिजे. नाहीतर सदस्य म्हणतील काय करायचे आहे जावु दया सोडा. ही योजना तुम्ही अंमलात आणली नाही तर तुम्हांला घरी जावे लागेल.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–</u>यामध्ये श्री. मोरे साहेब, सर्व प्रभागातील नगरसेवक भाग घेवुन सर्व नागरीकांना शौचालय उपलब्ध होईल अशी त्याचबरोबर स्वत:कडेही होईल हे पाहणे आवश्यक आहे. कारण मागे तुम्ही सरपंचाचा विषय केला तर ग्रामीण विकास विभागाने तशा प्रकारची त्यांच्या कायदयात दुरुस्ती करुन शौचालय नसेल तर त्या सदस्यास अपात्र ठरविण्याचा निर्णय घेतलेला आहे. आता पुढे ही योजना शहरात राबविल्यानंतर त्याप्रमाणे आपल्या महापालिका, नगरपालिका कायदयात तशा दुरुस्ती येण्याची शक्यता आहे. त्यामुळे शहर हे शुन्य ओडीएफ करणे हे आपले सर्वांचे टार्गेट ठेवु या. २ ऑक्टोंबर, २०१६ पर्यंत....

<u>सदस्य श्री.बी.बी.मोरे :–</u>मला तरी वाटते २०१७ चे जे महापालिकेची निवडणुक येईल ना त्यावेळेस तेथे कॉलमच टाकले गेले पाहिजे की जो सदस्य नगरसेवक होण्यासाठी, फॉर्म भरण्यासाठी इच्छुक असेल त्याने जर शौचालय बनविले असेल तरच त्याचा फॉर्म मान्य होईल नाहीतर तो नाकारला जाईल.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>मा. आयुक्त साहेब, हा जो प्रस्ताव आलेला आहे केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाकडुन, ठिक आहे आम्ही प्रस्ताव पाठवु, तो कधी येईल काय येईल. कधी येतो आपण सांगु नाही शकत. परंतु आमच्या महापालिकेची जबाबदारी काय असेल, बहुतेक ठिकाणी शौचालय नाही आहे. माझ्या प्रभागात शौचालयासाठी मी दोन वर्षापासुन पत्र देत आहे. स्टेशनच्या बाजुला लोक उघडयावर जावुन शौचालयास जात आहेत. परंतु आपल्या महापालिकेतील अशा ठिकाणी काय जबाबदारी आहे? केंद्र शासनाची वाट पाहणार की लोकांना आपण आपल्या महापालिकेमार्फत काही तरी निधी देवुन आम्ही ज्या ज्या प्रभागात शौचालय बनवायची आहेत दहा शिट, पाच शिटचे तर त्यासाठी आपण निधी देणार आहात की नाही? याचे जरा स्पष्टीकरण करावे.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–</u>सार्वजनिक शौचालय बांधण्यासाठी जी काही तरतुद आपणाकडे असेल त्याप्रमाणे आपण ती नियमितपणे करतच असतो. परंतु या योजनेसाठी आधीच १२ ते १६ कोटी रुपये राज्य शासनाकडे केंद्र शासनाने उपलब्ध करुन दिलेले आहे. फक्त आपला प्रस्ताव गेल्या गेल्या ती रक्कम वितरीत होणार आहे. आणि या योजनेवर केंद्र शासन व राज्य शासन मोठया प्रमाणावर लक्ष देवुन आहेत आणि त्याबाबत निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यामुळे वेळ लागणार नाही. आपला प्रस्ताव जसा सादर होईल तसे पैसे लगेच मिळतील.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>आयुक्त साहेब, आपल्या महापालिकेचे १२ हजार देणार आहेत तर आपले काही देता येईल काय? १० हजार देणार म्हणजे २२ हजाराचा प्रस्ताव आहे.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–</u>केंद्र शासनाचे ८ हजार व राज्य शासन ४ हजार आणि आपण आपल्या फंडातुन १० हजार असा प्रस्ताव आपण उदयाच्या सभेत मंजुर करु या. कारण तो ऐनवेळेस उदया घेतलेला आहे. तर २२ हजार रुपये लाभार्थींना मिळतील त्यांनी स्वत:चे काही हिस्सा टाकुन आपले वैयक्तीक शौचालय बांधावे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>मला वाटते २५ ते ३० हजार प्रस्ताव येतील आता.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–प्रस्ताव हे अधिकृत असावे म्हणजे ज्याच्याकडे शौचालय नाही.

सदस्य श्री. भगवान भालेराव :–आम्हांला नगरसवेकांना जर निधी दिला तर आम्ही सुध्दा त्यांना दोन–दोन, तीन–तीन हजार देवु शकतो ना त्यांना.

आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–नगरसेवक निधीतुन सुध्दा तुम्ही देवु शकता.

महापौर तथा पीठासीन अधिकारी :–सन्माननिय सदस्य मी सांगु इच्छिते की, या योजनेच्या प्रशिक्षणासाठी मी आणि आयुक्त साहेब आम्ही जेव्हा मुंबईला गेलो होतो, तेव्हा संपुर्ण महाराष्ट्राबद्दल त्यांनी एक तक्ता दाखविला आहे. त्यात एक खेदाची गोष्ट म्हणजे आपल्या उल्हासनगर शहरात शौचालयाची कमी याबाबत आपला पहिला क्रमांक होता. २३०० असे काही तरी संख्या होती. मी आयुक्तांशी याबाबत चर्चा केली तर त्यांनी सांगितले की त्यांच्या या संख्येमध्ये फरक आहे. आताच्या सध्याच्या परिस्थितीत व त्यांच्या संख्येत फरक आहे. म्हणुन मी मुख्यमंत्री महोदयांसमोर आश्वासन दिले की मी २०१६ पर्यंत ओएफडी करणार आहे आणि हे करण्यामध्ये संपुर्ण सभागृहाचे एकमत पाहिजे मला. यामध्ये तुम्ही मला सर्वांनी सहकार्य करा. अशी मी अपेक्षा करते.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–एक गोष्ट लक्षा घ्या, आपण हे जे १२०० देणार आहोत, हे केंद्र व राज्य शासन यांच्याकडुन येतील तेव्हा देणार ना, परंतु चेक देतांना आपणाकडे पैसे आलेले आहेत की नाही मला माहित नाही आपल्या महापालिकेची तिजोरी तर खडखडात आहे. जर कोणाचा प्रस्ताव तुमच्याकडे आला तर तो मान्य करुन चेक जाईपर्यंत पैसे देणार कोठुन? याचा सुध्दा साहेबांनी खुलासा करावा. हा महत्वाचा विषय आहे. आम्ही सांगु तुम्हांला आम्ही पैसे देवु म्हणुन आणि तो व्यक्ती आमच्याकडे येईल की साहेब पैसे देतील म्हणुन आता मला सांगा आपल्या तिजोरीत खडखडात आहे, तेथुन पैसे आले नाहीत तर पैसे दयायचे कोठुन? याचा सुध्दा खुलासा करणे महत्वाचे आहे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :–आपण ऐकत नाहीत, सुरुवातीलाच आयुक्त साहेबांनी सांगितले की, शासनाकडे प्रस्ताव पाठवायचा ३ हजार गेले की, १२ हजार नुसार जे काही होईल ६ कोटी ७ कोटी हे अनुदान आपणाला मिळणार आहे. आणि त्यातील पन्नास टक्के सुरुवातीला दयायचे आणि मग नंतर ५० टक्के दयायचे. अशा प्रकारची योजना आहे. आपला प्रस्ताव गेला नाही तर येणार नाही पैसे, पैसे आल्यानंतर आपणांस त्यांना दयायचे. बरोबर ना?

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–आता नागरीकांना सांगावे लागेल ना, पैसे आल्यानंतर शौचालय बांधा म्हणुन.

महापालिका सचिव :–मी ठराव वाचुन दाखविते.

ही महासभा वरील शासन निर्णयान्वये केंद्रशासनाच्या स्वच्छ भारत अभियान धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) उल्हासनगर शहरामध्ये अंमलबजावणी करणेकरीता मान्यता देत आहे.

सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :–साहेब, अशा ज्या योजना येतात त्यासाठी आपण एक प्रशिक्षण लावण्यात यावे. कारण राज्य शासनाकडुन व केंद्र शासनाकडुन हया ज्या योजना येतात त्या सर्व नगरसेवकांना माहित नसतात. जर आपण एक प्रशिक्षण घेतले त्यामध्ये दुस–या सुध्दा योजना असतील आता आम्हांला अजुन एक योजना भेटली आहे आवास योजना तर सर्व माहिती एकत्र भेटेल साहेब. धन्यवाद।

आयुक्त, श्री. मनोहर हिरे :–धन्यवाद।

महापौर :– सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

काही सदस्य :–पास–पास......

☑ <u>विषय क्र. २:—</u> केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) राबविण्याबाबत नगरविकास विभागाचा शासन निर्णय क्रमांक: स्वभाअ २०१५/प्र.क्र.२३/नवि ३४, दिनांक १५ मे, २०१५ प्रमाणे उल्हासनगर शहरामध्ये अंमलबजावणी करीता चर्चा करून निर्णय घेणे.

<u>प्रस्तावना:—</u>

<u>विशेष महासभा ठराव क्र:</u> २५ <u>दिनांक:—८/७/२०१५</u>

सुचकाचे नाव : श्री. राम पारवानी

अनुमोदकाचे नाव : श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही महासभा वरील शासन निर्णयान्वये केंद्रशासनाच्या स्वच्छ भारत अभियान धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) उल्हासनगर शहरामध्ये अंमलबजावणी करणेकरीता मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही /—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव :—</u>कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे:—</u>महोदया, पेपरात आलेला आहे की राष्ट्रगितातुन कोणता शब्द काढुन टाकायचा तो. होय, आज पेपरात आलेले आहे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ७.०० वाजता महापौर श्रीमती अपेक्षा विकास पाटील यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—३०/६/२०१६

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ३०/६/२०१६ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

## वि—१

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा दिनांक ३०/६/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती अपेक्षा विकास पाटील हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. अपेक्षा विकास पाटील —— महापौर

६. श्रीम. पंचशीला नाना पवार —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर | ३५ | श्री. दिपक लछमनदास सिरवानी |
| ४ | श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३६ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी |
| ५ | श्री. राम (चार्ली) पारवाणी | ३७ | श्री. राजू किशनचंद जग्यासी |
| ६ | श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे | ३८ | श्रीम. सोनिया राजू जग्यासी |
| ७ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | ३९ | श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ८ | श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना | ४० | श्रीम. वसुधा धनंजय बोडारे |
| ९ | श्रीम. आशा नाना बिराडे | ४१ | श्रीम. शकुंतला जग्यासी |
| १० | श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर | ४२ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| ११ | श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर | ४३ | श्रीम. जयश्री जीवनलाल जग्यासी |
| १२ | श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल | ४४ | श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर |
| १३ | डॉ. महेश गजानन गावडे | ४५ | श्रीम. जयश्री गजानन कांबळी |
| १४ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४६ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १५ | श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी | ४७ | श्रीम. मंदा सागर सोनकांबळे |
| १६ | श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल | ४८ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १७ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन दवणे | ४९ | श्रीम. अनिता सचिन भानुशाली |
| १८ | श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी | ५० | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १९ | डॉ. नीना प्रकाश नाथानी | ५१ | श्रीम. कांचन अमर लुंड |
| २० | श्रीम. मीना कुमार आयलानी | ५२ | श्रीम. जया मोहन साधवाणी |
| २१ | श्री. राजेश नानिकराम वधरिया | ५३ | श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे |
| २२ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५४ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २३ | श्रीम. जया प्रकाश माखीजा | ५५ | श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे) |
| २४ | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा | ५६ | श्री. गुरूनो भिकोमल वलेचा |
| २५ | श्रीम. ज्योती सुरेश कालानी | ५७ | श्री. विजय रामभाऊ तायडे |
| २६ | श्री. गणपत गोविंद एडके | ५८ | श्रीम. माया हरेश चावला |
| २७ | श्री. भगवान शंकर भालेराव | ५९ | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे |
| २८ | श्रीम. लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ६० | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| २९ | श्रीम. मिनू राजकुमार दासानी | ६१ | श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती |
| ३० | श्रीम. वनिता बब्बू भटिजा | ६२ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| ३१ | श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर | ६३ | श्री. प्रधान धर्मा पाटील |
| ३२ | श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता | ६४ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| ३३ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ६५ | श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी |
| ३४ | श्रीमती वंदना युवराज भदाणे उर्फ वंदना पाटील | ६६ | श्री. बी.बी.मोरे |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्री. राजु रामसिंग कंडारे, २. श्रीम. शशिकला शिवाजी आवारे, ३. श्री. उमेश सुरेश (पप्पु) कालानी, ४. श्री. गोदुमल नारायणदास किशनानी, ५. श्रीम. कमला गोदुमल किशनानी, ६. श्रीम. इंदिरा जमनादास उदासी, ७. श्रीम. खान इसरद सऊद, ८. ॲड. शैला पांडुरंग सोनताटे, ९. श्री. सतरामदास जेसवानी, १०.श्रीमती पुष्पा राजवानी, ११. श्री. विजय चाहु पाटील, १२. श्री. सन्मुख ग्यानचंद मानवानी, १३. श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.
३६.श्री. मनोहर हिरे, आयुक्त
३७.सौ. प्राजक्ता मि. कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३८.श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
३९.श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
४०.डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
४१.श्री. सेलवन, उप अभियंता, पाणी पुरवठा
४२.श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
४३.श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त, आरोग्य
४४.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
४५.श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
४६.श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
४७.श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्रीमती विशाखा सावंत
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी

दुपारी ३.३५ वाजता वंदे मातरम् म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—मा. महापौरजी, दिनांक २७/६/२०१६ रोजी माजी नगरसेवक श्री. रमेश रिजवानी यांचा मृत्यु झाला. त्यांच्या पत्नी सुध्दा यापुर्वी या महापालिकेच्या नगरसेविका होऊन गेल्या. तर मी सर्व सदस्यांना विनंती करतो की त्यांनी श्रध्दांजली अर्पित करावी.

महापालिका सचिव :—कृपया सर्वांनी दोन मिनिटे मौन धारण करावे.

---

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राम पारवानी

## शोक प्रस्ताव

उल्हासनगर महानगरपालिकेचे दिनांक २७/६/२०१६ रोजी माजी नगरसेवक श्री. रमेश रिजवानी यांचे निधन झाले.

त्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ५ अ                                        दिनांक:— ३०/६/२०१६

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. रमेश रिजवानी यांचे निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

⇨ <u>विषय क्र. १ :–</u> मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १८/२/२०१६ (त्यात दि. १९/३/२०१६), दिनांक १९/३/२०१६ (त्यात दि.२२/३/२०१६), विशेष महासभा दिनांक २९/३/२०१६ तसेच सर्वसाधारण महासभा दिनांक २०/४/२०१६ (त्यात २५/४/२०१६) रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

<u>काही सदस्य :–</u>पास–पास……

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ <u>विषय क्र. १:–</u> मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १८/२/२०१६ (त्यात दि. १९/३/२०१६), दिनांक १९/३/२०१६ (त्यात दि.२२/३/२०१६), विशेष महासभा दिनांक २९/३/२०१६ तसेच सर्वसाधारण महासभा दिनांक २०/४/२०१६ (त्यात २५/४/२०१६) रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

<u>विशेष महासभा ठराव क्र:</u> ५ ब      <u>दिनांक:– ३०/६/२०१६</u>

सुचकाचे नाव : श्री. सुभाष मनसुलकर

अनुमोदकाचे नाव : श्री. सुरेश जाधव

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १८/२/२०१६ (त्यात दि. १९/३/२०१६) रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ६४ पर्यंतचे, दिनांक १९/३/२०१६ (त्यात दि. २२/३/२०१६) रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ५७ पर्यंतचे, विशेष महासभा दिनांक २९/३/२०१६ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ३४ पर्यंतचे, तसेच सर्वसाधारण महासभा दिनांक २०/४/२०१६ (त्यात २५/४/२०१६) रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ४९ पर्यंतचे इतिवृत्त कायम करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही /–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

———————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. २ :—** विशेष समित्यांची रचना करणे.

---

**महापालिका सचिव :—**व्हीडीओग्राफरने आत यावे. शासन निर्णयानुसार प्रत्येक समितीचे चित्रीकरण करणे आवश्यक आहे, नाव देतांना सुध्दा. सर्व गटनेत्यांनी विशेष समितीची नावे दयायची आहेत.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सचिव महोदया, माझ्याकडे प्राप्त झालेली पत्रांमधील सर्व नावे वाचुन दाखवावीत.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—**राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचे गटनेते नाही आलेत ते येतील तेव्हा त्यांची नावे देतील.आपण त्यांची नावे आल्यावर सामावून घ्या
**महापौर तथा पीठासीन अधिकारी** — ठीक आहे
**महापालिका सचिव :—**माझ्याकडे आता शिवसेना गटनेत्यांचे पत्र प्राप्त झाले असून ते मी वाचुन दाखविते.

शिवसेना पक्षाच्यावतीने
**सार्वजनिक बांधकाम समिती**
१. श्री. सुरेश मधुकर जाधव
२. श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी
३. श्री. प्रधान धर्मा पाटील
**नियोजन व विकास समिती**
१. श्री. रमेश महादेव चव्हाण
२. श्री. सुरेश मधुकर जाधव
३. श्री. प्रधान धर्मा पाटील
**पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती**
१. श्रीमती जयश्री गजानन कांबळी
२. श्रीमती मंदा सागर सोनकांबळे
३. श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड
**आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती**
१. श्री. विजय खंडु सुपाळे
२. श्री. रमेश महादेव चव्हाण
३. श्री. नरेंद्र दवणे
**माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती**
१. श्रीमती नेहा नंदु भोईर
२. श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर
३. श्रीमती वंदना युवराज पाटील (भदाणे)
**गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती**
१. श्री. धनंजय बाबु राव बोडारे
२. श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड
३. श्रीमती समिधा आदिनाथ कोरडे
**क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती**
१. श्रीमती वसुधा धनंजय बोडारे
२. श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर
३. श्री. विजय खंडु सुपाळे
**महिला व बालकल्याण समिती**
१. श्रीमती समिधा आदिनाथ कोरडे
२. श्रीमती अनिता सचिन भानुशाली
३. श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान

महसूल समिती

१. श्रीमती मंदा सागर सोनकांबळे

२. श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर

३. श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे

आरपीआयपक्षातर्फे नाव सुचविण्यात आली आहेत.

सार्वजनिक बांधकाम समिती

श्रीमती पुष्पाताई मि. (नाना) बागुल

नियोजन व विकास समिती

श्रीमती पंचशिला नाना पवार

पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती

श्रीमती पुष्पाताई मि. (नाना) बागुल

आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती

श्री. भगवान भालेराव

माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती

श्री. भगवान भालेराव

गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती

श्रीमती पंचशिला नाना पवार

क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती

श्रीमती आशा बि–हाडे

महिला व बालकल्याण समिती

श्रीमती आशा बि–हाडे

श्रीमती आशा इदनानी यांच्या साई पक्षाच्या तर्फे एक पत्र आले आहे.

सार्वजनिक बांधकाम समिती

श्री. महेश गावडे

नियोजन व विकास समिती

श्री. दिलीप जग्यासी

पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती

श्री. सुजितकुमार चक्रवर्ती

आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती

श्री. विजय तायडे

माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती

श्रीमती शैलजा सोनताटे

गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती

श्री. दिपक सिरवानी

क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती

श्री. दिपक सिरवानी

महिला व बालकल्याण समिती

श्रीमती इंदिरा उदासी

महसूल समिती

श्रीमती जयश्री पाटील

भारतीय जनता पार्टी यांच्याकडुन पत्र आले आहे.

सार्वजनिक बांधकाम समिती

कु. शकुंतला जग्यासी

नियोजन व विकास समिती

श्री. हरेश जग्यासी

पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती

श्री. राम पारवानी

आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती

डॉ. निना प्रकाश नाथानी

माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती
श्रीमती मिना कुमार आयलानी
गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती
श्रीमती जया प्रकाश माखिजा
क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती
श्रीमती अर्चना गोकुळ करनकाळे
महिला व बालकल्याण समिती
श्रीमती माया हरेश चावला
महसूल समिती
श्री. जमनादास पुरस्वानी

कॉग्रेस पक्षाच्या गटनेतांच्यावतीने पत्र आले आहे.
सार्वजनिक बांधकाम समिती
श्रीमती अंजली साळवे
नियोजन व विकास समिती
श्रीमती जया साधवानी
पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती
श्रीमती कांचन लुंड
आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती
श्रीमती मिना सोनेजी
माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती
श्री. गोदुमल क्रिष्णानी
गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती
श्री. राजेश वधारिया
क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती
श्रीमती जया साधवानी
महिला व बालकल्याण समिती
श्रीमती मिना सोनेजी
महसूल समिती
श्रीमती अंजली साळवे

माझ्याकडे जे पत्र आले आहे ते मी आपणांस वाचुन दाखविले आहे. राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाच्यावतीने पत्र आल्यावर ती नावे वाचुन दाखविण्यात येतील. ठिक आहे. पास?

काही सदस्य :—पास—पास......

महापौर तथा पीठासीन अधिकारी:— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

☑

विषय क्र. २:— विशेष समित्यांची रचना करणे.

प्रस्तावना:—

सन—२०१२ च्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर एकूण ७८ नवनिर्वाचित पालिका सदस्य निवडून आले आहेत. आता सद्यस्थितीत ४ नगरसेवक अनर्ह ठरल्याने ७४ पालिका सदस्यांमधुन मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये विशेष समित्यांची नेमणुक करता येईल व महापालिका, स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादीचे कामकाजाचे नियम ४ अन्वये खालील आठ समित्यांची नेमणुक करता येईल.

१. सार्वजनिक बांधकाम समिती
२. नियोजन व विकास समिती

३. पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती
४. आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती
५. माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती
६. गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती
७. क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती
८. महिला व बालकल्याण समिती

महापालिकेच्या विशेष समितीवर ९ सदस्यांची नियुक्ती ही मान्यता प्राप्त पक्षाचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे तौलनिक पक्षबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता, विरोधीपक्ष नेता व अशा प्रत्येक पक्षाशी किंवा गटाशी विचार विनिमय करुन महानगरपालिकेतील अशा पक्षाच्या किंवा गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करण्याबाबतची तरतुद आहे. यापुर्वी महासभा ठराव क्र. १७, दिनांक २/७/२०१५ अन्वये एक वर्षाचे कालावधीसाठी प्रत्येकी ९ सदस्य असलेल्या

१. सार्वजनिक बांधकाम समिती

२. नियोजन व विकास समिती

३. पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती

४. आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती

५. माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती

६. गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती

७. क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती

८. महिला व बालकल्याण समिती

९. महसुल समिती

या ९ समित्यांची रचना करण्यांत आली होती. त्यांच्या एक वर्षाचा कालावधी दिनांक १/७/२०१६ रोजी संपृष्टात येत असून पुढील कालावधीसाठी त्याची पुर्नरचना करणे आवश्यक आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेतील प्रत्येक गटाचे संख्याबळ खालीलप्रमाणे आहे.

| शिवसेना | राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी | भाजपा | सेक्युलर अलायन्स आफ इंडिया गट | कॉग्रेस | आरपीआय | मनसे | अपक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २० | १९ | ११ | ८ | ६ | ४ | १ | ५ |

| ७४ | = ८.२२ |
|---|---|
| ९ | |

प्रत्येक विशेष समितीवर एका सदस्याचे निवडणूकीसाठी मतांचे प्रमाण– ८.२२ असणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने प्रत्येक गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देश खालील प्रमाणे असेल.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | शिवसेना | २० / ८.२२ | = २.४३ | (७) | मनसे | १ / ८.२२ | = ०.१२ |
| (२) | रा.का.पा. | १९ / ८.२२ | = २.३१ | (८) | अपक्ष | १ / ८.२२ | = ०.१२ |
| (३) | भाजपा | ११ / ८.२२ | = १.३३ | (९) | अपक्ष | १ / ८.२२ | = ०.१२ |
| (४) | साई | ८ / ८.२२ | = ०.९७ | (१०) | अपक्ष | १ / ८.२२ | = ०.१२ |
| (५) | कॉग्रेस | ६ / ८.२२ | = ०.७२ | (११) | अपक्ष | १ / ८.२२ | = ०.१२ |
| (६) | आरपीआय | ४ / ८.२२ | = ०.४८ | (१२) | अपक्ष | १ / ८.२२ | = ०.१२ |

वरील प्रत्येक गटाच्या संख्येच्या तौलनिक संख्याबळातून पूर्णांकाच्या आधारे प्रथम पक्षनिहाय प्रत्येक समितीवर खालील नेमणूका करण्यात येतील.

| राष्ट्रवादी कॉंग्रेस | शिवसेना | भाजपा | एकूण |
|---|---|---|---|
| २ | २ | १ | ५ |

यानंतर रिक्त राहणा—या तीन जागांवर नामनिर्देशन करतांना ज्या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे. त्या गटाचे पालिका सदस्याचे नामनिर्देशन करता येईल.

त्यामुळे खालील गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ खालील प्रमाणे आहे.

(१) शिवसेना ०.४३ (२) रा.का.पा. ०.३१ (३) भा.ज.पा. ०.३३
(४) सेक्युलर अलायन्स ऑफ इंडीया ०.९७ (५) कॉंग्रेस ०.७२ (६) आरपीआय ०.४८
(७) अपक्ष ०.१२ (८) म.न.से ०.१२

वरील परिस्थिती पहाता प्रत्येक समितीवर **कॉंग्रेस, आरपीआय, व भाजपा** या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे व त्यामुळे तीन रिक्त जागांवर या पक्षांच्या प्रत्येकी एक—एक सदस्याची नेमणूक करता येईल म्हणून प्रत्येक गटाचे विशेष समितीत प्रमाणाशिर प्रतिनिधीत्व खालील प्रमाणे करण्यास प्रस्तावित.

| शिवसेना | रा.का.पा. | भाजपा | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया | कॉंग्रेस | आरपीआय | मनसे | अपक्ष | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | २ | १ | १ | १ | १ | ० | ० | ९ |

<u>विशेष महासभा ठराव क्र:</u> ६ <u>दिनांक:— ३०/६/२०१६</u>

सुचकाचे नाव : श्री. सुभाष मनसुलकर

अनुमोदकाचे नाव : श्री. सुरेश जाधव

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार प्रत्येक विशेष समितीवर नऊ पालिका सदस्यांचा समावेश असलेल्या खालील ९ विषय समित्यांची नेमणुक करीत आहे.

१. <u>सार्वजनिक बांधकाम समिती</u>

१. श्री. सुरेश मधुकर जाधव
२. श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी
३. श्री. प्रधान धर्मा पाटील
४. कु. शकुंतला जग्यासी
५. श्री. महेश गावडे
६. श्रीमती अंजली साळवे
७. श्री. राजु जग्यासी
८. श्रीमती कमला क्रिष्णानी
९. श्रीमती पुष्पाताई मि. (नाना) बागुल

२. <u>नियोजन व विकास समिती</u>

१. श्री. रमेश महादेव चव्हाण
२. श्री. सुरेश मधुकर जाधव
३. श्री. प्रधान धर्मा पाटील

४. श्री. हरेश जग्यासी
५. श्री. दिलीप जग्यासी
६. श्रीमती जया साधवानी
७. श्री. सतरामदास जेसवानी
८. श्रीमती गुरुनो वलेचा
९. श्रीमती पंचशिला नाना पवार

३. <u>पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती</u>

१. श्रीमती जयश्री गजानन कांबळी
२. श्रीमती मंदा सागर सोनकांबळे
३. श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड
४. श्री. राम पारवानी
५. श्री. सुजितकुमार चक्रवर्ती
६. श्रीमती कांचन लुंड
७. श्री. नरेंद्रकुमार ठाकुर
८. श्रीमती वनिता बबू बठिजा
९. श्रीमती पुष्पाताई मि. (नाना) बागुल

४. <u>आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती</u>

१. श्री. विजय खंडु सुपाळे
२. श्री. रमेश महादेव चव्हाण
३. श्री. नरेंद्र दवणे
४. डॉ. निना प्रकाश नाथानी
५. श्री. विजय तायडे
६. श्रीमती मिना सोनेजी
७. श्रीमती रेखा ठाकुर
८. श्रीमती मिनु दासानी
९. श्रीमती आशा बि–हाडे

५. <u>माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती</u>

१. श्रीमती नेहा नंदु भोईर
२. श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर
३. श्रीमती वंदना युवराज पाटील (भदाणे)
४. श्रीमती मिना कुमार आयलानी
५. श्रीमती शैलजा सोनताटे
६. श्री. गोदुमल क्रिष्णानी
७. श्रीमती लक्ष्मी सिंग
८. श्रीमती सोनिया जग्यासी

९. श्री. भगवान भालेराव

६. गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती

१. श्री. धनंजय बाबुराव बोडारे
२. श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड
३. श्रीमती समिधा आदिनाथ कोरडे
४. श्रीमती जया प्रकाश माखिजा
५. श्री. दिपक सिरवानी
६. श्री. राजेश वधारिया
७. श्रीमती आशा गुप्ता
८. श्रीमती शुभांगी बहेनवाल
९. श्रीमती पंचशिला नाना पवार

७. क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती

१. श्रीमती वसुधा धनंजय बोडारे
२. श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर
३. श्री. विजय खंडु सुपाळे
४. श्रीमती अर्चना गोकुळ करनकाळे
५. श्री. दिपक सिरवानी
६. श्रीमती जया साधवानी
७. श्री. पृथ्वी वलेचा
८. शशिकला आवारे
९. श्री. भगवान भालेराव

८. महिला व बालकल्याण समिती

१. श्रीमती समिधा आदिनाथ कोरडे
२. श्रीमती अनिता सचिन भानुशाली
३. श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान
४. श्रीमती माया हरेश चावला
५. श्रीमती इंदिरा उदासी
६. श्रीमती मिना सोनेजी
७. श्रीमती पुष्पा राजवानी
८. श्रीमती शुभांगी बेहनवाल
९. श्रीमती आशा बि–हाडे

९. महसूल समिती

१. श्रीमती मंदा सागर सोनकांबळे
२. श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर

३. श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे

४. श्री. जमनादास पुरस्वानी

५. श्रीमती जयश्री पाटील

६. श्रीमती अंजली साळवे

७. श्रीमती आशा गुप्ता

८. श्रीमती इसरद खान

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही /–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u>विषय क्र. ३...........

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**एक मिनिट, मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, आज भारताचे संविधान हे जे पुस्तक देण्यात आलेले आहे ते सर्व नगरसेवकांसाठी आहे की फक्त स्थायी समितीच्या सदस्यांसाठी आहे. सर्वांसाठी आहे तर मग एक विनंती करतो की, भारताचे संविधान हे जे पुस्तक आहे ते सर्वांना हिंदीमध्ये मिळेल तर माझ्यामते फारच चांगले होईल. जी सदस्य मराठीत घेवु इच्छितात त्यांना मराठीत, कोणास हिंदीत हवे तर हिंदीत व कोणास इंग्रजीमध्ये हवे तर इंग्रजीमध्ये देण्यात यावे. असे केले तर सर्वांसाठी चांगले होईल.

**<u>उप–महापौर :–</u>**मा. सदस्य, भारताचे संविधान हे जे पुस्तक आहे ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त वाटप करण्यात येत आहे आणि जर तुम्हांस हिंदीमध्ये हवे असेल तर ते हिंदीत सुध्दा प्राप्त करुन देता येईल.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३:–** बारवी धरण प्रकल्पग्रस्तांना महापालिका नोकरीत सामावुन घेणेस मान्यता देणे.

---

<u>महापालिका सचिव:–</u>पास?

सदस्या श्रीमती सोनिया जग्यासी, श्रीमती मिनाकौर लबाना, सदस्य श्री. राजेश वदारिया, श्री. राजु जग्यासी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

महापालिका सचिव :–एकदा ठराव वाचुन दाखविते.

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या बारवी धरणाची उंची वाढविल्याने अतिरिक्त पाणी साठा क्षेत्रामुळे बाधित होणा–या गावातील विस्थापित कुटुंबातील किमान एका सदस्यास महापालिका आस्थापनेवर नोकरीत त्याचे शैक्षणिक अर्हतेप्रमाणे सामावून घेणेस मान्यता देत आहे.

सदस्य श्री. भगवान भालेराव :–बरोबर आहे, बरोबर आहे, पास.पास..

महापौर तथा पीठासीन अधिकारी:– सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. ३:– बारवी धरण प्रकल्पग्रस्तांना महापालिका नोकरीत सामावुन घेणेस मान्यता देणे.

प्रस्तावना:–

महानगरपालिकेस महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून बारवी धरणातून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येतो. सदर बारवी धरणातून उल्हासनगर,मिरा भाईंदर,कल्याण डोंबीवली,भिवंडी निजामपुर,नवीमुंबई व ठाणे या महानगरपालिका तसेच अंबरनाथ,कुळगांव बदलापुर या नगरपालिकांना पाणीपुरवठा होत आहे,सदरील धरणातील पाणीसाठा हा कमी पडत असल्याने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून बारवी धरणाची उंची वाढविण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

दिनांक १० सप्टेंबर, २०१५ रोजी आयोजित जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आलेला आहे.

पुढील काही दिवसात बारवी धरणाचे उंची वाढण्याचे काम झाल्यावर पाणी साठा दुप्पट होणार असून जिल्हयातील सर्व महानगरपालिका क्षेत्राला याचा फायदा होणार आहे ते सर्व महानगरपालिकांनी प्रकल्पग्रस्त गावातील किमान एका सदस्यास पाणी मिळणा-या सर्व महानगरपालिकांनी त्यांच्या आस्थापनेवर तात्काळ नोकरी उपलब्ध करुन द्यावी. जेणेकरुन प्रकल्पग्रस्त कुटुंबाना योग्य तो न्याय मिळेल असे मा. पालकमंत्री महोदयांनी निर्देश दिले त्या अनुषंगाने अशाच आशयाच्या खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

**ठराव – " बारवी धरणाची उंची वाढविल्याने अतिरिक्त पाणी साठा क्षेत्रामुळे बाधित होणा-या गावातील विस्थापित कुटुंबातील किमान एका सदस्यास ठाणे जिल्हयातील सर्व महानगरपालिकांनी तात्काळ नोकरी उपलब्ध करुन द्यावी "**

तरी, बारवी धरणाची उंची वाढविल्याने बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्त गावातील एका सदस्यास महापालिका आस्थापनेवर नोकरीत त्याचे शैक्षणिक अर्हतेप्रमाणे सामावून घेण्यास मा. महासभेची मान्यता मिळावी, ही विनंती.

विशेष महासभा ठराव क्र: ७ दिनांक:– ३०/६/२०१६

सुचकाचे नाव : श्री. सुरेश जाधव

अनुमोदकाचे नाव : श्री. सुभाष मनसुलकर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या बारवी धरणाची उंची वाढविल्याने अतिरिक्त पाणी साठा क्षेत्रामुळे बाधित होणा–या गावातील विस्थापित कुटुंबातील किमान एका सदस्यास महापालिका आस्थापनेवर नोकरीत त्याचे शैक्षणिक अर्हतेप्रमाणे सामावून घेणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही /–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेषमहासभा

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.** ४ :— उल्हासनगर महानगरपालिका अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करण्यासाठी अग्निशमन विभागाची सुधारित आस्थापना सूची तयार करणेस मान्यता देणे.

---

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>आयुक्त साहेब, हा प्रस्ताव परिपुर्ण आहे काय की त्यामध्ये काही त्रुटया आहेत त्यात सुधारणा करायच्या असतील तर त्या सुचवा नाहीतर आम्ही जसाच्या तसा पास करुन घेतो. परंतु एक आहे की या प्रस्तावाच्या नावाचे सक्षमीकरण करणे, ख—या अर्थाने सक्षमीकरण झाले पाहिजे. अग्निशमन विभागाचे कर्मचारी असतील, अग्निशमन विभागाचे यंत्रसामुग्री असेल किंवा त्यांची जी सेवा असेल त्या दृष्टीने हा प्रस्ताव परिपुर्ण असेल. किंवा काही त्रुटी असतील तर याठिकाणी नमुद कराव्यात.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :—</u>आपल्या महानगरपालिकेच्या आस्थापनेवर असलेल्या अग्निशमन विभागात जो प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे, त्यामध्ये नव्याने जे अग्निशमन सल्लागाराकडुन नव्याने मंजुर झालेले आपले रिक्रुटमेंट रुलस् शासनाच्या नविन धोरणाप्रमाणे थोडा फार बदल आहे. मुख्य अग्निशमन अधिकारी १, उप मुख्य अग्निशमन अधिकारी १, केंद्र अधिकारी २, सहा. केंद्र अग्निशमन अधिकारी ८, प्रमुख अग्निशमक विमोचक १८, आणि चालक व यंत्रचालक ३६, वाहन चालक ९, अग्निशामक विमोचक १३५ यामध्ये काही संख्याबदल झालेले आहे, काही पदाचे नाम जे आहे ते बदलण्यात आलेले आहे, हे नविन शासनाने जाहिर केलेले धोरण आणि रिक्रुटमेंट रुलस् त्यामध्ये जो गोषवा—यात दिलेला प्रस्ताव आहे त्यामध्ये थोडा बदल करुन याला मान्यता दयावी. आपण या नविन बदल निर्मितीप्रमाणे बदल निर्मितीचा प्रस्ताव आपण शासनाकडे पाठवु. या नविन पदनिर्मितीला मंजुरी घेण्यासाठी पाठपुरावा करु या.

यावेळी सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर, श्री. मनोज सयानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>साहेब, यामध्ये अजुन एक बदल महत्वाचा आहे. आपण ठेकेपध्दतीने घेतलेले जे कर्मचारी येथे आहेत,येथे असणारी कर्मचारी जे आठ आठ, दहा दहा वर्षापासुन काम करत आहेत त्यांना फक्त वयाची अट ही शासनाने जी वयाची अट दिलेली आहे ३८ वर्ष शिथील केली आहे ती या कर्मचा—यांना लागु करावी, एवढी विनंती आहे.

<u>सदस्या श्रीमती समिधा कोरडे :—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, या विषयामध्ये आता सध्या कार्यरत असलेले ठोक वेतनावर जे महापालिकेचे अग्निशमन कर्मचारी आहेत त्यांनी आतापर्यंत जेव्हापासुन येथे कार्यरत आहेत त्यांनी तेव्हापासुन महापालिकेस जे योगदान दिले आहे, आता सुध्दा देत आहेत. परंतु महापालिकेच्या काही फायरमनला आपण महापालिकेच्या खर्चाने, स्थायी समितीच्या ठरावानुसार प्रशिक्षणासाठी पाठविले होते त्याप्रमाणे हे जे ठोक वेतनावरील कर्मचारी आहेत, त्यांना स्थायी समितीच्या ठरावानुसार काही अटी शिथील करुन, शासनाकडे पाठवुन प्रथम त्यांना समाविष्ट करुन घेण्यात यावे आणि नंतर दुस—या कर्मचा—यांचा विचार करण्यात यावा.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :—</u>यामध्ये आपणाकडे असलेले जे रिक्त पदे आहेत, त्या रिक्त पदाचा आपण आढावा घेतला तर आठ पंधरा दिवसापुर्वी यामध्ये सामान्य प्रशासन, अग्निशमन विभाग एकत्रित बसुन यामधील जी पदे आपल्याकडे असलेल्या कर्मचा—यांच्या पदोन्नतीने भरता येतात ती पदोन्नतीने भरायची व आणि बाकी जी पदे आहेत ती पदे जाहिरात देवुन आणि ते अर्ज मागविल्यानंतर आपणाकडे जे कार्यरत ठोक वेतनावरील कर्मचारी आहेत आणि जी ठेकेदारापध्दतीने आहेत त्यांची आता जी वयोमर्यादा याबाबत जो उल्लेख झाला त्याप्रमाणे शासन निर्णय २५ एप्रिल २०१५ प्रमाणे जी वयोमर्यादा वाढविण्यात आली आहे ती विचारात घेवुन त्याप्रमाणे जे पात्रतेत असतील त्यांना प्राधान्याने ...

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>फक्त त्या यादीवर असलेले आपल्या कर्मचा—यांना प्राधान्य आणि बाकी नंतर नविन येणा—यांना जी अगोदरची अट आहे तीच लागु करा.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :—</u>नाही, आता ही जी अट आहे ती सर्वांनाच लागु केलेली आहे. एमपीएससी परिक्षा उत्तीर्ण होवून नियुक्ती होणा—या गॅझेटेड अधिका—यास सुध्दा वयोमर्यादा वाढविण्यात आलेली आहे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>आपल्या कर्मचा—यांना प्राधान्य देण्यात यावे एवढीच विनंती आहे.

<u>आयुक्त, श्री. मनोहर हिरे :—</u>होय. त्यामुळे ही वाढीव मर्यादा आणि शैक्षणिक अर्हता याप्रमाणे निवड होईल, प्राधान्य आपणाकडील जे कार्यरत कर्मचारी आहेत जे पात्रतेप्रमाणे बसतात, त्यांचा विचार करण्यात येईल.

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—</u>मा. महापौर महोदया, उप—महापौर महोदया, आयुक्त साहेब, आता जसे श्री. बोडारे साहेबांनी विचारले की हे परिपुर्ण नसल्याने मी काही बदल त्यामध्ये निदर्शनास आणुन देत आहे ते मी सचिव महोदयांजवळ देत आहे ते बदल त्यांनी वाचुन दाखवावे.

<u>महापालिका सचिव :—</u>मी आपणांस वाचुन दाखविते.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मुख्य अग्निशमन अधिकारी | ०१ | ९३००—३४८००<br>ग्रेड वेतन रुपये ४८०० |
| २ | उप—मुख्य अग्निशमन अधिकारी | ०१ | ९३००—३४८००<br>ग्रेड वेतन रुपये ४६०० |
| ३ | केंद्र अधिकारी<br>अ) अग्निशमन अधिकारी<br>(स्टेशन ऑफिसर) ——०१ पद | ०२ | ९३००—३४८००<br>ग्रेड वेतन रुपये ४३०० |
| | | | <u>विशेष टिप :—</u>अग्निशमन अधिकारी (स्टेशन ऑफिसर) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ चे कलम २१ अन्वये दर्शविलेले अग्निशन केंद्रे अधिकारी ही पदे समान असून ती वेगळी पदे नाहीत करीता अग्निशनम अधिकारी या पदास या पूढे केंद्र अधिकारी म्हणुन संबोधण्यात यावे व क्र. ३ मधील अ अग्निशमन अधिकारी (स्टेशन ऑफिसर) हे पदनाम रद्द समजणेत यावे. |
| ४ | सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी<br>अ) उप —अग्निशमन अधिकारी——०२ पदे<br>ब) उप—स्थानक अधिकारी——०६ पदे | ०८ | ९३००—३४८००<br>ग्रेड वेतन रुपये ४२०० |
| | | | <u>विशेष टिप :—</u>यापुर्वी उप—अग्निशमन अधिकारी मंजुर ०२ पदे व उपस्थानक अधिकारी मंजुर ०६ पदे हे दोन्ही पदे एकसारखे असल्याने महाराष्ट्र शासनाने तयार केलेल्या प्रारुप सेवा नियम अन्वये हया पदांच्या ऐवजी सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी म्हणुन संबोधण्यात यावे व क्रमांक ४ मधील अ) उप—अग्निशमन अधिकारी व ब) उप—स्थानक अधिकारी ही पदनामे रद्द समजण्यात यावे. |
| ५ | प्रमुख अग्निशामक विमोचक | १८ | ५२००—२०२००<br>ग्रेड वेतन रुपये २४०० |
| ६ | चालक यंत्रचालक | ३६ | ५२००—२०२००<br>ग्रेड वेतन रुपये २००० |
| ७ | वाहनचालक (अग्निशमन) | ०९ | ५२००—२०२००<br>ग्रेड वेतन रुपये १९०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | अग्निशामक विमोचक | १३५ | ५२००–२०२००<br>ग्रेड वेतन रुपये १९०० |

<u>तसेच</u>

मुद्दा क्र. १) सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी या पदाच्या पदोन्नती करिता संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांनी मान्य केलेल्या सेवा प्रवेश नियमावलीतील शर्तीनुसार तसेच सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी या पदाकरीता फायरमन संवर्गातील १० वर्ष अनुभव असणा–यांना पदोन्नती देण्यात यावी. कारण प्रमुख विमोचक/लिडिंग फायरमन या संवर्गात कार्यरत असणारे कर्मचारी हे अर्हता व पात्रता धारण करीत नाहीत सबब अग्निशमन विभागाची सध्याची मनुष्यबळाची कमतरता लक्षात घेता व फायरमन /विमोचक या संवर्गातील कर्मचारी अर्हता प्राप्त व प्रशिक्षित असल्याने त्यांना पदोन्नत करणे उचित वाटते.

मुद्दा क्र. २) मा. महासभा ठराव क्र. ४१, दिनांक ६/९/२०१४ अग्निशमन विभागातील विविध संवर्गातील रिक्त असलेली पदे पदोन्नतीसाठी सेवांतर्गत पध्दतीने कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेच्या धर्तीवर नेमणूक करण्यात यावी.

मुद्दा क्र. ३) सेवा प्रवेश नियमावलीतील शासन नियमाप्रमाणे अग्निशमन दलाचे इतर भत्ते लागू करणेत यावे.

उल्हासनगर महानगरपालिका अग्निसेवेचे सक्षमीकरण करण्यासाठी अग्निशमन विभागाची वरिल सुधारीत आस्थापना सुची तयार करणेस व शासनाकडे पाठविणेस मान्यता देत आहे.

ठरावात ही भाषा येणार नाही. टेक्नीकली चेक करावे लागेल. ठरावात तसा थोडा बदल करावा लागेल. पास ?

<u>**काही सदस्य :–**</u> ठीक आहे, पास–पास......

<u>**महापौर तथा पीठासीन अधिकारी:–**</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ <u>**विषय क्र. ४:–**</u> उल्हासनगर महानगरपालिका अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करण्यासाठी अग्निशमन विभागाची सुधारित आस्थापना सूची तयार करणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना:–</u>

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना नियम २००९ यामधील तरतूदींची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेतील अग्निशमन विभागाचे बळकटीकरण व विस्तारीकरण करणे आवश्यक आहे. यानुसार सद्यस्थितीत आवश्यक अग्निशमन केंद्रे व अग्निशमन वाहने महानगरपालिकेकडे उपलब्ध आहेत. मात्र शासन निर्णय क्रमांक अशस १४०७/३६०/प्र.क्र.२११/नवि–२०, मंत्रालय, मुंबई ३२, दिनांक ३१ ऑगस्ट, २००९ या संदर्भिय शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे आवश्यक कर्मचारी वर्ग महानगरपालिकेकडे उपलब्ध नाही. या अनुषंगाने या विभागाची आस्थापना सुची अदयावत करणे योग्य वाटते.

उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर सद्यस्थितीत अग्निशमन विभागासाठी मंजूर पंदाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदनाम | मंजूर पद संख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | अग्निशमन अधिकारी | १ | ९३००–३४८००<br>ग्रेड वेतन रुपये ४४०० |
| २ | उप अग्निशमन अधिकारी (अग्निशमन) | २ | ९३००–३४८००<br>ग्रेड वेतन रुपये ४२०० |
| ३ | उप स्थानक अधिकारी (अग्निशमन) | ६ | ९३००–३४८००<br>ग्रेड वेतन रुपये ४२०० |
| ४ | लिडींग फायरमन | १४ | ५२००–२०२००<br>ग्रेड वेतन रुपये २४०० |
| ५ | फायरमन | ६० | ५२००–२०२००<br>ग्रेड वेतन रुपये १९०० |
| एकुण | | ८३ | |

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयातील तरतुदी, उलहासनगर महानगरपालिकेकडील उपलब्ध अग्निशमन केंद्र व अग्निशमन वाहने यानुसार उल्हासनगर महानगरपालिका आस्थापना सूचीवर पुढीलप्रमाणे पदे असणे आवश्यक वाटते.

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | आवश्यक पद संख्या | सद्यस्थितीत मंजूर पदे | आवश्यक अतिरिक्त पदे | रद्द करावयाची पदे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुख्य अग्निशमन अधिकारी | ९३००—३४८०० ग्रेड वेतन रुपये ४७०० | ०१ | ०० | ०१ | —— |
| २ | उप मुख्य अग्निशमन अधिकारी | ९३००—३४८०० ग्रेड वेतन रुपये ४६०० | ०१ | ०० | ०१ | —— |
| ३ | अग्निशमन अधिकारी | ९३००—३४८०० ग्रेड वेतन रुपये ४४०० | ०१ | ०१ | —— | —— |
| ४ | उप अग्निशमन अधिकारी | ९३००—३४८०० ग्रेड वेतन रुपये ४२०० | ०१ | ०२ | —— | ०१ |
| ५ | अग्निशमन केंद्र अधिकारी | ९३००—३४८०० ग्रेड वेतन रुपये ४३०० | ०२ | ०० | ०२ | —— |
| ६ | उप अग्निशमन केंद्र अधिकारी | ९३००—३४८०० ग्रेड वेतन रुपये ४२०० | ०२ | ०६ | ०० | ०४ |
| ७ | प्रमुख अग्निशामक विमोचक | ५२००—२०२०० ग्रेड वेतन रुपये २४०० | १८ | १४ | ०४ | —— |
| ८ | चालक—यंत्रचालक | ५२००—२०२०० ग्रेड वेतन रुपये १९०० | ३६ | ०० | ३६ | —— |
| ९ | चालक | ५२००—२०२०० ग्रेड वेतन रुपये २००० | ०९ | ०० | ०९ | —— |
| १० | अग्निशामक विमोचक | ५२००—२०२०० ग्रेड वेतन रुपये १९०० | १३५ | ६० | ७५ | —— |
| एकुण | | | २०६ | ८३ | १२८ | ०५ |

उपरोक्त अतिरिक्त पद निर्मिती केल्यास प्रतिवर्षी रुपये २,७८,२५,४७६/— इतका अतिरिक्त खर्च महानगरपालिकेस सोसावा लागणार आहे. अग्निशमन सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्याने या विभागातील पद निर्मिती/पद भरतीसाठी आस्थापना खर्चाची अट लागू नाही.

उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर वरीलप्रमाणे अग्निशमन विभागाच्या सुधारीत पद सुचीस मा. महासभेची मान्यता मिळाल्यानंतर सदर प्रस्ताव संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांच्या शिफारशीसह अंतिम मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यात येईल.

यानुसार अग्निशमन विभागाच्या सुधारीत पद सूचीस मान्यता मिळण्यासाठी प्रस्ताव मा. महासभेपुढे सादर करण्यात येत आहे.

<u>विशेष महासभा ठराव क्र: ८</u>                    <u>दिनांक:— ३०/६/२०१६</u>

सुचकाचे नाव : श्री. सुभाष मनसुलकर

अनुमोदकाचे नाव : श्री. सुनिल सुर्वे

ही महासभा सभेत झालेल्या चर्चेअंती अग्निशमन सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्याने उल्हासनगर महानगरपालिका अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करण्यासाठी अग्निशमन विभागातील पद निर्मितीसाठी खालीलप्रमाणे सुधारीत पद सुचीस/ पदनामास शासन मंजुरीच्या अधिन राहुन मान्यता देत आहे.

<table>
<tr><th>अनु.क्र.</th><th>पदाचे नाव</th><th>आवश्यक पदे</th><th>वेतनश्रेणी व ग्रेड पे</th></tr>
<tr><td>१</td><td>मुख्य अग्निशमन अधिकारी</td><td>०१</td><td>९३००—३४८००<br>ग्रेड वेतन रुपये ४८००</td></tr>
<tr><td>२</td><td>उप—मुख्य अग्निशमन अधिकारी</td><td>०१</td><td>९३००—३४८००<br>ग्रेड वेतन रुपये ४६००</td></tr>
<tr><td rowspan="2">३</td><td rowspan="2">केंद्र अधिकारी<br>अ) अग्निशमन अधिकारी<br>(स्टेशन ऑफिसर) ——०१ पद</td><td>०२</td><td>९३००—३४८००<br>ग्रेड वेतन रुपये ४३००</td></tr>
<tr><td colspan="2">अग्निशमन अधिकारी (स्टेशन ऑफिसर) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ चे कलम २१ अन्वये दर्शविलेले अग्निशन केंद्रे अधिकारी ही पदे समान असून ती वेगळी पदे नाहीत करीता अग्निशनम अधिकारी या पदास या पूढे केंद्र अधिकारी म्हणुन संबोधण्यात यावे व क्र. ३ मधील अ अग्निशमन अधिकारी (स्टेशन ऑफिसर) हे पदनाम रद्द समजणेत यावे.</td></tr>
<tr><td rowspan="2">४</td><td rowspan="2">सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी<br>अ) उप —अग्निशमन अधिकारी——०२ पदे<br>ब) उप—स्थानक अधिकारी——०६ पदे</td><td>०८</td><td>९३००—३४८००<br>ग्रेड वेतन रुपये ४२००</td></tr>
<tr><td colspan="2">यापुर्वी उप—अग्निशमन अधिकारी मंजुर ०२ पदे व उपस्थानक अधिकारी मंजुर ०६ पदे हे दोन्ही पदे एकसारखे असल्याने महाराष्ट्र शासनाने तयार केलेल्या प्रारुप सेवा नियम अन्वये हया पदांच्या ऐवजी सहाय्यक अग्निशमन केंद्र अधिकारी म्हणुन संबोधण्यात यावे व क्रमांक ४ मधील अ) उप—अग्निशमन अधिकारी व ब) उप—स्थानक अधिकारी ही पदनामे रद्द समजण्यात यावे.</td></tr>
<tr><td>५</td><td>प्रमुख अग्निशामक विमोचक</td><td>१८</td><td>५२००—२०२००<br>ग्रेड वेतन रुपये २४००</td></tr>
<tr><td>६</td><td>चालक यंत्रचालक</td><td>३६</td><td>५२००—२०२००<br>ग्रेड वेतन रुपये २०००</td></tr>
<tr><td>७</td><td>वाहनचालक (अग्निशमन)</td><td>०९</td><td>५२००—२०२००<br>ग्रेड वेतन रुपये १९००</td></tr>
<tr><td>८</td><td>अग्निशामक विमोचक</td><td>१३५</td><td>५२००—२०२००<br>ग्रेड वेतन रुपये १९००</td></tr>
</table>

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही /—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. ५ :—** स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढाव्याची माहिती नोंद करणे.

---

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव महोदया, मी वारंवार साहेब, आपणांस या विषयाच्यावेळी आठवण दिलेली आहे. माझ्या प्रभागात साडेतीनशेपैकी फक्त दोनच शौचालयाच्या मंजु—या आलेल्या आहेत. तेथे आपण जो आरोग्य निरिक्षक दिलेला आहे त्यास वारंवार सांगितले आहे त्याच्यावर काहीच कारवाई नाही किंवा काही नाही. मी वारंवार एखादी गोष्ट बोलतो. आता मला महासभेत पुन्हा उभे राहुन बोलायला वाईट वाटत आहे. ना त्याच्यावर कारवाई होत आहे ना काम होत आहे, दुस—याला ते काम देवुन तरी ते काम झाले पाहिजे. कृपया आयुक्त साहेब, यावर लक्ष दिले तर बरे होईल.

**आयुक्त, श्री. मनोहर हिरे :—**यामध्ये आपण मेळावा लावुन ज्या सन्माननिय सदस्यांच्या प्रभागात, प्रत्येक प्रभागामध्ये मुख्य स्वच्छता निरिक्षक व स्वच्छता निरिक्षक यांना मेळावे लावुन आणि त्यामध्ये ज्यांचे अर्ज मंजुर झाले, नामंजुर झाले याचा आढावा घेवुन पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले आहेत आणि आपण ते सर्व प्रभागांमध्ये लागु करु या.

यावेळी सदस्या श्रीमती वंदना भदाणे, श्रीमती माया चावला, सदस्य श्री. गुरुनो वलेचा यांनी सभागृहात प्रवेश केला.

**सदस्या श्रीमती समिधा कोरडे:—**मा. महापौरजी, हरकतीच्या मुद्दयावर एक विचारु काय? आताच मिळालेल्या माहितीनुसार कॅम्प नं. १ मध्ये एक समाजमंदिराचा स्लॅब कोसळला आहे. सध्यस्थितीत अशी गोष्ट आहे की काही ठेकेदार बिलो रेट टेंडर भरतात, त्यांना काय त्यांचे काम होत आहे. तर याबाबत माहिती देण्यात यावी.

**आयुक्त, श्री. मनोहर हिरे:—**एका समाजमंदिराचे काम चालु आहे आणि स्लॅबचा काही भाग पडला अशी दोन तासांपुर्वी तक्रार प्राप्त झाली होती. शहर अभियंता आणि संबंधीत अभियंता यांना पाहणीसाठी मी पाठविले होते. ते पाहणी करुन आलेले आहेत तर याबाबत आपणांस शहर अभियंता माहिती देतील.

**श्री. राम जयस्वार, शहर अभियंता, साबांवि:—**आदरणीय महापौर महोदया, उप—महापौर, आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य, पत्रकारगण व महापालिकेचे अधिकारी वर्ग, आज सकाळी आम्हांला समजले की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समाजमंदिराचे काम चालु होते, त्याची स्लॅब अचानक कोसळली हे समजल्यानंतर आम्ही त्या स्थळावर आमच्या अभियंत्यांबरोबर गेलो.

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**शहर अभियंता साहेब, आपणांस माहित आहे काय की ते समाज मंदिराचे काम आहे की स्तंभाचे काम आहे? काय आहे? आपण समाजमंदिर सभागृहास सांगत आहात परंतु ते स्तंभाचे काम आहे. ते समाजमंदिराचे काम नाही, त्याची प्रथम तुम्ही शहानिशा करा.

**श्री. राम जयस्वार, शहर अभियंता, साबांवि:—**नाही, मला जे समजले ते समाजमंदिराचा स्लॅब पडला होता. त्याची आम्ही माहिती काढली, वर्कऑर्डरमध्ये तसे लिहिलेले आहे. ब्युटीफिकेशन ए प्रोव्हाईडींग शेड एट डॉ.बाबासाहेब आंबेडकर, एट मुकुंदनगर, सदरचे काम मेसर्स वनीदेवी मजुर कामगार सोसायटी यांना दिलेले होते. आमच्या अधिका—यांनी मला माहिती दिल्यानुसार सदरहु काम ज्या ठेकेदाराने केलेले आहे, त्यांनी अधिका—यांची नजरचुकवुन ते काम केव्हा चालु केले याची काहीही माहिती दिलेली नव्हती. या दोन दिवसामध्ये माझ्याकडे तेथिल दोन गृहस्थ आले होते आणि त्यांना माहिती दिली होती की, तेथिल स्लॅब असा असा झाला आहे आणि त्यामध्ये असे असे डिफेक्टेड आढळुन आला, तो स्लॅब झुकला आहे. तुम्ही ताबडतोब सकाळी येवुन पाहणी करा आणि रिपोर्ट करा. आणि त्याबाबत ताबडतोब ठेकेदारास कळवा आणि कारवाई करा. आणि दुर्देवाने आज आम्हांला समजले की तेथिल स्लॅब कोसळले आहे. तर त्याबाबतीत आम्ही ठेकेदारासोबत आताच जावुन पाहणी करुन आलो. त्याला नोटिस दिली आहे आणि त्याच्याकडुन याबाबतीत खुलासा मागवुन योग्य ती कारवाई त्वरीत करण्यात येईल.

यावेळी सदस्या श्रीमती जया माखिजा यांनी सभागृहात प्रवेश केला.

महापालिका सचिव :—विषय क्र. ५ पास?

काही सदस्य :—पास—पास……

यावेळी श्री. नरेंद्र कुमार ठाकुर, श्री. मनोज लासी यांनी सभागृहात प्रवेश केला.

महापौर तथा पीठासीन अधिकारी:— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

विषय क्र. ५:— स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढाव्याची माहिती नोंद करणे.

विशेष महासभा ठराव क्र: ९ दिनांक:— ३०/६/२०१६

सुचकाचे नाव : श्री. सुभाष मनसुलकर

अनुमोदकाचे नाव : श्री. प्रधान पाटील

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेवुन माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही /—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापौर तथा पीठासीन अधिकारी :—सन्माननिय सदस्य आताच मला राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या गटनेत्यांकडुन पत्र प्राप्त झाले आहे ते मी सचिव महोदयांना वाचण्यास सांगते.

महापालिका सचिव :—राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्यावतीने गटनेत्यांचे पुढील पत्र प्राप्त झाले आहे.

सार्वजनिक बांधकाम समिती

७. श्री. राजु जग्यासी
८. श्रीमती कमला क्रिष्णानी

नियोजन व विकास समिती

७. श्री. सतरामदास जेसवानी
८. श्रीमती गुरुनो वलेचा

<u>पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती</u>
७. श्री. नरेंद्रकुमार ठाकुर
८. श्रीमती वनिता बबू बठिजा
९. श्रीमती पुष्पाताई मि. (नाना) बागुल
<u>आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती</u>
७. श्रीमती रेखा ठाकुर
८. श्रीमती मिनु दासानी
<u>माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती</u>
७. श्रीमती लक्ष्मी सिंग
८. श्रीमती सोनिया जग्यासी
<u>गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती</u>
७. श्रीमती आशा गुप्ता
८. श्रीमती शुभांगी बहेनवाल
<u>क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती</u>
७. श्री. पृथ्वी वलेचा
८. शशिकला आवारे.
<u>महिला व बालकल्याण समिती</u>
७. श्रीमती पुष्पा राजवानी
८. श्रीमती शुभांगी बेहनवाल
९. श्रीमती आशा बि—हाडे
<u>महसूल समिती</u>
७. श्रीमती आशा गुप्ता
८. श्रीमती इसरद खान
अशा त—हेने त्यांनी नावे दिली आहेत.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>सचिव महोदया, एक मिनिट माझ्या नावापुढे जे आरोग्याचे पत्र आले आहे ते श्रीमती आशा बि—हाडे यांचे आले तर बरे होईल. महिला व बालकल्याण आणि त्यांच्याकडे दुसरे कुठले आहे, आरपीआयचे. तर त्यामध्ये बदल करा माझे त्यांना दया आणि त्यांचे मला दया. जरा नावात बदल करा फक्त माझे नाव त्यांच्या जागी येवु दया.

<u>महापालिका सचिव :—</u>मा. महापौर महोदया यांनी आदेश दिला की सभागृहाच्या संमतीने करण्यात यावे, त्यानुसार करण्यात येत आहे.

<u>सदस्य श्री.मनोज सयानी :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, आपल्या माहीतीवरुनच मी बोलत आहे. आपण संपुर्ण शहरातील दलितांची माहिती देत आहात, विकासाची माहिती देत आहात परंतु दुर्भाग्याने म्हणावे लागत आहे, आपण जसे उल्हासनगर महानगरपालिकेत आला आहात शहरातील ब—याच जटिल समस्या आहे त्यावर आपले लक्ष केंद्रीत नाही. भले ती शहरातील कच—याची समस्या असो, कल्याण—अंबरनाथ रस्त्याची समस्या असो, पाण्याची समस्या असो, कब्रस्तानाचा मुद्दा असो, केस्ट्रल इन्फ्रास्ट्रक्चरच्या जमिनी असो किंवा बाकी अन्य मुद्दे असो याकडे आपले कोठेच लक्ष नाही. आपले फक्त एकाच मुद्दयावर लक्ष जात आहे की श्री. भदाणे यांना कशाप्रकारे पद दयायचे, कशा प्रकारे विवादीत अधिका—यास सहा. आयुक्त, उप—आयुक्त पदावर बसवायचे आहे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>मा. महापौरजी, हा विषय विषयपटलावर आहे काय?

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—</u>हा विषय विषयपटलावर आहे काय?

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>सदरचा विषय विषयपटलावर आहे काय?

**सदस्य श्री.मनोज सयानी :–** आम्ही या महासभेसमोर या गोष्टीचा धिक्कार करतो, निषेध करतो की आपण अशा व्यक्तीस पदोन्नती दिली आहे. तसेच त्यांनी आपल्या सन्माननिय महापौर महोदया, शहराच्या प्रथम महिला यांना उच्च न्यायालयात पार्टी बनविले आहे. शहराच्या महापौरांना सुध्दा त्यांनी सोडले नाही. या गोष्टीचा आम्ही निषेध करतो व आपला सुध्दा आम्ही निषेध करतो.

यावेळी सदस्य श्री. गणपत एडके, श्री. नरेंद्रकुमार ठाकुर, श्री. गुरुनो वलेचा, सदस्या श्रीमती आशा गुप्ता श्रीमती मिनु दासानी, श्रीमती शुभांगी बेहनवाल, श्रीमती सोनिया जग्यासी, श्री. राजू जग्यासी, श्री.पृथ्वी वलेचा, श्रीमती वनिता बठिजा हे व्यासपीठासमोर येवुन उभे राहिले.

हे सर्व सदस्य कोरे कागद हातात घेवून निषेध व्यक्त करत होते.

**महापौर तथा पीठासीन अधिकारीः–** सभा संपली आहे.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वेः–** होय, सभा बंद करा.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :–** सचिव महोदया, राष्ट्रगीताला सुरुवात करा.

सदस्या श्रीम. ज्योती कालानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

**महापालिका सचिवः–**कृपया राष्ट्रगीतासाठी उभे रहावे. मा. महापौर महोदयांनी आदेश दिले आहेत.

**सदस्य श्री. सुरेश जाधव :–** महासभा संपली आहे, राष्ट्रगित सुरु करा, राष्ट्रगीत सुरु करा.

**महापालिका सचिव :–** कृपया राष्ट्रगीताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ५.०० वाजता महापौर श्रीमती अपेक्षा विकास पाटील यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
प्र. महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२२/९/२०१६

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२२/९/२०१६ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

वि—२

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा दिनांक २२/९/२०१६ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती अपेक्षा विकास पाटील हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. अपेक्षा विकास पाटील —— महापौर

७. श्रीम. पंचशीला नाना पवार —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर | २९ | श्री. राजू किशनचंद जग्यासी |
| ४ | श्री. राम (चार्ली) पारवाणी | ३० | श्रीम. सोनिया राजू जग्यासी |
| ५ | श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे | ३१ | श्रीम. वसुधा धनंजय बोडारे |
| ६ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | ३२ | श्रीम. शकुंतला जग्यासी |
| ७ | श्रीम. आशा नाना बिराडे | ३३ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| ८ | श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर | ३४ | श्रीम. जयश्री जीवनलाल जग्यासी |
| ९ | श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर | ३५ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १० | श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल | ३६ | श्रीम. मंदा सागर सोनकांबळे |
| ११ | डॉ. महेश गजानन गावडे | ३७ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १२ | श्री. विजय खंडु सुपाळे | ३८ | ॲड. शैला पांडुरंग सोनताटे |
| १३ | श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी | ३९ | श्री. विजय रामभाऊ तायडे |
| १४ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन दवणे | ४० | श्रीम. अनिता सचिन भानुशाली |
| १५ | श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी | ४१ | श्रीम. कांचन अमर लुंड |
| १६ | श्रीम. मीना कुमार आयलानी | ४२ | श्री. सतराम फतनदास जेसवानी |
| १७ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ४३ | श्रीम. जया मोहन साधवाणी |
| १८ | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा | ४४ | श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे |
| १९ | श्री. भगवान शंकर भालेराव | ४५ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २० | श्रीम. मिनू राजकुमार दासानी | ४६ | श्री. विजय चाहु पाटील |
| २१ | श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर | ४७ | श्रीम. माया हरेश चावला |
| २२ | श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता | ४८ | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे |
| २३ | श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती | ४९ | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| २४ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५० | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| २५ | श्रीम. इंदिरा जमनादास उदासी | ५१ | श्री. प्रधान धर्मा पाटील |
| २६ | श्रीमती वंदना युवराज भदाणे उर्फ वंदना पाटील | ५२ | श्री. प्रदिप रामचंदानी |
| २७ | श्री. दिपक लछमनदास सिरवानी | ५३ | श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी |
| २८ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ५४ | श्री.बी.बी. मोरे |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. राजु रामसिंग कंडारे, २. श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील,३. श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना, ४. श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल, ५. डॉ. नीना प्रकाश नाथानी, ६. श्री. राजेश नानिकराम वधरिया, ७. श्रीम. ज्योती सुरेश कालानी, ८. श्रीम. शशिकला शिवाजी आवारे, ९. श्रीम. लक्ष्मी सुरेद्र सिंग, १०. श्री. उमेश सुरेश (पप्पु) कालानी, ११. श्रीम. वनिता बब्बू भटिजा, १२. श्री. गोदुमल नारायणदास किशनानी, १३. श्रीम.

कमला गोदुमल किशनानी, १४. श्रीम. खान इसरद सऊद, १५. श्रीमती जया प्रकाश माखिजा, १६. श्री. गणपत एडके, १७. श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण, १८. श्री. सुभाष मनसुलकर, १९. श्री. रमेश महादेव चव्हाण, २०. श्रीम. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी, २१. श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे), २२. श्री. गुरूनो भिकोमल वलेचा २३. श्री. मनोज दिलीपकुमार सयानी, २४. श्री. सन्मुख मनवानी

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त
२. श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त, मुख्यालय
३. श्रीमती प्राजक्ता मि. कुलकर्णी, प्र.महापालिका सचिव
४. श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त, कर
५. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
६. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
७. श्री. राम जैसवार, शहर अभियंता
८. श्री. जाधव, उप मुख्य लेखा परिक्षक
९. श्रीमती मंगला माळवे, प्र. सहा. आयुक्त
१०.डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
११.श्री. सेलवन, उप अभियंता, पाणी पुरवठा
१२.श्री. संजय पवार, उप अभियंता, नगररचनाकार
१३.श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त
१४.श्री. नंदु समतानी, प्र. सहा. आयुक्त
१५.श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
१६.श्री. अजित गोवारी, प्र. सहा. आयुक्त
१७.श्री. विनोद केणी, प्र. स्वच्छता निरिक्षक
१८.श्री. एकनाथ पवार, प्र. स्वच्छता निरिक्षक
१९.श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
२०.श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
२१.श्री. यशवंत संगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२२.श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त
२३.श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्रीमती विशाखा सावंत
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. मनिष भोवते

सांयकाळी ४.०५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :–</u> आता विशेष महासभा सुरु करण्यात येत आहे.

विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

<u>उप–महापौर :–</u>एक मिनिट सचिव महोदया, मी हरकतीच्या मुद्दयावर बोलत आहे. मा.महापौरजी,सर्व सन्माननिय सदस्य,सर्व पत्रकार बंधु, व मा. आयुक्त महोदय, प्रथम या शहरामध्ये आपले स्वागत आहे. काल उल्हासनगर महानगरपालिकेच्या अंतर्गत असलेले ओटी सेक्शन ३ येथिल वडोल गाव याठिकाणी एक दुर्देवी घटना घडली, तेथे वालधुनी नदीवर असलेला जो ब्रिज आहे तो कोसळला, सुदैवाने तेथे जिवीत हानी झाली नाही. परंतु तेथे जवळपास शाळा सुध्दा आहे. लोकवस्ती असलेले ते गाव आहे आणि त्या गावातुन जाण्या येण्यासाठी तो ब्रिज हा एकमेव रस्ता आहे आणि दुस–या बाजुला जो रस्ता आहे तो खराब अवस्थेत आहे आणि तो उल्हासनगर व अंबरनाथला जोडणारा रस्ता आहे. माझी आज आपणांस विनंती आहे की जो उल्हासनगर व अंबरनाथला जोडणारा रस्ता आहे तर त्याची लवकरात लवकर रुंदी वाढवुन, कारण तो छोटा रस्ता आहे, तेथुन एक जर गाडी आली तर दुसरी गाडी तेथुन जावु शकत नाही. तेथे शाळा आहे, शाळेच्या जवळपास तेथे हजारो विदयार्थी शहरातुन शाळेत येत असतात. त्यामुळे माझाी आयुक्त महोदयांना विनंती आहे

की तुम्ही जर भेट दिली तर तुम्हांला माहित होईल की त्या रस्त्याची काय अवस्था आहे. तर तो रस्ता रुंद करुन देण्यात यावा तोपर्यंत जो ब्रिज आहे, जो गावातुन उल्हासनगर शहरामध्ये येतो, तो जो ब्रिज आहे तो बनविण्यासाठी उशिर लागणार म्हणुन तेथे पादचारी पुल म्हणजे पायी चालण्यासाठी पर्यायी रस्ता आपणाला बनवायला पाहिजे. आणि तो आयुक्त महोदयांनी लवकर चालु करावा. कारण त्या गावाचे जे दळणवळण आहे ते बंद झालेले आहे. व उल्हासनगर शहराशी त्या गावाचा संपर्क तुटलेला आहे. त्यामुळे आपणांस विनंती आहे की आता तात्पुरता लोकांसाठी रस्ता बनवुन दयावा, पादचारी पुल बनवुन दयावा. जोपर्यंत ब्रिज बनेल आणि पर्यायी व्यवस्था आपल्याला गावच्या लोकांसाठी करावीच लागणार आहे. तेथे शाळा सुध्दा आहे, त्यामुळे शाळा आपण बंद करु शकत नाही. शाळेमध्ये जाणारे हजारो विदयार्थी आहेत, त्यामुळे आपणांस विनंती आहे की तेथे पादचारी पुल लवकरात लवकर बनवुन देण्यात यावा व मी मा. महापौरांना सुध्दा विनंती करत आहे की आपण असे आदेश दयावेत आयुक्त महोदयांना पादचारी पुल बनविण्यासाठी. आणि दुसरीकडाचा जो रस्ता आहे तो रस्ता सुध्दा आपण लवकरात लवकर चालु करावा अशी मी आपणांस विनंती करत आहे.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>सन्माननिय सदस्य, काल जी घटना घडली ती फारच दु:खदायक घटना होती परंतु सुदैव आपले चांगले होते की तेथे कोणत्यास प्रकारची जीवीत हानी झालेली नाही. तर मी आयुक्त साहेबांना विनंती करते की आपण लवकरात लवकर त्या पर्यायी रस्त्याची व्यवस्था करण्यात यावी.

<u>सदस्या श्रीमती राजश्री चौधरी:—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, वडोल गावचा आता जो ब्रिज पडलेला आहे, तर दुसरा सुध्दा रस्ता आहे, दुस—या साईडने जाणारा तेथुन सुध्दा बसेस जातात, ते सुध्दा तुम्ही पाहुन घ्या. कारण दुस—यांदा अशी घटना होवु नये, आणि ते सुध्दा लवकरात लवकर कारण आता मुलांचे पेपर चालु होणार आहेत. त्यासाठी धन्यवाद।

यावेळी सदस्या श्रीमती आशा इदनानी, श्रीमती इंदिरा उदासी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.



<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. महापौरजी, आजची ही सभा सुरु होण्याअगोदर मी आपणांस व सर्वांना विनंती करेल, पहिल्या सभेत मी उशिरा आलो, त्यामुळे मी येथे बोलु शकलो नाही. गणेशोत्सवाच्या वेळी गणपती आणतांना उल्हासनगर शहराचे दोन मुले करंट लागुन त्यांचा मृत्यु झाला आणि त्याच्या दुस—या दिवशी एक महिला जी गाडीवरुन जात असतांना शहरातील रस्त्यावर खड्डे असल्याने त्यांचा अपघात होवुन मृत्यु झाला. त्यांना श्रध्दांजली देण्यासाठी मी आपणांस विनंती करतो.

<u>महापालिका सचिव :—</u>कृपया सर्वांनी मौन धारण करावे.

---

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

## शोक प्रस्ताव

गणेशोत्सवाच्या वेळी गणपती आणतांना उल्हासनगर शहरातील दोन मुले कु. हितेश सचदेव व कु. हितेश तलरेजा करंट लागुन त्यांचा मृत्यु झाला.

आणि उल्हासनगर शहरातील उत्तर भारतीय एक महिला श्रीमती गुप्ता हया गाडीवरुन जात असतांना रस्त्यावरील खड्डयात पडल्यामुळे त्यांचा अपघात होवुन मृत्यु झाला.

वर उल्लेखिलेल्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. १६ अ</u> <u>दिनांक:— २२/९/२०१६</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार कु. हितेश सचदेव व कु. हितेश तलरेजा आणि श्रीमती गुप्ता यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

<u>सर्वानुमते</u>

महापौर तथा पीठासीन अधिकारी :—मा. सदस्य कमी वेळात कमीत कमी बोलण्यात यावे.

सदस्य श्री. भगवान भालेराव :—आताच आमचे श्री. जमनादास पुरस्वानी साहेबांनी सांगितले की, एक उत्तर भारतीय महिला श्रीमती गुप्ता म्हणुन त्या महिलेचा खड्डयात पडुन मृत्यु झाला. त्या महिलेसाठी सभागृहाने पाच लाखाची आर्थिक मदत करावी अशी मी आरपीआय पक्षाच्यावतीने विनंती करतो.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—तिघांसाठी आम्ही सभागृहात अशी मागणी ठेवत होतो. ते दोघेजण तेथे रस्त्यावरील खड्डे बुजविलेले नसल्याने खड्डे असल्याने त्यांना लाईटचा शॉक लागला तसेच एक महिला त्या सुध्दा खड्डयात पडल्याने, आमच्या शहर अभियंत्याच्या चुकीमुळे तेथे जी घटना घडली आहे तर महापालिकेच्यावतीने पाच पाच लाख रुपये तसेच सभागृहामध्ये जी घटना घडली आहे, तर मी सर्व सदस्यांना विनंती करेल की एका महिन्याचा आपला भत्ता वाटुन तिघांना दिला पाहिजे. भारतीय जनता पक्षाच्यावतीने आम्ही जेवढे सदस्य आहोत, १२ सदस्य आहेत, तर त्या परिवारांना एक महिन्याचा भत्ता देण्याचे घोषित करतो. बाकी सदस्यांनी सुध्दा दिले पाहिजे आणि महापालिकेतर्फे सुध्दा पाच—पाच लाख रुपये त्यांना दिले पाहिजे.

सदस्या श्रीमती राजश्री चौधरी:—मा. महापौरजी, आयुक्त साहेब, एक विषय असा सुध्दा आहे की, ब्राम्हणपाडा येथे एक गरीब महिला आहे तिच्या घरावर झाड पडले आहे तिला सुध्दा आर्थिक मदत देण्यात यावी. त्या सध्या बाहेर उभ्या आहेत, तर त्यांना निवा—यासाठी काही नाही. आपल्या महापालिकेतर्फे जर काही मदत होत असेल तर त्यांना सुध्दा आर्थिक मदत देण्यात यावी.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, आपण या शहराचे नागरीक आहात, महापौर आहात, आमच्या शहरामध्ये जेवढे लोक दुर्घटनेने मरतील त्यांना पाच, पाच लाख दयावेत. कारण माणुस कशा कशाने मरतो, त्यास पाच पाच लाख दया हे आहे काय? आयुक्त साहेब मी तुम्हांला परिस्थिती सांगतो आमच्या शहरामध्ये कोणी अपघाताने मरेल तर त्यास पाच लाख रुपये दया. कोणीही म्हणेल मला पाच लाख रुपये दया, हे लावले आहे काय? तुम्ही प्रस्ताव पारीत करा, शहरामध्ये जी कोणी व्यक्ती अपघाताने मरेल त्यास पाच लाख रुपये जाहिर करा. कोणीही काहीही प्रस्ताव ठेवतोय.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—मा. महापौरजी, शहरात कोणाचे कुठेही काहीही झाले तर प्रत्येकाला दयावे.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—अधिका—यांना दोषी ठरवितात.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—तुम्ही त्या अधिका—यांवर कारवाई केली काय?

सदस्य श्री. सुरेश जाधव :—प्रस्ताव असा आणा की जो कोणी व्यक्ती शहरामध्ये दुर्घटनेने मरेल तीच लोक जाहिर करा.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—आयुक्त साहेब, आम्हांला सांगा की कुठल्या कायदयात देता येते?

सदस्य श्री. सुरेश जाधव :—जेवढे दुर्घटनेत मरतील त्यांना पाच लाख जाहिर करा.

सदस्य श्री. नरेंद्र दवणे :—महानगरपालिकेच्या कर्मचा—यांच्या, अधिका—यांच्या दुर्लक्षामुळे त्यांच्या बेजबाबदारपणामुळे जर झाले असेल तर माझ्यामते व सभागृहाच्या मते ते देणे योग्य होईल.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—मा. महापौरजी, कायदयात कोठे बसत असेल तर ते दया.

सदस्य श्री. जयेंद्र मोरे :—मा. महापौरजी, आयुक्त साहेब, या शहरात साहेब तुमचे स्वागत आहे. आयुक्त महोदय, तुम्ही १९९२ मध्ये रुजु झालात, महसुल समितीत तुम्ही काम केलेले आहे.

यावेळी सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण नेमके काय म्हणत होते ते समजुन येत नव्हते.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>सन्माननिय सदस्य, कृपया करुन सर्वांनी खाली बसावे.

<u>सदस्य श्री. जयेंद्र मोरे :—</u>एक मिनिट महापौर महोदया मला बोलायचे आहे. आयुक्त महोदय आमची...

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>सचिव महोदया, पुढील विषय घ्या.

<u>महापालिका सचिव :—</u>विषय क्र. १ ...

<u>सदस्य श्री. जयेंद्र मोरे :—</u>सचिव महोदया एक मिनिट मला बोलु दया.

<u>महापालिका सचिव :—</u>मला मा. पीठासीन अधिकारी महोदयांच्या आदेशाचे पालन करावे लागते.

यावेळी सदस्य श्री. दिपक सिरवानी, श्री. जीवन इदनानी हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>सदस्य श्री. जयेंद्र मोरे:—</u>जे लोक खड्डयात पडुन त्यांचा मृत्यू होतो त्यास पाच लाख रुपये देतात. पण आम्ही आमच्या अधिका—यांना किती वेळा सांगितले जे लोक खड्डयात पडले, त्यांचे डोके वगैरे फुटले त्यांना काय दिले? कोण देणार त्यांना म्हणजे मेल्यानंतरच पैसे देणार का? ज्यांची परिस्थिती नाजुक आहे त्या लोकांना कोण देणार? आमच्या लोकांना न्याय कोण देणार? लालचक्की चौकात दहिहंडी करतांना खड्डयात पडला एक व्यक्ती त्याचे पाय तुटले, डोके फुटले तर त्यास कोण देणार? त्यास भरपाई कोण देणार?

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>श्री. मोरे साहेब, अदयाप कुणास दिलेले नाही. शांत रहा. पुढील विषय घ्या.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>मला बोलु दया.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u>नको, खाली बसा.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u>नको काय, मला सुध्दा आपण परवानगी दिली. आम्ही जे बोलत आहे ते महत्वाचे नाही? आपण सांगितले होते दोन मिनिटे बोलण्यासाठी.

यावेळी सदस्या कु. शकुंतला जग्यासी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>मला वाईट वाटते, जर मला या सभागृहाने सांगितले असते ना की शहीदांना दयावे म्हणुन तरी बर वाटल असत.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>सन्माननिय सदस्य, विषय सोडुन तुम्ही का दुसरीकडे बोलत आहात?

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>मा. महापौरजी, आपणाकडुन मी परवानगी घेतली आहे, केवळ दोन मिनिटे बोलणार.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>होय, बोला.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u>जास्त वेळ घेणार नाही, महत्वपुर्ण मुद्दा आहे, संपुर्ण शहरात १८ सेक्शन ते २४ सेक्शनपर्यंत एकच एरिया आहे. एवढा पाऊस पडल्यानंतर देखील आठवडयात केवळ तीनच दिवस पाणी दिले जाते काय आपणांस माहित आहे? मा. आयुक्त महोदय जरा आपण नोंद घ्या. आज डॅम भरलेले आहे तरी देखील ही महापालिका पाणी देवु शकत नाही. मी आपणांस विनंती करेल, आपण एक महिला आहात, पाण्याची कशी परिस्थिती आहे हे आपणास चांगले माहित आहे. जेव्हा पाणी नव्हते तेव्हा आम्ही सुध्दा समजु

शकत होते. आज पाणी असतांना देखील महापालिका पाणी देवु शकत नाही तर आम्ही काय करायचे? श्री. सेलवन साहेबांना बोलवा ते हेच उत्तर देतील फॉरेस्ट नाक्याचे काम बाकी आहे. दोन वर्षापासुन काम दिले आहे परंतु काम होत नाही. कालच आम्ही तेथे भेट दिली. श्री. सेलवन साहेब असतील तर त्यांना बोलवा. फक्त या विषयावर थोडे दोन मिनिटे घ्या, लोक आपले आभारी राहतील.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**सन्माननिय सदस्य, मला कल्पना आहे, उल्हासनगर शहरात एवढा पाऊस पडुन सुध्दा पाण्याची कमी बाबत आमच्यासमोर निदर्शनास आले आहे. याकरीता आपण विशेष सभा आयुक्त महोदयांसोबत लावु या. ठिक आहे?

**सदस्य श्री. राजु जग्यासी :—**ठिक आहे महोदया, आपण कळवा.

**महापालिका सचिव :—**विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. १ :—** पाणी पुरवठा व जलनिस्सारण समितीतील सदस्य श्रीमती जयश्री गजानन कांबळी यांचे पद रिक्त झाल्याने पाणी पुरवठा व जलनिस्सारण समितीवर एक नविन सदस्य नेमणे.

---

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**सचिव महोदया, गटनेत्यांचे पत्र आहे, हे पत्र वाचुन दाखवा.

**महापालिका सचिव :—**माझ्याकडे मा. गटनेता श्री. सुभाष मनसुलकर यांचे पत्र प्राप्त झाले आहे. त्यानुसार सौ. राजश्री राजेंद्र चौधरी यांची पाणी पुरवठा व जलनिस्सारण समितीवर सदस्य नेमणुक विषय सुचविले आहे. पास?

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १:—** पाणी पुरवठा व जलनिस्सारण समितीतील सदस्य श्रीमती जयश्री गजानन कांबळी यांचे पद रिक्त झाल्याने पाणी पुरवठा व जलनिस्सारण समितीवर एक नविन सदस्य नेमणे.

**प्रस्तावना:—**

पालिका सदस्य श्रीमती. जयश्री गजानन कांबळी या फेब्रुवारी २०१२ च्या उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीत, प्रभाग क्र २८ (अ) नागरीकांचा मागासवर्गीय महिला साठी असलेल्या प्रभागातून निवडून आल्या होत्या व त्यांनी दि. ४/४/२०१२ रोजी पदभार ग्रहण केले होते

श्रीमती. जयश्री गजानन कांबळी, नगरसेवक, प्रभाग क्र. २८ (अ) यांचे निधन झाल्याने त्यांचे पद दिनांक ३/०८/२०१६ पासुन रिक्त झाले आहे.

महासभा ठराव क्र. ६ दिनांक ३०/६/२०१६ अन्वये विशेष समित्यांची रचना करण्यात आली होती. त्यानुसार श्रीमती. जयश्री गजानन कांबळी या पाणीपुरवठा व जलनिस्सारण समितीवर सदस्य म्हणुन नियुक्त झाल्या होत्या. आता त्यांचे निधन झाल्यामुळे सदरचे पद रिक्त झाल्याने त्या जागेवर नविन सदस्य नेमणेबाबतचा प्रस्ताव मा. महासभेसमोर मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**विशेष महासभा ठराव क्र:** १७          **दिनांक:—** २२/९/२०१६

सुचकाचे नाव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव : श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या पाणी पुरवठा व जलनिस्सारण समितीतील सदस्य श्रीमती जयश्री गजानन कांबळी यांचे पद रिक्त झाल्याने पाणी पुरवठा व जलनिस्सारण समितीवर श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी यांची नेमणूक करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही /—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. २ :—</u> नोटराईज/इतर अनोंदणीकृत दस्तऐवजांचे आधारे मालमत्तांचे हस्तांतरण करणे/भाडयाने दिले जात असल्याबाबत सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, ठाणे ग्रामीण यांचेकडील प्राप्त पत्राची माहितीची नोंद घेणे.

---

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव महोदया, हा विषय आपल्यासमोर आलेला आहे की नोटराईज व इतर अनोंदणीकृत दस्तऐवजांचे आधारी याबाबत आयुक्त महोदय, मी आपणांस सांगतो की ८० टक्के जे लोक आहे त्यांना मालकीची जागा मिळालेली नाही. फक्त शासन व राज्य शासन यांनी जोपर्यंत जाहिर केलेले नाही की, २०००पर्यंत जे लोक आहेत त्यांची मालकी आहे, ताबा आहे त्यांच्याकडे तर जोपर्यंत त्यांचा मालकी हक्क देत नाही तोपर्यंत ते दुय्यम निबंधक, रजिस्टर कार्यालयात जावुन रजिस्ट्री करु शकत नाही. सध्याची परिस्थिती कशी आहे की उल्हासनगर जे शहर आहे त्यामध्ये मिलिटरीच्या बॅरेक होत्या, तेथे राहणा—या लोकांनी आजुबाजुची जागा घेतली त्यामध्ये काही लोकांना जागा मिळाली, काही लोकांना मिळाली नाही. तरी याबाबत आपल्याला रजिस्ट्री कार्यालयाने सांगितले आहे की स्टॅम्प डयुटी आपल्याला घ्यायची हे मला माहित झालेले आहे, तो या शहरास कमीत कमी लागु होत नाही जोपर्यंत या शहरास पुर्णपणे जेवढया लोकांची कमीत कमी २००० किंवा आपण तारीख ठरविणार, त्यांना जोपर्यंत मालकी हक्क मिळणार नाही, तर रजिस्ट्री होणार नाही, स्टॅम्प डयुटी देणार नाही. स्टॅम्प डयुटी केव्हा देणार जेव्हा त्यास मालकी मिळेल. ज्याच्याकडे यु नंबर आहे, ई नंबर आहे, सर्वांची रजिस्ट्री जर करत असतील. काही वेळा रजिस्ट्री कार्यालयात सर्व कागदपत्रे रजिस्ट्री करायचे. तर या लोकांनी सांगितले की, ज्याच्याकडे सनद असेल तर रजिस्ट्रर करणार. तर आता सध्या कुठलीही महापालिका यावर कुठलीही बंदी घालु शकत नाही. कारण आपल्याकडे जे नोटराईज्ड येतात ते कर आकरणी वसुल करतो त्याच्या चेंज ऑफ नेमसाठी येतात. कर आकारणी, चेंज ऑफ नेम नोटरी करायला बंद केले तर महसुलाचे फार नुकसान होणार. कारण आम्ही त्यांना मालकी देत नाही. आमच्याकडे जर कोणी व्यक्ती आला की शामलालची जागा आम्ही रामलालला विकली आहे, ते नोटरीवर घेवुन आला रामलाल, तर ती शामलालची पावती रामलालवर करतो, कारण आम्हांला महानगरपालिकेला मालकी देण्याचा व स्टॅम्प डयुटी वसुल करण्याचा आपला काहीही हक्क नाही. राज्य शासनाने जोपर्यंत यांना मालकी दिलेली नाही ते आपल्यासाठी काहीच कामाची नाही. आणि आपण फक्त माहिती सादर करण्यासाठी सांगितले आहे. आम्हांस, महापालिकेला हे पत्र आलेले आहे. पण ते पत्र चुकीचे आहे आणि हे सादर केले ते सादर करणेपण चुकीचे आहे. आणि हे आपल्या शहरात लागु होत नाही. आणि ज्या अधिका—याने पत्र दिलेले आहे त्याला आयुक्तांनी पत्र दयायला पाहिजे. अगोदर आपण संपुर्ण शहराचा सर्व्हे करा, मग लोकांना मालकी हक्क दया.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>एक मिनिट, हे जे पत्र आलेले आहे ते महापालिकेच्या मालकीचे जागा आहेत त्याचे जे भाडे करार होतात ते हितसंबंधी आहे, इतर खाजगी मालकीच्या संबंधीत नाही. हे होवु शकत नाही हे

सगळयांना समजते. आपल्या ज्या मालमत्ता आहे, त्याची रितसर नोंदणी मालक म्हणुन झालेली आहे तर जे आपण भाडयाने देतो मला वाटते त्याच्याच संबंधी हे पत्र आहे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :–या महासभेची काहीही अडचण नाही.

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–तसे जर असेल तर आमचा काहीही आक्षेप नाही. फक्त महापालिकेने याचा खुलासा करावा.

श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त, कर :–सदर विषय जो आपल्यासमोर आलेला आहे, तो मा. मुद्रांक अधिका–यांनी यांनी मुद्रांक शुल्क चुकविण्याबाबत आहे. आणि त्या कार्यालयाचा यापुर्वीही वारंवार पत्रव्यवहार झालेला होता. त्यांना आम्ही ही बाब कळविली होती आणि महापालिकेचे जबाबदार अधिकारी म्हणुन ही प्रक्रिया नावतंत्राची सुरु आहे. आम्ही महसुल वसुल करण्यासाठीच ठेवलेली आहे.

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–आम्ही जे म्हणतो तुम्ही त्याचा खुलासा करा. आयुक्त साहेब जे म्हणत आहे की फक्त महापालिकेचे मालमत्तासाठी पुर्तता आहे तर तो विषय संपतो. आम्हांला काही बोलायचे नाही. आमचे जे बोलणे आहे तेही काढुन टाका.

श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त, कर :–यामध्ये संबंधीत अधिकारी यांनी जे पाठविले, महापालिकेचे मालकीचे दुकान, गाळे वगैरे, भाडेतत्वावर दिलेत वगैरे हा सुध्दा विषय येतो आणि याव्यतिरिक्त महापालिकेचे जे हस्तांतर होते त्यामध्ये ब–याचशा मोठया मालमत्ता त्यांचे व्यवहार होतात, २५ लाख, ३० लाख, ४ लाख जे काही असेल ते. तर यांचे मुद्रांक शुल्क भरले जात नाही, भाडे करार पैसे होतात. तर असे आम्ही व्यवहार केलेले आहे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–एक मिनिट, हया खाजगी मालमत्ता आहे काय? पहिला विषय हा आहे की हा महापालिकेच्या मालकीचा आहे. दुसरा विषय जो आहे तुम्ही म्हणत आहात खाजगी मालमत्तेचा आहे. त्याचा आपला कसा संबंध येतो कशामुळे येतो?

श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त, कर :–ते आपणाकडे चेंज ऑफ नेम करण्यासाठी अर्ज करतात, ती दुस–या व्यक्तीला विकलेली असते.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–विकलेली आहेत, तर ते जे म्हणत आहेत त्या मुद्दयाला सुध्दा आपणाला खुलासा करायला पाहिजे, त्याच्यामध्ये त्याचेच नाव जर मालमत्तेत नसेल तर चेंज ऑफ नेम कसे होईल.

श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त, कर :–याठिकाणी ब–याचशा मालमत्ता अनाधिकृत असल्याने त्याचा मालकी हक्काचा कुठलाच पुरावा त्यांच्याकडे नसतो.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–आपल्या रेकॉर्डला मालकी हक्क कसे नोंदले आहेत?

श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त, कर :–मालमत्ता कर देणारा प्रथमत: पात्र व्यक्ती म्हणुन रेकॉर्डला नाव असते. त्यासाठी ठराव झालेला आहे. जर ती मालमत्ता चेन असेल म्हणजे एका व्यक्तीने दुस–या व्यक्तीला विकलेली आहे, या पध्दतीने ते मुद्रांक आपल्याला दाखवितात, म्हणजे नोटराईज्ड आहे आमच्याकडे कागदपत्र वगैरे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–तुमच्याकडे मालक म्हणुन जी व्यक्ती आहे त्याने बी ला विकली, बी ने सी ला विकली. बी चे नाव तुमच्याकडे अधिकृत मालक म्हणुन दाखल आहे काय? ते कशाच्या आधारावर आहे?

श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त, कर :–आपल्या रेकॉर्डवर आपण कर निर्धारण जेव्हा केली होती, त्या कर निर्धारावर....

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–हे तुमचे उत्तर आहे काय?

<u>श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त, कर :–</u>नाही.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–</u>हेच मला बोलायचे होते, ती जी प्रक्रिया आपणाकडे आहे ती पुर्वीपासुन सुरु आहे. तर यामध्ये असे म्हटलेले आहे की त्यांचे मुद्रांक वसुल करण्याचे महापालिकेचे काम नाही.
<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>जरी महापालिकेचे वसुल करण्याचे काम नसेल तरी ज्यावेळेस महापालिका ते नाव बदल करते त्यावेळेसच त्यांनी काळजी घ्यावयास पाहिजे. या पत्राचा तसा अर्थ होत नाही परंतु माझ्या पेक्षा यांची यामध्ये माहिती जास्त आहे. त्यामुळे जे मालकी आपणाकडे दाखल आहे, जसे अ व्यक्तीचे नाव आपणाकडे दाखल आहे, याचा अर्थ तो अ व्यक्ती मालक आहे अधिकृत. आपण जे म्हणत आहात की त्याच्याकडे काहीही अधिकृत नाही.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–</u>नाही, नाही, मी त्याला मालक म्हणत नाही. एक मिनिट, आपणाकडे त्या जागेचा मालक म्हणुन त्याची नोंद नाही, आपणाकडे नोंद आहे की या जागेचा कर तो व्यक्ती भरतो. तर मालकीचा रेकॉर्ड आपणाकडे नाही, फक्त कर भरण्याचा रेकॉर्ड आपणाकडे आहे. तर मालकी आपण देवु शकत नाही.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>एक मिनिट, स्लम किंवा ऑन प्लाट ज्यांची बांधकामे झालेली आहेत, तर आपण त्यांना कर पावती दिलेली आहे, हे सर्वीकडेच आहे. कल्याणमध्ये असणार आहे, ठाणेमध्ये असणार आहे, मुंबईमध्ये असणार आहे. अशा प्रकारचे पत्रव्यवहार वारंवार मुद्रांक शुल्कवाल्यांनी इकडे केलेला आहे. महापालिका प्रशासनाने कधीही तो ग्राहय धरलेला नाही. कारण तो त्यांचा वसुलीत जात नाही. यावेळेस आपण एवढे का गंभीर घेतले हे समजत नाही. अवलोकनार्थ विषय ठेवलेला आहे. नाहीतर आपली वसुली कमी होईल.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>आपण असे करु याची मी सविस्तर माहिती घेतो, कारण हा विषय महापालिकेच्या व्यतिरिक्त असा त्यांचा पत्रात उल्लेख दिसत नाही. या व्यतिरिक्त त्यांचे काही पत्रव्यवहार असतील तर आपण ते पाहु या. आणि स्टॅम्प डिपार्टमेंटची मलाही माहिती आहे त्यामुळे मी सुध्दा त्यांच्याशी बोलेले की यामध्ये आपल्याला कशापध्दतीने स्टॅम्प डयुटी जर ईव्हेजन झाली असेल तर कळेल. पण मुळ उद्देश शासनाचा असा आहे की शासनाचा महसुल बुडता कामा नये. त्याला आपण सहकार्य करायला पाहिजे, शासनाचा घटक म्हणुन. कारण शासनाकडुन आपणांस बरेचसे अनुदान मिळतात. वुई शुल्ड सपोर्ट गर्व्हमेंट रिकव्हरी इव्हेजन ॲण्ड एव्हरी इव्हटेड...

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>हे करत असतांना महापालिकेचा सुध्दा बुडता कामा नये. आपण जर का सपोर्ट केला नाही तर ते पैसे भरणार नाहीत, कर भरणार नाहीत. त्यामुळे पहिले प्राधान्य आपल्याला आहे. अवलोकनार्थ ठेवलेले आहे परंतु त्यावर कारवाई तुर्तास असणार.

यावेळी सदस्या श्रीमती कांचन लुंड, श्रीमती रेखा ठाकुर, श्रीमती मिनु दासानी, श्रीमती मिना आयलानी, श्रीमती माया चावला, कु. जयश्री जग्यासी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–</u>नाही, माझे काय म्हणणे आहे साहेब...

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–</u>साहेब विषयांतर होत आहे, या गोष्टीचे थोडक्यात मला सांगायचे आहे. उल्हासनगरची पार्श्वभुमी अशी आहे. १९४७ साली जेव्हा हिंदुस्तान व पाकिस्तान अशी फाळणी झाली. त्यावेळेस सिंधी भाषिक आणि इतर भाषिक जे कराचीमध्ये पाकिस्तानच्या भुमीमध्ये होते त्या फाळणीच्या वेळेस मारामारी असे काही प्रकार झाले त्यावेळेस ते तिकडुन येथे स्थलांतरीत झाले, निर्वासीत होवुन येथे आलेत. अशा महाराष्ट्राच्या आणि हिंदुस्तानच्या काही शहरामध्ये निर्वासीत एरिया असा ठेवलेला आहे. त्या अनुषंगाने उल्हासनगर शहर हे पुर्ण निर्वासीतांचे शहर होते. त्यावेळी बॅरेक होते. बॅरेक ही केंद्र शासनाची जागा आहे. बॅरेकमध्ये राहण्यासाठी तात्पुरती व्यवस्था करण्यात आलेली होती. त्यानंतर ती सोय कमी पडल्यामुळे १९५२ साली ब्लॉक बनविण्यात आले व काही लोकांना ते राहण्यासाठी दिलेत. केंद्र शासनाने राशनकार्ड दिले सर्व काही दिले. त्यानंतर ही उल्हासनगरची जागा महाराष्ट्र शासनास हॅण्डओव्हर करण्यात आली. आणि

उल्हासनगरचे ॲथोराईज्ड स्ट्रक्चर, जे तुम्ही बोलत आहेत की मुद्रांक शुल्क भरण्याची गरज कोणाला आहे? ॲथोराईज्ड स्ट्रक्चर लोकांना आहे की स्टॅम्प डयुटीवाल्यांना. ॲथोराईज्ड स्ट्रक्चर हे बॅरेक व ब्लॉक आहे, काही ठिकाणी मोरी वगैरे होती, बाकी जागा पुर्ण महाराष्ट्र शासनाची होती. महाराष्ट्र शासनाच्या जागेवर काही लोकसंख्या अशी वाढत गेली तर येथिल लोकांनी वाढत वाढत वाढत अतिक्रमण करत गेलेत. त्यावेळेस रजिस्ट्र होत होती. तर मुद्रांक शुल्क भरण्याचे बंद करण्यात आले. महाराष्ट्र शासनाची जागा आहे, ज्या जागेचा आपण आता कर घेत आहोत त्याचा मालकी हक्क शासनाची आहे साहेब. आणि आपल्या महाराष्ट्र शासनाने ते शुल्क भरण्यासाठी बंद केलेले आहे. रजिस्ट्री होत होती आता रजिस्ट्री होत नाही. आपण कोणत्या आधारे त्यांना रजिस्ट्री करण्यासाठी पाठविणार की मुद्रांक शुल्क भरण्यासाठी त्यांना सांगणार आहेत ते पहा. म्हणुन माझी अशी विनंती आहे की आपण करदाता म्हणुन त्यांना महाराष्ट्र शासनाच्या अमुक जागेवर तो राहत आहे. तर मी कर भरत आहे दरवर्षी. जर मी जागा दुस—याला दिली तर त्याच्या जागेवर फक्त चेंज ऑफ नेम होणार आहे. जर मुद्रांक शुल्क भरण्यासाठी आपणांस शासनाने जर अनुमती दिली तर मालकी हक्क आपोआपच होत आहे ना त्याचे?

यावेळी सदस्य श्री. पृथ्वी वलेचा हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>हा विषय माहितीसाठी ठेवला आहे, हा विषय पुढील वेळेस घेवु जेणेकरुन महापालिकेचे नुकसान होणार नाही.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>हा विषय वगळण्यात यावा. यामध्ये कसे येईल जर उल्हासनगर महानगरपालिका मालमत्ता व्यतिरिक्त असेल तर आपण माहिती नोंद करुन घेवु नका. जर उल्हासनगर महानगरपालिकापर्यंत असेल तर करा.

<u>महापालिका सचिव :—</u>सदरचा विषय सर्वानुमते वगळण्यास मान्यता देत आहे. मान्य?

<u>काही सदस्य :—</u>विषय वगळण्यात यावा.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ <u>विषय क्र. २:—</u> नोटराईज/इतर अनोंदणीकृत दस्तऐवजांचे आधारे मालमत्तांचे हस्तांतरण करणे / भाडयाने दिले जात असल्याबाबत सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, ठाणे ग्रामीण यांचेकडील प्राप्त पत्राची माहितीची नोंद घेणे.

<u>प्रस्तावना:—</u>

उल्हासनगर महानगरपालिका महानगरपालिका हद्दीतील नोटराईज/इतर अनोंदणीकृत दस्तऐवजांचे आधारे मालमत्तांचे हस्तांतरण करणे/भाडयाने दिले जात असल्याबाबत मुद्रांक शुल्क वसुली करणे तसेच मालमत्ता हस्तांतरण आणि नावात करतांना क्षेत्रिय अधिकारी यांचेकडुन अनुसरावयाची कार्यपध्दती याबाबत सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, ठाणे ग्रामीण यांचेकडील दिनांक १९/८/२०१६ रोजीचे प्राप्त पत्र अवलोकनार्थ महासभेपुढे सादर करण्यात येत आहे.

<u>विशेष महासभा ठराव क्र:</u> १७ अ <u>दिनांक:— २२/९/२०१६</u>

**सुचकाचे नाव : श्री. राजेंद्रसिंह भुल्लर**
**अनुमोदकाचे नाव : श्री. जमनादास पुरस्वानी**

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या नोटराईज/इतर अनोंदणीकृत दस्तऐवजांचे आधारे मालमत्तांचे हस्तांतरण करणे/भाडयाने दिले जात असल्याबाबत सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, ठाणे ग्रामीण यांचेकडील प्राप्त पत्राची माहितीची नोंद घेणेचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही /–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————

⇨ **विषय क्र. ३:–श्रीमती बेबी माळी, कनिष्ठ लेखा परिक्षक व श्रीमती संगिता गोसावी,लिपिक अपंग कर्मचारी यांना स्कुटर व ॲडप्शन करुन देणेस मान्यता देणे.**

———————————————————————————————————

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>नियमानुसार इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता हा ठराव करण्यांत यावा.

<u>महापालिका सचिव :–</u>ठिक आहे.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :–</u>कर्मचा–यांचे जे काही वैद्यकीय खर्चापोटी रक्कम असेल किंवा काही असेल तर अशा ठरावास इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता देण्यात यावे.

<u>महापालिका सचिव :–</u>ठिक आहे.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ <u>विषय क्र. ३:–</u> श्रीमती बेबी माळी, कनिष्ठ लेखा परिक्षक व श्रीमती संगिता गोसावी,लिपिक अपंग कर्मचारी यांना स्कुटर व ॲडप्शन करुन देणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना:–</u>

श्रीमती बेबी माळी, कनिष्ठ लेखा परिक्षक व श्रीमती संगिता गोसावी,लिपिकयांनी स्कुटर व ॲडप्शन मिळणेबाबत विनंती केली आहे.

मा. महासभा ठराव क्र. ४६, दिनांक ५/२/२०१४ अन्वये महापालिकेतील अंध/अल्पदृष्टी, मुकबधीर, कर्णबधीर व २९ अस्थिव्यंग या प्रवर्गातील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना शासनाच्या धोरणानुसार कानातील मशीन, स्कुटर ॲडप्शन, सहाय्यक तंत्र/ उपकरणे देणेबाबत मा. महासभेने स्कुटर ॲडप्शन देण्यासाठी रुपये ५०,०००/– (रु. पन्नास हजार फक्त) मान्यता दिलेली आहे.

एकुण २२ अस्थिव्यंग या प्रवर्गातील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना शासनाच्या धोरणानुसार अपंग कर्मचारी यांना उपकरणे पुरविण्यासाठी मा. महासभेने मान्यता दिलेली आहे. सदर प्रस्तावामध्ये श्रीमती बेबी माळी, कनिष्ठ लेखा परिक्षक व श्रीमती संगिता गोसावी, लिपिक यांचा समावेश नाही.

तरी स्कुटर ॲडप्शन देण्यासाठी रु. ५०,०००/– (रु. पन्नास हजार फक्त) दिलेले आहेत.

| अ. क्र. | अधिकारी व कर्मचारी यांचे नाव व पदनाम | सदर केलेले स्कुटर कोटेशन किंमत रुपये | ॲडप्शन कोटेशन किंमत | एकुण रक्कम | अनुदान रक्कम | एकुण अग्रीम रक्कम | अग्रीमसाठी संमती पत्रावर स्वाक्षरी केली आहे/नाही. | कोटेशन सादर केलेल्या कंपनीचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती बेबी माळी, | ६१,२७२/– | १४,५००/– | ७५,७७२/– | ५०,०००/– | २५,७७२/– | आहे | व्ही.जे. ऑटोमोबाईल प्रा. |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कनिष्ठ लेखा परिक्षक | | | | | | | लि. उल्हासनगर–३ |
| २ | श्रीमती संगिता गोसावी, लिपिक | ६१,५०९/– | १४,५००/– | ७६,००९/– | ५०,०००/– | २६,००९/– | आहे | व्ही.जे. ऑटोमोबाईल प्रा. लि. उल्हासनगर–३ |

स्कुटर उपलब्ध करण्यासाठी श्रीमती बेबी माळी, कनिष्ठ लेखा परिक्षक व श्रीमती संगिता गोसावी लिपिक यांनी कोटेशन सादर केलेले आहे. शासनाच्या धोरणानुसार अपंग कर्मचारी यांना उपकरणे पुरविण्यासाठी महापालिकेतील इतर अपंग कर्मचा–यांप्रमाणे श्रीमती बेबी माळी, कनिष्ठ लेखा परिक्षक व श्रीमती संगिता गोसावी, लिपिक यांना प्रत्येकी रु. ५०,०००/– अनुदान देण्यासाठी मा. महासभेची मान्यता घेण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**विशेष महासभा ठराव क्र: १८** **दिनांक:– २२/९/२०१६**

**सुचकाचे नाव :श्री. राजेंद्रसिंह भुल्लर**
**अनुमोदकाचे नाव : श्री. जमनादास पुरस्वानी**

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या श्रीमती बेबी माळी, कनिष्ठ लेखा परिक्षक व श्रीमती संगिता गोसावी,लिपिक अपंग कर्मचारी यांना स्कुटर व ॲडप्शन करुन देणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही /–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ४ :–** स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढाव्याची माहिती नोंद करणे.

---

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–**माहिती नोंद करण्याचा विषय आहे तर पुढे काही बोलायचेच नाही, माहिती नोंद झाली. पुढील विषय घ्या.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :–**सन्माननिय सदस्य, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत घराघरात शौचालय बांधण्याची प्रभागनिहाय माहिती घेतली असून त्यामध्ये काही प्रभागामध्ये फक्त फॉर्म भरलेले आहेत पण तेथे आपले काही अधिकारी गेलेले नाहीत आतापर्यंत. अशा ब–याच प्रभागातील तक्रारी माझ्याकडे आलेल्या आहेत. माझी अशी विनंती राहिल की, जे शिल्लक राहिलेले प्रभाग आहेत त्यांच्या फॉर्मचा विचार देखील यामध्ये करण्यात यावा.

**सदस्य श्री. जयेंद्र मोरे :–**मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, आता हे हागणदारी मुक्त स्वच्छ भारत अभियान राबविण्यात येत आहे. तर आयुक्त साहेब, गेल्या एक वर्षापासुन महिलांसाठी शौचालय बांधण्यात येईल, असे म्हटले होते. ज्या प्रभागातील झोपडपट्टीतील महिला आहेत, त्यांच्यासाठी शौचालय बांधण्यात येईल. परंतु एक वर्षापुर्वी आम्ही ती संचिका पारीत करुन सार्वजनिक बांधकाम विभागाचे श्री. नागदेव या लिपिकाकडे दिलेली आहे. परंतु ते म्हणतात ते निविदा मध्ये आहे, निविदा मध्ये आहे, तर सांगा की केव्हा ती निविदा उघडणार आणि शौचालय बांधणार? आणि सर्वात महत्वाचा विषय हे जे शौचालय बांधण्यासाठी लागणारी रक्कम आपल्या महापालिकेची आहे की शासनाची आहे? माहिती कोण देणार? ही रक्कम कोणाची? महिलांसाठी जे शौचालय बांधण्यात येते तर त्यासाठी कोठुन आपण रक्कम खर्च करतो?

यावेळी सदस्या श्रीमती मंदा सोनकांबळी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :–</u>श्री. बोडारे साहेब गरीबांसाठी पहा ना, गरीबांना घरात शौचालय नाही. त्यासाठी केंद्र शासन जे पैसे देतो तर त्याचा निर्णय लवकर घ्या ना. प्रशासन त्याकडे लक्षच देत नाही.

<u>महापालिका सचिव :–</u>विषय पास?
<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ <u>विषय क्र. ४:–</u> स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढाव्याची माहिती नोंद करणे.

<u>विशेष महासभा ठराव क्र</u>: १९ <u>दिनांक:– २२/९/२०१६</u>

सुचकाचे नाव :श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव : श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढाव्याची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही /–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ५ :–**उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळ व सर्व शिक्षा अभियान या दोन्ही कार्यालयास महानगरपालिका मुख्य इमारतीमधील स्थानिक संस्था कर विभागात (पार्टीशन करुन) स्थलांतरीत करणे

---

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, उप–आयुक्त साहेब माहिती देतील का? कारण की काय एवढी गरज पडली तेथुन येथे आणायची. हा पहिला विषय. दुसरा विषय म्हणजे आपल्या ज्या मालमत्ता बाहेर आहेत, हा विषय बघितल्यावर मला तर असे वाटते, आपल्या मालमत्ता ज्या बाहेर आहेत त्या सर्व मोकळया ठेवायच्या बिल्डराच्या किंवा कोणाच्या तरी घशात ठेवायच्या आणि या महापालिकेत नको ते आरोप ठेवायचे, जसे युनियनचे झाले, माझे वारंवार म्हणणे होते की युनियनचे येथुन कार्यालय काढा. असे करा ना महापौर महोदया, आयुक्त साहेब, सर्व प्रभाग समितीच येथे आणा. हा महत्वाचा आमचा विषय आहे. आम्हांला प्रभाग समितीत जायला त्रास होतो. आमचा विषय आम्हांला प्रभाग समितीत दयावा लागतो. तर डबल विषय कोठुन देणार आम्ही? हा जो विषय आणलेला आहे तो अक्षरक्ष: कोणाच्या तरी पायघडयाठी आणलेला आहे. हेतुपुरस्कर आणलेला आहे. आपणाकडे सर्व जागा उपलब्ध आहेत आणि या जागा आपणांस उपलब्ध करुन घ्यायच्या आहेत. त्या जागा आपल्या ताब्यात घ्यायच्या. हा तर धंदा झाला. आणि मला वाईट वाटते हे प्रशासनाकडुन आले आहे. अत्यंत वाईट अवस्था आहे ही. आपल्या मालमत्ता आपण कशा वाचवायच्या,

आज त्याच इमारतीमध्ये आपली मालमत्ता त्याच्या ताब्यात आहे. दुसरा व्यक्ती राहतो तेथे. आपण काढु शकलो नाही.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—हा विषय वगळण्यांत यावा, हा विषय येथे आणायची गरज नाही.

महापालिका सचिव :—सदरचा विषय वगळण्यात...............

महापौर तथा पीठासीन अधिकारी :—सन्माननिय सदस्य....

यावेळी सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी, श्री. राम पारवानी, श्री. हरेश जग्यासी, श्री. प्रदिप रामचंदानी, श्री. भगवान भालेराव, श्री. राजेश वानखेडे, श्री. प्रधान पाटील, श्री. महेश गावडे, श्री. सतरामदास जेसवानी, श्री. जयेंद्र मोरे हे सभागृहातुन बाहेर गेले.

महापालिका सचिव :—एक मिनिट, मा. महापौर महोदया बोलत आहेत या विषयी.

महापौर तथा पीठासीन अधिकारी :—सन्माननिय सदस्य, आपल्याच काही नगरसेवकांचा काही कार्यक्रम असल्या कारणाने, शहिदांना श्रध्दांजली देण्यानिमित्त सदस्य टाउनहॉलला गेलेले आहेत. हा विषय महत्वाचा असल्याने मला वाटते या विषयासोबतच ही सभा स्थगित करावी. आणि येत्या दोन तीन दिवसात...

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—एक मिनिट, हा विषय तर अमान्य करा ना. हा विषय अमान्य झाला आहे.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—दोन मिनिटे, महापौर महोदया, या विषयावर माहिती हवी, महत्वाचा विषय आहे. आपल्या महापालिकेतील तिसरा माळा जो आहे ना तेथे हे कार्यालय आणण्याचे ठरले आहे. एमएमआरडीएने खासकरुन त्यांनी निधी देवुन ती जागा उपलब्ध केली आहे. आपल्याला देखील वापरता येत नाही, याबाबत थोडी माहिती घ्या. श्री. लेंगरेकर साहेबांना हे सुध्दा माहित नाही की आपल्याला एमएमआरडीएने निधी दिला आहे. त्यांच्याकरीता जागा उपलब्ध करुन देण्यासाठी ठेवलेला आहे. मा. आयुक्त महोदय, दुस—याचे अधिकार आपण घेत आहोत आणि आपले अधिकार, पहा मी सांगतो ते.

यावेळी सदस्या श्रीमती आशा गुप्ता, श्रीमती अर्चना करनकाळे, कु. शकुंतला जग्यासी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :— त्याच्या मागे एक षड्यंत्र आहे. ज्याठिकाणी हे रिजर्वेशन, एकॉर्डेशनमध्ये झालेली जागा उल्हासनगर महानगरपालिकेने ताब्यात घेतली. बरेच वर्ष पडुन होती. बिल्डराने पार्किंगसाठी असलेल्या जागेत सुध्दा अतिक्रमण करण्याचा प्रयत्न केला. त्यात सुधारीत प्लानमध्ये दोन माळे चढविण्याचा प्रयत्न केला. ते महापालिकेने कुठलेही ताब्यात घेतले नाही. महापालिकेच्या इतर मालमत्ता आहेत, एक मालमत्ता रिजन्सी म्हणुन आहे ती रिजर्वेशन, एकॉर्डेशनमध्ये ती जागा विकसित केलेली आहे. त्या जागेपैकी फक्त पाच जागा आपल्या ताब्यात आहेत. एक रिजन्सी निर्माण म्हणुन जागा होती. महापालिकेने ती ताब्यात घेतली परंतु ती प्रलंबित होती. बिल्डर व सोसायटीवाल्यांच्या ताब्यात गेल्याने आज ती जागा आपणाकडे नाही. अशा प्रकारचे षड्यंत्र यामागे आहे. श्री. लेंगरेकर साहेबांनी कशामुळे केले, तिकडे आहे चालु आहे ना, बर, कारणे काय दिलीत तर स्टाफ नाही. एलबीटीचा स्टाफ किती वसुली करत आहे, आयुक्त महोदय तुम्हांला पटतय काय? कारणे दिली येथे आणायची. आम्हांला हे अजिबात पटत नाही कुठेतरी षड्यंत्र वाटतय. बिल्डरने हाताशी धरुन लोकांकडुन तयार केलेला हा प्रस्ताव आहे, त्यात आपले अधिकारी व कर्मचारी त्याच्या गळयाशी लागत आहेत. जर तुमचे प्रशासन सक्षम करायचे होते तर आता तुम्ही ऐकले, नगररचनाकारांची काय बोंबाबोंब चालु आहे? सार्वजनिक बांधकाम विभागात काय चालु आहे. कर विभाग श्री. लेंगरेकर साहेब चालवु शकत नाहीत म्हणुन दुस—याला पदभार दिलेला आहे, ही अशी अवस्था आहे. आणि त्या शिक्षण मंडळावर आरोप चाललेत. तुम्ही सुरुवातीला सांगितले की लोकाभिमुख आणि ट्रान्सफरन्स प्रशासन करण्यासाठी ते ते पर्याय, मार्ग तुम्हांला घ्यावे लागतील. आम्ही सर्व तुमच्या बरोबर आहोत पण आम्ही सांगतोय म्हणुन न करता जे योग्य असेल ते करा. नाहीतर कुणाला तरी गिळंकृत करण्यासाठी आमचे अधिकारी, कर्मचारी काम

करत असतील, जे चांगले चालले आहे त्यास उध्दवस्त करायचे आणि ते पुन्हा चांगले आहे असे दाखवायचे. हा प्रस्ताव रिजेक्ट करा. तुम्ही माहिती घ्या. आता सभागृहाची तीच भावना आहे की आता हा प्रस्ताव रिजेक्ट करा. वारंवार आम्ही सांगत आहोत.

यावेळी सदस्य श्री. सुजित चक्रवर्ती हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>कमीत कमी साहेब, आम्हांला आमचा अधिकार तर वापरु दया. सर्व सन्माननिय सदस्यांनी रिजेक्ट सांगितले आहे तर मा. महापौरांना विनंती आहे त्यांनी सन्माननिय सदस्यांचा मान ठेवावा. मा. महापौरांचे आदेश असतात परंतु सन्माननिय सदस्यांचा आदर ठेवावा अशी विनंती करतो.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>सन्माननिय सदस्य, तुमचा सर्वांचा आदर ठेवुनच मी या पदावर बसले आहे. त्यामुळे हा विषय सर्वांच्या समक्ष यावा. त्यामुळे या विषयासोबतच ही सभा येथे स्थगित करण्यांत येत आहे. आणि पुढील सभा येत्या एक–दोन दिवसात घेण्यात येईल. राष्ट्रगित सुरु करतो.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>मा. महापौर महोदया, एकदा विषय रिजेक्ट केला तर असे होते काय? कायदा सांगा जरा.

<u>महापालिका सचिव :–</u>रिजेक्ट आपण सदस्यांनी केला आहे. सभा होवु शकते अदयाप यावर अंतिम निर्णय झालेला नाही. तसेच मला पीठासीन अधिकारी महोदयांनी आदेश दिला आहे. तर अंतिम काय आहे ते पीठासीन अधिकारी महोदया सर्वसंमतीने निर्णय घेतील.

यावेळी सदस्य श्री. राजेश वानखेडे, सदस्या श्रीमती जया साधवानी यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :–</u>मा. महापौरांनी असे सांगितले ना, सभा स्थगित झाली ना. सभा संपल्यानंतर तुम्ही कसा विषय घेणार परत? एकदा तुम्ही सांगितले की सभा संपली तर महापौर महोदयांनी सांगितल्यानंतर परत का तो विषय घेता? एकदा रिजेक्ट म्हटल संपला विषय ना. महापौर महोदयांनी सांगितले की सभा संपली तर विषय कुठे आला? एकदाच निर्णय घ्या ना संपली की नाही संपली, असे करुन घेवु नका स्वत:चे. चला घ्या पुढचा विषय घ्या.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>विषय रिजेक्ट झाला हा.

<u>महापालिका सचिव :–</u>विषय रिजेक्ट झालेला नाही. महापौर महोदया बोलत होत्या. तुम्ही अंतिम निर्णय घ्यायचा की हा विषय रिजेक्ट झाला की नाही. हा विषय आता स्थगित करुन पुढील सभेत चर्चेवर येईल, असे महापौर महोदयांनी सांगितले आहे. अंतिम काय तो आपला निर्णय दयावा.

<u>सदस्य श्री. राजेश वानखेडे :–</u>महोदया, आधी रेकॉर्डींग चेक करा नंतर निर्णय घ्या.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>रेकॉर्डींग चेक करा, मग विषय आणा.

<u>महापालिका सचिव :–</u>एक मिनिट, येथे खुलासा होणे अति आवश्यक आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>आपल्याला वाटेल की मी वारंवार हस्तक्षेप करतो. सदस्यांना माझी एक विनंती राहिल की आपल्याला योग्य पध्दतीने जर कामकाज चालवायचे, तर काही तरी औपचारीकता, कोणताही विषय पास झाला तर ती एक औपचारीकता सर्वांना समजेल अशा पध्दतीने त्याची घोषणाची पध्दत ठेवली पाहिजे. नाहीतर गोंधळ होवुन रिजेक्ट केले की काय केले, अंतिमत: तो विषय आला की काय केला हे संभ्रमात राहिल. मला वाटते विषयांची अंतिमत: ही कोणतरी म्हणा सचिवांनी म्हणा की कोणी म्हणा त्यांनी घोषित केल्यानंतरच त्याबद्दल निर्णय झाला. मी यातच जात नाही. तर येथुन पुढे प्रत्येक विषयाबद्दल मी म्हणतो. म्हणजे हा संभ्रम राहणार नाही की तो विषय आता तहकुब झाला की रिजेक्ट झाला.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>सचिवांनी जाहिर केले होते रिजेक्ट म्हणुन.

<u>महापालिका सचिव :—</u>नाही.

<u>सदस्य श्री. राजेश वानखेडे :—</u>रेकॉर्डींग चेक करा. विषय संपला.

<u>महापालिका सचिव :—</u>रेकॉर्डींग चेक करु. तुम्ही रिजेक्ट रिजेक्ट म्हटले. आणि नंतर मी रिजेक्ट बोलत असतांना महापौर महोदयांनी मला थांबविले, त्या म्हणाल्या मला बोलायचे आहे त्यामुळे मी पुढे थांबले. त्यांना बोलायचा अधिकार आहे.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव:—</u>तुम्हांला काय म्हणायचे आहे?

<u>महापालिका सचिव:—</u>मा. महापौरांचा निर्णय असतो, मा. महापौरांनी ठराव पास झाला की नाही जाहिर केले पाहिजे.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>राष्ट्रगितासाठी आम्हांला उभे केले आहे.

<u>महापालिका सचिव:—</u>आणि सभा सुध्दा सर्वसंमतीने तहकुब झाली पाहिजे.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>महापौर महोदया, तुमचे काय म्हणणे आहे?

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>महापौर महोदया, काय आम्ही बसावे, आपण आम्हांस राष्ट्रगितासाठी उभे केले आहे.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>तुम्ही अपमान करु नका राष्ट्रगिताचा.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>सन्माननिय सदस्य, हा विषय प्रशासनाकडुन आलेला आहे. कोणी वैयक्तीकपणे मांडलेला नाही. हा प्रशासनाकडुन आलेला आहे, सर्वांच्या हितासाठी असेल. किंवा काही विषय असतील त्यावर. आपण कोणत्याही विषयावर मान्य, अमान्य असे चर्चा करतो. जेव्हा सर्व नगरसेवक येथे उपस्थित असतील तेव्हा घेवु तोपर्यंत आज येथे या विषयास स्थगिती देवु या. मग सदरची सभा येत्या दोन तीन दिवसात घेवु या आपण.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>ठिक आहे, तुम्ही महापौर आहात. एक वेळी प्रथा पडेल तर ती पडेल. त्यामुळे प्रत्येक विषय तसाच राहिल, जर सदस्य गेल्यानंतर तुम्ही प्रत्येक वेळी सभा स्थगित करणार आहेत काय? एक सिस्टम काहीतरी ठरवा. यापुढे तसे होणार आहे काय? सदस्य निघुन गेल्यावर सभा स्थगित. आणि प्रशासनाकडुन आलेले सर्व विषय महत्वाचे आहेत आणि सर्व प्रशासन व्यवस्थित चालले आहे अशी भावना असेल तर व्यवस्थित चालेल. आतापर्यंत बोंबाबोंब झालीच नसती. प्रशासनाने सर्वच विषय व्यवस्थित हाताळले असते, तर सभागृहाचा एवढा रोष मा. आयुक्त महोदयांना पहिल्या दिवशी बघावा लागलाच नसता. प्रशासनाकडुन आले म्हणुन महत्व आहे. आणि लोकप्रतिनिधींकडुन आले तर त्याला काहीच महत्व नाही काय? तुम्ही महापौर आहात, सर्व नगरसेवक सांगत आहेत की हा विषय रिजेक्ट आहे आणि तुम्ही हा विषय प्रशासनाकडुन आला आहे, प्रशासनाला महत्व असले पाहिजे, पण बोंबाबोंब नको. आमच्या सदस्या श्रीमती साधवानी महोदयांनी सुरुवातीलाच सांगितले की प्रशासन कशाप्रकारे चालले आहे. आयुक्त महोदय हे जाणुन बुजुन चालले आहे. एकदा रिजेक्ट केल्यानंतर परत एवढे काय?

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—</u>मा. महापौर महोदया, सभागृहाची शोभा होत आहे. तर काय तो निर्णय एकदा घेवुन टाका.

<u>सदस्य श्री. राजेश वानखेडे :—</u>जनगणमन चालु करा.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>सभा स्थगित करण्यापुर्वी सभागृह निर्णय घेतो की महापौर आधिच निर्णय घेते?

<u>महापालिका सचिव :—</u>सभागृहाच्या सर्व संमतीने सभा स्थगित झाली पाहिजे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>सर्व संमतीने ना, मग महापौर महोदया कशा निर्णय घेतात?

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>ठिक आहे, ठिक आहे, मी मान्य करते. हा विषय वगळण्यात यावा.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>अमान्य करा, अमान्य करा.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>अमान्य करा. रिजेक्ट करा.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे :—</u>मा. महापौरजी, ९९ टक्के लोकांचे म्हणणे आहे की हा विषय अमान्य करावा. तर आपणांस ही पुन्हा विनंती आहे.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>हा आमच्या सभागृहाचा अपमान आहे.

यावेळी काही सदस्य एकत्रित आवाजात बोलत असल्याने कोण नेमके काय बोलत होते हे समजुन येत नव्हते.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>सर्व एकत्र बोललात तर मला काहीच कळणार नाही.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :—</u>सभागृहाचे म्हणणे आहे की अमान्य करा.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>सर्व तेच म्हणत आहेत, सर्व सभागृहाचे म्हणणे आहे. कृपया आपण आग्रह न धरता सदस्यांचा सन्मान ठेवावा.

<u>सदस्या श्रीमती राजश्री चौधरी :—</u>आयुक्त महोदय जे म्हणाले ते आम्हांला मान्य आहे.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>ठिक आहे हा विषय अमान्य करण्यात येत आहे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे :—</u>आभारी आहे.

यावेळी सदस्या श्रीमती राजश्री चौधरी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ <u>विषय क्र. ५:—</u> उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळ व सर्व शिक्षा अभियान या दोन्ही कार्यालयास महानगरपालिका मुख्य इमारतीमधील स्थानिक संस्था कर विभागात (पार्टीशन करुन) स्थलांतरीत करणे

<u>प्रस्तावना:—</u>

उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळ गेल्या ८ वर्षापुर्वी महानगरपालिकेच्या मुख्यालयात कार्यरत होते. तद्नंतर तत्कालीन मा. आयुक्त यांच्या आदेशान्वये शिक्षण मंडळ व सर्व शिक्षा अभियान हे दोन्ही कार्यालय वुडलॅण्ड कॉम्पलेक्स, सी—विंग, तिसरा मजला, उल्हासनगर—२ या ठिकाणी स्थलांतरीत करण्यात आले आहे.

तथापि, शिक्षण मंडळात कार्यरत कर्मचारी शाळांना भेट देण्याच्या नावाखाली कार्यालयातुन निघुन जातात. परंतु भेटीचा तपशिल भेट नोंदवही ख्टपेपज त्हपेजमत, मध्ये नोंद केल्याचे दिसुन येत नाही. शिक्षण मंडळातील कामकाज व कर्मचारी यांचेबाबत पालक, शिक्षक तसेच लोकप्रतिनिधी यांचेकडुन वारंवार तक्रारी प्राप्त होत असतात. वुडलॅण्ड कॉम्पलेक्स, सी—विंग, तिसरा मजला, उल्हासनगर—२ हे ठिकाण महानगरपालिका मुख्यालयापासुन दुर असल्याने प्रशासकीय कामकाजात गैरसोय निर्माण होत आहे.

त्याअनुषंगाने शिक्षण मंडळातील कामकाजात पारदर्शकता आणणे, कर्मचारी यांचेवर नियंत्रण ठेवणे इ. सोईचे होणेसाठी मनपा शिक्षण मंडळ व सर्व शिक्षा अभियान या दोन्ही कार्यालयास महानगरपालिका मुख्य इमारतीमधील स्थानिक संस्था कर विभागात (पार्टीशन करून) स्थलांतरीत करणेसाठी मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.

तरी उपरोक्त प्रस्ताव निर्णयार्थ महासभेपुढे सादर करण्यात येत आहे.

विशेष महासभा ठराव क्र: २० दिनांकः– २२/९/२०१६

**सुचकाचे नाव :श्री. राजेंद्रसिंह भुल्लर**

**अनुमोदकाचे नाव : श्री. धनंजय बोडारे**

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळ व सर्व शिक्षा अभियान या दोन्ही कार्यालयास महानगरपालिका मुख्य इमारतीमधील स्थानिक संस्था कर विभागात (पार्टीशन करुन) स्थलांतरीत करणेचा प्रस्ताव अमान्य करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही /–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापौर तथा पीठासीन अधिकारी :–ही सभा अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यांत येत आहे.

---

☑

सूचकाचे नांव :–श्री. राम पारवानी

अनुमोदकाचे नांव :– श्री. सुनिल सुर्वे

स्थगित प्रस्ताव

दिनांक २२/०९/२०१६ रोजी सांयकाळी ४.०० वाजता सुरु केलेली सभा काही कारणास्तव स्थगित करण्यास प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. २० अ दिनांक : २२/०९/२०१६

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक २२/०९/२०१६ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :–कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ६.३० वाजता महापौर श्रीमती अपेक्षा विकास पाटील यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—१९/१०/२०१६

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १९/१०/२०१६ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

# वि—२—अ

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा दिनांक २२/९/२०१६ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा स्थगित करण्यात आल्याने सदर सभा बुधवार दिनांक १९/१०/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती अपेक्षा विकास पाटील हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. अपेक्षा विकास पाटील —— महापौर

८. श्रीम. पंचशीला नाना पवार —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्री. राजु रामसिंग कंडारे | २७ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर |
| ४ | श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील | २८ | श्रीम. इंदिरा जमनादास उदासी |
| ५ | श्री. राम (चार्ली) पारवाणी | २९ | श्रीमती वंदना युवराज भदाणे उर्फ वंदना पाटील |
| ६ | श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे | ३० | श्री. दिपक लछमनदास सिरवानी |
| ७ | श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना | ३१ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी |
| ८ | श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर | ३२ | श्री. राजू किशनचंद जग्यासी |
| ९ | श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल | ३३ | श्रीम. शकुंतला जग्यासी |
| १० | डॉ. महेश गजानन गावडे | ३४ | श्रीम. जयश्री जीवनलाल जग्यासी |
| ११ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन दवणे | ३५ | श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर |
| १२ | डॉ. नीना प्रकाश नाथानी | ३६ | ॲड. शैला पांडुरंग सोनताटे |
| १३ | श्रीम. मीना कुमार आयलानी | ३७ | श्री. विजय रामभाऊ तायडे |
| १४ | श्री. राजेश नानिकराम वधरिया | ३८ | श्रीम. कांचन अमर लुंड |
| १५ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३९ | श्री. सतराम फतनदास जेसवानी |
| १६ | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा | ४० | श्रीम. जया मोहन साधवाणी |
| १७ | श्रीम. शशिकला शिवाजी आवारे | ४१ | श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे |
| १८ | श्री. भगवान शंकर भालेराव | ४२ | श्री. गुरूनो भिकोमल वलेचा |
| १९ | श्रीम. लक्ष्मी सुरेद्र सिंग | ४३ | श्रीम. माया हरेश चावला |
| २० | श्रीम. मिनू राजकुमार दासानी | ४४ | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे |
| २१ | श्रीम. वनिता बब्बू भटिजा | ४५ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| २२ | श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर | ४६ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| २३ | श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता | ४७ | श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी |
| २४ | श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती | ४८ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| २५ | श्री. गोदुमल नारायणदास किशनानी | ४९ | श्री.बी.बी. मोरे |
| २६ | श्रीम. कमला गोदुमल किशनानी | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर, २. श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड, ३. श्रीम. आशा नाना बिराडे, ४. श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर, ५. श्री. विजय खंडु सुपाळे, ६. श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी, ७. श्रीम.

शुभांगी मनोहर बेहनवाल, ८. श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी, ९. श्रीम. जया प्रकाश माखीजा, १०. श्रीम. ज्योती सुरेश कालानी, ११. श्री. गणपत गोविंद एडके, १२. श्री. उमेश सुरेश (पप्पु) कालानी, १३. श्रीम. खान इसरद सऊद, १४. श्रीम. सोनिया राजू जग्यासी, १५. श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण, १६. श्रीम. वसुधा धनंजय बोडारे,१७. श्री. धनंजय बाबूराव बोडारे, १८. श्री. सुनिल मुकुंद सुर्वे, १९. श्रीम. मंदा सागर सोनकांबळे, २०. श्री. सुरेश मधुकर जाधव, २१. श्रीम. अनिता सचिन भानुशाली, २२. श्री. रमेश महादेव चव्हाण, २३. श्रीम. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी, २४. श्री. राजेश देवेंद्र वानखेडे, २५. श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे), २६. श्री. विजय चाहु पाटील, २७. श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे, २८. श्री. प्रधान धर्मा पाटील, २९. श्री. सन्मुख ग्यानचंद मानवानी

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त
२. श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त, मुख्यालय
३. श्रीमती प्राजक्ता मि. कुलकर्णी, प्र.महापालिका सचिव
४. श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त, कर
५. श्री. राम जैसवार, शहर अभियंता
६. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
७. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
८. श्री. जाधव, उप मुख्य लेखा परिक्षक
९. श्री. सेलवन, उप अभियंता, पाणी पुरवठा
१०.श्री. हनुमंत खरात, उप अभियंता, विद्युत
११.श्री. संजय पवार, उप अभियंता, नगररचनाकार
१२.डॉ. राजा रिजवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
१३.श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त
१४.श्री. नंदु समतानी, प्र. सहा. आयुक्त
१५.श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
१६.श्री. अजित गोवारी, प्र. सहा. आयुक्त
१७.श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
१८.श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक
१९.श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
२०.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
२१.श्री. यशवंत संगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२२.श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
२३.श्री. रविंद्र बेहनवाल, स्वच्छता निरिक्षक
२४.श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त
२५.श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
२६.श्रीमती छाया डांगळे, प्र. विधी विभाग प्रमुख

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती विशाखा सावंत
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. मनिष भोवते

दुपारी ३.२० वाजता वंदे मातरम् म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :–</u>दिनांक १९/१०/२०१६ रोजीची आजची ही सभा दिनांक २२/९/२०१६ रोजीच्या विशेष महासभेची स्थगित केलेली सभा आहे.

विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. ६ :– प्रस्तावाची सूचना

महापालिका अधिकारी व कर्मचा–यांच्या सेवा फक्त निवडणूक कामकाजाकरीता वर्ग करण्याकामी पालिका सदस्य श्री.सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

**महापालिका सचिव :**–सदस्य सभेत उपस्थित नसल्याने सदरचा विषय कार्यसुचीवरुन वगळण्यात येत आहे. त्यांनी कोणाला ॲथोराईज केले आहे का, पत्र दिले आहे का?

**काही सदस्य :**–नाही.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. ६:– प्रस्तावाची सूचना

महापालिका अधिकारी व कर्मचा–यांच्या सेवा फक्त निवडणूक कामकाजाकरीता वर्ग करण्याकामी पालिका सदस्य श्री.सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**प्रस्तावना:–**

उल्हासनगर महानगरपालिका अधिकारी/कर्मचा–यांची सेवा नियमित स्वरुपाच्या इतर कामासाठी वारंवार तहसिल कार्यालयाकडे वर्ग करण्यात येत असल्याने महासभा ठराव क्र. २४, दिनांक ४/८/२००९ अन्वये फक्त निवडणूक कामासाठीच महानगरपालिका अधिकारी / कर्मचा–यांची सेवा वर्ग करणे प्रशासनास निर्देश देण्यात आले आहेत.

परंतु सद्यस्थितीतही महानगरपालिकेतील अधिकारी /कर्मचारी यांची सेवा प्रत्यक्षात निवडणूकी व्यतिरिक्त नियमित स्वरुपाचे कामासाठी तहसिलदार कार्यालयाकडे वर्ग करण्यात आली आहे.

उल्हासनगर महानगरपालिकामार्फत स्थानिक संस्था कराची वसूली महापालिका कर्मचा–यांमार्फत करण्यात येत आहेम. परंतु कर्मचारी वर्ग अपुरा पडत असल्याने इतर कामकाज व वसूलीवर विपरीत परिणाम होत असल्याने, कर्मचा–यांचे वेळेत वेतन न देणे तथा विकास कामे करण्यास अडथळा निर्माण होत आहे.

महानगरपालिका उत्पन्नाचा महत्वाचा स्त्रोत ''मालमत्ता'' कर व पाणी पट्टी'' असल्याने तहसिल कार्यालय येथे कार्यरत अधिकारी / कर्मचा–यांचे कार्यमुक्त आदेशाची वाट न पाहता संबंधीतांना त्यांचे मुळ विभागात तात्काळ रुजु होणेबाबत या प्रस्तावाच्या सुचनेद्वारे प्रस्ताव मांडत असून, त्यावर विचार व्हावा, ही विनंती.

**विशेष महासभा ठराव क्र:** २० ब **दिनांक:– १९/१०/२०१६**

**सुचकाचे नाव : श्री. जमनादास पुरस्वानी**

**अनुमोदकाचे नाव : श्री. नरेंद्रकुमार ठाकुर**

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या महापालिका अधिकारी व कर्मचा–यांच्या सेवा फक्त निवडणूक कामकाजाकरीता वर्ग करण्याकामीचा प्रस्ताव पालिका सदस्य सुनिल सुर्वे हे उपस्थित नसल्याने वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही /–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u>विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. ७ :– <u>प्रस्तावाची सूचना</u>

सेवा प्रवेश नियमानुसार उल्हासनगर महानगरपालिकेने सेवा व शर्ती नियम २०१५ मंजूर केलेले आहेत म्हणुन त्यानुसार महापालिकेतील वर्ग १ ते ४ कर्मचारी व अधिकारी यांना पदोन्नती देणेबाबतचा श्री. सुनिल मुकुंद सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

<u>महापालिका सचिव :–</u>सदस्य सभेत उपस्थित नसल्याने सदरचा विषय कार्यसुचीवरुन वगळण्यात येत आहे.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:–</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ <u>विषय क्र. ७:– प्रस्तावाची सूचना</u>

सेवा प्रवेश नियमानुसार उल्हासनगर महानगरपालिकेने सेवा व शर्ती नियम २०१५ मंजूर केलेले आहेत म्हणुन त्यानुसार महापालिकेतील वर्ग १ ते ४ कर्मचारी व अधिकारी यांना पदोन्नती देणेबाबतचा श्री. सुनिल मुकुंद सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

<u>प्रस्तावना:–</u>

उल्हासनगर महानगरपालिकेतील वर्ग १ ते ४ च्या अधिकारी/कर्मचा–यांनी पदोन्नती मिळणेबाबत महापालिका प्रशासनाकडे विनंती अर्ज दिले असून सन १९९६ च्या ततकलीन उल्हासनगर महानगरपालिका कर्मचारी सेवा शर्ती नियमानुसार महानगरपालिकेत पदोन्ती व भरती अनुशेष सन २००३ मध्ये भरण्यात आला. त्यानंतर महापालिकेचे सेवा शर्ती नियम १९९६ ला शासनाची मंजुरी मिळाली नसली तरी वरीलप्रमाणे भरती व पदोन्नती देण्यात आलेली आहे.

त्यानंतर शासनाच्या नमूना सेवा प्रवेश नियमानुसार उल्हासनगर महानगरपालिकेने सेवा व शर्ती नियम २०१५ मंजूर झालेले असून त्यानुसार महापालिकेतील वर्ग १ ते ४ मधील कर्मचारी व अधिकारी यांनी पदोन्नती देणेसाठी प्रशासनाकडे विनंती अर्ज केले आहेत. या प्रस्तावाद्वारे सुचित करण्यात येते की, संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांना पदोन्नती देणेबाबत कारवाई करणेत यावी.

<u>विशेष महासभा ठराव क्र:</u> २० क <u>दिनांक:– १९/१०/२०१६</u>

सुचकाचे नाव : श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव : श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या सेवा प्रवेश नियमानुसार उल्हासनगर महानगरपालिकेने सेवा व शर्ती नियम २०१५ मंजूर केलेले आहेत म्हणुन त्यानुसार महापालिकेतील वर्ग १ ते ४ कर्मचारी व अधिकारी यांना पदोन्नती देणेबाबतचा प्रस्ताव पालिका सदस्य श्री. सुनिल सुर्वे हे उपस्थित नसल्याने वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही /–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ८ :– <u>प्रस्तावाची सूचना</u>

अमर शहिद भगत कंवरराम साहेब यांचा पुतळा उल्हासनगर महापालिकेच्या पहिल्या मजल्यावर बसविण्याबाबत श्री. राजु जग्यासी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

<u>काही सदस्य :–</u>पास,पास......

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>मा. महापौरजी, मी आधी संपुर्ण सभागृहास धन्यवाद देवु इच्छितो की प्रस्ताव वाचल्याबरोबर सदस्यांनी संमती दाखवुन पास पास असे म्हटले. मी थोडक्यात सांगतो एक महान असे संत होते त्यांच्याबाबतीत मी थोडया शब्दात बोलु इच्छितो, ते असे संत होते की ते कुठल्याच धर्माचा व जातीचा भेदभाव करत नव्हते. प्रत्येक वेळी ते भगवंताच्या व भक्तांच्या हितासाठी रमत होते. जे कोणी भक्ती व किर्तन करत होते, जो कोणी त्यांच्या झोळीत येत होता, त्यावेळी त्यांच्यासमोर जो कोणी गरीब व गरजु, कोणत्याही धर्माचा व जातीचा येत असायचा तर ते त्यांना देत असायचे. एक महान असे संत दुवा करत होते. आणि त्यांच्या बाबतीत एक छोटीशी कहानी सांगत असत की, त्यांच्यावेळी एक महिला होती तिचा छोटा मुलगा मरण पावला होता, तर त्यावेळी त्या महिलेने त्यांच्या झोळीत तो मुलगा टाकला व त्यावेळी त्यांना सांगितले की याच्यासाठी प्रार्थना करा, त्यांना झोळी दिली. त्यांच्या शब्दात एवढी शक्ती होती, त्या संताच्या तर झोळी देता देता त्यांना माहित पडले की हा मुलगा मेलेला आहे तर त्यावेळी ते भगवंताला प्रार्थना करतात की हे देवा तुम्ही माझ्या या भक्ताची व माझी लाज राखली पाहिजे व भगवंत त्यांची लाज राखतात, ही सत्यकथा आहे. त्यावेळी त्या मुलाचे प्राण येतात तो जिवंत होतो. असे हे संत होते. त्यांच्या जीवनातून आपण काहीना काही घेवु इच्छितो. त्यासाठी मी संपुर्ण सभागृहास धन्यवाद देतो सर्वच पक्षांनी मला सहयोग दिला आहे. मी सर्वांचा आभारी आहे. मा. महापौर महोदया मी आपणांस विनंती करतो की या प्रस्तावास सर्वांनी मंजुरी दिली असल्याने मी आपणांस सुध्दा धन्यवाद देतो.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>सन्माननिय महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त महोदय, महानगरपालिका आवारातील पहिल्या माळयावर पुतळा बसविण्यासंदर्भाचा जो विषय आहे, मला वाटते की, प्रशासनाने हे स्पष्ट करावे की, असा पुतळा बसविता येतो का ही पहिली गोष्ट. आणि जर संत कंवरराम यांचा पुतळा जर बसविता येत असेल तर माझी अशी मागणी आहे, अण्णाभाऊ साठेंचा पुतळा गेली कित्येक वर्ष, ज्यांनी दलित समाजासाठी अहोरात्र मेहनत काम करुन केले आणि दलित समाजाला दिशा देण्याचे काम केले.

यावेळी सदस्या श्रीमती आशा इदनानी, श्रीमती शैलजा सोनताटे, श्रीमती वनिता भटिजा, श्रीमती वंदना भदाणे, श्रीमती कमला क्रिशनानी, सदस्य श्री. गोदुमल क्रिशनानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>मा. महापौरजी, श्री. भगवान भालेरावांनी जो मुद्दा उचलला आहे...

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>मला आधी माझे म्हणणे मांडु दया, मग तुम्ही तुमचे मत मांडा. अण्णाभाऊ साठेंचा पुतळा महापालिकेच्या आवारात न बसवता पहिल्या माळयावरच बसवावा, त्यांच्यामुळे महाराष्ट्रातील जे दलित वर्ग आहेत त्यांची मान उंचावेल असे मला वाटते. आणि या दोन्ही मुद्दयाबाबत प्रशासनाने माहिती दयावी अशी मी आयुक्त साहेबांना विनंती करतो.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :–**सन्माननिय महापौरजी, आयुक्त महोदय, श्री. राजु जग्यासींचा प्रस्ताव आलेला आहे की जे संत आहे त्या संताचा पुतळा महापालिकेच्या पहिल्या मजल्यावर सभागृहात बसवायचा आहे की सभागृहाच्या बाहेर बसवायचा आहे, फक्त पहिल्या मजल्यावर बसवावा असे आलेले आहे. मी असे म्हणेल की या उल्हासनगर शहरामध्ये बरेच संत झालेले आहेत की ज्यांचे नाव येथे घेता येणार नाही एवढे संत झालेले आहेत. आणि उल्हासनगर हे पाच ते सात लाख लोकवस्तीचे शहर आहे. तसेच या शहरात जेव्हा संत येतात त्यावेळेस टाचणी पडली तरी आवाज येईल असे या संताना मानणारा हे शहर आहे हे मी मान्य करतो. आमचा विरोध नाही आणि आमचा सहयोग सुध्दा नाही एवढे लक्षात घ्या. सन्माननिय सदस्यास मी सांगु इच्छितो माझा पुतळा बसविण्यास विरोध नाही परंतु एक लक्षात घ्या, संत बरेचसे झालेले आहेत. असे संत झालेले आहेत की लोक मरायला तयार आहेत उल्हासनगर शहराचे. तर सर्व संताची नावे घेवुन सर्व संतांना या महापालिकेत बसवायचे आहेत काय? ठिक आहे, आता श्री. भगवान भालेराव यांनी जसे सांगितले की अण्णाभाऊ साठे यांचा महापालिकेच्या आवारात पुतळा बसवायचा आहे जेथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा आहे, जेथे शिवाजी महाराजांचा पुतळा आहे. अशा पध्दतीने जे पुतळे असतील ते तेथे बसवावे. आमचा विरोध नाही, आणि संतांबाबतीत सुध्दा नाही. उल्हासनगर शहरामध्ये कित्येकवर्षी अनेक कार्य, समाजकार्य करुन माझे सुध्दा या संतांसारखे येथे पुतळा बसवितील काय? हे बरोबर नाही. म्हणुन श्री. राजु जग्यासी यांनी जो प्रस्ताव आणला त्यास माझा विरोध नाही परंतु त्यामध्ये फेरबदल झाला पाहिजे हे लक्षात घ्या. अशा संतांसाठी आमचा आदर आहे. परंतु या संतांचा पुतळा जेथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व शिवाजी महाराज यांचे पुतळे आहे ज्यांनी महान कार्य केले आहे व त्यांचे पुतळे खाली महापालिकेच्या आवारात प्रवेशद्वाराच्या बाजुला आहे, जर यांचा पुतळा तेथे लावला तर आम्हांला त्यास विरोध नाही. तर माझी विनंती आहे सभागृहाला की सभागृहाने एवढे लक्षात घेतले पाहिजे की संतांचे पुतळे कोठे लावायचे, कारण लोकशाही पध्दतीने आम्ही निवडून येतो आणि येथे काय राजकारण चालते, आणि येथे संतांचे पुतळे जर लावले, त्यांना भलेबुरे येथे जे बोलतो, काम होत नाही, जमीनीचा प्रश्न सुटत नाही, काही प्रश्न सुटत नाही, उल्हासनगर शहरात अनाधिकृत बांधकाम खुप चालत आहे. अशा थोर संतांचा या महापालिकेमध्ये पुतळे बसु नये, हे आपल्याला शोभणार नाही. आणि म्हणुन तो पुतळा खाली महापालिकेच्या आवारामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर व शिवाजी महाराज यांचे पुतळे बसविले आहे तसे अन्य पुतळे बसविण्यास हरकत नाही. धन्यवाद।

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, सभागृहामध्ये आजचा हा विषय श्री. राजु जग्यासी यांनी प्रस्तृत केला आहे. मी भारतीय जनता पक्षाच्या सर्व सदस्यांतर्फे त्यांना धन्यवाद देतो. जसे आता श्री. अण्णाभाऊ साठेबाबत श्री. भालेराव यांनी म्हटले, महात्मा फुले, भगवान झुलेलाल या सर्वांचा पुतळयाचा प्रस्तावाबाबत आधीच स्थायी समितीने मंजुरी दिली गेली आहे. हे पुतळे महापालिकेच्या आवारात जेथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आहे तेथेच लावण्याची मंजुरी देण्यात आलेली आहे. आता जो प्रस्ताव श्री. राजु जग्यासी यांनी पहिल्या माळयावर पुतळा बसविण्याबाबतचा यासाठी प्रस्ताव दिला आहे की आधीच तीन पुतळे महापालिकेच्या आवारात बसवायचे आहेत. स्थान तेच आहे, जेथे महात्मा गांधीचा पुतळा आहे तेच स्थान. जागा वेगळी असेल. सिरु चौक बोलणार तर सिरु चौकच राहणार जागा वेगवेगळी असेल. स्थान तेच आहे. श्री. राजु जग्यासी यांना मी धन्यवाद देतो आणि हे पहिल्या माळयावर पुतळा बसविण्याचा जो प्रस्ताव त्यांनी ठेवला आहे तेथेच तो झाला पाहिजे. कारण की संत कंवरराम यांची आजसुध्दा संपुर्ण भारतभर नाही तर भारतापासुन वेगळा झालेला सिंध प्रांतमध्ये सुध्दा हिंदु व मुस्लीम हे संत कंवरराम यांची पुजा करतात व त्यांना मानतात. ते अस दर्वेश फकीर होते. त्यांनी समाजासाठी संपुर्ण जीवन समर्पीत केले. त्या महान खुर्चीवर बसुन देव बनुन त्यांनी कधीच स्वत:ची पुजा करुन घेतली नाही. एक समाजसेवक म्हणुन संतासारखे काम करुन त्यांनी धर्माचा विचार केला आणि मानवता वाढविण्यासाठी त्यांनी काम केले. एक प्रकारे मनुष्य मनुष्याच्या कामी येईल. याचा प्रचार त्यांनी केला. आज संपुर्ण हिंदुस्तानमध्ये ३७२ स्थानामध्ये पुतळे लागले आहे व त्यांना पुजले जाते. त्यांच्या जन्म उत्सवाच्या वेळी व ज्यावेळेस त्यांचा मृत्यु झाला त्या त्या पुण्यस्थितीच्या वेळी त्यांची पुजा केली जाते, प्रसाद व भंडारा दिला जातो. असा संत ज्यास देवाचा दर्जा म्हटले तरी कमी आहे त्यांचा पुतळा येथे लावला जावा. जेव्हा भारताचे विभाजन झाले, त्यावेळी सिंध प्रांतातुन जास्तीत जास्त सिंधी आले व उल्हासनगरमध्ये वसले, तरी आज सुध्दा कुठल्याही चौकाचे नाव झुलेलाल चौक नाही आहे. कल्याणमध्ये जेथे उल्हासनगर मधुन ५००० व १०००० सिंधी तेथे वसले आहेत तेथे फारच सुंदर चौक, झुलेलाल चौक बनविण्यात आलेला आहे. उल्हासनगरमध्ये श्री. राजु जग्यासी यांच्या प्रभागात साई कंवरराम चौक आहे. त्यांनी ते सुशोभित केला आहे त्यासाठी त्यांना धन्यवाद देतो. त्यांचा जो प्रस्ताव येथे आणला आहे, तो झाला पाहिजे. मी श्री. भगवान भालेराव व बाकी सदस्यांना सुध्दा निवेदन करेल की हा प्रस्ताव सर्वसंमतीने होईल तर बरे होईल, शहराचे भले होईल. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :</u>—मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, आज श्री. राजु जग्यासी यांनी जो प्रस्ताव आणला जो उल्हासनगर महापालिकेच्या सभागृहाच्या बाहेरातील पटांगणात संत भगत कंवररामची प्रतिमा बसवायची आहे, तर आजच्या या स्थगित सभेत राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्यावतीने शहिद संत भगत कंवरराम यांचा पुतळा बसविण्यासाठी सभागृहास विनंती आहे की एकमताने व सर्वसंमतीने हा प्रस्ताव पारीत करण्यात यावा. कारण या सभागृहास मी सांगु इच्छितो की जेव्हा पार्टीशनच्या आधी त्यांना शहिद नाव दिले, पार्टीशनच्या आधी हिंदु मुस्लिम विवाद संपुर्ण भारतभर सुरु झाले होते त्यावेळी त्यांच्यावर खुप दबाव पडला होता, मुस्लिम बनविण्यासाठी. परंतु त्यांनी हिंदुत्व व ती जागा सोडली नाही. त्यावेळी त्यांना दोन गोळया मारण्यात आल्या. या विवादामुळे की ते हिंदुचे मुस्लीम बनु इच्छित नव्हते. अशा महान कर्मयोगी व अशा शहिदास योग्य जागा मिळाली पाहिजे, व भविष्यात जे कोणी लोकप्रतिनिधी निवडून येतील,सभागृहामध्ये शहरातील कार्य करतील, तर अशा प्रतिमेस पाहुन त्यांना नमन करुन त्यांच्याकडुन प्रेरणा घेतील. मा. महापौर महोदया आपणांस मी सांगतो नुकतेच चार महिन्यापुर्वी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस साहेबांनी अमरावतीत १०० कोटीचा शहिद भगत कंवराम धर्मस्थानचा प्रस्ताव पारीत केला आहे व त्याचे भुमीपुजन सुध्दा झालेले आहे. त्याचा मुर्हुर्त सुध्दा झाला आहे व फारच गतीमानतेने काम चालु आहे. व पुढील निवडून येणारे २०१७ मधील लोकप्रतिनिधींकडुन त्याचे उद्घाटन सुध्दा होईल. जर महाराष्ट्राचे सरकार या शहिद भगत कंवररामसाठी १०० कोटी खर्च करते, तर उल्हासनगर शहरामध्ये सुध्दा त्यांचा पुतळा असला पाहिजे. त्यांच्याकडुन प्रेरणा घेण्यासाठी महापालिकेच्या सभागृहाच्या बाहेरील जी जागा आहे तेथे त्यांचा पुतळा व नाव आले पाहिजे, असे मी सभागृहास, आदरणीय श्री. भालेराव व श्री.बी.बी.मोरे यांना निवेदन करतो की यास सर्वसंमीने पारीत करण्यात यावे. धन्यवाद।

<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :</u>—मा. महापौर महोदया, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, मी श्री. राजु जग्यासी यांना धन्यवाद देते की त्यांनी असा प्रस्ताव आणला हा प्रस्ताव फारच आधी यावयास पाहिजे होता. सर्वांनी त्याबद्दल स्वत:चे मत मांडले आहे. तर मी कॉंग्रेस पक्षाच्यावतीने खात्री देते की आमचे सर्वांचे समर्थन आहे. तसेच लवकरात लवकर इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता यावर कार्यवाही झाली पाहिजे. मा. महापौरजी अशी मी आपणांस विनंती करते.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :</u>—मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सर्व पक्षांनी आपापले विचार मांडले. सर्वांचे तेच मत आहे. श्री. राजुजी यांना सर्व पक्षाचे नेते, सर्व दलांनी जे समर्थन दिले आहे. महाराष्ट्र शासनास सुध्दा आम्ही धन्यवाद देतो. श्री. देवेंद्र फडणवीस यांनी १०० कोटीचा प्रस्ताव पारीत करुन तेथे कंवराराम यांचे स्थान बनविणे सुरु केले आहे. श्री. देवेंद्र फडणवीस यांना मी धन्यवाद देतो त्यांनी चांगले कार्य केले. मी व माझ्या पक्षाच्यावतीने श्री. राजु जग्यासी यांच्या प्रस्तावास संपुर्णपणे समर्थन आहे.

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :</u>—मा. महापौर महोदया, आज श्री. राजु जग्यासी यांनी जो प्रस्ताव टाकलेला आहे, आमचे समर्थन आहे त्यास. परंतु त्याबरोबर मला एवढेही बोलायचे आहे की एक तरतुद आपणाकडे झालेली आहे, शिवाजी चौकामध्ये शिवाजी महाराजांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्याचा प्रस्ताव सुध्दा पारीत झालेला आहे. याबरोबर त्या प्रस्तावाचा सुध्दा पुर्णपणे विचार करण्यात यावा ही माझी आपणांस विनंती आहे.

<u>काही सदस्य:</u>—पास, पास, पास....

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :</u>—माझ्या प्रश्नाचे प्रथम प्रशासनाने उत्तर दयावे.

<u>श्री. जैसवार, शहर अभियंता:</u>—मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य व पत्रकार बंधु, संत कंवरराम यांच्या पुतळयाविषयी मी सांगु इच्छितो की पुतळा बसविण्यासाठी एक प्रकारचा शासन निर्णय आहे, त्यामध्ये लिहिले आहे की कोणताही पुतळा जर आपणांस बसवायचा असेल तर जिल्हास्तरीय जी समिती आहे त्यांचे काही मार्गदर्शक तत्व आहेत, त्यांच्या मार्गदर्शक तत्वाचे परिपुर्ण पालन केल्यानंतर जेव्हा आपण मंजुरी देणार तेव्हा शासनाची मंजुरी घेण्यासाठी तेथे प्रस्ताव पाठवुन त्याची मंजुरी घ्यावी लागते. त्यासाठी या प्रक्रियेतुन आपणांस पुढे जावे लागेल. आपण या प्रस्तावास मान्यता दिल्यानंतर आपण ही सर्व प्रक्रिया पुर्ण करु.

<u>महापालिका सचिव:</u>—पास?

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>मा. सचिव महोदया, आता यांनी जसे म्हटले तसे प्रस्ताव नमुद करुन आले पाहिजे.

<u>महापालिका सचिव:–</u>मी ठराव वाचुन दाखविते.

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या अमर शहिद भगत कंवरराम साहेब यांचा पुतळा उल्हासनगर महापालिकेच्या पहिल्या मजल्यावर शासन मान्यतेच्या अधिन राहुन मान्यता देत आहे.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :–</u>इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करावा.

<u>श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त:–</u>२ फेब्रुवारी २००५ चे जे शासन निर्णय आहे त्याच्या अटींची पुर्तता करुन शासन मान्यतेच्या अधिन राहुन मान्यता देण्यात येईल.

<u>महापालिका सचिव :–</u>ठिक आहे. २ फेब्रुवारी २००५ चे शासन निर्णयाच्या अटींची पुर्तता करुन शासन मान्यतेच्या अधिन राहुन मान्यता देत आहे.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :–</u>ठिक आहे, इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करुन पाठपुरावा करावा.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:–</u>प्रशासनाकडुन त्याचा वेळेवर पाठपुरावा झाला पाहिजे.

<u>महापालिका सचिव :–</u>ठिक आहे? सर्वानुमते? पास?

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :–</u>होय, होय.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ <u>विषय क्र. ८:–</u> <u>प्रस्तावाची सूचना</u>

अमर शहिद भगत कंवरराम साहेब यांचा पुतळा उल्हासनगर महापालिकेच्या पहिल्या मजल्यावर बसविण्याबाबत श्री. राजु जग्यासी यांचा प्रस्ताव विचारात घेणे

<u>प्रस्तावना:–</u>

उपरोक्त विषयान्वये मी आपणांस सूचना देतो की, उल्हासनगर महानगरपालिकेच्या पहिला मजल्यावरील मोकळया जागेत आमच्या समाजाचे थोर संत अमर शहिद भगत कंवरराम साहेब यांचा पुतळा बसविण्याबाबत महासभेत प्रस्ताव मांडत आहे.

तरी सदर अशासकिय प्रस्तावावर येत्या महासभेत सविस्तर चर्चा होवून निर्णय होण्याकरीता विनंती आहे.

<u>विशेष महासभा ठराव क्र:</u> २१ <u>दिनांक:– १९/१०/२०१६</u>

सुचकाचे नाव : श्री. राजू जग्यासी

अनुमोदकाचे नाव : श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या अमर शहिद भगत कंवरराम साहेब यांचा पुतळा उल्हासनगर महापालिकेच्या पहिल्या मजल्यावर २ फेब्रुवारी २००५ चे शासन निर्णयाच्या अटींची पुर्तता करुन शासन मान्यतेच्या अधिन राहुन मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही /—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u>सदरची सभा संपली आहे. दोन मिनिटे, २१ ऑक्टोंबर रोजी आपला काही कार्यक्रम आहे, त्याविषयी महापौर महोदया आपणांस काही सांगतील.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>मा. सदस्य, मा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १२५ व्या जयंती व उल्हासनगर महापालिकेच्या २० व्या वर्धापना दिनानिमित्त २१ ऑक्टोंबर, २०१६ रोजी जनरल अरुणकुमार वैद्य सभागृह येथे उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील विशेष प्राविण्य संपादन करणा—या व्यक्तींचा गुणगौरव व पुरस्कार करण्यात येणार आहे. त्यासोबत सांस्कृतिक कार्यक्रम सुध्दा आहे. माझ्याकडुन सर्व सदस्यांना विनंती आहे की सर्वांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे.

<u>महापालिका सचिव :—</u>दुसरी सभा ४.०० वाजता सुरु होईल. सभा सुरु व्हायला पाच मिनिटे आहेत.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>थोडा वेळ मी बोलु का, सभा सुरु व्हायला वेळ असल्याने मी महत्वाचे काही सांगु इच्छितो. थोडा वेळ आपणाकडे आहे म्हणुन परखड जी वस्तुस्थिती आहे आपली त्याची जरा सर्वांनी जाणीव करुन घेणे आवश्यक आहे. सर्वांना माहिती आहे परंतु मोघम माहिती आहे की आपणाकडे बजेट डिफीसीएंट आहे. परंतु या संदर्भात सविस्तर माहिती जर आपणा सर्वांना झाली, तर आम्ही जी मोहिम सुरु करणार आहे, आपले रिव्हेन्यु वाढविणेसाठी किंवा जे काही उत्पन्न आहे ते वसुल करण्यासाठी तर सर्वांचे सहकार्य देखील आपणाकडे मौल्यवान असणार आहे. कारण प्रशासन सर्वपरी आपले प्रयत्न करेल, सर्व कौशल आम्ही पणाला लावु. परंतु सविस्तर माहिती जर आपणांस असली तर आपणांसही नागरीक भेटायला येतात त्यावेळी ते आपल्याशी संवाद साधतात त्यामुळे हा विषय आपल्या दृष्टीने प्रायोरेटीचा असावा. अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. थोडक्यात माहिती जर आपणांस दयायची झाली तर आपल्याकडे जे उत्पन्नाचे महत्वाचे जे साधन आहे, त्यात मालमत्ता कर यामध्ये सेल्स टॅक्स खुप मोठी गळती आहे. त्यामध्ये आपणाकडे थकबाकी प्रलंबित आहे. यात सविस्तर जर माहिती घेतली तर आपणाकडे काही मालमत्तांची कर आकारणी करायची राहिली आहे. जेवढया मालमत्ता रेकॉर्डवर आहेत याची संगणकाद्वारे माहिती आम्ही तयार केली. जो काही डेटा आहे तो ऑनलाईज केला, शॉर्टींग केला आणि एकुण १ लाख ७० हजार मालमत्तांचे व्यक्तीनिहाय मालमत्तेची थकबाकी किती आणि चालु किती याची मागणी केली, त्याची सविस्तर माहिती काढली. ज्यांनी थकबाकी भरलेली आहे असे आपण एकुण वगळले. १ लाख ७० हजार मालमत्तांमधुन ज्यांची थकबाकी शिल्लक आहे मग ती एक रुपयापासुन जवळपास साडेआठ, नऊ कोटी रुपयापर्यंत, या सर्वांची माहिती काढली तर ९६ हजार ९५ हे आपले मालमत्तांचे थकबाकी धारक आहेत, १ लाख ७० हजारपैकी. चालुचे तर जवळपास सर्वच आहेत. आपण सध्या फक्त थकबाकीधारक म्हणतो ज्यांची १० वर्षापुर्वीची मालमत्ताची वसुली येणे बाकी आहे. आता याची एकुण आकडेवारी जर घेतली तर ९६ हजार ९५ मालमत्ता धारकांकडुन २५६ कोटी ७२ लाख रुपये वसुल करायचे आहे. जर सरासरी काढली तर प्रत्येक या ९६ हजार ९५ मालमत्ता धारकांकडुन प्रत्येकी एव्हरेज २६ हजार ७१५ रुपये येणे बाकी आहे. यात रेंज आहे जसे मी आता आपणांस सांगितले की एक रुपयापासुन साठेआठ कोटी रुपये याचे परत आम्ही वर्गवारी केली. १० लाखाच्या वरचे किती मालमत्ताधारक आहेत, ५ ते १० लाख किती आहेत, अडीच ते ५ किती, १ ते अडीच किती, ५ हजार ते १ लाखात किती आणि २५ हजार ते ५० हजार, ५ हजारापेक्षा खाली किती, असे ९ त्याचे गट केलेत. १० लाखाच्या वरचे जे लोक आहेत ते एकुण ४७ लोक आहेत. आपले एकुण ८ युनिट आहेत, हे पुर्ण शहराचे काढले. युनिटवाईज सुध्दा आपला आता डेटा तयार झाला आहे. १० लाखाच्या वर ४७ लोक आहेत, या ४७ लोकांकडुन २३ कोटी ३२ लाख रुपये येणे आहे. नंतर ५ लाख ते १० लाख अशी जी थकबाकी आहे असे ८८ लोक आहेत. त्यांच्याकडुन ५ कोटी ८६ लाख रुपये येणे बाकी आहे. अडीच लाख ते पाच लाख ची जी

वसुली आहे, थकबाकी आहे असे २९९ लोक आहेत. त्याची थकबाकी ९ कोटी ९४ लाख रुपये आहे. एक लाख ते अडीच लाखात २३४२ लोक आहेत. त्यांच्याकडुन वसुली ही ३२ कोटी ४७ लाख रुपये येणे आहे. ५० हजार ते १ लाख मध्ये ८६२१ थकबाकी धारक आहेत. त्यांची वसुली ५७ कोटी ७७ लाख आहे. २५ हजार ते ५० हजार या दरम्यान २२ हजार लोक आहेत. यांची वसुली ७९ कोटी ७८ लाख रुपये आहे. १० हजार ते २५ हजारात १७ हजार ३१० लोक आहेत. २९ कोटी ४५ लाख रुपये आहेत. ५ हजार ते १० हजाराच्या वसुलीत १५ हजार ३२२ लोक आहेत. त्यांचे १० कोटी ७९ लाख होतात. आणि ५ हजारपेक्षा कमी जे आहेत त्यात २९ हजार ७६२ वसुलीधारक आहेत. त्यांची वसुली ७ कोटी ३२ लाख आहेत. अशा प्रकारे वेगवेगळया कॅटेगरीमध्ये हे थकबाकीधारक ९६ हजार लोकांपर्यंत आम्हांला पोहचायचे आहे. आणि त्यांच्याकडुन ही वसुली करायची आहे. त्याची सुरुवात ज्यांची जास्त थकबाकी आहे तेव्हापासुन आपण करणार आहोत. त्याच्यामध्ये ज्या काही उपाययोजना आहेत, जसे मी नेहमी म्हणतो त्यांच्याशी आधी संवाद साधु आणि त्यांना समजावुन सांगु की मालमत्ता वसुली, तुमचे जे काही विकासाची कामे आहेत त्यास हातभार लागणार आहे आणि त्याबद्दल प्रशासनास जाब विचारण्याची अधिकार देण्याची बाब आहे. त्यामुळे हे तुमचे तुम्हीच भरले पाहिजे, असा संवाद साधुन आणि त्यांच्याशी योग्य समन्वय साधुन वसुल नाही झाले तर सक्तीचे उपाय करावे लागतील. काही कोर्ट केसेस सुध्दा झालेले आहेत, त्यात स्थगिती असतील तर त्याही बाबी आम्ही विधी विभागाकडुन तपासुन घेवु. आणि यामध्ये कोर्टमार्फत त्यांचा स्टे वॅकेट करुन घेणे, त्यांना स्थगिती न मिळणे कारण हया थकबाकी आपण निश्चित केलेल्या आहेत. त्यात अमाउंट बद्दल काही वाद असू शकतो काही मालमत्ताबद्दल असू शकतो परंतु थकबाकी ही केवढया वर्षाची आहे हे नक्की आहे. त्यामुळे आपणांस याबद्दल कठोर पावले उचलण्याची गरज आहे. आणि मी तर म्हणेल की ९६ हजार १ लाख ७० हजार पैकी मालमत्ताधारक आहेत तर ६० टक्के पेक्षा जास्त लोक थकबाकीधारक आहेत. आणि जवळपास आपल्याला ३० टक्के ते ३५ टक्के मालमत्तेची आकारणी होणे बाकी आहे. हा एक महत्वाचा विषय आहे आणि जवळपास ५६ कोटी आपले जर वसुल झाले तर यावर्षीचा जो अर्थसंकल्प आहे त्याची सुध्दा मी आपणांस माहिती सांगतो की पुढील सहा महिन्यामध्ये आपले जे महसुल जमा होणार आहे, त्यातुन जो आपला आवश्यक खर्च आहे तो वजा जाता आपल्या तिजोरीमध्ये फक्त २० ते २५ कोटी रुपये ठेकेदारांचे बिल देण्यासाठी शिल्लक राहणार आहे. आणि जे कामे आपण सुरु केलेली आहेत, त्याची बिले आता आलेली आहेत तर त्यांची संख्या जर विचारात घेतली तर २०० कोटीपेक्षा जास्त आपल्याला बिलांची पुर्तता करावी लागणार आहे. म्हणजे जेवढा आपला खर्च आहे त्यापेक्षा फक्त १० टक्के रक्कम आपल्या तिजोरीत मार्च अखेरपर्यंत शिल्लक राहणार आहे. ही खुप गंभीर बाब आहे, वास्तविक आपण ज्यावेळेस कामे देतो त्यावेळेस आपल्या महसुलीचा विचार आपण करायला पाहिजे. आपले बजेट तेवढे नाही तर किमान थकबाकी वसुल करुन तेवढे काम करायला पाहिजे. तर ही परखड डोळयात अंजन घालणारी वस्तुस्थिती आपण सर्वांनी लक्षात घ्यावी आणि या मालमत्ता कराबाबत कोणी जर आपणांस एप्रोच झाले तर किंवा कोणी माफीची मागणी केली तर किमान आपण याबाबत प्रशासनाच्या सोबत राहुन मालमत्ता कर लवकरात लवकर या थकबाकीधारकांकडुन कसा वसुल करता येईल, त्याबद्दल आपण सर्वांनी सहकार्य करावे. अशी आम्ही अपेक्षा करतो आणि सर्व माहिती आम्ही वस्तुनिष्ठ जेवढी शक्य होईल तेवढी एक्युरेट काढली आहे, थोडाफार काही जणांच्याबाबत १९—२० होवु शकते. २—४—५ सोडले तर बाकी २५६ कोटी आणि हे ९६ हजार ९५ थकबाकीधारक यांच्यामध्ये फारसा काही बदल याठिकाणी होणार नाही. याबद्दल थोडया काही आपल्याही भावना असतील तर मी याठिकाणी माहित करुन घेण्यास उत्सुक आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**मा. आयुक्त महोदय,आपण ही जी आकडेवारी दिलेली आहे यामध्ये पहिले पाच जे ५० हजाराच्या वर आहेत, ५० हजार ते १ लाख, १ लाख ते अडीच लाख, अडीच लाख ते ५ लाख आणि ५ ते १० लाख तसेच १० लाखापेक्षा जास्त असे जे मालमत्ताधारक आहेत ते ११ हजार ३९७ असे आहेत. आणि आपण जे २६६ कोटी सांगितले त्यातुन २९ कोटी त्यांच्यावर आहेत. तर माझ्या मते ५० हजाराच्यावर वाल्यांवर प्रथम आपण कारवाई कराल, तर आमचे ५० टक्के जे महसुल येते १२९ कोटी ४६ लाख व आम्हांस कामही कमी करावे लागते. तर ९० हजार मालमत्तात आपल्याला जावे लागते तर हया ९० हजार मालमत्तेऐवजी ११ हजार मालमत्ता जर पाहिल्या तर १० हजाराच्या वर असलेले आपणाकडे रक्कम लवकर येईल.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**जेवढे काही आपणाकडे मालमत्ताधारक आहेत, त्यातुन १० टक्के म्हणजे जसे आपण म्हणालात ११ हजार, ९६ हजाराच्या तुलनेने कमी टक्के आहेत. आणि त्यांच्याकडे रक्कम ५० टक्केपेक्षा जास्त आहे. त्यापध्दतीने आपण काम करु.

<u>सदस्य श्री.बी.बी.मोरे :—</u>सन्माननिय महापौरजी, आयुक्त महोदय, आज तुम्ही महासभेत कराच्यावसुलीबाबत जे सर्व समजुन सांगितले सर्व सदस्यांना तर माझी विनंती आहे, सर्व सन्माननिय सदस्यांच्या समोर मी सांगु इच्छितो, एवढी कर वसुली का झालेली नाही, ही किती वर्षाची वसुली आहे? आणि त्या वसुलीसाठी कोण जबाबदार आहे? त्यांना वसुली का करता आली नाही? हा एक प्रश्न आहे, कारण ही जर वसुली पहिल्यापासुनच जर झाली असतील तर आज तुम्ही जी आकडेवारी सांगितली, ४० लोक एवढे आहेत, हे ५० लोक एवढे आहेत, १० लोक एवढे आहेत, ५ लोक एवढे आहेत तर साहेब हे राहिले नसते. म्हणजेच या महापालिकेमध्ये जी वसुली करायची होती, ती वसुलीकडे कोणी लक्ष दिलेले नाही. त्यामुळे एवढी वसुली राहिली आणि आज येणारा मार्च महिना, त्यावेळेला आपली आर्थिक परिस्थिती काय होईल, आज तुम्ही सांगितले परंतु हेच अगोदर झाले असते, कारण आले अधिकारी जेव्हा वसुलीला जातात, त्याच्याकडे ना लाख, दोन लाख, चाळीस लाख असेल, त्यांनी सांगितले काही नाही, आमची परिस्थिती गंभीर नाही आहे. पाच हजार घ्या, दहा हजार घ्या, अशा पध्दतीने करुन हे सर्व एवढे भुर्दंड राहिलेले आहे. म्हणुन माझी विनंती आहे, कारण आपण ज्या पध्दतीने म्हणत आहोत एवढी वसुली झाली तर महापालिकेत हे करता येईल. परंतु नविन कराबाबतीत देखील, सर्व्हेच्याबाबतीत काय आहे? साहेब, जर नविन सर्व्हे केला तर तुम्ही जे म्हणत आहात करोडो तर काय अब्ज वसुल होतील. जी लोक बिना भाडयाने राहत आहेत, त्यांना काय आवश्यक आहे, ते म्हणतात महापालिकेची जागा आहे, कर देत नाहीत आम्हांला काय करायचे आहे. हा कोणी विचार केला पाहिजे तर शासनाने. महापालिकेने विचार केला पाहिजे की आपले हे उत्पन्न कोठुन निघेल? हे केले पाहिजे, हे कोणी विचारात घेत नाही. आणि म्हणुन मला एवढेच म्हणायचे आहे साहेब, वसुली करायची झाली तर ती काटेकोरपणे केली पाहिजे. नाहीतर बिल्कुल फक्त आकडेवारी दाखवतील, वसुली केली जाणार नाही आणि मग मार्च महिना आल्यानंतर येरे माझ्या मागल्या असे होईल, धन्यवाद।

<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u>आयुक्त महोदयांच्या म्हणण्याप्रमाणे कराबाबतीत आम्ही त्यांचे समर्थन करतो. साहेब, मी आपणांस सांगु इच्छिते की संपुर्ण इमारतीच्या इमारती सर्व्हे झालेल्या नाहीत. माझ्याच पॅनलमध्ये मी ब—याचदा पत्र दिलेले आहे की ही ही इमारतीवाले माझ्याकडे आले होते ते सर्व्हे करु इच्छितात परंतु लक्ष दिले जात नाही.  आणि साहेब, दुसरे म्हणजे मी नियोजन समितीची सभापती सुध्दा आहे त्यामुळे मी आपणांस दुस—या विषयाकडे घेवुन जाते की येथे २००५ मध्ये जे आधीची बांधकामे बनली आहेत, आमच्या मा. मुख्यमंत्री महोदयांनी फॅक्स काढला आहे की, त्यानुसार हजारो लोकांनी बांधकामे नियमाधीन करण्यासाठी फॉर्म भरला आहे. ते पेमेंट भरण्यासाठी तयार आहेत. येथे हजारो करोडो रुपये भरण्यासाठी लोक तयार आहेत. आमचा विभाग दुस—या माळयावर आहे परंतु तेथे कोणीच बसत नाही. कलेक्टरांजवळ काय क्युरी आहे त्यावर कधीही कोणीही पत्रव्यवहार केलेला नाही. साहेब, फक्त कर विभागाचेच पैसे नाही तर साहेब त्या विभागाकडुन सुध्दा पैसे येवु शकतात, आपण जी आकडेवारी दाखवत आहात त्याच्यापेक्षाही, हजारो—करोडोपेक्षा जास्त लोक भरायला तयार आहेत. नियमाधीनबाबतचे रजिस्टर आपण पहा त्यावेळी किती फॉर्म भरले गेले होते. आणि किती रिजेक्ट केले गेले होते, ज्यांचे फॉर्म स्विकारण्यात आले होते त्यांना एक एक कागद व एक एक पत्र देवुन मग एंन्ट्री करण्यात आली होती. त्यांना एक्सप्टंट सुध्दा दिले गेले होते. ते लोक पैसे भरण्यास तयार आहेत. फक्त कलेक्टर महोदयांकडे आपणांस जायचे आहे.  साहेब, आपण आज जाहिर करा उदयापासुन लाईन लागेल. कारण लोक आमच्याकडे येवुन सांगतात.  तर हे सुध्दा आपल्या लक्षात आणुन देणे महत्वाचे होते, धन्यवाद।

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>मा. महापौर महोदया, फक्त दोन मिनिटांसाठी मी बोलत आहे.  आयुक्त महोदयांनी जे काही मुद्दे येथे मांडले की, २६६ वसुलीधारकांकडुन वसुली करणार.  त्यांनी भाग बनविले आहेत, १० लाखापासून ५ लाखापर्यंत.  मी आयुक्त महोदय यांचे लक्ष केंद्रीत करण्याचा प्रयत्न करेल की, आता जी एलबीटी आपली बंद झाली आहे त्यात आपले साडेतीन कोटीचे नुकसान झालेले आहे, जर जकातीत त्याची तुलना केली तर. जेव्हा श्री. खतगांवकर साहेब आयुक्त म्हणुन होते तेव्हा त्यांनी म्हटले होते की हा जो कर आहे तो लोकांनी स्वत:हुन भरला पाहिजे. आज जर भरला नाही तर १० वर्षांनी देखील हा कर येईल. त्यात असे आहे की येथे १७ लोक निलंबित झाले आहेत एलबीटी कर वसुलीत. तसेच उच्च न्यायालयाचे रिट पिटीशन नं. १६३८ मध्ये आम्ही ॲफिडेव्हीड केले आहे, त्याची मी प्रत देतो.  त्यात आम्ही म्हटले आहे की ६८ कर्मचारी व १२ अधिका—यांवर चौकशी केली तर आपणांस माहित पडेल, त्याबद्दल ॲफिडेव्हट केलेली संचिका मी आपणांस देतो. हे श्री. युवराज भदाणे यांनी हे ॲफिडेव्हीट फाईल केली परंतु त्यांवर त्याच्यावर काहीही कार्यवाही झालेली नाही. आज आपण येथे आला आहात, आपण नविन आहात, आपणासाठी हे चांगले मार्गदर्शन असेल, याद्वारे आपण महापालिकेचे कसे उत्पन्न वाढवु शकतात. उत्पन्न जर येईल तरच विकासाचे काम होईल. यागोष्टीकडे लक्ष देणे आवश्यक आहे की केवळ १७ लोकांना निलंबित करण्यात आले

आणि १२ अधिका–यांच्याबाबतीत सांगण्यात आले की त्यांच्यावर चौकशी बसविण्यात येईल. ते सुध्दा उच्च न्यायालयात फाईल करण्यात आले परंतु आजपर्यंत त्यावर काहीच चौकशी बसविली नाही. तर हा तपासणीचा विषय आहे. ही संचिका आपणाकडे देतो. त्यावर आपण अभ्यास करा.

महापौर तथा पीठासीन अधिकारी :–सन्माननिय सदस्य, दोन सेकंद व दोन मिनिटांचे पाच मिनिट घेतले.

सदस्य श्री. जीवन इदनानी :–मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त महोदय, आपण फारच चांगले काम करत आहात वसुलीबाबत. पण मी असे म्हणेल या मोहिमेबरोबरच आपणांस सांगेल की ब–याच ठिकाणी कर आकारणी झालेलीच नाही. आपल्या कर विभागामार्फत वसुलीबाबत अनेक चुका झालेल्या आहेत. त्या चुकांमुळे लोकांना वर्षानुवर्षे भटकावे लागत आहे. लोकांना व्हीजीट मिळत नाही, कर आकारणी केली जात नाही. जर आपणांस बरोबर कारभार करायचा असेल तर लोक जे आपल्या चुकांमुळे भुगतत आहेत आपल्या चुकांमुळे. लोक त्रस्त आहेत. कर आकारणी झालेली नाही, वसुली बरोबर होत नाही. लोकांना भटकावे लागते. तर मी आपणांस म्हणेल की या मोहिमेबरोबरच कर आकारणी ही सुध्दा मोहीम चालु करावी. जेणेकरुन लोक व्यवस्थित कर भरतील व लोकांना भटकावे लागणार नाही. तर मी आपणाकडुन अपेक्षा करेल की हया दोन्ही मोहिम सोबत सुरु कराव्यात. धन्यवाद।

सदस्य श्री. राजु जग्यासी :–मी एक सेकंद घेईल, मा. महापौरजी. साहेब, मी फक्त आपणांस याविषयी माहिती देवु इच्छितो, मी यापुर्वी सुध्दा हा विषय सभागृहात उचलला आहे, आपण म्हणालात की ३० ते ३५ टक्के कर आकारणी होणे बाकी आहे. एकदम बरोबर आकडा नाही सांगु शकणार परंतु माझी सूचना असेल याबाबत यापुर्वी सुध्दा मी सभागृहात सांगितले की आमच्या शहरातील माहिती एमएसईबी विभागाकडुन जर घेतली की किती मिटरधारक आहेत व किती लोकांच्या घरात विद्युत मिटर चालु आहे, तर आपणांस लगेच त्याचा फरक कळेल. उदाहरणार्थ जर एक लाख मिटर आपल्या एमएसईबी विभागाने दिले आहेत आणि आपणाकडे ८० हजाराची आकडेवारी आहे तर कोठे ना कोठे २० हजाराचा आकडा आहे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–आम्ही ती घेतली आहे, ती सव्वा दोन लाख आहे.

सदस्य श्री. राजु जग्यासी :–सव्वा दोन लाख आहे, त्याबरोबरच ग्राहक.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–ते दोन लाख ७० हजार आहे.

सदस्य श्री. राजु जग्यासी :–ठिक आहे, दोन लाख ७० हजार आहे. मग साहेब आपणांस याच्यातुन माहित पडेल की कॅम्प नं. १ मध्ये किती आहे, २ मध्ये किती आहे आणि जर आपण कर्मचा–यांना माहिती देतो....

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–जेव्हा हे कॅलक्युलेशन येते की एका मालमत्तेत दोन दोन मिटर असेल तर ती जागा सोडली जाते.

सदस्य श्री. राजु जग्यासी :–होय, ते सोडुन, ठिक आहे साहेब.

महापौर तथा पीठासीन अधिकारी:–सचिव महोदया, दुस–या सभेस सुरुवात करा. ही सभा संपली.

सायंकाळी ४.०० वाजता महापौर श्रीमती अपेक्षा विकास पाटील यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—२५/११/२०१६

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि.२५/११/२०१६ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

वि—३

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा शुक्रवार दिनांक २५/११/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती अपेक्षा विकास पाटील हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. अपेक्षा विकास पाटील —— महापौर

९. श्रीम. पंचशीला नाना पवार —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीम. नेहा (बेबी) नंदकुमार भोईर | ३२ | श्रीमती वंदना युवराज भदाणे उर्फ वंदना पाटील |
| ४ | श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३३ | श्री. दिपक लछमनदास सिरवानी |
| ५ | श्री. राम (चार्ली) पारवाणी | ३४ | श्री. राजू किशनचंद जग्यासी |
| ६ | श्रीम. अर्चना गोकूळ करणकाळे | ३५ | श्रीम. आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ७ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | ३६ | श्रीम. वसुधा धनंजय बोडारे |
| ८ | श्रीम. आशा नाना बिराडे | ३७ | श्रीम. शकुंतला जग्यासी |
| ९ | श्री. राजेंद्रसिंग विरसिंग भुल्लर | ३८ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| १० | डॉ. महेश गजानन गावडे | ३९ | श्री. सुभाष मलन्ना मनसुलकर |
| ११ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४० | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १२ | श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी | ४१ | श्रीम. मंदा सागर सोनकांबळे |
| १३ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) वामन दवणे | ४२ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १४ | श्री. दिलीपकुमार देवीदास जग्यासी | ४३ | ॲड. शैला पांडुरंग सोनताटे |
| १५ | डॉ. नीना प्रकाश नाथानी | ४४ | श्री. विजय रामभाऊ तायडे |
| १६ | श्रीम. मीना कुमार आयलानी | ४५ | श्रीम. कांचन अमर लुंड |
| १७ | श्री. राजेश नानिकराम वधरिया | ४६ | श्री. सतराम फतनदास जेसवानी |
| १८ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ४७ | श्रीम. जया मोहन साधवाणी |
| १९ | श्रीम. जया प्रकाश माखीजा | ४८ | श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे |
| २० | श्री. पृथ्वी व्यापारीलाल वलेचा | ४९ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २१ | श्री. गणपत गोविंद एडके | ५० | श्रीम. मीना दिपक सोनेजी (सोंडे) |
| २२ | श्रीम. शशिकला शिवाजी आवारे | ५१ | श्री. गुरूनो भिकोमल वलेचा |
| २३ | श्री. भगवान शंकर भालेराव | ५२ | श्री. विजय चाहु पाटील |
| २४ | श्रीम. लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ५३ | श्रीम. माया हरेश चावला |
| २५ | श्रीम. मिनू राजकुमार दासानी | ५४ | श्रीम. समिधा आदिनाथ कोरडे |
| २६ | श्री. नरेंद्रकुमार (कुमारी) केवलराम ठाकुर | ५५ | श्री. जयेंद्र चंद्रकांत मोरे |
| २७ | श्रीम. आशा प्रभुनाथ गुप्ता | ५६ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| २८ | श्री. सुजीतकुमार के चक्रवर्ती | ५७ | श्री. प्रधान धर्मा पाटील |
| २९ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५८ | श्री. राजु (जीवन) चंद्रभान इदनानी |
| ३० | श्रीम. इंदिरा जमनादास उदासी | ५९ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३१ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ६० | श्री.बी.बी. मोरे |

तर,
खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. राजु रामसिंग कंडारे, २. श्रीम. मीना कौर अजित सिंग लबाना, ३. श्रीम. पुष्पा रामचंद (गंगोत्री) राजवानी, ४. श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर, ५. श्रीम. पुष्पा मिलींद (नाना) बागुल, ६. श्रीम. ज्योती सुरेश कालानी, ७. श्री. उमेश सुरेश (पप्पु) कालानी, ८. श्रीम. वनिता बब्बू भटिजा, ९. श्री. गोदुमल नारायणदास किशनानी, १०. श्रीम. कमला गोदुमल किशनानी, ११. श्रीम. खान इसरद सऊद, १२. श्रीम. सोनिया राजू जग्यासी, १३. श्रीम. जयश्री जीवनलाल जग्यासी, १४. श्रीम. अनिता सचिन भानुशाली, १५. श्री. रमेश महादेव चव्हाण, १६. श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल, १७. श्री. मनोज दिलीपकुमार सयानी, १८. श्री. सन्मुख ग्यानचंद मानवानी

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त
२. श्रीमती विजया कंठे, उप–आयुक्त, मुख्यालय
३. श्रीमती प्राजक्ता मि. कुलकर्णी, प्र.महापालिका सचिव
४. श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त, कर
५. श्री. राम जैसवार, शहर अभियंता
६. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
७. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
८. श्री. अशोक जाधव, उप मुख्य लेखा परिक्षक
९. श्री. विनायक फासे, सहा. लेखा परिक्षक
१०.श्री. एस.के. सेलवन, उप अभियंता, पाणी पुरवठा
११.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१२.डॉ. राजा रिजवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
१३.श्री. हनुमंत खरात, उप अभियंता, विद्युत
१४.श्री. संजय पवार, क. अभियंता, नगररचनाकार
१५.श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक
१६.श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त
१७.श्री. नंदु समतानी, प्र. सहा. आयुक्त
१८.श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
१९.श्री. अजित गोवारी, प्र. सहा. आयुक्त
२०.श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त
२१.श्रीमती छाया डांगळे, प्र. सहा. आयुक्त
२२.श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
२३.श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
२४.श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
२५.श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
२६.श्री. यशवंत संगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२७.श्री. रविंद्र बेहनवाल, स्वच्छता निरिक्षक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्रीमती विशाखा सावंत
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी

सायंकाळी ४.१३ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

महापालिका सचिव :– ही विशेष महासभा आहे ती आता सुरु करण्यांत येत आहे.
विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. १ :– उल्हासनगर महानगरपालिकेत जमा होणा–या एलबीटी वसूली, मालमत्ता कर, पाणी

समस्या, प्रदूषण व आरोग्य या विषयावर चर्चा होणे.

---

सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—मा. महापौरजी, हा विषय नंतर घेण्यात यावा, यामध्ये अगोदर पाण्याचा विषय आहे त्याची आता आपण चर्चा करु या.

सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :—मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, मी पाण्याचाविषयी बोलत आहे. आमच्या प्रभागात डंम्पींग ग्राउंड आहे, तेथे पाण्याची टाकी आहे तेथुन पाणी मिळत होते, आता मिळत नाही, सहा महिने झाले आहेत, पाण्याची लाईन तुटली आहे. जरा याकडे लक्ष दया. पाणी येत नाही, मी आयुक्त महोदयांना पत्र दिलेले आहे. श्री. सेलवन साहेबांना, श्री. रहेजा साहेबांना ब—याचदा सांगितले आहे की आम्हांला पाणी मिळत नाही. दुसरे म्हणजे पाणी वेळेवर येत नाही. कधी सकाळी साडेसहा, किंवा कधी रात्री साडे अकरा वाजता, कधी दुपारी २ वाजता, कधी चार वाजता असे पाणी येते, लोक ओरडत असतात आम्ही काही घराच्या बाहेर जावु नये काय? घरात बसुन राहायचे काय? पाणी वेळेवर येत नाही. कुणाला लग्नाला जायचे आहे, कोणाला कोठे जायचे आहे, बाजारात जायचे आहे, पाणी कधी येणार? श्री. रहेजा साहेब म्हणता की अर्धा तासांनी मी मॅसेज देतो, व मॅसेज देतात सकाळी ५.३० वाजता, आपले पाणी येणार. पाणी येते ६.३० वाजता. आम्ही म्हणतो की, पाण्याचे टाईम पक्के करा. पाणी कधीही येते, झोप जाते,. सकाळी पाणी येणार तर लोक पाणी भरतील. मी नगरसेवक आहे की कोण आहे, लोकांना काय घरोघरी जावुन सांगु काय, की पाणी या या वेळेस येईल, मी काय सारखे सांगावयास जावु लोकांच्या घरी?

सदस्य श्री. राजेश वदारिया :—मा. महापौरजी मी आयुक्त महोदय व आपणांस लक्षात आणुन देतो की, २०१५—१६ मध्ये नगरसेवक निधी, सर्वसाधारण निधी वगैरे अर्थसंकल्पात मंजुर केले होते. त्यात सार्वजनिक बांधकाम विभाग व पाणी पुरवठा विभागाचे काम करण्याची पध्दत एकदम हळु आहे. त्यामुळे काही निविदा अपलोड होवुन सुध्दा काही होत नाही. ते मंजुर होवुन पडले आहेत, ते निकाली काढले पाहिजे. कारण निवडणूकीचे वर्ष आहे, यावेळी लोकांची अपेक्षा जास्त आहेत की हे काम लवकर झाले पाहिजे, ते काम लवकर झाले पाहिजे. तर सन २०१५—१६ च्या अर्थसंकल्पामध्ये जी कामे मंजुर झाली आहेत, त्याच्या निविदा काढुन पडल्या आहेत, तर त्या कामास प्राधान्य देवुन लवकर केले पाहिजे. दुसरे म्हणजे आपल्याबरोबर काही दिवसांपुर्वी गटनेतांनी सभा घेतली होती त्यात आपण सांगितले होते की ५० टक्के कामास आपण मंजुर देणार. त्यात महापौर,उप—महापौर, स्थायी समिती, सभागृह नेता,विरोधी पक्ष नेता, सर्व गटनेते व इतर काही असे ५० टक्के निधी देवु. तर माझे असे म्हणणे आहे की, आपल्या नेतृत्वाखाली जो निर्णय झाला आहे तो चांगला झाला आहे, तर हे काम १०० टक्के झाले पाहिजे. कारण हे निवडणूकीचे वर्ष आहे. तर आपणाशी आशा करतो की आपण त्यास १०० टक्के मान्यता देणार धन्यवाद।

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—महापौर महोदया, आयुक्त साहेब, साहेब हा असा मुद्दा आहे की आपल्याबरोबर सर्व गटनेत्यांनी सभा घेतली आहे,त्यात आपण निर्णय घेतला की या वर्षाचा पन्नास टक्केचा हिस्सा आपण नगरसेवक निधी व पदाधिका—यांचा जो निधी आहे तो देणार, हे सर्व त्यादिवशी मान्यही झाले. परंतु येथे असा विषय येतो की, आज आपण २५ डिसेंबर आहेत ही सभा १९ डिसेंबरला झाली होती. या सहा दिवसात आपला कागद हलला नाही. सभा सहा दिवसांपुर्वी झाली होती. आज आमच्याकडे ३ जानेवारीपर्यंतची वेळ आहे, कारण आपण परिपत्रक दिले होते नगरसेवक निधी हा जोपर्यंत कार्यकाळ पुर्ण होत नाही, त्याचे शेवटचे तीन महिने तो वापरु शकत नाही. आमचा महापालिकेचा कार्यकाळ ३ एप्रिल २०१७ रोजी पुर्ण होत आहे. याचा अर्थ ३ जानेवारी २०१७ पर्यंत जेवढया काही निविदा असतील त्या काढुन त्याचे प्राकलन तयार करुन त्यांना वर्कऑर्डर देणार. तर आपले प्रशासन तेव्हाच सक्षम होईल जसे आपण कर वसूलीसाठी कर्मचारी कार्यरत केले होते तसेच या कामासाठी लावणार तरच आपले प्रशासन यशस्वी होईल असे मी समजतो. दुसरे म्हणजे मागील वर्षाचा जो निधी होता १५—१६ चा त्यात काहींच्या निविदा निघाल्या आहेत, काहींच्या निविदा मागविल्या आहेत, काहींच्या निविदा स्विकारल्या आहेत, त्यांनी सेक्युरीटी डिपॉझिट सुध्दा भरले आहेत, त्यांना निधी मिळाला नाही. काही नगरसेवकांनी निधीसाठी पत्र सुध्दा दिले आहे, त्यांचे प्राकलन सुध्दा तयार आहे परंतु त्यास मंजुरी मिळालेली नाही. तर अशा परिस्थितीत जसे अर्थसंकल्पात मंजुरी मिळाली तशा निविदा काढल्या व मागविल्या, त्या भरल्या गेल्यात, परंतु त्या निविदेस काही कारणास्तव आढावा घेण्यासाठी रोख लावला. तर जे दमदार नगरसेवक होते, जे सक्रिय होते त्यांनी आपला निधी गमविला. जे २०—२५ टक्के नगरसेवक होते त्यांनी निधीची वाट पाहुन काम होईल, परंतु ते नाही झाले, अशा परिस्थितीत त्यांना निधी का मिळु नये, त्यांच्याशी अन्याय का? ज्यांच्या निविदा झाल्या आहेत, निविदा प्रोसेसमध्ये आहेत, व ज्यांच्या निविदा मागवायच्या आहेत, तर मी येथे या गोष्टीचा खुलासा करु इच्छितो की

आपण कशाप्रकारचे येथे धोरण निश्चित करु इच्छिता. आपण या वर्षासाठी धोरण बनविले की आपण पन्नास टक्के निधी देणार, तर आपण या सभागृहास आश्वासन दयाल की जो काही निधी असेल तो ३ जानेवारीच्या आधी दयाल. तसेच ज्यांच्या निविदा काढल्या आहेत, ज्यांच्या कार्यरत आहेत, ज्यांचे वर्कऑर्डर झाले आहेत त्यांना सुध्दा दयाल अशी मी अपेक्षा करतो. व त्याचप्रकारे याचे मला उत्तर पाहिजे.

<u>सदस्या श्रीमती लिलाबाई आशान :—</u>साहेब, माझा प्रभाग क्र. २५ आहे तेथे पाणी येत नाही. अर्ध्या प्रभागात ५ वाजता पाणी येते तर अर्ध्या प्रभागात ३ नंतर पाणी येते. आधी सकाळचे पाणी होते ते सकाळचे करता करता दुपारी झाले, कधी ३ ला तर कधी ४ ला, माझा प्रभाग एकदम गरीब आहे, त्यांनी कधी पाणी भरायचे? तर आधी जशी पाण्याची वेळ होती तशीच आता करा.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>ज्या पध्दतीने श्रीमती आशान महोदयांच्या प्रभागात पाण्याची समस्या आहे त्याच पध्दतीने आमच्या प्रभागात सुध्दा आहे. मी वारंवार भेटुन तुम्हांला सांगितले आहे. माझ्या प्रभागात कुठलीही पाण्याची वेळ नाही. या शहरामध्ये १, २, ३ कॅम्पामध्ये रोज पाणी येते. परंतु ४ व ५ मध्ये एक दिवसाआड पाणी देत आहेत. माझ्या प्रभागात २ दिवसांनंतर पाणी भेटत असते, ते सुध्दा पाण्याची कुठलीही वेळ नाही, म्हणजे एकाच शहरात अशा पाणी देण्याच्या वेगवेगळया पध्दतीचे कारण काय आहे साहेब?

यावेळी उप—महापौर श्रीमती पंचशिला पवार हया सभागृहातुन बाहेर गेल्या. 

<u>सदस्या श्रीमती वसुधा बोडारे :—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आताच श्रीमती लिलाबाई आशान यांनी प्रभाग क्र. २५ बाबत सांगितले त्यांचा अ व माझा ब असा प्रभाग आहे. आणि ४ नंबर ओटी या विभागात पाच नंबरवरुन येणारे व एक नंबरवरुन येणारे असे पाणी असते, त्यामुळे अगदी तळागळाचे व शेवटी पाणी मिळते, कधी कधी मोटर बंद होते, काहीही कारण असते, किंवा शुक्रवारी पाणी बंद असते, शनिवार किंवा रविवारी पाणी येते, तर याबाबतीत माझे असे म्हणणे आहे की, एखादया लोकांना आज पाणी मिळाले नाही तर त्या दिवसाचे पाणी मिळायचा त्यांना हक्क आहे तर ते कसे मिळवुन दयायचे हे तुमचे काम आहे. बाकी ठिकाणी मिळते, एक नंबरवरुन मिळत मिळत आमच्याकडे येते परंतु बाकी ठिकाणहुन मिळत मिळत आमच्याकडे येईपर्यंत काही ना काही समस्या निर्माण होते आणि पाणी मिळत नाही. मग आम्ही काय करायचे? मग आम्ही येतो टॅकरकडे, टॅकर येतो सोसायटी एरियामध्ये, जो स्लम एरिया आहे तेथे टॅकर पॉईंटपण नाही. तर मग कसे तेथे पाणी जाणार. तर माझे एवढेच म्हणणे आहे की, जसे तुम्ही कर वसुल करतात तसेच पाण्याचे पहा, पाण्याची भिषण समस्या आहे, ४ नंबर ओटीला तर फार त्रास आहे. तुम्ही तेथे कधीही या. १५ मिनिटे उशिर झाला तर हे आमचे काम आहे काय? आमचे काम नाही. आमचा सात ते पावणे आठपर्यंतची पाण्याची वेळ आहे, जर या वेळेस पाणी मिळाले तरच लोकांना व्यवस्थित पाणी जाते. सातचे सव्वासात होते परंतु पावणे आठलाच पाणी बंद होते. हे नाही झाले पाहिजे, सव्वासातचे आठ सुध्दा झाले पाहिजे. आमचा जो हक्क आहे पाऊण तास ते एक तासाचे तेवढे जर पाणी आम्हांस दिले तर ४ नंबर ओटी तरु शकते. दरवेळेस बाहेर एक वेळ जरी कोठे गेले तर हेच चालु असते, पाणी यु लाईनचे नाही, ते नाही, हेच होते. तर महोदया आम्ही जी पहिली वेळ सांगितली पाणी येण्याची ती बरोबर आहे, तीच ठेवा. प्रत्येक नगरसेवकाला पाण्याचे शेडयुल कळु दया. आमच्या पाण्याची वेळ सकाळची जी आहे त्या वेळेस काही फेल्युअर झाले, तर तुम्ही आम्हांस दिवसभरात कुठले तरी ॲडजेस्ट करुन देणार. आम्ही याच्या मागे लागायचे त्याच्या मागे लागायचे कुठेतरी ॲडजेस्ट तर करुन दया. तुम्ही जसे टॅक्सबाबत करत आहात तसेच पाणी पुरवठयाची सभा घ्या, कुठला तरी प्रभाग पहा, कुठल्या प्रभागात पाणी पुर्ण जाते, कुठल्या प्रभागात पोहचत नाही. जेथे पोहचत नाही तेथे तुम्ही स्वत: जातीने लक्ष दया. तुमच्याबरोबर आम्ही उभे राहतो, कोणत्या विभागात पाणी जात नाही हे दाखवुन दया. नुसते बोलतो म्हणुन नाही तर तुम्ही तेथे कधीही या आम्ही तुमच्याबरोबर उभे आहोत. मला वाटते श्री. सेलवन साहेब, सर्वांनाच माहित आहे की आपले कुठल्या कुठल्या प्रभागात पाणी पोहचत नाही. आता जसे श्रीमती लिलाबाई आशान यांनी सांगितले आपले रात्री पावणे दहा वाजेची पाण्याची वेळ आहे. १० नंतर बायकांनी १०.३०, ११.०० असे बघत बसायचे, त्यांची काही अडचण असेल त्यांचा संदेश येतो, नगरसेवकांना संदेश येतो परंतु नगरसेवक प्रत्येक माणसाकडे जावुन सांगु शकत नाही ना. प्रत्येकाला कसे सांगणार पाणी नाही आले, ठिक आहे पाणी येईल पंधरा मिनिटांनी, जर वीस मिनिटे उशिराने पाणी आले तर पुढे वीस मिनिटे वाढवुन पाहिजे. जर तुमच्या प्रभागात पावणे दहाचे पाणी येत असेल आणि ते पाणी साडे दहा वाजता आले तर पुढे पाणी वाढले पाहिजे, माझे चाळीस मिनिटे मला मिळाली पाहिजेत. तर असे आमच्या दोघींचे म्हणजे श्रीमती लिलाबाई आशान व माझे मत आहे. तेवढे करा ही नम्र विनंती.

<u>**सदस्य श्री. विजय पाटील :–**</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, कॅम्प नं. ५ मध्ये दोन दिवस पाणी नाही. उदया तिसरा दिवस आहे तर तिस–या दिवशी तरी पाणी देण्यात यावे, ही नम्र विनंती.

यावेळी सदस्या डॉ. निना नाथानी, श्रीमती मिना आयलानी, श्रीमती जया माखिजा हया सभागृहातुन बाहेर गेल्या. 

<u>**सदस्य श्री. सुरेश जाधव :–**</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आमचा पॅनल क्र. २९ आहे, त्याठिकाणी पाण्याची टाकी भरुन पडली आहे. आज दोन वर्ष झाले, टाकी पुर्णपणे तयार आहे, प्रभागात बहुतेक ठिकाणी पाण्याच्या लाईन झाल्या आहेत, काही शुल्लक कारणासाठी, त्याची प्राकलन सुध्दा तयार आहे, आपण वर्क ऑर्डर इश्यु करण्यास सुध्दा सांगितले आहे. तरी सुध्दा काही कारणास्तव ती टाकी भरत नाही. पाण्याचा हा परिणाम सर्व शहरावर होतो. प्रत्येकास वेगवेगळा टाईमटेबल दिलेला असतो. आमच्या शहरातील ज्या टाक्या आहेत त्या आपण पुर्णपणे चालु केल्यात तर मला वाटते, आपण लोकांना टाईमशीर पाणी देवु शकतात. जोपर्यंत हया गोष्टी होत नाही तोपर्यंत प्रत्येक प्रभागात सर्वांच्या समस्या वाढत राहणार. त्यांना वेळेवर पाणी भेटणार नाही, पण माझ्या प्रभागामध्ये, मा. महापौरजी, याच महासभेत मी दोन वर्षापासुन पाण्याच्या टाकीसाठी नेहमी आंदोलन करत असतो. पण त्याचा परिणाम झालेला नाही. आपणाकडुन आशा आहे, कोठे शहराला आहे. आपण चांगले काम करत आहात हे लोकांनी पाहिले आहे, आम्हीही पाहिले आहे. पण ही पाण्याची जी समस्या आहे, ती लवकरात लवकर चालु करावी. पाण्याच्या ज्या टाक्या आहेत त्या काही शुल्लक कारणासाठी तुम्ही लक्ष देत नाही. तुम्ही यास महत्व देवुन हे काम पुर्ण कराल तर आपले धन्यवाद। माझ्या प्रभागातील काही थोडेसे करा, आपण संबंधीत अधिका–यांना आदेश दयावेत व लवकरात लवकर ती पाण्याची टाकी चालु करावी. कोणार्कच्या काही लाईनी आहेत त्या फक्त दोनचारच राहिल्या आहेत तेवढे फक्त चालु करा. म्हणजे माझ्या प्रभागातील पाण्याची समस्या कमी होवुन जाईल.

<u>**महापौर तथा पीठासीन अधिकारी :–**</u>सन्माननिय सदस्य, जर एखादा सदस्य बोलत असेल तर बाकीच्यांनी आपसात कमी आवाजात बोलावे. माईक असून व्यवस्थित आवाज येत नाही.

<u>**सदस्य श्री. विजय पाटील :–**</u>त्यांना बाहेर काढा सर्वांना.

<u>**सदस्य श्री. जीवन इदनानी :–**</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आज ही जी चर्चा होत आहे. सुविधेवर चर्चा होत आहे. आपला जो नगरसेवक निधी आहे, वा प्रभाग समिती निधीवर चर्चा होत आहे. आपण जसे वचन दिले की त्यावर आपण खुलासा करणार आहात. मुख्य गोष्ट आहे पाणी पुरवठयाची मला माहित झाले की आपण पारस नाका येथे काल सुध्दा सभा घेतली. त्याची समिक्षा केली होती, मी फक्त आपणास एवढेच विचारेल की हा जो प्रकल्प आहे तो अंतिम कधी होईल? त्याची अंतिम तारीख आपण कृपा करुन दयावी. त्यांनी काल प्रोग्रेस चार्ट दिला असेल त्या चार्ट नुसार काम कधी पुर्ण होईल, कधी शहरास पाणी देवु, तर कृपया आपण आम्हांस अंतिम तारीख दया. लोक त्रस्त आहे. कॅम्प नं. ३ व कम्प नं. ४ बाबत श्रीमती लिलाबाई आशान, श्रीमती बोडारे महोदया यांनी सांगितले की त्यांना त्या लाईनीतुन दिलासा मिळेल तर कृपा करुन यावर जरा लक्ष दयावे. उल्हासनगर शहर सुखी होईल. तसेच अर्थसंकल्पाबाबत, आता आपण आला आहात तर आपल्या विचाराने आपण वर्षाचे अर्थसंकल्प बनवुन येथे चुक आहे, तेथे चुकीचे आहे हे पाहुन आपण त्यास दुरुस्त करु शकता. येणा–या वर्षात नविन अर्थसंकल्प असेल तसेच नविन महापालिका असेल, नविन सदस्य निवडून येतील तर नविन महापालिकेस नविन दिशा आपण देवु शकता. तोपर्यंत आपण जे वचन दिले आहे सर्व पक्षीय बैठकीत तर मला अशी आशा आहे, की आपण एक दिशा दयाल व लवकरात लवकर ही अडचण दूर कराल.

<u>**सदस्य श्री. राजु जग्यासी:–**</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आता जसे म्हटले आहे, आज सुध्दा कॅम्प नं. ३ मध्ये आठवडयातुन दोन किंवा तीन दिवसच पाणी मिळते. लोकांना आपणाकडुन आशा आहे, नाहीतर लोक लाचार झाले होते. आपल्या कार्यपध्दतीमुळे लोकांना आशा मिळाली आहे. आपण तर एक एक माणसास व्हॉटस्अपवर वर सुध्दा उत्तर देत असतात. आपण एक आयुक्त असतांना व्हॉटस्अपवर सामान्य माणसाला आपण उत्तर देतात. ही फार मोठी गोष्ट आहे. त्यामुळे लोकांना आशा मिळाली आहे. तसेच एवढी मोठी कर वसूली, लोक स्वत: भरण्यासाठी येतात व आता सुध्दा काही भरण्यासाठी येण्यास बाकी असतील. परंतु साहेब, आज सुध्दा पाण्याची समस्या कॅम्प नं. ३ येथे आहे. साहेब, आपणांस तर वाईट वाटणार नाही, मी माफी मागतो, जेव्हा कर वसुली होत नव्हती तर महापालिकेने एक मोहिम सुरु केली होती की किन्नरांना पाठविले जात होते व कर भरण्यासाठी लोकांना सांगितले जात होते. साहेब आज असे सुध्दा लोक आहेत की

जे वेळेत कर भरत असतात परंतु त्यांना आठवडयातुन फक्त दोन किंवा तीन दिवस पाणी मिळत असते. तर त्यांना कोठे तरी वाटत असते की जर आपण वेळेवर कर भरत असतो तर महापालिकेचे सुध्दा कर्तव्य आहे त्यांनी पाणी वेळेवर दिले पाहिजे. जर ते नाही देवु शकत तर आम्ही आदराने आयुक्त महोदयांना विचारु इच्छितो की आम्ही किन्नराला घेवून कुठल्या अधिका–याजवळ जावे. आम्ही कोणाकडे जावे? जर साहेब आपण कर वसुली करतो, ऑटोने शहरात जाहिरात करतो, ही फार चांगली गोष्ट आहे. साहेब मी यावेळी माझे कार्यालय कर वसुलीसाठी दिले आहे, दोन दिवसामध्ये २७ लाख वसुली झाली. आमचे ते कर्तव्य आहे परंतु त्याचबरोबर साहेब, आपण ज्याप्रकारे कार्य करतात, तर आम्हांला वाटते की आपल्या हाताखालील लोक सुध्दा त्याचप्रकारे काम करावे. नाहीतर असे होईल की आपण लोकांजवळ कर वसुलीसाठी जात होते तसेच लोक विचार करत आहेत की आम्ही कोठे जावे? कॅम्प नं. ३ ची अडचण सोडविण्यासाठी एकच उपाय आहे की अल्टीमेल्टी लाईन. तर साहेब, माझी आपणांस एक विनंती आहे, मला माहित झाले आहे की तेथे दोन तीन दिवसांपासुन ते काम पुन्हा बंद पडले आहे. तर साहेब, कृपा करुन एक तातडीची सभा घ्या व एक तारीख निश्चित करा व केव्हापर्यंत हे काम पुर्ण होईल व कॅम्प नं. ३ च्या जनतेला दिलासा मिळेल, धन्यवाद।

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :</u>—मा. महापौर महोदया, एक वर्षापुर्वी तत्कालीन आयुक्त श्री. मनोहर हिरे महादेयांनी खुप प्रयत्न केल्यानंतर एक आदेश काढला होता. एक वर्षापुर्वी नोव्हेंबर महिन्यात याची प्रत सर्वांना मिळाली आहे. त्यावर स्वाक्षरी आहे. हे काम विना विलंब, विलंब होवु नये याची दक्षता घ्यावी असे लिहिले आहे. परंतु संबंधीत अधिका–यास मराठी वाचता येत नाही, ज्यामुळे त्यांचे लक्ष या गोष्टीकडे गेलेले नाही. तर आयुक्त महोदयांना माझी विनंती असेल, मागील महासभेत सुध्दा मी हे निवेदन दिले होते, परत एकदा देत आहे. दुसरी विनंती मी करत आहे की, पाण्याच्या समस्येवेळी तत्कालीन आयुक्त महोदयांनी असा प्रस्ताव ठेवला होता की, पाण्याची समस्या सोडविण्यासाठी आपला नगरसेवक निधी जो २०१६–१७ चा आहे त्याबाबत जर आपण पत्र दिले तर आपणांस लवकरात लवकर बोअरवेल पंप, जेटपंप लावुन देवु. नाईलाज लोकांच्या पाण्याची समस्या सोडविण्यासाठी ठेकेदारांचे हातपाय जोडुन आपल्या नगरसेवक पदासाठी पत्र दिले. नगरसेवकांना पत्र दिल्यामुळे ठेकेदारास आम्ही मदत केली. ठेकेदारांनी आमच्यावर व आयुक्त महोदयांवर विश्वास ठेवला. त्यांनी वेळेवर जेटपंप, बोअरवेल पंप लावुन दिले. त्यामुळे पॅनलच्या लोकांना शांती मिळाली. जर आम्ही पाण्यासाठी आधीच निधी दिला आहे तर या वर्षाचा अर्धा निधी आपण दयाल की आम्हांस आमच्या खिश्यातुन भरावे लागेल. तर कृपया आयुक्त महोदयांनी जो विश्वास दिला होता, जी मदत केली होती, जबान दिली होती, त्याबाबतीत सुध्दा आम्ही काम करायला तयार आहोत. जो नगरसेवक निधी आहे, जो प्रभाग समिती निधी आहे, त्यांच्या निविदा निघते परंतु सहा सहा महिने निविदा उघडल्या जात नाही. ज्या कामास विलंब झाला आहे, जी कामे नगरसेवक व प्रभाग समितीत निधीचे आहेत, नाहीतर आमच्यावर अन्याय होईल, जी मान्यता दिलेली कामे आहेत ती व्हायला पाहिजेत. तसेच पत्रामध्ये आयुक्त महोदय, जे लिहिले आहे तर त्याबाबतीत जरा मदत कराल. या पत्राची प्रत मी आपणांस देत आहे. मागील महासभेत मी एक संचिका दिली होती महापौर महोदया की लोक कसे भटकत आहेत कामासाठी, मी नगररचना विभागाबाबत बोलत आहे. तसेच एक विषय असा आहे की लोकांना कोटी रुपये मिळु शकतात, जसे आपण एक विषय हाताळला आहे. त्याने शहरास भरपुर पैसे मिळतील, शहराचा विकास होईल. तर दुकाने, इमारती, घरे अवैधतेपासुन वैधता होण्यासाठी २००६ पासुन लोकांनी पत्र दिले आहे, अशा ८ हजार संचिका, त्या संचिका उल्हासनगर ५ येथिल पाणी पुरवठयाचे जे कार्यालय आहे, तेथे एक अधिकारी बसला आहे, त्या आठ हजार संचिका कपडयात बांधुन पडल्या आहेत. त्या जर आपण उघडुन पाहिल्यात त्याची पडताळणी करुन नियमाने काम जर पुढे केले तर लोकांनाही त्याचा फायदा होईल. शहराच्या विकासासाठी कोटी रुपये महापालिकेस मिळणार. ब–याचशा संचिका अशा आहेत त्याचा निर्णय घेतला आहे परंतु त्याचे पत्र देणे बाकी आहे. या संचिकेचा सुध्दा लवकर निर्णय घेण्यासाठी कुण्या सक्षम अधिका–यास बसवुन निर्णय घ्यावा. या विषयाकडे लक्ष देणार तर फार चांगले होईल, धन्यवाद।

<u>सदस्या श्रीमती समिधा कोरडे :</u>—मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त महोदय, हा जो विषय आहे तो चार विषय मिळुन आहे जसे पाणी समस्या, आरोग्य, मालमत्ता, एलबीटी. पाण्याच्याबाबतीत सांगायचे झाले तर कॅम्प नं. ४ व ५ मध्ये एक दिवसाआड पाणी येते. ५ नंबरमध्ये बुधवारी पाणी येते. गुरुवारी ५ नंबरमध्ये पाणी येणार नव्हते, आज शुक्रवारी शटडाउन आहे. म्हणजे ५ नंबरला जे पाणी बुधवारी येणार होते ते डायरेक्ट रविवारी आले. आम्हांला ते पाणी उदया नाही शनिवारी मिळण्यात यावे. ही लोक ५ नंबरला पाणी देणार, पण वेळ वाटुन देणार. जेव्हा ५ नंबरला पाणी पुर्ण दिवस देणार, तेव्हा सर्वीकडे ते पाणी जाणार. काही वेळेस ५ नंबरचे पाणी ४ नंबर येथे जाते, तर जरा लक्ष दया, पाण्याचे व्यवस्थित वाटप व्हावे. दुसरे म्हणजे आरोग्यविषयी, तर आरोग्याशी संबंधीत म्हणजे उल्हासनगर शहरात जे आरोग्य केंद्र आहेत, उल्हासनगर कॅम्प

नं. ५ येथिल जे भाजी मार्केट आहे, तेथे आपला दवाखाना आहे, त्याच बाजुला कुत्र्यांची नसबंदी सुध्दा होते. ते कुत्रे उठुन डायरेक्ट पेंशेंटजवळ उडया मारुन धावुन येतात. एक दिवस तर असे झाले होते की तेथिल पेशंट त्या कुत्र्यांमुळे सैरावैरा धावु लागले होते. आपण एकीकडे आरोग्य देणार आहोत आणि तेथेच ही गोष्ट, त्यासाठी एक जागा व्यवस्थित शोधली पाहिजे ना महापालिका प्रशासनाने. आधीच आपणाकडे मनुष्यबळ कमी आहे. आरोग्याशी निगडीत एक प्रश्न आहे, कॅम्प नं. ५ येथे जे आपण डंपींग ग्राउंड सुरु केलेले आहे, तर मा. मुख्यमंत्री महोदयांच्या आदेशान्वये, आपले स्वत:चे स्त्रोत सुरु केले पाहिजे, स्वत:चे डंपींग ग्राउंड सुरु केले पाहिजे, आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. डंपींगवर जो कचरा टाकला जातो तो बहुतेक वेळा जाळला जातो. आणि तो आमचा प्रभाग आहे, तो कचरा जाळल्यामुळे सर्वत्र पसरत आहे व त्यामुळे तो त्रास नागरीक व रहिवाश्यांना होत आहे त्यामुळे लोकांचा आरोग्याचा प्रश्न उद्‌भवत आहे. ती आग विझविण्यासाठी महापालिकेचे स्वत:चे पाण्याचे टॅकर आहे त्याने ती आग विझविली जाते. जर मी भेट दयायला जाते तर तेथे संबंधीत व्यक्ती पाण्याने आग विझवत असते. म्हणजे दोन्ही बाजुने नुकसान आपलेच आहे. त्यामुळे आरोग्यावर होणारा परिणाम यावर गांभिर्याने लक्ष दिले जावे. तिसरा मुद्दा म्हणजे मालमत्ता, मालमत्तेच्याबाबतीत म्हणायला झाले तर आपण चांगली वसुली करत आहात. ही चांगली गोष्ट आहे, कर वसुली सर्वांची असावी. उल्हासनगर शहरात काही मालमत्ता भाडयाने दिलेली आहे त्यामुळे कर वसुली करण्यास विलंब लागत आहे. जे रेसिडेंशिअल आहेत त्यांची वसुली चांगली होत आहे परंतु आपलीच मालमत्ता आहे ती भाडयाने दिली आहे तर त्याची वसुलीची कुठेतरी कमतरता दिसत आहे. चौथा म्हणजे रस्ते, त्याबाबत मी मागे पत्रही दिले होते, की टॅकर पॉईंटकडुन ५ नंबरला येणारा जो रस्ता आहे, मुख्य तो उल्हासनगरमध्ये पनवेलमार्गे येतो. त्या रस्त्याची निविदा २०१२ पासुन चालु आहे परंतु काम होत नाही. आता आपण जी निविदा काढली आहे तर आता आपण म्हणत आहात की आपली आर्थिक परिस्थिती सध्या चांगली नाही. त्या निविदेमुळे दोन गोष्टी झाल्या आहेत, एक म्हणजे त्याचे निगोशेशन झाले आहे, ती निविदा अंतिम टप्प्यात आहे. पाईपलाईन टाकल्यामुळे तो रस्ता पुर्णपणे उखडला गेला आहे, त्यामुळे त्या रस्त्याचे काम अर्धवट अवस्थेत आहे. त्या रस्त्याचे काम झालेले नाही. आणि तेथुन येणा—या जड गाडया, कच—याची गाडी यामुळे तेथिल असलेली पाईप लाईन तुटण्याची शक्यता आहे. जो रस्ता अर्धवट बनलेला आहे तो बनविण्यात यावा, आणि जर विलंब होत असेल तर जे रस्त्यावर खड्डे पडलेले आहेत ते तरी बुजविण्यात यावे. मी जेव्हा तेथिल जेईंना श्री. अश्विनी यांना बोलली तर ते म्हणाले की ज्या रस्त्याच्या निविदा मागविण्यात आल्या आहेत त्या रस्त्यांचे खड्डे भरता येणार नाही. मी आपणांस सांगितले तर आपण म्हणालात आर्थिक परिस्थिती बरोबर नाही म्हणजे रस्त्यांवरील खड्डेही होणार नाहीत व तो रस्ता तसाच पडुन राहणार. रस्त्याची पाहणी आपण प्रत्यक्षात करावी मग आपण निर्णय घ्यावा. मी असे म्हणणार नाही की आपण तो रस्ताच करा, किंवा खड्डे भरा. पण आपण ते केले पाहिजे. याबाबत २०१२ मध्ये तर महासभेचा ठराव सुध्दा होता त्या रस्त्याचा. आणि जेवढा खराब भाग आहे तर ते लवकरात लवकर पुर्ण करण्यात यावे. आणि त्या रस्त्यासाठी आम्ही चार लोक उपोषणास सुध्दा बसलो होतो. त्यामुळे आपण त्याकडे लक्ष दया. त्या निविदेची संचिका दोन वेळा हरविली होती, आता निविदा काढली आहे आता पुन्हा तसे होता कामा नये ती संचिका निगोशिएशन होवुन आलेली आहे त्यामुळे आपण जरा याकडे लक्ष दयावे.

<u>सदस्य श्री. जयेंद्र मोरे :</u>—मा. महापौरजी, आयुक्त महोदय, ३ ऑक्टोंबरला जेव्हा राणा खदान बंद केले तेव्हा आपण म्हणाला होतात की तेथिल पाणी बंद करु, तेथे व्यवस्थित स्वच्छता करु पण आता तेथिल परिस्थिती काय आहे, आमच्याकडे जी खडीमशिन आहे तेथे आता डंपींग ग्रउंड केले आहे आता तेथे एवढी बिकट परिस्थिती आहे, म्हणजे लोकांना बाहेर निघता येत नाही. २० वर्षापासुन राणा खदानचा जो डंपींग ग्रउंड होता, ती जागा आपण फक्त डंपींगसाठी घेतली होती, खडी मशिन हा काय डंपींग पॉईंट नाही, तरी सुध्दा आता तेथे कचरा टाकायला सुरुवात झाली. हे केव्हा सुरु होईल? आजची तेथे परिस्थिती काय आहे, डंपींग ग्रउंडच्या बाजुला जी घरे होती, जे गाळे होते ते तोडले की नाही? ज्या दिवशी सभा होती त्याच दिवशी खडी मशिन येथे असलेले गाळे त्याबाबत आमचे तेथिल प्रभाग अधिकारी डॅर्शींग आहेत त्यांनी त्याच दिवशी कारवाई केली. ५—६ गाळे तोडुन मोकळे झालेत. सन १९९६ ची करपावती आहे, तो ५ नंबर येथिल डंपींग पॉईंट केव्हा बंद होणार? आज तेथे सावित्रीबाई फुले शाळा आहे, ७९६ मुले तेथे शिकतात, गोरगरीबांची मुले तेथे शिकत आहेत, आज तेथिल परिस्थिती अतिशय नाजुक झालेली आहे. आणि प्रत्येक व्यक्तीला, प्रत्येक आजारास सामोरे जावे लागत आहे, म्हणजे तेथे कोणी राहुच शकत नाही अशी परिस्थिती तेथे झालेली आहे. आयुक्त महोदय, ते पाच नंबर येथिल डंपींग पॉईंट बंद केव्हा होणार?

यावेळी सदस्या श्रीमती मंदा सोनकांबळे, श्रीमती वंदना भदाणे, श्रीमती शुभांगी बेहनवाल, सदस्य श्री. प्रधान पाटील, श्री. भगवान भालेराव हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>डंपींग ग्राउंड बद्दल जर बोलायचे झाले तर राणा खदान येथे आपण वर्ष ना वर्ष डंपींग करत होतो. त्याठिकाणी मोठया दुर्घटना घडल्या, भिंत कोसळण्याचे प्रकार त्याठिकाणी घडले. तेथे कुठलीही हानी झाली नाही. परंतु एक गोष्ट खरी आहे की, तेथे १००—१५० फुटाचे ढिग त्याठिकाणी लागले आहेत. त्याठिकाणी वसाहत असल्याने त्या लोकांना जिवित राहण्याचा धोका निर्माण झालेला आहे. पर्यायी जागा शोधणे आपणांस गरजेचे होते. आपणांस माहिती असेल दोन मुले तेथे फसली व खाली गेली अशी अफवा देखील पसरविण्यात आली होती. जेथे २ तास तो कचरा बाजुला करायला वेळ लागणार होता तेथे ५ तास लागले. अफवा होती ती ख—या रुपाने घटना घडण्याची शक्यता होती त्यामुळे आपण जेथे तो डंपींग ग्राउंड होता जेथे पुर्वी गायकवाड पाडा येथे जागा निश्चित केली होती परंतु एकच दिवस तेथे आपण कचरा टाकण्याचे काम केले. त्यानंतर ते बंद पडले. आजमितीस आपणाकडे जोपर्यंत पर्यायी जागा मिळत नाही, एकतर शहराच्या हद्दीमध्ये मिळणे अशक्यच आहे. हद्दीच्या बाहेर शासकिय जागा मिळण्यासाठी आपण प्रयत्न केले परंतु त्यामध्ये आपणांस ठोस उपाय मिळाले नाही. खाजगी जागा जर घ्यायची म्हटली तर त्यासाठी काही अडचणी आहेत, ग्रामपंचायतीचा ठराव पाहिजे, किंवा अन्य काही अटी आहेत त्यामध्ये आम्ही लिहीत आहोत की ग्रामपंचायत अन्य कुठलीही असा ठराव करणार नाही की उल्हासनगर महापालिकेचा कचरा त्यांच्या शहराच्या कुठल्याही विकत घेतलेल्या खाजगी जागेवर तुम्ही डंप कराल, ही अट शिथील करण्यासाठी आम्ही लिहित आहोत सध्या, परंतु जी जागा आता मोकळी पडलेली आहे, तेथे आता कुठलाही धोका नाही. केवळ धुर किंवा इतर काही गोष्टी असतील त्यावर आपण आता नियंत्रण घालु शकतो. परंतु आजमितीस असे म्हणणे आहे की राणा खदानकडे परत वळावे.

<u>सदस्य श्री. जयेंद्र मोरे :—</u>साहेब, ५२ दिवस झाले, आपण केले नाही ना साहेब ते.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>काय केले पाहिजे.

<u>सदस्य श्री. जयेंद्र मोरे :—</u>हे आता राणा खदानचे लेव्हलींग करता आले असते ना.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>लेव्हलींग जरी केले तरी त्याची कॅपेसीटी संपलेली आहे ना. लेव्हलींग केवळ तेथिल धोका कमी करण्यासाठी करत आहोत. पुन्हा नविन कचरा टाकण्यासाठी, जागा करण्यासाठी आपण लेव्हलिंग करत नाही आहोत. तेथे लोक अनाधिकृत करुन जरी राहत आहेत त्यांचा धोका कमी करण्यासाठी सिस्टेमेटीक जो कचरा साठलेला आहे तो कमी करण्यासाठी करत आहोत. तरी पर्यायी जागा असेल तर आम्हांला आनंदच होईल.

<u>सदस्य श्री. जयेंद्र मोरे :—</u>पर्यायी जागा म्हटले तर वसार गाव येथिल जागा होती तेथे कचरा टाकत होते, तेथे एक खदान आहे, कोनार्कला जो ठेका दिला आहे त्याच लोकांनी तेथे पाणी भरल्यामुळे तेथे ते टाकत नव्हते. तेथे टाकण्यात यावे ना साहेब.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>ही बाब मला नव्याने कालच समजली त्याबाबत खुलासा माझ्या विभागातील लोक करतील. पर्यायी जागा अजुन आहे, जी होती किंवा ज्याचा वापर अजुन करता येईल, त्याच्यावर विचार करु शकु.

<u>सदस्य श्री. जयेंद्र मोरे :—</u>पण साहेब, लवकरात लवकर करा. कारण तेथिल लोकांचे राहणे अवघड झालेले आहे, आणि तेथे काही फवारणी होत नाही. आमचा प्रभाग असल्याकारणाने फवारणी करायची असली तर आमचे सफाई कर्मचारी दयावे लागतात. बाकीचे कामे सर्व राहुन जातात. तेथे स्पेशल लोक नाही ठेवलीत की तेथे जावुन फवारणी करतील. नाहीतर तेथे एक दवाखाना उघडा. आणि म्हणजे जर लोक आजारी पडले तर जवळच्या जवळ लोकांना दवाखान्यात जायला बरे होईल. फवारणी करण्यासाठी माणसे दया.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>एक गोष्ट मी मान्य करतो त्या उपाययोजनेमध्ये जर आम्ही कमी पडत असु. तर मी सूचना देतो, फवारणी करण्यासाठी किंवा जो धुर येतो तो कमी करण्यासाठी ज्या काही उपाययोजना होतील त्या करण्याचा आम्ही १०० टक्के करु.

<u>सदस्य श्री.सतरामदास जेसवानी:</u>—मा. आयुक्त साहेब, श्री. मोरे साहेब व माझे घर बाजुबाजुला आहे, तो धुर इतका पसरला होता तो नेताजी चौकपर्यंत पोहोचला. प्रभाराम मंदिरापासुन ते नेताजी चौक फार लांब आहे, तेथे जी आग लावण्यात आली होती त्यामुळे फार दुरपर्यंत धुर पसरला होता तेथिल लोक माझ्या व श्री. मोरे साहेबांच्या घरी आले होते. आम्ही आश्वासन दिले की साहेबांना आम्ही सांगु, जेणेकरुन धुवा पसरणार नाही, त्यासाठी काहीतरी करु. कारण की महापौर महोदयांचे घर सुध्दा बाजुला आहे व कार्यालय सुध्दा आहे, त्यांच्या घरी सुध्दा लोक जात असतील. श्री. प्रधान साहेबांकडे सुध्दा लोक वारंवार जात असतील, तर लोकांना त्रास होवु नये याकडे जरा लक्ष दयावे, धन्यवाद।

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :</u>—मा. आयुक्त साहेब, आज गेल्या काही दिवसांपासुन जेवढे आम्ही नगरसेवक येथे बसलेले आहोत तर सर्वांनी पाण्यासाठी खुप हाल सोसले आहेत. या वर्षी चांगला पाऊस पडला आहे, डॅम वगैरे ओव्हरफ्लो झाले आहे तरी आम्हांला पाण्याचा त्रास सहन करावा लागत आहे. एक दिवसाआड पाणी येत आहे. पाल्यावरुन जे आपणांस ५५ एमएलडी पाणी मिळत होते ते आता आपणांस ३५ एमएलडी पाणी मिळत आहे. ते पाणी कॅम्प नं. ४ येथे सुध्दा चालवत आहेत. तेच पाणी कॅम्प नं. ५ येथे देत आहेत. आता परिस्थिती अशी आहे की, आज शुक्रवार आहे पाण्याचा दिवस आहे, तरी आज लोकांना तेथे पाणी मिळाले नाही. काल कॅम्प नं. ४ चे पाणी येणार होते तेथे पाणी मिळाले, परंतु येथे मिळाले नाही. आज त्यांची वेळ होती तरी त्यांना पाणी मिळाले नाही. उदया कॅम्प नं. ४ ची वेळ आहे, मग ४ नंबरवाले तेथे येवुन बसतील, आम्हांला पाणी पाहिजे म्हणुन, म्हणजे कॅम्प नं. ५ वाल्यांना तीन दिवस पाणी नाही. त्यानंतर दुस—या दिवशी ४ नंबरवाल्यांना ही परिस्थिती भोगावी लागते. आज शहरामध्ये कर रुपाने पाण्याचे पैसे जमा करायला पाहिजे होते, परंतु येथिल कर्मचा—यांनी केले नाही. आता काम सुरु केले, ठिक आहे, आता पैसा आला आपणाकडे. आज आम्ही घरोघरी लोकांना जावुन सांगत आहोत की कर भरा नाहीतर जप्ती येणार, जप्ती येणार, तर आज आपण लोकांना काय देत आहोत? साधे जीवनावश्यक गोष्ट आहे पाणी, ते पाणी आपण देवु शकत नाही. आपणांस काय अधिकार आहे, जी जीवनावश्यक गोष्ट आहे, पाण्याच्या थेंबासाठी तरसत आहेत, परंतु त्यांना आपण पाणी देवु शकत नाहीत. पाणी एक दिवसाआड येते, आठवडया शेवटी त्यांना पाणी मिळत आहे. मला फक्त आपणाकडुन हेच पाहिजे होते की, एमआयडीसीकडुन जी दादागिरी चालली आहे, शहाडवरुन पाणी येते, आणि पाल्यावरुन जे पाणी येते या पाण्याच्या स्त्रोतवरुन जी दादागिरी चालली आहे, तेथिल अधिका—यांना काहीच समजत नाही. श्री. खतगांवकर साहेब होते ते त्यांना दाबत होते, आम्ही अडीच कोटी महिन्याचे भरत होतो. तरी सुध्दा त्यांची दादागिरी चालायला त्यांनी दिली नाही. आज डॅममध्ये एवढे पाणी असतांना सुध्दा आम्हांला पाणी मिळत नाही. आम्ही सर्व आज महापालिके क्षेत्रामध्ये जेवढे प्रापर्टी होल्डर आहेत त्यांनी कर भरण्याचा प्रयत्न केला. जे गरीब लोक आहेत त्यांनी सुध्दा ५००, १०० लोकांकडुन उसने घेतले व कर भरला. त्या लोकांची काय चुक आहे की त्यांनी पैसे भरले व आपण त्यांना आज सुविधा देवु शकत नाही. आज आमच्यासमोर २०१७ मध्ये इलेक्शन आहे, सर्व सोयी उपलब्ध असतांना आपण त्यांना देवु शकत नाही तर फायदा काय आमचा? आज जो महापालिकेत पैसा जमा केला आहे तो फक्त अधिकारी व कर्मचा—यांचे पैसे देण्यासाठी जमा केला आहे काय? आपण लोकांकडुन पैसे जमा करतो तर त्यांना सुख सुविधा देण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. आम्ही हे मानले की तुम्ही आले, येथिल लोकांकडे २०० कोटीचे पैसे येणे होते, आपल्या अधिका—यांची चुकी होती. हे प्रशासनाचे अपयश आहे. श्री. लेंगरेकर जेव्हापासुन आले तेव्हापासुन याचा पाठपुरावा केला असता तर आमच्यावर ही परिस्थिती आली नसती. लोकांनी थोडे, थोडे पैसे भरुन कर क्लीअर केले असते. एलबीटीच्याबाबतीत सुध्दा तसेच झाले असते, मला एवढेच म्हणायचे आहे की आपण लोकांकडे जबरदस्तीने पैसे वसुल करायला जात आहोत, आज कल्याण अंबरनाथ रस्त्यावरील व्यापा—यांची काय चुकी होती? आयुक्तांनी त्यांना सांगितले की, ग्राउंड प्लस २ बनवा, आज ते बिचारे तोडुन ग्राउंड प्लस २ बनवायला गेले, काही लोकांनी तक्रारी केल्या, वर तक्रारी केल्या, त्यामुळे बिचा—यांचे ते काम तसेच पडुन आहेत. काही लोक दुकानात नसतांना सुध्दा पाण्याचे कर्मशिअल बिल भरत आहेत, त्यांची काय चुकी आहे? आज शहराला सुधारण्यासाठी, आकार देण्यासाठी व्यापा—यांचा फार मोठा सहभाग आहे, पण आपण त्यांना काही सुविधा पुरवत नाही. आम्ही काय करावे त्यांच्याकडे जावुन कसे सांगावे की तुम्ही कर भरा. आज त्या लोकांची दुकाने अशीच पडुन आहेत, ते लोक पैसे भरु शकणार नाहीत, त्यांच्याकडे जावुन आपण जबरदस्तीने कुलुप लावणार, सिल लावणार. मला फक्त एवढे म्हणायचे आहे की आपल्या महापालिका क्षेत्रामध्ये आपण पाणी कधी देवु शकणार याची दुरुस्ती कधी करुन देणार? तेवढे मला आपणांस विचारायचे आहे. हे तुम्हीच करु शकता, दुस—या अधिका—यांचे कामच नाही ते. कारण तुमचे अधिकारी तेथे जातात, तिकडील लोक त्यांना चॉकलेट देतात, निघुन येतात बिचारे. ज्यांचे मिटर आहे, ते नादुरुस्त आहे. ते पाण्याचे बिल आकारत आहेत. जेव्हा त्यांना वाटले एक मशिन बंद करायची, दोन मशिन बंद करायचे, फ्लो कमी करायचे त्या पध्दतीने ते तेथे काम करत आहेत. सर्व जनता आपल्या समोर आहेत, जनता या गोष्टीला समर्थन करते. आता जसे श्री. राजु

जग्यासी यांनी संगितले की, किन्नरला लोकांना पाठवुन आपण कर वसुली केली. मी तर आज तुम्हांला सत्तेमध्ये असुन सुध्दा सांगत आहे, ज्या लोकांकडे पाणी येत नाही त्यांना आम्हांला घरी जावुन सांगावे लागत आहे. आमच्या प्रभागात सकाही ३.०० वाजता पाणी येते व एक ते दिड तास पाणी असते. ते पाणी भरणार, कामावर जाणार एकतर मुंबईला लोकांना कामावर जावे लागते. ती लोक आमच्याकडे ४ वाजता मोर्चे घेवुन येतात. आम्ही चुकी केली आहे का की नगरसेवक म्हणुन निवडून आलोत. एक अधिकारी फोन उचलत नाही. आम्ही कसे संपर्क करायचे नंतर तुम्हांला फोन करावा लागतो. तुम्ही किती लोकांना सामोरे जाणार. शेवटी तुम्हांला दिवसभर येथे सुध्दा काम करायचे असते. तुम्ही फक्त एवढे सांगा की शहराला कधी तुम्ही रेग्युलर, रोजचे पाणी देणार?

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>सर्वांचे बोलुन झाले असेल तर नंतर मी समोरोप म्हणुन बोलतो.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>मी आपले एक सेकंद घेतो, ज्या स्फुर्तीने आपण कर वसुली करत आहात, त्याची एक दुसरी साईड सुध्दा आहे, ती साईड तुम्हांला सांगितली होती. किती तरी लोक कर भरण्यास इच्छुक आहे परंतु त्यांच्यामध्ये काही वाद आहे. हे वाद कोणी केलेत तर आपल्या स्टाफने. काही कर्मचारी सेवानिवृत्त झाले, काही मरण पावलेत, काही आहेत, ब—याच वर्षापासुन ते वाद चालु आहेत, आज त्यांच्यावर दंड आकारणी सुध्दा होत आहे, कोणामुळे तर आपल्या स्टाफमुळे. ज्याप्रकारे आपण कर वसुल करत आहात त्याचप्रकारे कंम्पलेंट निडरचे सेल सुध्दा चालु करा. जे जिनीयन कंम्पलेनर आहेत जे यातुन सफर करत आहेत, आमच्या कर्मचा—यांमुळे, तर त्यांना न्याय मिळावा. जेणेकरुन ते सुध्दा कर भरु शकतील व रेग्युलर चॅनलमध्ये बसु शकतील.

यावेळी सदस्य श्री. प्रधान पाटील यांनी सभागृहात पुन्हा प्रवेश केला.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>मी एका गोष्टीचा खुलासा करु इच्छितो की, सध्या महानगरपालिकेचे सर्व अधिकारी, प्रशासन व आयुक्त हे कर वसुलीशिवाय दुसरे काम करत नाही. कदाचित असेही बोलण्यात आलेले आहे, असे काही नाही. कर वसुली ज्वलंत लोकांच्या दारापर्यंत जातात, ते तुमच्यापर्यंत येते, यास चांगली प्रसिध्दी मिळाली, त्याचा फायदाही झाला. लोकांमध्ये एक जनजागृती झाली. कर वसुलीशिवाय इतर विषयही सुरु आहेत, सर्वांच्या बैठकीही आम्ही घेतो. आता थोडया वेळा पुर्वी ट्राफिकबाबतही मी सांगितले, त्याचे प्राकलन वगैरे सर्व तयार आहे, त्याची संचिका जेव्हा माझ्याकडे तयार होवून येईल, ते सुरु होईल. विषय आहे पाणी पुरवठयाचा तर मला त्याबाबत खेद वाटत आहे की लोकांना रातोरात पाण्यासाठी जागावे लागते, कधी १२ वाजता पाणी येते, कधी केव्हा येते, अशी पध्दतच मी कोठे पाहिली नाही की लोकांना रात्री पाण्यासाठी जागावे लागत आहे. मी यामध्ये गांभिर्याने लक्ष घातले व मी पाहिले यामध्ये व कालांतराने असे लक्षात आले की, आमचे प्रशासनास किंवा अधिका—यांचा यामध्ये दोष नाही, यामध्ये आपण पाणी पुरवठयाचे जे आराखडे तयार केले, जे राबविले, जी लोकांची प्रवृत्ती शहरामध्ये आहे, आणि ज्या पध्दतीने पाणी पुरवठा सिस्टम चालत आहे ती सर्वांची आहे, सर्वांचे मोठे दुखणे आहे की पाणी बरोबर येत नाही. काही विभागामध्ये अशी सुध्दा परिस्थिती आहे की दिवसातुन तीन वेळा पाणी येते. त्यामुळे हे विसंगत कशामुळे झालेले आहे, काही ठिकाणी दोन—दोन, तीन—तीन कनेक्शन आहेत, काही ठिकाणी रबळी नडयांचे गठ्ठे आहेत, जसे गांडुळांचे गठ्ठे आहेत, तसे ते रबळी नडयांचे गठ्ठे १००, १००, ३०० फुट मिटर आतमध्ये गेले आहे. यामध्ये आपण योजना निर्माण करतांना काही दोष झालेले आहे, तर कोणाचा दोष आहे, प्रशासनाचा दोष आहे हे बघण्यापेक्षा त्याचा मुद्दा लक्षात घ्यायला पाहिजे. लोकांनी प्रत्येक घरामध्ये पाण्याचे पंप बसविले आहे. मल्टीस्टोरेज कनेक्शनने आपण डायरेक्ट वरच्या माळयापर्यंत कनेक्शन दिले आहे. खरेतर त्याठिकाणी अंडरग्राउंड व ओव्हरेज डॅम त्याठिकाणी बसवायला पाहिजे. टाकीपर्यंतचा सप्लाय आपण त्याठिकाणी डायरेक्ट दयायला पाहिजे होता. खरतर पुर्ण भार आपणावर घेतला आहे आणि पाणी पुरवठयाचे काम त्यांना दिलेले आहे. असे नाही की यामध्ये आमचे लक्ष नाही, यामध्ये आम्ही लक्ष घातलेले आहे. मी आल्यानंतर नोंद करायला सांगितले आहे. पाण्याच्या २५ टाक्या आहेत, आणि २५ टाक्यांचे वेगवेगळे लोकेशन, किती घरांना पाणी पुरवठा होतो, किती घरांना होत नाही, त्याची निड किती आहे १३५ प्रकाणे, त्याचे स्टोरेज किती आहे, त्या टाकीद्वारे किती पुरवठा होतो ही सर्व माहिती आपण काढु, माहिती काढण्यात थोडा वेळ गेला. परंतु आता माझ्याकडे पुर्ण माहिती आहे हे मी धरुन चालतो, तुम्ही जी माहिती दिली त्यावर आता आपण उपाययोजना करणार आहोत. या सर्व गोष्टी करायला, त्यामध्ये निर्णय घ्यायला आणि त्यामध्ये जर काही प्राकलने तयार करावी लागली ते करावे लागणार आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे आपण आता अडीचशे कोटी खर्च करावे लागणार आहे. कोठे आपल्याला काही काम बाकी आहे काय? जे काही प्राकलने आहेत, जी कामे होते ती

पुर्णपणे झाली आहेत की नाही. ते मला तपासावे लागणार आहे. त्यानंतर त्या एजन्सीकडुन जी काही कामे अपुर्ण असतील ती देखील आपणांस पुर्ण करुन घ्यावी लागतील. आणि त्यामध्ये जबाबदारी सुध्दा निश्चित करावी लागेल. सर्व गोष्टीला वेळ दयावे लागणार आहे. ही काही आजची गोष्ट नाही की पाणी पुरवठापण विस्कळीत झाला, किंवा आज पाणी येत नाही तर यामध्ये गेल्या अनेक वर्षापासुन हा प्रश्न सुरु आहे. त्यामध्ये आम्ही लक्ष घालत आहोत आणि १०० टक्के लक्ष घालुन ज्या काही उपाययोजना आहेत कराव्या लागणार आहेत, फक्त एवढाच प्रश्न त्यामध्ये होईल, फार मोठया प्रमाणावर फक्त एकदा बजेटची जर गरज पडली तर परत एकदा बसावे लागणार आहे. त्यामध्ये काही ठोस निर्णय घ्यावा लागणार आहे.

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–</u>साहेब, एक मिनिट यामध्ये आपण तात्पुरत सोय करु शकतो. यामध्ये जो फ्लो होता तो एमआयडीसीने मेंटेन केला तर आपल्याला काहीच अडचण निर्माण होणार नाही.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>आपण जी योजना राबविली ती योजना व्यक्तीसापेक्ष वॉल सिस्टम किंवा आपला जो वॉलमेन आहे, तो ठरवेल किंवा अजुन कोणाच्या सांगण्यावरुन ते पाणी सोडले जाईल. एवढे पैसे खर्च केले तर फक्त एका बटणाने संपुर्ण शहर चालायला पाहिजे होते. त्यालाच खरे सिस्टम म्हटले जाते आणि पाणी पुरवठयाचे नियोजन केले जाते. आपण कशामुळे त्यामध्ये कमी पडलो. यामध्ये कदाचित माझे अनुमान सुध्दा चुकीचे असतील ते कोणाला पटणार पण नाही. एवढया कमी कालावधीमध्ये पाणी पुरवठयात एवढे खोल जावुन मला जे काही नॉलेज मिळाले आहे त्या आधारावर मी बोलत आहे. एकुण आराखडे चुकीचे झाले. जुनी लाईन आपण तीच ठेवली व नविन लाईनसुध्दा केल्या यामध्ये काय मतलब आहे ते नाही मला कळले. शहरासाठी जर पुर्ण अडीचशे रुपये खर्च करतो तर पुर्ण शहरच त्यामध्ये का नाही घेतले गेले. हा सुध्दा मोठा प्रश्न आहे, संपुर्ण शहरासाठी आपण करत आहोत आणि काही भाग आपण वगळत आहेत. त्याचे पुढे काय होणार, जुनी लाईन त्याठिकाणी चालु राहणार, नविन लाईनमधुन काही लोकांनी डायरेक्ट कनेक्शन आपण घेतलेले आहे. त्याचे निप्पल खोलपर्यंत इनसर्ट केलेले आहे. यामध्ये कोण जबाबदार आहे? पाणी कमी आहे असे नाही म्हणता येणार उलट मी आकडेवारी सर्व काढली यामध्ये माझ्याकडे डीटेल तर नाही पण आपण गरजेपेक्षा जास्त पाणी या शहराला देतो. याचा अर्थ काही लोकांना पाणी कमी पडतो आणि काही लोकांना गरजेपेक्षाही जास्त पाणी जाते. मी सकाळीच आमच्या कामवालीला मुद्दाम प्रश्न विचारला, पाणी येते का तुमच्याकडे तर ती म्हणाली आमच्याकडे तीन वेळा पाणी येते. तर काही ठिकाणी तीन तीन वेळा पाणी येते तर काही ठिकाणी तीन तीन दिवस पाणी येत नाही. त्यामुळे कोणास दोषारोप करुन किंवा एकमेकांवर बोट दाखवुन कुणाच्या चुका नाही काढायच्या, हे आपण फेस करायला पाहिजे, अधिका–यांना दोषी ठरवुन फायदा नाही, ठिक आहे जर १०० टक्के दोष असेल तर, पण त्याने प्रश्न सुटणार आहे का? लोकांचे घरचे पंप बंद व्हायला पाहिजे, ज्यावेळेस लाईट जाते ना तर सर्वांना व्यवस्थित पाणी मिळेल. लाईट जाते त्यावेळेस पाणी का टे लॅण्डपर्यंत जाते, तर त्यावेळी पंप झालेले असतात, ग्रव्हीटीपने जे प्रेशर असते, जी डिझाईन केलेले असते तसे पाणी मिळते. हे सर्व मला थोडक्यात सांगायचे आहे, याबाबत आम्ही अभ्यास करु. जेथे जास्तीचे पाणी जात आहे त्यास कसे डायवर्ट करता येईल, ज्यांना पाणी कमी मिळते त्यांना कसे वेळ वाढवुन पाणी मिळेल किंवा कमी खर्चामध्ये करता येईल, आणि जी योजना आपण दोन अडीचशे कोटीची केलेली आहे. तरी संबंधीत एजन्सीने आम्हांला गाईड करावे की यामध्ये कशा पध्दतीने गॅपस् राहिलेले आहेत ते करुन आपल्याला हा पाणी पुरवठयाचा त्रास कमी करता येईल. फॉरेस्ट नाक्याचे काम सुध्दा थांबले होते, बरेचसे कामे कोणत्या ना कोणत्या कारणामुळे थांबली होती ती सर्व कामे आता आपण सुरु केलेली आहेत. फॉरेस्ट नाक्याचे काम सुध्दा सर्व ठेकेदारांची सभा घेवुन सुरु केले आहे, मग ते कुठलेही काम असो सुरु केले आहे. अंबरनाथमधील सुध्दा एक विषय राहिला होता, तो केला, सार्वजनिक बांधकाम विभागाने जो मुद्दा उपस्थित करुन दिला तोही सुटलेला आहे. ज्या ठेकेदाराने काम सुरु केले नाही ते सुरु केलेले आहे, ज्या जुन्या लाईनी आहेत ती आपल्याला बंद करता येईल, त्यामुळे त्याचा बराचसा परिणाम त्या विभागात दिसुन येईल.

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–</u>साहेब, आपण जे म्हणालात ते बरोबर आहे, एमजीपीच्या माध्यमातुन ज्या लाईनी टाकल्या आहेत, ठिक आहे, पण जुन्या सिस्टममध्ये लोकांना जे पाणी मिळते ते लोकांना मिळायला पाहिजे. एमआयडीसीचे तुम्ही काही बोलला नाहीत.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>एमआयडीसीच्या जर काही चुका असतील, मला अजुन अदयाप माझ्या कार्यकाळात, आठ–दहा दिवसात फिडबॅक मिळाला नाही की एमआयडीसी काही कपात करते.

सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—महत्वाचा मुद्दा एमआयडीसीचा आहे, त्यांच्यामुळे आपल्या शहराला पाणी मिळत नाही.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—त्याची सभा मी घेईल व किती आकडेवारी आहे ती घेईल. आणि त्यामध्ये आपणांस सुरळीत करता येईल.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—एमाआयडीसी जी पंपिंग आपणांस करते ती जुन्या लाईनीतुन करते, ती पंपींग सेव करण्यासाठी पपींग कमी करुन देते. ओल्ड एमपीआरमध्ये चार पंप आहेत कधी दोन पंप चालतात त्याचे आम्हांस शेडयुल दिले आहे. १६ तास प्रत्येक दिवसी, परंतु विज वाजविण्यासाठी ती लोक पंपींग बंद करुन टाकतात व काही तरी कारणे देतात की खाली रॉ वॉटरने आम्हांस पाणी बरोबर येत नाही. नदीचे लेव्हल बरोबर नाही. त्यांचे कोऑर्डीनेशन हे ईरिगेशन विभागाशी बरोबर होत नाही. यांचे काम आहे नदीची लेव्हल ईरिगेशन विभागास कळविणे, ईरिगेशनवाले पुढे जो टाटा पॉवर वाल्यांना आंध्राव्हॅली डॅम आहे, इकडे बारवी डॅम आहे त्यांच्याशी कॉऑर्डीनेशन करुन तेवढे पाणी ते रिलीज करतात, जसे नदीपात्रामध्ये लेव्हल मेंटेन राहिल. दुसरे म्हणजे आम्ही एमआयडीसीला एक सुचना दिली आहे की म्हारळ गाव येथिल डब्ल्युटीपी आहे त्याचे उल्हासनगर महानगरपालिका एक ग्राहक आहे. तर आमचा निदान एक व्यक्ती तेथे असला पाहिजे. तसेच पंपीगवर नजर ठेवावी. ते पंपींग बरोबर करत आहेत की नाही. आमचा अनुभव असा आहे, आम्ही अचानक जर गेलो तर ती लोक आपल्या समोर प्रथम दरवाजा उघडत नाहीत, चालु करुन मग दरवाजा उघडतात. कितीतरी हा अनुभव तेथे जावुन घेतला आहे. तेथे ती लोक थांबत नाही, तर माझे असे म्हणणे आहे की उल्हासनगर महापालिकेतील पाणी पुरवठा विभागाचा एखादा व्यक्ती तेथे २४ तास थांबला पाहिजे. व तेथे रेकॉर्ड केला पाहिजे. कोणत्या नंबरचा पंप कधी चालु केला कधी बंद केला.

सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :—व्यक्ती इमारनदार असला पाहिजे.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—सारखी गोष्ट पाल्याची सुध्दा आहे. आपणांस एनर्जी बिल सेव्ह करायचे आहे. पाणी कमी दयावे असे नाही, तर त्यांना सुध्दा टार्गेट आहे की आपण खर्च कमी करावा. त्यामुळे ते पंपींग कमी करुन टाकतात. त्याचा फार मोठा परिणाम आपल्या पाण्यावर होतो. आम्हांस जेवढे पाणी मिळते तेवढेच पाणी देतात, ते स्टोरेज होत नाही. ४ मिटर, ५ मिटर पाणी भरले तर सोडतात त्यामुळे अडचण निर्माण होत आहे. साहेब, त्यांचे जे पंप आहेत ते २०, २० वर्ष जुने आहेत. तर पंप जेवढे जुने असतील तर त्याची पात्रता तेवढी कमी होईल तर ते पाणी पुरवठा आपणांस देतात तर त्यांना तुम्ही सांगितले पाहिजे की २० वर्षापासुन जी जुनी लाईन आहे ती बंद केली पाहिजे, कारण त्यांची मशिनरी सुध्दा जुनी झालेली आहे.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—आयुक्त महोदय, मी वारंवार २ वर्षापासुन लाल चक्की टाकी विषयी बोलत आहे. आता परत विषय आला म्हणुन मी तुम्हांला सांगत आहे, माझ्या प्रभागातील लाल चक्की टाकीचे काम पुर्ण झाले आहे, पण तेथे चालु का करत नाही, थोडे १० २० टक्के काम असेल, ५–१० लाखाचे काम असेल, त्यासाठी दोन वर्षापासुन ती लालचक्कीची टाकी बंद पडुन आहे. आपण जर त्यांना आदेश दयाल तर ती टाकी लवकरात लवकर चालु होवुन जाईल.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—होय, यापुर्वीच मी लिहुन घेतले आहे.

सदस्य श्री. सुरेश जाधव :—ठिक आहे साहेब, धन्यवाद।

यावेळी सदस्य श्री. हरेश जग्यासी यांनी सभागृहात प्रवेश केला.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—एक ज्वलंत विषय आता सुरु करु या, जर सर्वांचा पाण्याचा विषय संपला असेल तर. लोकांचाही दोष हा आहे काही ठिकाणी मी दक्षिणेकडील भागात मी भेट दिली तर लोकांनी पाण्याच्या नळाला तोटीही न बसविल्याचे दिसुन आले, हे सुध्दा त्यांची जबाबदारी आहे. मघाशी मी सांगितले की त्या बाईने पाणी भरत असतांना तेथे तोटी नाही, तीचे पाणी भरुन झाले आहे, परंतु तो पाईपातील पाणी वाहत होते तो पाईप मी ओढुन पाहिला तर ते पाणी गटारात चालले आहे. मला प्रत्येक घरात जावुन बघायचे नाही की प्रत्येकाचे काय ॲटीटयुड आहे. त्यावरुन दिसत आहे की प्रत्येक घरात हे होत आहे. पाल्याच्या भागातील माझा असा अनुभव आहे की गरजेपेक्षा जास्त सप्लाय होत आहे. मग त्यामध्ये लक्ष घालावे लागेल.

परंतु लोकांची प्रवृत्ती मोटर बसविणे, पंचर करणे, लाईन कनेक्शन घेणे, नळाच्या तोटया न बसविणे. ज्यावेळेस तुम्ही लोकांचे मोर्चे आणाल त्यावेळेस एक सुध्दा माणुस असा नसला पाहिजे की या सर्व गोष्टी केलेल्या नाही आहेत. जर माझ्या घरी सुध्दा असे मोर्चे आणले तर मी तुमचे स्वागत करेल. माणसाचा या पध्दतीचा दोष असता कामा नये.

सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—पाण्याच्या वेळी सर्वांच्या मोटर बंद होतील अशा उपाययोजना तुम्ही करा.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—मला सांगा मोटारीची गरज आहे का?

सदस्य श्री. सुरेश जाधव :—ते फॅड झालेले आहे साहेब.
आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—मला सांगा फ्लॅटवाल्यांनी सुध्दा त्यांच्या इमारतीत अंडर ग्राउंड टॅक बसवायला पाहिजे होते की नव्हते. हे कंम्पलसरी करण्याची आपली मानसिकता असेल. आपण सर्वांना नोटिसा देवु व फ्लॅटवाल्यांनी स्वत:ची व्यवस्था करावी.

सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—ठिक आहे, बेशक.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :— इंडयुजल कनेक्शन मी कट करतो. फक्त सर्वांची साथ पाहिजे. साथ नसेल तर करायची गोष्ट आहे तर करतो.

सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—साहेब, सिस्टम जी आहे ती खुपच जुनी आहे.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—ज्या आपण जुन्या लाईन काढत आहात तर त्याची सुरुवात जेएनएनयुआरएम लाईनीपासुन झाली पाहिजे. कारण की आपणाकडे त्याचा योग्य अहवाल आहे की आपण कोणत्या इमारतीत किती कनेक्शन दिले आहे. जर कनेक्शन जास्त असेल तर आपण काही कनेक्शन कट करु शकतात. तसेच त्यावेळी आपल्या प्रभागात गोल मैदान येथिल टाकी सुरु झाली तेव्हा चांगला प्रेशर असायचा, दुस—या माळयापर्यंत पाणी जात होते. तसेच आतमध्ये बॅरेकपर्यंत पाणी जात होते. जसे जसे लोकांनी तेथे मोटर व निपल बसविले आहे त्यामुळे सर्वीकडे सुके झाले, पाणी येत नाही.

सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—साहेब, पाणी पुरवठा विभागात कर्मचा—यांची कमतरता वाढवावी लागेल.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—तो विषय आहे, तो आपण मांडलेला आहे. आपल्याकडे वरिष्ठ पातळीवरील यंत्रणा बंद झालेली आहे. पाणी पुरवठा कार्यालय व शहर अभियंता कार्यालय असेल, सिव्हरेज आणि पाणी पुरवठा मिळुन आपण कार्यालय केले परंतु त्याला सेपरेट इंजिनिअर्स नाहीत. उप—आयुक्त, अतिरिक्त आयुक्त नाहीत, नगररचनाकार नाहीत, सहा. संचालक नाहीत, कोण कोण आहे की नाही ते पहा, सर्व लोक नाहीत. खाली रिक्त संख्या कमी आहे, वर रिक्त संख्या जास्त आहे.

सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :—साहेब, पाण्याच्या लिकेजचे काय करायचे?

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—असे नाही की सर्व जबाबदारीपासुन बाजुला होत आहेत.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—दुसरी एक सूचना आहे की म्हारळगाव डब्ल्युटीपी जी एमआयडीसीची प्रापर्टी आहे, त्यास एकच ग्राहक आहे उल्हासनगर महानगरपालिका. तर त्यास टेकओव्हर करायला पाहिजे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—तो मी विचार केला आहे परंतु मला टाकीवाईज काय स्थिती आहे ते पहावे लागेल.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—होय ते पहा, परंतु आमच्याकडे ओव्हर सोर्स नाही. जर त्यासाठी आपण म्हारळगावाचा प्रोजेक्ट जर टेकओव्हर करतो, तर डेफिसेटीट व्हल्यु त्यांची शुन्य आहे. तर आम्हांस फार कमी भावात मिळु शकतो.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :</u>—ठिक आहे.

<u>सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :</u>—पाईप नाही तर कसे बदली करणार? असे पाणी वाहते ना रस्त्यावर जर आपण पाहाल तर आपणांस रडायला येईल. पाईप नाही तर रबर टाकतात. एवढी मोठी महापालिका आहे आपली.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :</u>—आपण प्रत्येक ठिकाणी लवचिक धोरण ठेवले आहे म्हणुन पाईप सुध्दा रबराचे आहे. ते कोठेही वळविता येतील, सर्व धोरण लवचिक आहे. प्रत्येक ठिकाणी ॲडजस्टमेंट, रस्ता बनविण्याचा ॲडजस्टमेंट, पाणी पुरवठयाचा ॲडजस्टमेंट, ड्रेनेज लाईनची ॲडजस्टमेंट, लवचिक सोडुन जे कठिण स्थिर असते, तशी यंत्रणा असली पाहिजे, पाईप लाईनपासुन प्रशासनापासुन आपण सर्व सोबत मिळुन.

<u>सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :</u>—पाईप कसे टाकले जातील. आम्ही देणार तेव्हा तुम्ही टाकणार.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :</u>—आता महत्वाच्या मुद्दयावर चर्चा करायच्या काय?

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :</u>—आयुक्त साहेब, आपण पाल्यावरुन जे ४५ एमएलडी पाणी घेतो, साहेब, पाल्यावरुन जे आपणांस ४५ एमएलडी पाणी यायचे ते आता ३०—३५ एमएलडी झालेले आहे. ४५ एमएलडी पाणी जर तिकडुन घेतले तर आपल्या ब—याचशा समस्या दुर होतील.

यावेळी सदस्या श्रीमती माया चावला, कु. शकुंतला जग्यासी हया सभागृहातुन बाहेर गेल्या.



<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :</u>—आपण आता आपली जी आर्थिक परिस्थिती आहे, त्याच्याबद्दल आपण थोडेसे लक्ष देवु या, मला वाटते हा विषय फक्त नगरसेवक निधी का नाही दिला, किंवा ५० टक्केच का दिला, हाच का दिला, हे पाहण्यापेक्षा आपली ऑल ओव्हर परिस्थिती जे बजेट आपण केले ७४० कोटीचे त्याचे स्टेट्स काय आहे पहिले सात आठ महिने संपल्यानंतर हे पाहिले पाहिजे. जर आपण बजेट ७४० कोटीचे केले, आपल्यासमोर आता शिल्लक ४०—४२ कोटी आहे, आपल्याकडे बिले ५६ कोटीचे प्राप्त झाले आहे. मार्च पर्यंत आणखी १०० कोटीचे बिले येणे अपेक्षित आहे. आणि मार्चपर्यंतची वसुली जर पाहिली तर आपणांस आता दिसत आहे की आपण मोहिम चांगली राबविली वगैरे, जुन्या नोटापांसुन सुध्दा वसूली चांगली झाली. आता जर आपण आकडा पाहिला तर कालपर्यंत आपण ३९ कोटी वसुली या महिन्यात केली. आजचा आकडा जर काढला तर दिडदोन कोटी वसुली केली. आज जर कॅस पाहिली तर १ लाख ५० हजार आहे, फक्त जुन्या नोटांबाबत माहिती आली नाही म्हणुन जुन्या नोटा थांबविल्या. याचा अर्थ काय आहे जर जुन्या नोटा बंद केल्या वर वसुली थांबविली तर नविन नोटांबाबत लोकांना देण्यास भाग पाडु. जसे आपण चॅनलवर पाहतो जर लोकांकडे दैनंदिन गरजांसाठी नोटा नसतील तर आपण ऑर्गनाईज्ड सेक्टरमध्ये पाहिले तर येणा—या दिवसात लोकांकडुन नविन नोटांमध्ये मालमत्ता कर येणे अवघड आहे. धोक्याची घंटा आपण समजुन घ्याी. आज जरी तुमच्याकडे ४० कोटी जमा दिसले तर तीन महिन्यामध्ये अजुन काही लागले तर त्यात बदल करता येईल. आताच आपणाकडे ६५ कोटी बिल आहेत व त्यात १०० कोटी येणे आहे आणि मग हे देणार कोठुन आणि कोणता मॅसेज आपण एंजन्सीज किंवा ठेकेदारांना देणार, फुकटात काम करुन घेतात आणि बिल मात्र दोन, दोन, चार, चार महिन्यात देणार. जी बिले आली आहेत त्याची माहिती घेतली तर २००८ पासुनची बिले आहेत. म्हणजे ज्या ठेकेदारांना जर आपण आठ—आठ वर्ष बिले दिले नाहीत तर नविन येणा—या ठेकेदारांना सुध्दा बिले लवकर मिळणार नाहीत, त्यामुळे निविदा त्याच पध्दतीने भरा, काम सुध्दा त्याच दर्जाचे करा, कामामध्ये जी काही मिलावट वगैरे आहे ती काढायला मोकळे. जेव्हा आपण वेळेवर बिले देवु काम त्या पध्दतीने असेल, तर आपणाकडे ठेकेदार येतील की नाही दोन कोटीचे काम केले तर दोन कोटी त्यांना त्याच मुदतीत मिळेल. मी मागे सभेत सुध्दा सांगितले, कोणीही चांगल्या दर्जाचा ठेकेदार ज्याची चांगली ऐपत आहे, काम करण्याची कुवत आहे तो आपणाकडे काम करायला धजावत नाही. आपली ख्याती अशी झालेली आहे त्याठिकाणी तेच लोक काम करु शकतात, जेथे हे सर्व मिलावट, बिले, बाकी मॅनेजमेंट, ॲडजस्टमेंट अशा पध्दतीने ते करु शकतात, तर मला वाटते हा कोठे तरी थांबवल पाहिजे. अशा पध्दतीने लोक आले पाहिजे व चांगल्यापध्दतीने काम केले पाहिजे. ही पार्श्वभुमी लक्षात घेणे गरजेचे आहे. जर आपण आपला अर्थसंकल्पच नीट नाही केला त्याचे परिणाम, आपल्या सोयीसुविधेच्या कामावर, दर्जावर व वेळेवर होणार आहे त्याकरीता लक्ष दिले पाहिजे. मी स्वतः येथे रुजु झाल्यानंतर माहिती घेतली, नगरसेवक निधी म्हणुन नाही म्हटले, मी

काय म्हटले तर जी काही कामे आहेत त्यात केंद्र व राज्य शासनाचे अनुदान नाहीत अशी सर्व कामे हा आदेश देईपर्यंत थांबवु. याचा अर्थ असा होतो की, जर जुने दयायला पैसे नाही तर नविन कशाला हे करायला पाहिजे. तर हा मॅसेज सुध्दा लोकांपर्यंत गेला पाहिजे. जर तुम्ही कर भरत नसाल तर विकासाची कामे तुमच्यासाठी वेळोवेळी ठेकेदारांकडुन करुन प्रस्तावित करण्याचे काय प्रयोजन आहे? लोकांना जर वाटले की आपण कामे करत आहोत तर ती लोक कर सुध्दा भरतील. आता जुन्या नोटांमुळे हा भरणा दिसतो काही कारवायांमुळे दिसत आहे. जर त्याच्या खिश्यातच नसेल तर ही नियतीची गोष्ट आहे. काही लोकांकडे ऐपत नसते पण नियत असते, त्यांच्याकडुन कारवाई करुन वसुल करु पण ऐपत नसेल व नियत सुध्दा नसेल तर कसे वसुल करणार त्यामुळे पुढचे दोन महिने हे कठिण वेळेचे आहे हे सर्वांनी लक्षात घ्यावे. आता या परिस्थितीत आपण कसे काम करायचे, त्यासाठी आपला जो नगरसेवक निधी आहे, पदाधिका–याचा निधी आहे त्यासाठी आपणांस ४० कोटी लागत आहे. २–३ कोटीचा फरक आहे. ३७–३८ कोटी आपणांस लागत आहे, तर १०० टक्के आपल्याला देणे आहे. दुसरी गोष्ट ५० टक्के करतांना मी अशी सूचना दिली की ती कामे करतांना आपण काही मुलभुत गोष्टींना प्राधान्य देवु या. गल्लीबोळापर्यंतची जी कामे आहेत, नाली, गटार,आणखी काही ती करण्यापुर्वी त्या त्या प्रभागातील लोकांनी कर भरला आहे का हे आपण पाहिले पाहिजे. मला वाटते असा विषय आपण लोकांपुढे घेवुन जाणे योग्य नाही याची मला कल्पना आहे. परंतु हा विषय घेतांना पाठी मागे जरा विसरायला पाहिजे. दारापर्यंत कॉमन सोयी सुविधा पाहिजे तर त्या एरियातील लोकांनी कर भरायला पाहिजे. ती माहिती माझ्याकडे प्रभागनिहाय आहे, पाहिजे तर मी ती सर्वांना शेअर करतो. कुठल्या प्रभागातुन किती टक्के वसुली आली आहे, काही प्रभागातुन तर शुन्य टक्के वसुली आली आहे. ही कॉम्प्युटरची माहिती आहे. काही प्रभागांमध्ये काही टक्के लोकांनी कर भरलेला नाही. तर असा विषय लोकांपुढे आला पाहिजे. नाली, गटार व अन्य काही विषय असतील तर त्यामध्ये जेथे खरोखर गरज आहे, जर आपण तेथे भेट दिली तर त्याठिकाणी आपण फेस टु फेस ते करु देखील. परंतु सरसकट आपण जनरल आपण वर्षानुवर्षे करत आहोत तशा पध्दतीने न करतो, आपण रस्ते, शौचालय या गोष्टींसाठी ५० टक्के निधीचे प्राधान्य दयावे असे माझे म्हणणे आहे. येणा–या काळात आपण रस्ते, पाणी व शौचालय चांगले देण्याचे धोरण आपण ठेवावे. त्यावर आपल्याला जास्त बजेट खर्च करता यावा, असे माझे एक धोरण आहे. आणि खासदार आमदार यांचेही काही २० टक्क्याचे निधी मिळाले आहे, त्यातुन कामे होतील परंतु ओव्हर ऑल जो खर्च आहे, साधा एक्सपर्टीगचा खर्च करायचे म्हटले तर १००० मिटरला जवळपास ६ कोटी पेक्षा जास्त पैसे लागणार आहे. तर ओव्हर ऑल हया सर्व गोष्टी आपल्याला खर्च, दर सर्व जर पाहिले तर नाली, गटार तर तेव्हाच करु या जेव्हा त्या प्रभागातील लोक आपल्याला कर भरण्यास सहकार्य देतील. माझ्याकडे सर्व डिटेल्स आहे परंतु ते मी आपणांस उघड करु शकत नाही. त्यावर नंतर चर्चा करु. पण यामध्ये आपणांस ठराव काय पाहिजे? ठरावा काय यामध्ये?

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारेः–</u>आयुक्त साहेब, तुम्ही सर्व सांगितले, माहिती दिली, सर्वांनी कान लावुन ऐकले आहे. परवा मला इंटरव्हयु घेतांना एक प्रश्न विचारला, उल्हासनगर महानगरपालिका, एका शब्दात उत्तर दयायचे होते किंवा एका वाक्यात उत्तर दयायचे होते, त्यात मी उत्तर दिले लोकांची अपेक्षा असलेली संस्था किंवा लोकांच्या अपेक्षा पुर्ण करायच्या. तर लोकांची अपेक्षा पुर्ण करण्याची संस्था. आता लोकांच्या काय अपेक्षा असतील तर रस्ते व्यवस्थित असावेत. पाणी व्यवस्थित असावे, लाईट असली तरी चालेल नसली तरी चालेल, आरोग्याच्या दृष्टीने सॅनिटेशन व्यवस्थित असावे. नाले व्यवस्थीत असावे, साफसफाई व्यवस्थित असावे. पाणी व्यवस्थित असावे. यापुर्वी आम्हांला माहित नव्हते की लवचिक पाईप कसे असेल, त्यास नाव दिले आहे एसडीपी पाईप. तेव्हा आम्हांला काहीच माहित नव्हते. जेव्हा २००९ मध्ये ठराव पारीत झाला जेएनएनयुआरएमची योजना आली तेव्हा आम्हांला बरे वाटले, आम्ही तर सांगितले की चौथ्या माळयापर्यंत प्रेशरने पाणी जाणार. २४ तास पाणी २४ बाय ७ अशी आम्हांला अधिका–यांनी माहिती दिली. केंद्र शासनाकडुन निधी मंजुर होत आहे. लोकांना सांगितले जाते पाण्याची काळजी नाही, तुमचे मोटरचे बिल वाचेल. लोकांना मोटर लावायची आवश्यकता नाही किंवा हौसपण नाही. उलट झोपडपट्टीचे लोक बिल भरत आहेत व आता बिल सुध्दा वाढलेले आहे. पुर्वी आमच्याकडे २०० येत होते आता १८०० झाले. आता बिल किती येते, तुम्ही तर म्हणाले होत २४ तास पाणी येणार ते सुध्दा विना मोटर. त्यानंतर दिवस गेले २०१२ कि २०१३ मध्ये ठेकेदाराने काम बंद केले. काय तर म्हणे निधी संपला, बरोबर? आम्हांला काही माहित नाही, सुरुवातीचा ठराव काढा, इतिवृत्त काढा मग कळेल. प्रशासनाने सांगितले की, तुम्ही ठराव पास करा. तातडीने ठराव पारीत झाला तर राज्य व केंद्र शासनाकडुन दोन्ही कडुन पारीत झाल्यावर आपणाकडे पाणी सुरळीत होईल. आम्ही ते स्वप्न पाहत होतो. स्वप्न दाखविणारे कोण होते तर प्रशासन. स्वप्न उध्दवस्त झाले. म्हणुन आम्ही लोकांना डिसेंबर मध्ये काम पुर्ण होईल, विठ्ठलवाडीची टाकी फार पुर्वीची आहे. १९८७ ची टाकी आहे ती चालु होणार आणि डिसेंबर २०११ मध्ये पाणी सुरु होणार. आजतागायत काय करायचे तेही प्रशासनाने

ठरविले नाही. मी ओरडुन थकलो, तुमच्या समोर सुध्दा विषय काढलेला आहे. किती आयुक्त आले, किती एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर आले पण काही नाही. ती टाकी ठेवायची की तोडायची आमचा दोष आहे का? दोष कोणाचा, आमचा, तुमचा का प्रशासनाचा? एकंदरीत महापालिका प्रशासन म्हणुन बोलत आहे. त्यावेळी आम्हांला एसडीपी पाईप, सीडीपी पाईप हे काही आम्हांला माहित नव्हते. प्रशासनाने सांगितले की हे पाईप चांगले, मग त्या ठेकेदाराने बनविले की प्रशासनाने बनविले हे माहित नाही. मग ती योजना २०१२ मध्ये पुर्ण होईल आणि शहरामध्ये प्रेमनगर टेकडी पासुन शहाड फाटक येथिल झोपडी असेल किंवा इमारत असेल किंवा लो लेव्हलची झोपडी असेल त्या प्रत्येकास पाणी मिळेल. एक संकल्पना असे स्वप्न याठिकाणी दाखविले आहे. आपण सांगितल्याप्रमाणे मंजुरी दिली, २०१२ मध्ये सांगितले त्यास रिवाईज्ड करावे लागेल, आमच्या महासभेने सांगितले, ठिक आहे, १२७ कोटी पाण्यात जाण्यापेक्षा तुम्ही बनवा. महानगरपालिका त्याचा रिफंड देईल, महानगरपालिकेने रिफंड दिला, प्रोजेक्ट बनविला शासनाच्या अभियंत्यांनी तेव्हा श्री. सेलवन सुध्दा होते, श्री. टाके होते, श्री. अली होते, त्यांनी प्रोजेक्ट बनविला, तेव्हा १३५ कोटीचा महापालिका निधी वापरलेला आहे. अजुनही तो प्रोजेक्ट पुर्ण नाही, तर दोष कोणाचा, झोपडपट्टीतील नागरीकांचा, कर भरला आम्ही. काही चोर असतील २० टक्के, ५० टक्के चोर असतील. पण त्यांना आम्ही काय दयायचे? तुम्ही काय देत आहात? लोक म्हणतात आम्हांला टीबी होती, आम्हांला अस्थमाचे आजार झाले, त्यास उत्तर आम्ही काय देणार? ज्यांनी कर भरला ते आम्हांला विचारणार. आमचा दोष काय? ज्यांनी कर भरला नाही त्यांच्यावर तुम्ही कारवाई करा. आम्ही भरतो, आम्हांला सुविधा दया. नाली, स्वच्छता, गाडी फिरते, स्विपींगची मशिन फिरते, मी परवा १.०० वाजता पाहिले, गाडी फिरते, काही इलाज नाही, तरी चालु आहे, दोष कोणाचा आमचा? तुमच्या सारखा प्रशासक याठिकाणी आला असता, आमच्या अधिका—यांनी जबाबदारीने काम केले असते. संपुर्ण दोष नगरसेवक व लोकांना देवुन चालणार नाही.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>माझे ऐकुन घ्या, मी दोष नाही देत आहे. मी कुठल्याही संस्थेला, व्यक्तीला किंवा तुम्हां कोणाला दोष नाही देत, उलट सामुहिक सर्वांची जबाबदारी आहे असे मला वाटते.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>तर आज उल्हासनगर महानगरपालिकेची अशी अवस्था आहे, कल्याण अंबरनाथ रस्ता होणार असे आम्हांस सांगितले, प्रशासनाने सांगितले निविदा काढणार, एमएमआरडीएकडे आम्ही गेलो होतो तेथे निधी घेतला, १३ कोटी काहीतरी निधी होता, बाकीचा ३९ कोटी येणार होता. निविदा निघाली म्हणुन सांगितले, रस्ते लोकांनी तोडले. व्यापा—यांचा रोष घेतला, आज ते लोक उध्दवस्त आहेत. तरी रस्ता होत नाही, होईल कधी नाही, सांगता येत नाही. दोष कोणाचा? आमचा, लोकांचा की प्रशासनाचा? नगररचना विभागामध्ये काय चालले आहे? गेल्या दिड वर्षापासुन, दोन वर्षापासुन प्रत्येक अधिकारी आला तर सुरुवातीला थांबवितो, मग ते श्री. होगेपाटील असतील किंवा इतर कोणी नगररचनाकार असतील, प्रत्येक येतो व थांबवितो, आम्हांला माहित नाही, आम्ही म्हणतो ठिक आहे, श्री. गुरगुळे असतील, नंतर जेव्हा गेले तेव्हा आम्हांला लक्षात आले की नको ते त्यांनी काम केलेले आहे. आता सुध्दा परिस्थिती तीच आहे. जेव्हा जातात येथुन मग ते कोण आहेत, श्री. करपे, श्री. होगेपाटील असतील, श्री. गुरगुळे असतील, श्री. सोनवणे असतील, दोष कोणाचा, पब्लीकचा नाही, येथिल अधिका—यांचा. नगरचना विभागात सुध्दा तेच आहे. कर न भरणा—यांवर कारवाई झाली पाहिजे व कर भरणा—यास सुविधा मिळाल्या पाहिजे, तसे जे कायदेशीर आहे त्यांचे प्लान मंजुर झाले पाहिजे आणि जे बेकायदेशीर असतील त्यांना कायमचे उध्दवस्त करा. कल्याण अंबरनाथ रस्त्याबाबत आम्ही सुरुवातीपासुन सांगत होतो सर्व सभागृहाच्या मताने की काही तरी नियम बनवा, जी प्लस २, नदी मध्ये नको आहे, रस्ता १०० फुट असला पाहिजे, एक स्कीम झाली. तर तेही मान्य नाही, त्या व्यापा—याने जायचे कोठे? आणि आता तर नोटबंदी. सांगायचे तात्पर्य असे की लोकांची अपेक्षा आहे, तुमच्याकडुन, आमच्याकडुन जर तुम्ही आम्ही एकत्र आलो तर शहराचा विकास होईल आणि लांब गेलो तर शहर भकास होईल. आणि संघर्ष न होण्यासाठी, विकास साधण्यासाठी लोकांच्या अपेक्षा आम्ही आमच्या माध्यमातुन तुमच्यापर्यंत पोहोचवतो. तुमचा आणि आमचा संपर्क, समन्वय असला पाहिजे, तो कमी पडतो. प्रशासनाच्यावतीने जे ऐकतात ते अधिकारी कार्यक्षम नाहीत. आम्ही वारंवार सांगितले, अगोदरच्या आयुक्तांना सांगितले. अभियंता घ्या, स्टाफ भरती करा, आम्ही करणार काय? आम्ही बोलु शकत नाही. कारण ती ॲथोरीटी आमच्याकडे नाही. मग ती भरती झाली नाही, वर्षानुवर्षे आम्ही सांगत आहे. दोष कोणाचा आमचा? वॉलमन नाहीत, श्री. मनसुलकरांनी सांगितले की एमआयडीसीतुन जे पाणी येते आम्हीही भांडतो, तर आलेले पाणी व्यवस्थित वितरीत करण्यासाठी, तर आपणांस विनंती की निवडणूकीचे वर्ष आहे यावेळी असमाजिक तत्व उभे राहतात, नगरसेवकांच्या विरोधात किंवा नको त्या लोकांना प्रसिध्दी मिळविण्यासाठी लोकांना भडकविण्यासाठी काम चालते. मी तुम्हांला काही कामे सुचवितो की ५० टक्क्यामध्ये अमुक अमुक करावे, नाला लिहुन घ्या, नाल्याची आवश्यकता आहे की नाही. खांदेश मटन ते आनंद विदयालय नाला याची परिस्थिती काय, हे मी माझ्या प्रभागाबाबत सांगत आहे.

त्यानंतर मी सांगतो गिता कॉलनी शौचालय, माधव नगर शौचालय, एमएमआरडीए शौचालय, वसिटा कॉलनीचे शौचालय बंद आहे. वारंवार सांगितले आहे की निधी त्यांना दया नाहीतर शौचालय आपणांस बंद करावे लागेल. अशी कामे जी आहे ती करावीच लागणार आहे. रस्ते विकसित केले तर आतील लोक, जर दलदल रस्त्यावर आले तर त्यांना बरोबर वाटणार नाही. लोकप्रतिनिधी कशासाठी असतात, लोकांची मागणी, लोकांच्या भावना, सर्वच आपल्यापर्यंत पोहोचण्सार नाही, हे थांबले पाहिजे. तर मागील वर्षाची २०१५–१६ ची कामे अदयाप प्रलंबित आहेत. यावर्षी आपले ठरल्याप्रमाणे ५० टक्के. तुम्ही आमच्या जागी असते तर तीच भुमीका मांडली असती. फक्त पात्र बदलतात. फक्त समस्या बदलत नाही, ती समस्या सोडविण्यासाठी आपण त्या भुमीकेमध्ये जायला पाहिजे. मोदी सरकारने जेव्हा नोटबंदी केली तेव्हा समस्या निर्माण झाली त्याचे परिणाम काय होतील ते भविष्यात कळेल. आज लोकांची अपेक्षा आहे, आज आम्हांला धुळ खायला लागणार आहे. पाणी जे मिळते तर उल्हासनगरला ५५ एमएलडी पाणी मिळते तर आम्ही सांगतो उल्हासनगरला ४५ एमएलडी पाणी खुप झाले. मिळत नाही, मिळण्यासाठी काही तरी उपाययोजना केली पाहिजे. तर तात्पुरते आपण तुम्ही आणि आम्ही मिळुन एमआयडीसीच्या मागे लागुन पुर्वी जसे पाल्यावरुन ५३ एमएलडी पाणी येत होते, ते मिळण्यासाठी आज जसे ३५ की ३४ एमएलडी केले, त्याचा परिणाम उल्हासनगर–४ व ५ मध्ये दिवसाआड पाणी मिळते. आठवडयातुन तीन दिवस म्हणजे गुरुवारी पाणी मिळणार नाही, नंतर शुक्रवार, मग शनिवार पाणी मिळेल. ती लोक आपल्याला फिरु देणार नाहीत. तुमच्यापर्यंत पोहचु शकणार नाही, आम्हीही तेथे राहु. लोक शेवटी बघणार की तुमचा नगरसेवक कॅपेबल नाही, जावु दया चला. अशा वेळेस सर्व प्रशासनावर तुटुन पडतात मग ते नगरसेवकांच्या सर्व हाताबाहेर जाते. जेव्हा पाण्याचे दुर्मिक्ष होते तेव्हा नगरसेवकांनी परिस्थिती हाताळली. तेव्हा प्रशासनाच्या मागे आम्ही कवच म्हणुन उभे राहिलो. चांगले वातावरण राहण्यासाठी तुम्ही आणि आम्ही चांगले दिड महिने विकास करु या. एक चांगल्या वातावरणामध्ये निवडणूकीला सामोरे जावु या. तेव्हा तुम्ही तुमची भुमिका सांगितली, रास्त आहे, की कर्ज काढुन, ऋण काढुप सण साजरा करु नये, अशी मराठी गावढी म्हण आहे. पण कधी कधी ते करावेही लागते. तर आता महासभेची विनंती आहे की नगररचना कारभाराबाबत लवकरात लवकर निर्णय घ्यावा. त्यातुन आपणांस महसुल उत्पन्न होती, त्यानंतर साफसफाईच्याबाबतीत, जे आधी ऐकले, हागणदारी मुक्त बाबत कशा प्रकारे अहवाल झालेला आहे. आणि त्याचबरोबर साफसफाईबाबतीत कचरा उचलणे आणि झाडु खाते. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातुन मी तुम्हांला एक प्रस्ताव देतो, २०१५–१६ साठी प्रस्ताव दयायची गरज नाही, तुम्हांला भावना कळलेल्या आहे. निवडणूकीचे वर्ष आहे त्यामुळे बॅकलॉग तुम्हांला कळण्यासाठी वर्ष आहेतच, मागील दिड वर्षामध्ये, आमच्या तीन वर्षामध्ये सतत बदल झाला, जकात गेली, एलबीटी आली, एलबीटीची वसुली नाही झाली, गेल्या दोन तीन वर्षामध्ये नगरसेवकाच्या विभागात कामे झाली, १५–१६ मध्ये तर कामेच झाली नाहीत. ज्यांनी नियोजन करुन कामे दिली तर त्यांची अजिबातच कामे झाली नाहीत. काही लोकांची झाली, काही लोकांची झाली नाही, त्यामुळे तो गॅप नको राहायला. तुम्ही सांगता की प्लॅनिंग करुन, तसे प्लॅनिंग करुन काम देवु, परंतु लोकांवर अन्याय होता कामा नये. २५ लोकांची कामे झाली आहेत, आणि २५ लोकांची बाकी आहेत तर तसे होता कामा नये. त्यामुळे १५–१६ चा निधी असेल, प्राकलने करुन झाली असतील तर खात्री करुन घ्या. जसे मी तुम्हांला उदाहरण दिले. लोकांना सांगितले की होईल आता. मंजुर केले अशा प्रकारची काही कामे आहेत काय? आता पाण्याच्या बाबतीत सांगतो, ती योजना, माझे पुर्ण पॉकिट झाले, एक प्रभाग होता तर त्याता माधव नगरच्या पॉकिटमध्ये लाईनीच घेतल्या नव्हत्या. आता सांगितले की त्या लाईनी घेतल्या आहेत. ती एक निविदा मंजुर करुन मग त्या लाईनी टाकायला घेतल्या. श्री. सेलवन यांना विचारा अशी कामे करुन घेतली. माझ्या प्रभागामध्ये वॉलमनचे पाणीच बंद झाले. पंधरा दिवसापासुन सांगतात की आम्ही आनंद नगरला गेलो, लालचक्कीला गेलो, जीजामाता येथे गेलो. मोठी बारवीची लाईन तुटलेली होती त्याचा परिणाम लोकांना पाणी मिळत नव्हते. आता अशा वेळी काय करायचे? जर शासकीय पध्दतीने गेलो, निविदा काढणे,प्राकलन मंजुर करुन घेणे, त्यास दिड महिने तर दोन महिने गेले असतील, अशा वेळी इमरजन्सीमध्ये काम, टाकीच्या खाली खोदलेले आहे, तेथे मिळाला नाही पॉईंट. वॉल खोदला तेथे रस्ता तोडला, आता ही सर्व प्रक्रिया करायची असेल तर त्यास दोन महिने जातील. तोपर्यंत त्या खोदलेल्या रस्त्यात लोक रस्त्यामध्ये पडणार काय? जी काही तातडीचे कामे असतील ती करावीच लागतील. त्यामुळे कायदेशीर प्रक्रिया ती कामे, इमरजन्सी कामे विश्वासात घेवुन त्यामध्ये गैरकृत्ये किंवा गैरव्यवहार होणार नाही याची काळजी घ्या, पण अशी कामे आपल्याला करावीच लागणार आहे. नाहीतर लोक आम्हांलाच शिव्या घालतील. प्रशासन वा यापुर्वीचे प्रशासन तुम्ही लोकांवर घेत आहात, लोकांचे ऐकत आहात, पुर्वीचे आयुक्त ऐकत नव्हते त्यामुळे लोकांना आमची सवय झाली होती. आयुक्त नाहीत, शहर अभियंता नाही, एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर नाहीत, मग राग कोणावर नगरसेवकांवर. लाईट गेली तरी नगरसेवकांनी फोन करावा. लोकांना ती सवय झालेली आहे, लोकांना अंगवळणी यायला वेळ लागेल. लोकांच्या अपेक्षा नगरसेवकांवर असतात आणि त्यामुळे नगरसेवकांना ताण आहे. त्यामुळे अशी कामे आपल्याला करावीच लागतील जी सुचविलेली कामे आहेत ती करावीच लागतील.

२०१५–१६ मध्ये ईनिविदा निघालेल्या आहेत. किंवा प्राकलने आहेत नगरसेवकांची ती कामे पुर्ण करुन २०१६ आणि २०१७ आपल्या सभेत ठरल्याप्रमाणे...

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानीः–</u>श्री. बोडारे साहेब, धन्यवाद। धन्यवाद। धन्यवाद।

यावेळी सदस्या श्रीमती इंदिरा उदासी, श्रीमती आशा बि–हाडे, श्रीमती मिनु दासानी, श्रीमती लक्ष्मी सिंग, श्रीमती अर्चना करनकाळे हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारेः–</u>तुम्ही आणि आम्ही बरोबरच असणार आहे, या शहराचा विकास करण्यासाठी लोक पाहतात. सकाळी ८ वाजल्यापासुन रात्री ८ वाजेपर्यंत ज्या पोटतिडकीने तुम्ही काम करत आहात, त्या पध्दतीने ती कामेही झाली पाहिजेत. आता मागे तुम्हांला मी रस्ता दाखविला गेल्या दिड वर्षापासुन तेथे डांबर पडलेला आहे, तर लोक दोष कोणास देतील? एकतर नगरसेवक निष्क्रिय, या दिड वर्षापासुन एकतर व्हीटीसी पासुन मानेरा येथे आणि श्रीराम टॉकिज मी दाखविले ते. श्रीराम ते कल्याण हद्दीपर्यंत सिमेंट रोड आणि तेथुन पुढे आल्यानंतर उल्हासनगरचे दर्शन. तर अशा वेळी लोकांना काय सांगायचे, निविदा होत आहे ते होईल तर लोकांची ऐकायची मानसिकता नाही आहे. लोकांना जलद पाहिजे, तर कामे तातडीने करा, नगरसेवकांनी त्यांच्या समस्या ठेवलेल्या आहेत. अजिबातच चुकीचे असे नाही, येथुन पुढे गैरव्यवहार होणार नाही असे करा. परंतु या पुर्वी जी कामे आवश्यक होती ती करा. कल्याण अंबरनाथ रस्त्याबाबत मी मागील महासभेत विषय मांडला होता. तर तो कधी होणार, लोकांना आम्हांला सांगायला, उत्तर दयायला. ठिक आहे, तुम्हांला त्रास झालेला आहे, शहरासाठी थोडा त्रास झालेला आहे, आम्ही तेही त्यांना आव्हान करु. जसे श्री. मोदीजी सांगतात की ५० दिवस वाट पहा. थोडा त्रास काढा. ते लोकांना सांगतात की तुमचे चांगलेच दिवस येतील. तुम्ही १५, २०, ३०, ५० दिवसात नक्कीच कराल, अशी सर्वांची अपेक्षा आहे हे मी सभागृहाच्यावतीने बोलतो. हे पुर्ण करा अशी आग्रही माफी.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वेः–</u>यामध्ये मी थोडीशी एक गोष्ट जोडतो, निधी देतांना एक गोष्ट लक्षात घ्या साहेब, प्रत्येकाच्या प्रभागात दोन दोन प्रभाग आहेत, आता माझ्या प्रभागात दुस–या नगरसेविका होत्या त्या वारल्यामुळे निधी तुम्ही जर ५० टक्के दिला तर तो प्रभागावर होणारा अन्याय आहे. कारण इतर ठिकाणी दोन दोन नगरसेवक आहेत तर ते दोन्ही नगरसेवक संपुर्ण प्रभागास तो निधी वापरणार. कृपा करुन तेवढी गोष्ट लक्षात घ्या. असे काही प्रभाग आहेत, श्री. सतरामदास जेसवानी यांचे प्रभाग आहे, माझे सुध्दा प्रभाग आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>हे पहा मी या वर्षीचा ५० टक्के निधीबाबत सांगितले होते. त्यामध्ये काही जुने म्हणजे १५–१६ चीच काय तर १४–१५ ची कामे सुध्दा माझ्याकडे आलेले आहेत. त्यामुळे आपल्याला निर्णय घ्यावा लागेल की दोन वर्षापुर्वीचा निधी आपल्याला दयावे लागेल काय, तर मला वाटते आपण चालु वर्षामध्येच स्टील करत आहे. माझा हा मुद्दा आहे की ज्यांनी कामे दिली होती त्यांनी वेळेत पुर्ण करुन घेतली. ज्यांची राहिली त्यांचे काही नाही. कुठेतरी डेडलाईन आपल्याला करावी लागेल. ८ नोव्हेंबरला जर ५०० व हजाराच्या नोटाबंद झाल्या, तर ७ नोव्हेंबरपर्यंत काही लोकांनी खपविल्या सुध्दा. त्यामुळे असे नाही म्हणता येणार की ७ नोव्हेंबरच्या लोकांचे झाले काम आणि ८ नोव्हेंबरवाल्यांचा काय दोष आहे? कुठेतरी कोणत्याही निर्णयाला एक क्वालिफाईन डेट असते, आणि त्याप्रमाणे करु या. मी मघाशी सांगितले आकडेवारी परत सांगतो, ओव्हरवॉल आपली वसुली फक्त ३२ टक्के आहे. ही ३२ टक्के नव्या नोटा व जुन्या नोटा यामुळे पुढील ३ महिन्यात होईल की नाही मला माहित नाही. त्यामुळे बिल मात्र १०० टक्के येणार पण वसुली ३२ टक्के येवु शकते. साधे गणित आहे, आपल्या खिश्यात जर पैसे नाही तर दुकानात काय जावुन करणार? तेवढयाचाच मान घेणार जेवढे खिश्यात पैसे आहे.

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :–</u>साहेब, फक्त करावर आपण अवलंबुन न राहता जसे मी सांगितले की ज्यांचे प्लान रितसर येतात त्यांचे प्लान पास करा ना.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–</u>ठिक आहे, जर ती येणारी रक्कम असेल म्हणुन आपण भविष्यात मिळणार तर त्याच्यावरही आपण आज खर्च करणार तर त्यामध्ये आपण १७–१८ चे बजेट कसे मांडणार? १७–१८ चे बजेटपण आपल्याला ठेवायचे आहे.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>आयुक्त साहेब, माझे काय म्हणणे आहे, १५–१६ चे काम कशासाठी झाले नाही? ३१ मार्च झाले, आपल्याला स्पील ओव्हर साठी स्थायी समितीची मंजुरी घ्यावी लागते, नगरसेवकांनी वेळोवेळी विनंती केली आहे परंतु प्रशासनाने पास केलेले नाही, प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे तो निधी नगरसेवकांना का मिळु नये? ८० टक्के लोकांना मिळाले. कारण ज्यांनी अगोदर सुचविले की माझे हे काम झाले पाहिजे, त्याचे प्राकलन तयार झाले, तुमच्या प्रशासनाने ते ३१ मार्चपर्यंत करायला पाहिजे होते, केले नाही, त्यानंतर आपण स्थायी समितीमध्ये त्याचा ठराव घेतला की स्पील ओव्हर करुन करायला पाहिजे. त्या नगरसेवकाची चुकी असेल, त्याने आपले काम नाही सुचविले असेल, ठिक आहे १४–१५ चे आम्ही बोलत नाही, तुम्ही करु नका. पण १५–१६ चे ज्या लोकांनी वेळेवर पत्र दिलेले आहे, प्रशासनाने त्याचे प्राकलने तयार करुन आणि वेळेवर त्याचे काम केले पाहिजे, नगरसेवकांवर अन्याय कशासाठी?

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>हा विषय अन्यायाचा किंवा वेळ न पाळण्याचा नाही. परंतु आपण पैसे कोठुन देणार ते मला सांगा.

<u>सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :—</u>जे जकातीचे पैसे होते ते काय केले?

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>संपुर्ण फिगर आपणांस समजवावी लागेल.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>साहेब एक विनंती आहे, मी वारंवार तुम्हांला सांगितले की काही अधिका–यांना सवय लागली आहे. फाईल सही झाली की बाजुला ठेवायची, मला वाईट शब्दात बोलायची इच्छा होते. आम्ही जोपर्यंत तेथे जात नाही तोपर्यंत ती फाईल होत नाही. प्रशासनाची ही सवयच झालेली आहे. फाईलीचा निपटारा त्यादिवशीचा त्यादिवशी करत नाहीत. काही लोक फक्त दुस–यांना घेवुन बसायचे. आणि केव्हा काहीतरी रिमार्क मारायच्या. श्री. सुनिल सुर्वे यांच्या फाईलला रिमार्क. पण इतर फाईलीला रिमार्क नाही विषय एकच आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>हे पहा, आपण जेव्हा महासभेच्या वेळी आमनेसामने भेटतो, आपण जसे नागरीकांसाठी एक दिवस ठेवतो तसे नगरसेवकांबरोबर एक दिवस सभा ठेवण्याचा माझा मनोदय आहे. जे प्रलंबित प्रश्न असतील त्याचा काही तरी मागोवा घेता येईल.

<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u>साहेब, आपले म्हणणे बरोबर आहे. मा. महापौरजी, आठ महिन्यापासुन माझा प्रश्न येत नाही. आज स्थगित सभा आहे, परंतु सामान्य सभेत आठ महिन्यापासुन एक प्रश्न सुध्दा आलेला नाही.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>भगिनी, विषयांतर होत आहे. त्यासाठी महापौर महोदयांनी बोलावे.

<u>सदस्या श्रीमती जया साधवानी :—</u>साहेबांनी जसे सांगितले की, नगरसेवक व आयुक्त हे आपसात बोलतील, तर माझे हे म्हणणे होते की प्रश्न येतात कोठे आमचे? तर श्री.सुर्वे साहेब आपणांस असे वाटते की मीच बोलावे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे :—</u>मी त्यादिवशी महापौर महोदयांना सुध्दा सांगितले की प्रश्न घेवुन टाका.

<u>सदस्या श्रीमती जया साधवानी:—</u>प्रश्न लाईनीत लागले आहेत.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>माझी पुन्हा एकदा सर्वांना विनंती आहे, जो निर्णय आपण घेतलेला आहे त्यासाठी नाईलाज आहे, ५० टक्के कपात निधीतुन करावीच लागणार आहे. त्यामध्ये देखील कामे सुचवितांना जसे मी सांगितले, जर कामे नाले गटारची असतील तर आपण तेही करु. पण १४–१५ व १५–१६ चा जो निधी आहे तो आपल्याला याठिकाणी घेता येणार नाही. आता मी लेखा अधिका–यांकडुन माहिती घेतली तर तीच कामे जवळपास ७० ते ८० कोटीची आहेत.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>नगरसेवक निधी व प्रभाग समिती निधी आम्हांला पाहिजे, बाकी सर्वसाधारण निधी नको.

<u>सदस्य श्री. सुभाष मनसुलकर :—</u>साहेब, तुम्ही आहेत, म्हणुन विश्वासात आम्ही कामे करुन घेतो.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव :—</u>आयुक्त महोदय, मागील वेळेस सर्वसाधारण निधी आयुक्तांच्या सांगण्यावरुन पास झालेले आहे. त्याचे आपण काय करणार? जसे आपण आयुक्त आहात, तेही आयुक्त होते. आपल्याही सांगण्यानुसार कामे होत आहेत, विना वर्कऑर्डरच्या. आणि काही लोकांनी कामेही केलेली आहेत.

<u>सदस्य श्री. पृथ्वी वलेचा :—</u>जेव्हा तेव्हा सांगता पैसा नाही, पैसा नाही तर बंद करा महापालिका. आम्ही काय करावे?

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>मला दोन गोष्टी आणखी सांगायच्या आहेत, अर्थसंकल्पाविषयी. आपला जो खर्च आहे त्यामध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. त्यात खेमाणी नाल्याचा जो प्रकल्प आहे तो आपण आपल्या निधीतुन करत आहोत. एक २९ कोटी होते ते वाढुन ९ कोटी त्यात वाढले, असे काही छोटे मोठे खर्च वाढणार आहेत. जेवढे आपले बजेटची सरप्लस आपल्याकडे राहिल, कालच मी शासनाकडुन मागणी केली तर ते मोठया प्रोजेक्टसाठी ४ आणि ५ कोटी देण्यास तयार आहेत. तर अट एकच आहे की तुमचे स्वत:चा सहभाग असावा. तर २५ टक्के आपला सहभाग पाहिजे तर सरप्लस आपणाकडे पैसे पाहिजे. भविष्यात अंदाजपत्रकामध्ये आपण कोठुन पैसे दाखविणार. तर यात आपण जर २० कोटी सरप्लस केले, २० कोटी रुपये कपात केली दुस—या खर्चामध्ये तर आपण १०० कोटी रेस करु शकु. आणि १०० कोटीचे कामे करु शकु. तर २० कोटी रुपये आताच खर्च करायचे काय की त्याचे वाढवुन पुढच्यावर्षी करायचे ते आपण ठरवा.

<u>उप—महापौर :—</u>मा. महापौर, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, सर्व प्रथम स्थायी समितीचे सर्व सदस्यांचे आभार व्यक्त करते त्यांनी जो विषय आणला आहे तो खरोखर चांगला आणला आहे. पाण्याची समस्या याबाबत महासभेत आपण भरपुर चर्चा केली, आयुक्त महोदय यांचे सुध्दा ऐकले. आयुक्त साहेबांना पाण्यासाठी ब—याचवेळा पाणसाठी फोन केला व समस्या सांगितली. आमच्या विभागातील महिलांची सभा घेतली आणि महिलांसंदर्भात त्यांना माहिती दिली आणि महिलांना सांगितले की आयुक्त महोदयांचे म्हणणे आहे की, आपण पाणी कमी वापरावे. आपण आमच्या पाठीशी आहेत परंतु अधिकारी मात्र नगरसेवकांच्या पाठीशी राहत नाहीत. माझ्या प्रभागामध्ये १०० टक्के ब्ल्यु लाईनीचे काम झालेले आहे. आम्ही स्वत: करुन घेतलेले आहे. आणि असा कोणताही नगरसेवक नाही की तो म्हणतो की नविन लाईन टाकु नका. एकाच लाईनीतुन तुम्ही एकच वेळी पाणी सोडा. आम्ही स्वत: सांगुन सुध्दा आमच्या प्रभागात वेळेवर पाणी सोडले जात नाही. नागरीक काम धंदा करणारा, झोपडपट्टीत राहणारा, रात्री मेहनतीचे काम करुन उशिरा घरी येणार, पाण्यासाठी रात्र रात्रभर जागे रहावे लागते. पाणी मिळत नाही, पाण्याची एक वेळ ठरवा. ब—याचदा पाण्याची सभा झाली त्यात सांगितले गेले की तुम्ही पाण्याची वेळ ठरवा. सकाळी दयायचे कि संध्याकाळी दयायचे अशा पध्दतीने तुम्ही जर व्यवस्थीत पाणी दिले तर पाणी व्यवस्थित येईल तीन तीन दिवस पाणी येत नाही. माझा सव्वा दोन वर्षाच्या कालावधीत मी झोपडपट्टयांमध्ये फिरले प्रत्येक झोपडपट्टीमध्ये तीच अडचण आहे. मी श्री. आशान मॅडमकडे सुध्दा गेली, समतानगरमध्ये फिरली, ब—याच ठिकाणी गेली, विशेष करुन झोपडपट्टयांमध्ये पाणी नाही, तीन तीन दिवस पाणी येत नाही. त्याचबरोबर शेडयुलप्रमाणे शुक्रवारी पाणी बंद असते, त्यात भर शनिवारी सुध्दा पाणी भेटत नाही आणि रविवारी जर काही अडचण आली तर पाणी मिळत नाही. ब—याच ठिकाणी पाणी नसते, यात नागरीकांची काय चुक आहे, नागरीक झोपडपट्टीत राहतात त्यांची चुक आहे का, नागरीकांना काही अडचण नसते मोटर चालवायची. त्यांना एक एक रुपयाचा हिशोब दयावा लागतो त्यांना हौस नसते बिल वाढवायची. नाईलाजाने त्यांना मोटर चालवावी लागते, कारण तीन तीन दिवस पाणी येणार नाही आणि त्यामुळे त्यांना मोटर चालवावी लागते, मी महापौर महोदयांना विनंती करते की त्यांनी अधिका—यांची सभा घेवुन लवकरात लवकर पाण्याची समस्या सोडवावी. तसेच आमच्याबरोबर सुध्दा सभा घ्या, प्रभागात कशा कशा पाण्याच्या समस्या आहे ते कळेल, तुमचे अधिकारी काम करत नाहीत. जेएनएनयुआरएमची योजना आली ती योजना येवुन १० वर्ष झाली, ती योजना पुर्ण होत नाही त्याचा भुर्दंड नागरीकांना भोगावे लागते. टॅक्नीकल जर पार्ट असेल तर ते नगरसेवकांना येत नाही, हे अधिका—यांचे काम आहे, अधिकारी बरोबर काम करत नाही. ही योजना जेथे जेथे अपुर्ण आहे ती पुर्ण कराच व जेथे १०० टक्के पुर्ण आहे तेथे सुध्दा सुरु करा. एलबीटीच्या संदर्भात म्हटले तर दिवाळीपासुन आपण एलबीटी वसुल करु शकलो नाही ती बंद झाली. त्याचबरोबर ड्रेनेजचा प्राब्लेम आहे, नगरसेवक निधी सुध्दा आपण ५० टक्के कपात केलेला आहे. आता निवडणूका जवळ आहे, त्याचबरोबर इतर जो काही निधी आहे तो मागील वर्षाचा आहे. काहींचे प्राकलन तयार आहेत काहींच्या निविदा काढल्या आहेत तर आपण अशा ठिकाणी कशाप्रकारे ५० टक्के कपात करणार?

त्यासाठी तुम्ही प्रत्येक नगरसेवकांनी जेथे जेथे कामे मागणी केली आहे तेथे ५० टक्के तुम्ही देणार पण ज्यांनी मागणी केली नाही, त्यांची कामे झाली नाही त्यांना कसे तुम्ही ५० टक्के देणार. ठिक आहे तुम्ही ५० टक्के करा कपात आम्ही सहकार्य देतो परंतु गेल्या वर्षाचा जो निधी आहे तो मिळाला पाहिजे. आम्ही नगरसेवक तुम्हांला सहकार्य करतो तुम्ही सुध्दा आम्हां नगरसेवकांना सहकार्य करावे, धन्यवाद।

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>सचिव महोदया, ठराव वाचा.

<u>महापालिका सचिव:—</u>मी ठराव वाचुन दाखविते.

ही विशेष महासभा सभेमध्ये झालेल्या चर्चेअंती असा निर्णय घेत आहे की, उल्हासनगर शहरातील विकास कामे ठप्प झाल्याने पाणी पुरवठा समस्या, प्रदुषण, आरोग्य यावर प्रभाव पडला आहे. तरी उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये अर्थसंकल्प २०१५—१६ च्या अधिन राहून, कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन ई निविदा काढण्यात आल्या असून, तशी प्राकलने तयार करण्यात आली आहेत. परंतु प्रशासनाच्या धिम्यागतीच्या कामामुळे कामाचे आदेश दिले गेले नाहीत. त्यामुळे नगरसेवकांनी प्रस्तावित करुन मंजूर झालेली तसेच आयुक्तांच्या आदेशाने मंजूर झालेली कामेही होवू शकली नाहीत. पुढील दोन महिन्यात उल्हासनगर महानगरपालिकेची निवडणूक होत असून, कामे न झाल्याने नागरीक त्रस्त आहेत.

तरी महानगरपालिकेतील विविध विभागामधील सन २०१५—१६ च्या अर्थसंकल्पातील ज्या नगरसेवकांची आजतागायत उर्वरित राहिलेले निधीच्या कामाचे आदेश किंवा प्राकलन मंजूर करुन त्वरीत कामाचे आदेश देण्यास तसेच महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती, सभागृह नेता, विपक्षनेता व सर्व पक्षाचे प्रमुख गटनेता यांची व आयुक्त यांची दिनांक १९/११/२०१६ रोजी बैठक झाली सदर बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे २०१६—१७ च्या अंदाजपत्रकातील निधीपैकी ५० टक्के निधीची कामे मंजूर करुन त्यांचे सुध्दा प्राकलन तयार करुन दिनांक ७ डिसेंबर २०१६ पर्यंत सर्व शॉर्ट नोटिसने ई निविदा व मॅन्युअल निविदा काढून लवकरात लवकर कामे मंजूर करुन कामाचे आदेश देण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल. पास?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>उत्पन्न वाढविण्यासाठी मी आपणांस सूचना देतो. गर्व्हमेंटने २००६ मध्ये रेग्युलायझेन इलिगल स्ट्रक्चर ऑफ उल्हासनगरसाठी स्पेशल ॲक्ट केले होते त्याचे काम पुर्ण थांबले आहे.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ <u>विषय क्र. १:—</u> उल्हासनगर महानगरपालिकेत जमा होणा—या एलबीटी वसूली, मालमत्ता कर, पाणी समस्या, प्रदूषण व आरोग्य या विषयावर चर्चा होणे.

<u>प्रस्तावना:—</u>

गेल्या वर्षभरात शहरातील विकास कामे ठप्प झाले असून, नागरी सुविधेची दैनंदिन कामे देखील पार पडत नाही. त्यामध्ये प्रामुख्याने महासभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार एलबीटीच्या वसूली संदर्भात प्रशासनामार्फत कार्यवाही बाबत सुधारणा नाही. तसेच मालमत्तेची वसूली पाहता शहरातील विकास कामे करणे कठिण होवून ठप्प झाली आहेत. याबाबत संबंधीत अधिकारी जबाबदार आहेत. नगरसेवक वेळोवेळी प्रशासनासोबत असून देखील मोठ मोठया व्यापारांच्या थकबाकीदारावर कार्यवाही न होणे त्यामुळे महापालिकेच्या उत्पन्नावर विपरित परिणाम झाल्याने त्यामहे एमआयडीसी देयक अदान केल्याने शहरातील पाणी पुरवठामध्ये कपात करणे व त्यामुळे शहरात पाणी समस्या प्रश्नास सामोरे जावे लागत आहे. तसेच नव्याने वितरित केलेल्या जेएनएमआरएम योजनेअंतर्गत टाकण्यात आलेल्या वितरण व्यवस्था बाजवारा उडलेला आहे. तसेच भुयारी गटार योजना रस्त्यांना पडलेले खड्डे, प्रदुषण व आरोग्य विषयक समस्यांना नागरीकांना सामोरे जावे लागत असल्याने प्रशासनाच्या या कामकाजाच्या दिर्घगाईमुळे व आडमुठी भूमीकेमुळे नागरीकांच्या रोष नगरसेवकांवर ओढला जात आहे.

तरी याबाबत चर्चा विनिमय करण्याकरीता विशेष तात्काळ महासभा लावण्याबाबत स्थायी समितीचे खालील सहया करणारे सदस्य आपणांस विनंती करित आहे. तरी विशेष महासभेचे आयोजन करण्यात यावे, ही विनंती.

१. श्री. विजय चाहू पाटील
२. श्री. सुनिल सुर्वे
३. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
४. श्रीमती लिलाबाई आशान

<u>विशेष महासभा ठराव क्र:</u> २७        <u>दिनांकः—२५/११/२०१६</u>

सुचकाचे नाव : श्री. धनंजय बोडारे
अनुमोदकाचे नाव : श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही विशेष महासभा सभेमध्ये झालेल्या चर्चेअंती असा निर्णय घेत आहे की, उल्हासनगर शहरातील विकास कामे ठप्प झाल्याने पाणी पुरवठा समस्या, प्रदुषण, आरोग्य यावर प्रभाव पडला आहे. तरी उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये अर्थसंकल्प २०१५—१६ च्या अधिन राहून, कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन ई निविदा काढण्यात आल्या असून, तशी प्राकलने तयार करण्यात आली आहेत. परंतु प्रशासनाच्या धिम्यागतीच्या कामामुळे कामाचे आदेश दिले गेले नाहीत. त्यामुळे नगरसेवकांनी प्रस्तावित करुन मंजूर झालेली तसेच आयुक्तांच्या आदेशाने मंजूर झालेली कामेही होवू शकली नाहीत. पुढील दोन महिन्यात उल्हासनगर महानगरपालिकेची निवडणूक होत असून, कामे न झाल्याने नागरीक त्रस्त आहेत.

तरी महानगरपालिकेतील विविध विभागामधील सन २०१५—१६ च्या अर्थसंकल्पातील ज्या नगरसेवकांची आजतागायत उर्वरित राहिलेले निधीच्या कामाचे आदेश किंवा प्राकलन मंजूर करुन त्वरीत कामाचे आदेश देण्यास तसेच महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती, सभागृह नेता, विपक्षनेता व सर्व पक्षाचे प्रमुख गटनेता यांची व आयुक्त यांची दिनांक १९/११/२०१६ रोजी बैठक झाली सदर बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे २०१६—१७ च्या अंदाजपत्रकातील निधीपैकी ५० टक्के निधीची कामे मंजूर करुन त्यांचे सुध्दा प्राकलन तयार करुन दिनांक ७ डिसेंबर २०१६ पर्यंत सर्व शॉर्ट नोटिसने ई निविदा व मॅन्युअल निविदा काढून लवकरात लवकर कामे मंजूर करुन कामाचे आदेश देण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही /—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u>कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ६.२५ वाजता महापौर श्रीमती अपेक्षा विकास पाटील यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका